र क्त क म ळे

(भारतीय क्रांतिकारकांच्या कथा)

लेखक :

त्र्यं. रा. गोडगे,
बी. ए., बी. टी.

एकमेव विक्रेते :

श्री लेखन वाचन भांडार

ढोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०.

रक्तकमळे

(भारतीय क्रांतिकारकांच्या कथा)

लेखक :
त्र्यं. रा. गोडगे,
बी. ए., बी. टी.

किंमत १४ रुपये

एकमेव विक्रेते :
श्री लेखन वाचन भांडार
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०.

प्रकाशक :
त्र्यं. रा. गोडगे
सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी
लक्ष्मी कारंजा
अहमदनगर.

पहिली आवृत्ती : १९७५

सुधारून वाढविलेली
दुसरी आवृत्ती : १९७६

मुद्रक :
मा. प. तळेकर
श्री दत्त मुद्रणालय,
३२५ शनिवार पेठ,
पुणे ३०.

प्रस्तावना

रक्तकमळांना आदरांजली

अठराशेसत्तावन सालच्या स्वातंत्र्य-संग्रामात हिंदी सामर्थ्य पराभूत झाले. अग्नी शांत झाला तरी, वरवर दिसणाऱ्या राखेखाली निखारे धगधगत होते. त्या निखाऱ्यांनी वासुदेव बळवंत फडक्यांच्या अंतःकरणात सशस्त्र क्रान्तीचा पोत पाजळला. फडक्यांच्या जीवनातूनच चाफेकर बंधू व स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्फूर्ती घेतली आणि सावरकरांच्या 'अभिनव भारताने' देशभर क्रान्तीचे चुडे पेटविले. फिनिक्स या नावाचा एक पक्षी आहे की, तो मरण पावल्यावर त्याच्या मृत देहाच्या मातीतून त्याच्यासारखे पक्षी जन्म घेतात, असा एक समज काही देशांत पूर्वी होता. हुतात्म्यांची राख देखील चैतन्यमय भस्म आहे. त्या भस्मातून नवनवे क्रान्तिकारक देह धारण करतात. बलिदानाच्या वेदीवर सांडलेले हुतात्म्यांचे रक्त कधी सुकत नाही, कधी गोठत नाही. ते सदैव अमृत असते, संजीवनी असते. त्या रक्तातून नवीन क्रान्तिकारकांच्या हृदयात प्राण ओतले जातात. अशा तऱ्हेने भारताच्या स्वातंत्र्यासाठी क्रान्तिकारकांच्या कैक पिढ्यांनी आपली शिरकमले वाहिली! तीच ही रक्तकमळे! विशी-पंचविशीतील तरुणांच्या खांद्यांना खांदे देऊन पंधरा-सोळा वर्षांच्या कोवळ्या मुला—मुलींनी देखील क्रान्तिकालीच्या चरणी आपली जीवने वाहिली! अशी आहे आपली प्रभावी परंपरा! असा आहे आपला विजिगीषू वारसा आणि असा आहे आपला उज्ज्वल इतिहास!

तरुण मनाला अद्‌भुताची ओढ अधिक असते. म्हणूनच तरुण विद्यार्थी अद्‌भुत गोष्टी, हेरकथा, रहस्यकथा इ. वाचण्यात दंग होतात सशस्त्र क्रान्तिकारकांची जीवने तर अद्‌भुत प्रसंगांनी रसरसलेली. हे प्रसंग वाचताना विद्यार्थ्यांच्या-मनाची भूक तर शान्त होईलच, त्याशिवाय त्यांच्या अंतःकरणांवर उदात्ततेच्या संस्कारांचे ठसेही उमटतील.

आता मनू पालटला आहे. देश स्वतंत्र झाला आहे. पिस्तुले व बॉम्ब घेऊन क्रान्तिकारकांप्रमाणे शत्रूशी लढण्याची गरज उरली नाही. तथापि देशात राक्षसाप्रमाणे किती तरी आव्हाने उभी आहेत! निरक्षरता, विज्ञानाबद्दल अज्ञान, वर्गकलह, रोगराई, दारिद्र्य, जातिविषमता आणखी किती तरी! तरुण मनांनी यांतले एक आव्हान स्वीकारून त्यासाठी जरी आपले जीवन वेचले तरी त्यांचे जीवन त्या हुतात्म्यांप्रमाणेच उज्ज्वल होईल.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी हिंदी राष्ट्रसभेने महर्षी दादाभाई नौरोजी यांच्या नेतृत्वाखाली रणशिंग फुंकले. लो. टिळक व महात्मा गांधी ह्यांच्या कर्तृत्वाने

देश स्वतंत्र झाला. गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी सुरू केलेली असहकारितेची व सविनय कायदेभंगाची चळवळ व एकोणिसशे-बेचाळीसची मोहीम यांमध्ये इंग्रज सरकारच्या सैतानी हल्ल्यांमुळे हजारो देशभक्तांची शिरे स्वातंत्र्याच्या वेदीवर पडली. ती एक स्वतंत्र यशोगाथा आहे. ह्या पुस्तकाच्या छोट्या कक्षेत ती मावणारी नसल्यामुळे येथे फक्त सशस्त्र क्रान्तिकारकांच्याच कथा घेतल्या आहेत.

दिल्ली येथे दोन–तीन वर्षांपूर्वी स्वातंत्र्य लढ्यात शिक्षा भोगून आलेल्या स्वातंत्र्य–सैनिकांची अधिवेशने भरली होती. त्या वेळी 'क्रांति अंक' प्रसिद्ध करण्यात आले. काळ्या पाण्याचा अथवा दीर्घ मुदतीचा कारावास भोगून आलेले 'गदर' चे क्रांतिकारक, काकोरी कट व बंगाल्यातील सूर्यसेनांचे कार्यकर्ते, भगतसिंह-चंद्रशेखर आझादाचे सहकारी इ. क्रांतिकारकांनी त्या अंकात सशस्त्र क्रान्तीचे स्वतः पाहिलेले व अनुभवलेले प्रसंग दिले आहेत. ते प्रसंग वाचून हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मला झाली. इतिहासाच्या कालप्रवाहाला धरून मी त्या स्वातंत्र्य-लढ्यातील प्रसंगांची मांडणी केली. उपरोक्त प्रसंग त्रुटित व तुटक तुटक होते. ह्यास्तव संगतवार मांडणी करण्याच्या व माहितीच्या दृष्टीने मला बऱ्याच संदर्भ ग्रंथांचा उपयोग झाला. म. म. चित्राव शास्त्र्यांचा अर्वाचीन चरित्रकोश, श्री. शिखरे यांचे 'आमचे स्वातंत्र्य लढे', श्री. राजा मंगळवेढेकर यांची 'स्वातंत्र्य-लढ्याबरची पुस्तकमाला', श्री. दाते यांचे 'भारतीय स्वातंत्र्याचे रणझुंजार' ह्या सर्वांचा मी ऋणी आहे. श्री. राम निसळ (खंदे स्वातंत्र्य-सैनिक व 'आझाद हिंद' चे संपादक.) ह्यांनी पुरविलेल्या 'क्रान्ती' अंकामुळे ही कल्पना जन्माला आल्यामुळे मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

ज्या शेकडो क्रान्तिवीरांनी स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणांची कुर्बानी केली, त्यांच्या स्मृतीला शेवटी सादर वंदन.

२० फेब्रुवारी १९७५ — लेखक

दुसऱ्या आवृत्तीच्या संबंधात—

पाचसहा वर्षांपूर्वी दिल्ली येथे स्वातंत्र्य सैनिकांचे दोन वर्षे मेळावे भरले होते. त्या वेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'क्रांति'अंकात स्वातंत्र्यलढ्यात काळे पाणी पाहून आलेल्या व अन्य कारागृहांत दीर्घ मुदतीच्या खडतर शिक्षा भोगून आलेल्या क्रांतिवीरांनी स्वतःसंबंधी व स्वतःच्या सहकाऱ्यांसंबंधीची क्रांति-कार्यातील माहिती निवेदन केली आहे. त्या अंकातील मजकुराने माझ्या मनाची इतकी पकड घेतली की, आजच्या पिढीला त्या माहितीचा परिचय होणे, सुसंस्कार, इतिहास व स्फूर्ती या दृष्टीने उपकारक होईल, असे मला वाटले. यास्तव त्या विषयावर मिळाली तेवढी पुस्तके वाचून कालानुक्रमे, संगतवार रीतीने व ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर भारतीय क्रांतिकारकांच्या कथा चित्रित केलेले 'रक्तकमळे' हे पुस्तक मी फेब्रुवारी एकोणीसशे पंचाहत्तर साली लिहून प्रसिद्ध केले. सन १८५७ पासून नेताजी सुभाषचंद्र बोसपर्यंतच्या ज्या क्रांतिकारकांनी धारातीर्थी, बॉम्ब-स्फोटात, इंग्रजांशी लढताना, अथवा फाशीच्या तक्त्यावर स्वतःची शिरकमळे अर्पण केली, अशाच प्रमुख क्रांतिकारकांच्या जीवनकथा या पुस्तकात संकलित करण्यात आल्या आहेत. या पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतर क्रांतिकारांच्या संबंधाने आणखी काही पुस्तके वाचनात आली. त्यांत आढळून आलेल्या काही नवीन, अद्भुत व विस्मयकारक माहितीची भर या आवृत्तीत जुन्या धड्यांत घालण्यात आली आहे. पं. शामजी कृष्ण वर्मा, मॅडम कामा, डॉ. खानखोजे ही मंडळी जरी प्रत्यक्ष कारागृहात गेली नाहीत, तरी त्यांनी क्रांतीच्या दिशेने केलेले कार्य इतिहासात सुवर्णाच्या रंगाने रेखाटण्याइतक्या तोलामोलाचे आहे. यास्तव हे व इतर काही क्रांतिकारक यांच्या जीवनावरील नवीन चौदा धडे या आवृत्तीत घालण्यात आले आहेत. त्यामुळे पहिल्या आवृत्तीपेक्षा ह्या आवृत्तीतील पुस्तकाचा आकार साधारणतः दुप्पट झाला आहे. तथापि हे सर्व करताना पाल्हाळ व अधिक माहिती शक्य तितकी संक्षिप्त केली असून माहितीची अद्भुतता, स्फूर्तिप्रदतता व रंजकता यांच्याकडे लक्ष पुरविले आहे.

इंग्रजांसारख्या बलाढ्य शस्त्रधारी सत्ताधीशाबरोबर स्वातंत्र्यासाठी लढा देणे, हे काही व्यक्तींचे अथवा गटांचे काम नव्हे. निःशस्त्र जनतेची मने स्वातंत्र्याच्या आकांक्षेने चेतविली पाहिजेत व स्वातंत्र्याची चळवळ ही जनतेची चळवळ केली पाहिजे, हे तत्त्व लो. टिळकांनी ओळखले होते. म्हणूनच 'केसरी'तील लिखाण, शिवाजी-उत्सव, गणेशोत्सव व कॉंग्रेसचे व्यासपीठ या साधनांच्या द्वारे त्यांनी जन-सामान्यांच्या मनात 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तो मिळविणारच' हा मंत्र बिंबविला. त्यानंतर महात्मा गांधीजींनी देशभरातील जनतेची हृदये स्वातंत्र्याच्या कल्पनेने भारून टाकली. जनतेची संघटना उभी केली. या देशव्यापी चळवळीने एखाद्या खवळत्या महासागराच्या सामर्थ्याने ब्रिटिश साम्राज्यशाहीला धडका मारून एका बाजूने तिला खिळखिळे केले, तर दुसऱ्या महायुद्धामुळे


कोसळलेल्या संकटामुळे दुसऱ्या बाजूने ती साम्राज्यशाही हादरली गेली. अठराशे सत्तावन्नला सुरू झालेल्या स्वातंत्र्यमंदिराच्या उभारणीचे काम शेवटी एकोणीसशे सत्तेचाळीसला पूर्ण झाले. जनतेच्या पाठिंब्याशिवाय ब्रिटिश साम्राज्याविरुद्धची उठावणी यशस्वी होणार नाही, याची जाणीव वासुदेव बळवंत फडके, पिंगळे, कर्तारसिंग, भगतसिंह, सूर्यसेन या सर्वांना चांगल्या तऱ्हेने होती. त्या दृष्टीने बऱ्याच पलटणी काही क्रांतिकारकांनी आपल्या बाजूस वळविल्या देखील होत्या. त्या योजना यशस्वी झाल्या असत्या तर कदचित इतिहासाचा ओघ भिन्न दिशेने वाहिला असता. परंतु अदृष्टात तसे लिहिले नव्हते. दारूचे कोठार जसें एखाद्या ठिणगीने भडकून उठावे, तसे फितुरीच्या ठिणगीने क्रांतिकारकांचे भव्य मनसुबे भस्मीभूत झाले. असें जरी असले, तरी स्वातन्त्र्याच्या मंदिराच्या उभारणीत क्रांतिकारकांचा वाटा मोठा आहे. शेकडो ज्ञात-अज्ञात नरनारींनी आपल्या शिरकमलांनी व रक्ताने त्या वास्तूची उभारणी केली आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, आजच्या सुशिक्षितांच्या पिढीला भगतसिंह, चंद्रशेखर आझाद, सावरकर इ. बोटांवर मोजण्याइतक्या क्रांतिकारकांची देखील साधारण माहिती असत नाही, तिथे इतर जनांच्या बाबतीत विचारच करायला नको. क्रांतिकारकांचा त्याग, शौर्य, धैर्य, दानत, इमान व देशप्रेम या गुणांनी भारताचा इतिहास उजळून निघाला आहे. त्यांनी आमच्यासाठी रक्त सांडले. आम्हाला निदान त्या रक्ताच्या शौर्यशाली कथांची ओळख तरी असायला हवी. या पुस्तकात सुमारे सव्वाशे क्रांतिकारकांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

'रक्तकमळे' प्रकाशात आणण्यास माझे परम मित्र सुप्रसिद्ध जानपदकवी व कथालेखक श्री. ग. ल. ठोकळ यांनी मला खूप उत्तेजन दिले. तसेच पुस्तकाची पहिली आवृत्ती सत्वर संपुष्टात येण्यास पुढील सज्जनांचे साहाय्य व सहकार्य लाभले, नगर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आमदार श्री. शंकरराव काळे, बी. एस्सी., बी. ई. खासदार श्री. बाळासाहेब विखे आणि नगर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री. यशवंतराव गडाख, बी. ए., बी. एड. यांच्या साहाय्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे, हे माझे कर्तव्य आहे. तसेच काही शाळा, कॉलेजे, नगरपालिका शिक्षण मंडळे व जिल्हा परिषदा यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पुस्तक आकर्षक करण्यात चित्रकार श्री ग. वि. देशपांडे व मुद्रक श्री. माधवराव तळेकर या स्नेह्यांनी घेतलेल्या परिश्रमांबद्दल मी त्यांचे आभार मानलेच पाहिजेत.

शेवटी भारताच्या स्वातंत्र्यलढा लढलेल्या ज्ञात-अज्ञात झुंजार वीरांनो व वीरांगनांनो, तुमच्या उज्ज्वल स्मृतीला कृतज्ञतापूर्वक वंदना !

२०, डिसेंबर १९७६ —लेखक

अनुक्रमणिका



— १ —

इ. स. १८५७. भारताच्या इतिहासात ते साल अग्निरेखेने रेखाटले गेले. अग्निरेखेने इतिहास रंगविणारी ती माणसे भूतकाळाच्या अंधाऱ्या पडद्याआड गेली. त्यांची शरीरे जरी काळाच्या पडद्याआड गेली असली तरी त्यांच्या देदीप्यमान पराक्रमाच्या प्रकाश-झोताने शेकडो देशभक्तांना पारतंत्र्याच्या अंधारातून वाट दाखविली. शेकडो क्रांतिकारकांची हृदये विद्युत्शक्तीने लहरून सोडली. अठराशेसत्तावन सालच्या त्या ज्वालामुखीसारख्या प्रचंड स्फोटाने इंग्रजी सत्तेचे बुरूज हादरले. बुरूज हादरले, परंतु इमले कोसळले नाहीत. आणि ज्वालामुखी जरी विझला तरी त्याचे उद्रेक मधून मधून इंग्रजी सत्तेच्या इमल्यांना धक्के देतच होते.

सत्तावनच्या स्फोटाची कारणे अनेक होती. त्या सर्वांचे सार म्हणजे इंग्रजांनी कपटाने, विश्वासघाताने व तलवारीने, फसवणुकीने हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांची सत्ता काढून घेतली. जुलमी कराखाली सामान्य जनता वाकून गेली. कारागिरांचे धंदे बसविले गेले. हिंदी जनतेची पिळवणूक करून हिंदुस्थानातील संपत्तीची धार इंग्लंडकडे वळविण्यात आली. इंग्रजी तलवारीने हिंदी राजेरजवाड्यांची तक्ते फोडली. इंग्रजी तागडीने हिंदी व्यापाराची बाजारपेठ मोडली आणि तागडी-तलवारीमागून आले खिस्ताचा क्रूस घेऊन खिस्ती धर्मगुरू. त्यांनीही हिंदू धर्मावर हल्ले करण्यास सुरुवात केली. अशा रीतीने राजकीय, आर्थिक व धार्मिक जुलमामुळे जनतेच्या मनात इंग्रजी सत्तेबद्दल असंतोष धुमसत होता. त्याला वाचा फोडली अठराशेसत्तावन सालाने. डुकराच्या व गाईच्या चरबीने माखलेली काडतुसे लष्करातील शिपायांना देण्यात आली. हे तात्कालिक निमित्त मात्र कारण झाले.

प्रतीके कुणाच्या प्रतिभासंपन्न कल्पनेतून स्फुरली कोण जाणे. तथापि क्रांतीची साद घालण्यासाठी लाल कमळे व चपात्या ह्यांच्याइतकी अर्थवाही सुंदर प्रतीके योजणाऱ्याच्या प्रतिभेचे कौतुक करावे तेवढे थोडेच. चपात्या म्हणजे अन्नब्रह्म. अन्नाची आणभाक म्हणजे इमान. लाल कमळे म्हणजे क्रांतीच्या वेदीवर बलिदान. हिंदी लोकांना इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी एका गावाहून दुसऱ्या गावाला चपात्या पाठविण्यात येऊ लागल्या. लाल कमळे निरनिराळ्या छावण्यांतील सैनिकांच्या हाता-हातांतून प्रवास करू लागली. ३१ मे १८५७ हा उठावणीचा दिवस ठरला. परंतु मंगल पांडे या शिपायास तोपर्यंत थांबणे असह्य झाले. त्याचा संताप अनावर झाला. भरलेली बंदूक घेऊन तो परेड मैदानावर गेला व त्याने इंग्रज अधिकाऱ्यांना बंदुकीने गोळ्या घालण्यास सुरुवात केली. मंगल पांडेला पकडण्यात आले व लष्करी कोर्टापुढे खटला चालून त्याला फाशी देण्यात आले.

मंगल पांडे याने पहिला बार काढला आणि मग ठिकठिकाणच्या पलटणी बिथरल्या. कानपूर, लखनौ, दिल्ली, ग्वाल्हेर, जगदीशपूर (अयोध्या प्रांत) इत्यादी ठिकाणच्या शिपायांनी इंग्रजांविरुद्ध हत्यार उचलले. ब्रह्मावर्त ह्या ठिकाणी असलेले पेशवे नानासाहेब, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सेनापती तात्या टोपे, कुंवरसिंह व दिल्लीचा म्हातारा नामधारी बादशहा बहादूरशहा ह्यांच्याकडे ह्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्व आले. सुरुवातीला ह्या मंडळींची सरशी झाली. तथापि सैन्यातील विस्कळितपणा व नेपाळ, ग्वाल्हेर, निजाम इत्यादी हिंदी राज्यकर्ते स्वातंत्र्य सैनिकांना साह्य करण्याऐवजी इंग्रजांच्या साह्यास गेले. त्यामुळे स्वातंत्र्ययुद्धात अपयश आले. शिवाय वरील कारणांच्या जोडीला फितुरी व विश्वासघात ही आलीच. लढयाची बाजी हरली, पण बाजी लावणारी शूर माणसे हरली नाहीत. स्वातंत्र्याच्या वेदीवर त्यांनी आपली शिरकमळे वाहिली.

नानासाहेब पेशवे हे दुसऱ्या बाजीरावाचे दत्तक पुत्र. बाजीराव पेशव्यांच्या बरोबर ते गंगाकिनारी ब्रह्मावर्त येथे राहात होते. बाजीरावांच्या मृत्यूनंतर त्याला देण्यात येणारी वार्षिक आठ लाख रुपयांची रक्कम इंग्रजांनी नानासाहेबांस देण्याचे नाकारले. त्यामुळे असंतुष्ट झालेल्या नानासाहेबांनी स्वातंत्र्य-संग्रामाचे नेतृत्व केले. नानासाहेब हे मनाने जसे दिलदार होते तसेच

वृत्तीने सालस व सात्त्विक होते आणि दिसायला भव्य व रुबाबदार होते. नेतृत्व करण्याला लागणारे गुण व व्यक्तित्व त्यांच्या ठायी होते. कानपूर व लखनौ ह्या ठिकाणी त्यांच्या नेतृत्वाने हिंदी फौजांनी इंग्रजांचा पराभव केला. त्या कामी त्यांचे सेनापती तात्या टोपे ह्यांनी शौर्य व मुत्सद्देगिरी ह्यांची शर्थ करून बाजी लढविली. तथापि नेपाळचा राजा, ग्वाल्हेरचे शिंदे व हैद्राबादचा निजाम इत्यादी बलाढ्य देशी राजे स्वातंत्र्ययुद्धास साह्य करण्याऐवजी इंग्रजांस जाऊन मिळाले. तसेच निरनिराळ्या ठिकाणच्या पलटणी जरी सुरुवातीस एकत्र आल्या होत्या तरी त्यांच्या वागणुकीत पुढे विस्कळितपणा व बेजबाबदारपणा आला. त्यामुळे हिंदी सैन्याचा पराभव झाला. इंग्रजी सैन्याने नानासाहेबांच्या वाड्यावर छापा घातला. त्यांच्या मुलीला पकडले. तिच्या अंगाला तेलाने भिजवलेल्या कापडांच्या चिंध्या गुंडाळल्या व तिला जिवंतपणी पेटवून देऊन जाळले. पराभवाचा डंख व कन्येच्या हृदयद्रावक भीषण अंत यांचे दुःख शिरी घेऊन हा अश्वत्थामा स्यमंतकाच्या शोधासाठी नेपाळात गेला. परंतु नेपाळच्या नरेशाने त्याची निराशा केली. नेपाळचे दैवत जे पशुपतिनाथ महादेव त्याचे दर्शन घेऊन नानासाहेब जे गडप झाले ते परत कोणालाही दिसले नाहीत.

आणि वीस-बावीस वर्षे वयाची झाशीची कोवळी राणी लक्ष्मीबाई तिने मांडीवर घेतलेला दत्तक अमान्य करून इंग्रजांनी तिचे राज्यच घशात घातले. त्यामुळे ती शूर राणी वाघिणीसारखी चवताळली. शिवाय इंग्रजांनी लोकांवर चालविलेल्या क्रूर अत्याचाराच्या कहाण्या राणीच्या कानांवर आदळत होत्या, डोळ्यांना दिसत होत्या. नानासाहेबांच्या लाडक्या मैनेने जिवंतपणी जळताना फोडलेल्या किंकाळ्यांनी तिचे हृदय द्रवले होते. मन संतापाने उफाळले होते. सूडाने पेटलेल्या इंग्रजांनी गावेच्या गावे पेटवून दिली. सापडलेल्या क्रांतिकारकांच्या सैनिकांना शेकडोंनी झाडांवर टांगून फाशी दिले. हे हृदयविदारक दृश्य पाहून राणीने संग्रामात उडी घेतली. इंग्रजी सैन्याने झाशीच्या किल्ल्याला वेढा दिला. राणीने शर्थीने व शौर्याने किल्ला लढविला. परंतु दैवच उलटले. एका फितुराने किल्ल्याची चोरवाट व दारूगोळा ठेवण्याचे कोठार इंग्रजांस दाखविले. झाशीजवळच्या टेकडीवरून इंग्रजांनी नेमका त्या कोठारावर तोफांचा मारा केला. किल्ला आगीने पेटला. दत्तक पुत्राला पाठीशी

बांधून व साथीला दोन-तीन शूर दासी घेऊन राणीने किल्ल्याच्या तटावरून घोडा फेकला. नानासाहेब-सेनापती तात्या टोपे यांची गाठ घेऊन राणी निरनिराळ्या आघाड्यांवर लढू लागली. इंग्रजी सैनिकांनी तिचा पाठलाग सुरू केला. राणी व सुंदर नावाची तिची शूर दासी ह्यांचे घोडे भरधाव पळत होते. इतक्यांत एका सैनिकाने सुंदरच्या घोड्याला घोडा भिडवून तिला ठार केले. ते पाहून राणीने घोडा मागे फिरविला. सुंदरला ठार करणाऱ्या शिपायाचे मुंडके राणीच्या तलवारीने धडापासून उडवून दिले. तथापि पाठलाग करणाऱ्या सैनिकांच्या गोळ्यांनी राणी घायाळ झाली. डोक्यावर झालेल्या तलवारीच्या वारांनी डोक्यातून रक्त निथळत होते. कपाळावर गोळी लागून डोळ्यातील बुबुळ बाहेर आले होते. राणीची शुद्ध हरपली होती. रक्ताने लाल झालेली राणी रणचंडिकेप्रमाणे दिसत होती. राणीबरोबर असलेले त्यांचे एक सेवक रामचंद्रपंत शेळके ह्यांनी राणीचा घायाळ देह जवळच असलेल्या एका साधूच्या झोपडीत ठेवला. राणीची प्राणज्योत मालवली. गंगादासबाबांनी चिता पेटविली. एक अग्निज्योत दुसऱ्या अग्निज्वालेत विलीन झाली. मानवी विकारां-वर जय मिळविलेल्या निर्विकारी गंगादासबाबांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले, कंठातून हुंदके ओसंडले.

अयोध्या प्रांताचा ऐंशी वर्षांचा वृद्ध राजा कुंवरसिंह नानासाहेब, लक्ष्मीबाई व तात्या टोपे ह्यांच्या खांद्याला खांदा देऊन, लढला. तथापि स्वातंत्र्यसैन्याचा पराभव झाल्यामुळे तो राजधानीकडे आश्रयासाठी निघाला. मागून इंग्रज सैन्य पाठीवर येत होते. नावेत बसून कुंवरसिंह गंगा नदी पार करीत होते. इतक्यात मागून बंदुकीच्या गोळ्या नावेवर येऊन आदळल्या. नाव कलंडली. कुंवरसिंह पोहून जाऊ लागले. एक गोळी कुंवरसिंहाच्या मनगटात घुसली. वेदना असह्य होऊ लागल्या. एका हाताने तलवार उपसून त्यांनी गोळी लागलेला हात कोपरापासून छाटून टाकला व ते पोहून किनाऱ्याला पोहोचले. दोन दिवसांनी हा म्हातारा शूर वीर आपल्या राज-वाड्यात मरण पावला.

तात्या टोपे हा नानासाहेबांच्या पदरी असलेला साधा हिशोबनीस. परंतु अंगच्या गुणांमुळे तो स्वातंत्र्य–सेनेच्या सेनापतिपदावर विराजमान झाला. तात्या टोपे हे नाशिक जिल्ह्यातील येवले गावचे राहणारे. शौर्य, युद्धाचे डावपेच व सैन्याच्या चपळाईच्या हालचाली ह्यांमुळे सुरुवातीला

त्यांनी इंग्रजी फौजांचे पराभव केले होते. तथापि मानसिंह ह्या मित्राने विश्वासघात करून तात्या झोपलेले असताना त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन करून दिले. राजद्रोह व खून करणे असे आरोप ठेवून इंग्रजांनी त्यांना फाशी दिले. खटल्याच्या वेळी तात्या टोपे आपल्या जबानीत म्हणाले, "मी इंग्रजी राज्यात जन्माला आलो नाही; तसेच इंग्रजांचा केव्हाही प्रजाजन नव्हतो. मग राजद्रोहाचा आरोप मजवर कसा लागू पडतो ? हाती उघडपणे शस्त्र घेऊन युद्धात मी हत्या केली असेल. पण खून, दरवडे, बायकामुलांची हत्या हे प्रकार मी केले नाहीत."

हिंदू आणि मुसलमान एकमेकांच्या रक्ताने रंगलेले सात पिढ्यांचे वैर विसरले. श्रीमंत नानासाहेब आणि बादशहा बहादूरशहा जफर, सेनापती तात्या टोपे आणि मौलवी अहमदशहा व पीर अली, राणा कुंवरसिंह, महाराणी लक्ष्मीबाई आणि बेगम हजरत महल ही सर्व मंडळी फिरंगी सत्ता उलथून टाकण्यासाठी एक दिलाने, एक ध्येयाने खांद्याला खांदा देऊन लढली. हजरत महल ही अयोध्येची बेगम मानिनी आणि शौर्यशालिनी. अपमानाने हृदय पेटले, सूडाने डोळ्यांत रक्त उतरले. हातात समशेर घेऊन आघाडीवर वीरश्रीने लढली. राणी व्हिक्टोरियाने हिंदी लोकांना शांत करण्यासाठी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तर हजरत महलने तोडीस तोड म्हणून स्वतःच्या नावाने दुसरा जाहीरनामा काढला. सेना हार गेली, पण बेगम हारली नाही. पराभवाचे दुःख पाठीशी घालून ती जी नानासाहेबांप्रमाणेच नेपाळच्या निबिड अरण्यात शिरली ती परत दिसली नाही, अपार शौर्य, अढळ निष्ठा व अभंग विश्वास ही सत्तावनच्या संग्रामाची वैशिष्ट्ये होती. म्हणूनच इंग्रजांनी कैद करून ब्रह्मदेशात मंडाले येथे ठेवलेला म्हातारा बहादुरशहा स्वतःचे वृद्धपण विसरून आवेशाने म्हणतो, हिंदुस्थानच्या तलवारी लंडनच्या सिंहसनाशी टकरी घेतील.

गाझियों में बू रहेगी जब तलक ईमानकी
तबतक लंडन तक चलेगी तेग हिंदुस्तानकी

अशी आहे अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्य-संग्रामाची अपेशी तथापि शौर्याने भरलेली तेजस्वी कथा. स्वातंत्र्यदेवीच्या पूजेसाठी त्या वीरांनी रक्तकमळे वाहिली. भारताच्या संजीवनी मातीत त्या हुतात्म्यांनी क्रांतीच्या विचाराच्या ठिणग्या पेरल्या. त्यांच्यावर स्वतःच्या रक्ताचे शिंपण केले. त्याच रक्तातून भावी कालातील स्वातंत्र्यवीरांनी देह धारण केले. त्याच ठिणग्यांनी त्यांच्या प्राणात क्रांतीचे तेज ओतले.

* *

२. गरुडझेप

(वासुदेव बळवंत फडके)

सुमारे शंभर वर्षांपूर्वीची (इ. स. १८७३) गोष्ट. पुणे शहराच्या चौकाचौकांतून थाळी वाजवून एक इसम दवंडी देत चालला होता. 'लोकहो, ऐका, आज सायंकाळी शनवारवाड्यासमोर माझे व्याख्यान आहे. आपला देश स्वतंत्र झाला पाहिजे. त्यासाठी आपणाला काय काय करायला पाहिजे ते सर्व मी सांगणार आहे. तरी सर्वांनी माझ्या व्याख्यानास यावे हो!' त्या काळी एखाद्या गोष्टीची सरकारी खबर जनतेस देण्यासाठी वेस्कर किंवा जागल्या चौकाचौकात थाळी वाजवून ती देत असे. परंतु व्याख्यात्यानेच स्वतःच्या व्याख्यानाची दवंडी पिटवीत गल्लोगल्ली फिरण्याचा वरील प्रकार अजब तर खराच. तथापि त्या गोष्टीला कारणही तसेच होते. दवंडी देत फिरणारा तो व्याख्याता होता सरकारी नोकरीतील एक कारकून, वासुदेव बळवंत फडके. व्याख्यानाचा विषय होता इंग्रजांची सत्ता ह्या देशातून घालवून देण्याचा. इंग्रजी राज्यात व पुण्यासारख्या शहरात अशा भयंकर विषयाची दवंडी देऊन स्वतःवर संकट ओढवून घेण्यास कोणाची छाती होणार! म्हणूनच वासुदेव बळवंत फडके स्वतःच दवंडी देत होते. ह्या एकाच उदाहरणावरून त्यांचे स्वातंत्र्यप्रेम, तळमळ व बेडरपणा हे गुण दिसून येतात.



आणि आश्चर्य असे की, वासुदेव बळवंत फडके यांच्यासारख्या कारकुनाचे व्याख्यान ऐकायला शनवारवाड्याजवळ तरुणांची झुंबड उडत असे. स्वातंत्र्य मिळविण्याचे नवे क्रांतिकारक विचार उघडपणे प्रतिपादन करून त्यांनी इंग्रजांच्या जुलमी राजवटीवर असंतुष्ट असणाऱ्या तरुण मनांवर मोहिनी टाकली. इंग्रजांच्या राजवटीवर सर्वच जनता रुष्ट होती. ह्यास्तव त्या असंतोषाला वाचा फोडणाऱ्याचे बोल ऐकण्यास तरुणांची गर्दी व्हावी, हे साहजिकच होते.

वासुदेव बळवंत जरी सरकारी नोकरीत होते, तरी ते एकसारखे रजेवर राहात. रजेच्या अवधीत ते गावोगाव हिंडून लोकांच्या मनांत इंग्रजी राज्याबद्दल अप्रीती निर्माण करीत. आईच्या आजारपणाची खबर लागून तिला भेटण्यासाठी त्याने रजा मागितली. परंतु त्यांनी मागितलेली रजा मंजूर झाली नाही. त्यामुळे रजामंजुरीची वाट न पाहता ते आईला भेटावयास गेले. तथापि ते गावी पोहोचण्यापूर्वीच आईचे प्राणोत्क्रमण झाले. शेवटच्या क्षणी ते आईला डोळे भरून पाहू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना इंग्रजी राज्ययंत्रणेची चीड आली.

वासुदेव बळवंत हे कुलाबा जिल्ह्यातील शिरढोण ह्या गावाचे राहाणारे. सुरुवातीला ते मुंबईस नोकरीला लागले. त्यानंतर पुणे येथे पलटणीच्या हिशोब खात्यात कारकून म्हणून त्यांची बदली झाली. त्यांच्या मनात सुरुवातीपासूनच इंग्रजी राजवटीबद्दल तिटकारा होता. शस्त्रबलाने इंग्रजी सत्ता उलथून टाकण्याचे विचार त्यांच्या मनात घोळत होते. तेवढ्यासाठी त्यांनी शस्त्रे चालविण्याचे ज्ञान मिळविण्याचे ठरविले. त्या वेळी पुण्यात लहुजीबुवा नावाच्या वस्तादाचा आखाडा प्रसिद्ध होता. वासुदेव बळवंत त्या आखाड्यात जाऊन जोर-बैठका काढू लागले. तरवार व दांडपट्टा फिरविणे, बंदूक उडवणे, गोफण फिरवणे अशा प्रकारचे मर्दमुकीचे शिक्षण त्यांनी तेथे संपादन केले. त्यानंतर हत्यारे पैदा करून तरुणांना त्यांनी ते शिक्षण दिले. इंग्रजांशी सशस्त्र लढा देण्यासाठी ते अनुयायी तयार करू लागले. तथापि शिकलेल्या लोकांत इंग्रजांविरुद्ध लढाई करण्याची हिंमत नाही हे त्यांना दिसून आले.

त्याच सुमारास महाराष्ट्रात दुष्काळाने कहर केला. दोन वर्षे पावसाचा

थेंब पडला नाही. हजारो माणसे अन्नपाण्यावाचून मेली व हजारो गुरे चारा-पाण्यावाचून मृत्युमुखी पडली. तथापि लठ्ठ पगार घेऊन ऐषआरामात राहणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या अंतःकरणाला काही त्या अभागी लोकांच्या करुण स्थितीमुळे पाझर फुटला नाही. दुष्काळी कामे, अन्न व वैरण ह्यांची सोय करण्याचे अधिकाऱ्यांच्या मनातही आले नाही. दुष्काळग्रस्त जनतेच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा गोऱ्या मिशनऱ्यांनी उठवण्याचा सपाटा चालविला खिस्ती धर्म स्वीकरण्याच्या अटीवर त्यांनी अडल्यानडलेल्या लोकांना अन्न व कपडा पुरविला. दुष्काळी परिस्थितीच्या कोंडीत पकडून हजारो लोकांना खिस्ती धर्मोपदेशकांनी बाटवून खिस्ती बनविले.

गोरे राज्यकर्ते व गोरे धर्मोपदेशक यांच्या चढाऊ व कावेबाज वागणुकीची वासुदेव बळवंत फडके यांना चीड व संताप आला. इंग्रजांचे राज्य घालवून स्वातंत्र्य मिळविण्याशिवाय देशाची स्थिती सुधारणार नाही, अशी त्यांची खात्री झाली. त्यांच्या डोळ्यांसमोर मूठभर अडाणी मावळ्यांच्या साहाय्याने हिंदवी स्वराज्य उभारणाऱ्या शिवछत्रपतींचा आदर्श होता. त्यांच्या डोळ्यासमोर सत्तावनच्या स्वातंत्र्यवीरांचे क्षात्रतेज तरळत होते. शिक्षणामुळे भेकड बनलेल्या सुशिक्षित माणसांचा नाद सोडून देऊन त्यांनी रामोशी, कोळी, ठाकर इत्यादी आदिवासी लोक हाताशी धरले. आपल्या देशाच्या दुःस्थितीला इंग्रज लोकच कसे जबाबदार आहेत, हे वासुदेव बळवंतांनी त्यांना पटवून दिले. त्या इमानी लोकांना त्यांनी हत्यारे चालविण्याचे शिक्षण दिले, शस्त्रे पुरविली. वासुदेव बळवंतांचे सैन्य उभे झाले.

वासुदेव बळवंतांनी बंदुकी, तरवारी, भाले, पिस्तुले इत्यादी गाडीभर शस्त्रे पुणे येथे आपल्या घरी जमा करून ठेविली होती. ती गाडीभर हत्यारे त्यांनी पुण्यापासून आठ–दहा मैल अंतरावर असलेल्या लोणी गावी नेली. रामोशी कोळी, ठाकर अशा आपल्या अनुयायांचा तेथे दरबार भरविला. प्रत्येकाच्या हातावर दहीपोहे ठेवण्यात आले. स्वातंत्र्याच्या चळवळीशी इमान राखीन, अशी शपथ प्रत्येकाने घेतली, बेलभंडार उचलला. त्यानंतर सर्व सैनिकांना हत्यारे देण्यात आली, फेटे, मंदिल बांधण्यात आले. मिष्टान्नाचे जेवण देण्यात आले.

पहिली पत्नी वारल्यावर वासुदेव बळवंतांनी दुसरे लग्न केले. ती पत्नी म्हणजेच गोपिकाबाई होत. वेळप्रसंग आल्यास आपल्या पत्नीलाही

परिस्थितीबरोबर दोन हात करता यावेत म्हणून त्यांनी तिला लिहिणे-वाचणे घोड्यावर बसणे, तरवारीचे हात करणे, बंदुकीने नेम मारणे ह्या गोष्टी शिकविल्या होत्या. वीरपत्नीला साजेसे शिक्षण गोपिकाबाईंना मिळाले होते. तथापि स्वारीवर बाहेर निघण्यापूर्वी इंग्रजांच्या उपद्रवापासून सुरक्षिततेच्या दृष्टीने वासुदेव बळवंतांनी पत्नीला पुण्याहून जुन्नर येथे तिच्या आजोळी पाठविण्याचे ठरविले. बैलगाडी दाराशी उभी होती. कमरेला तलवार लटकावून व पतीच्या पाया पडून गोपिकाबाई गाडीत बसल्या शरीर खंबीर होते, परंतु मन कोमल होते. वय होते तेरा-चौदा वर्षांचे. पतीचा वियोग होताना हृदय हेलावले. डोळ्यांत पाणी उभे राहिले. गदगदित स्वरात त्यांनी विचारले, "आपली भेट परत कधी ?" शब्द व अश्रुबिंदू बरोबरच बाहेर पडले, "देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर." वासुदेव बळवंतांनी आत्मविश्वासयुक्त वाणीत उत्तर दिले. नियती आपल्या आत्मविश्वासाशी क्रूर चेष्टेचा खेळ खेळणार आहे, अशी अंधुकशी कल्पना देखील त्या दुर्दम्य आशावादी वीराला कशी यावी !

वासुदेव बळवंतांनी डोक्यावर केसांच्या जटा राखल्या होत्या, दाढी वाढविली होती. ते रंगाने गोरे असून उभट बांध्याचे होते. त्यांचे नाक धारदार असून डोळे निळ्या रंगाचे व भेदक होते. त्यांना पाहताच लोकांच्या मनात भीती व दरारा निर्माण होत होता. ते दत्तभक्त होते.

इंग्रजांच्या विरुद्ध उठावणी करण्यास व सैन्याची हालचाल करण्यास सोयीचे पडावे म्हणून त्यांनी भोवतालच्या प्रदेशाचे नकाशे तयार केले. सैन्याचा पगार भागविण्यासाठी व हत्यारे खरीदण्यासाठी त्यांनी आपल्या सैन्यानिशी श्रीमंत व जुलमी सावकारांच्या व जमीनदारांच्या घरांवर दरवडे घालण्यास सुरुवात केली. जे सावकार गोरगरीब शेतकऱ्यांची पिळवणूक करून गबर झाले होते अशांच्याच घरावर दरवडे घालण्यात आले. तथापि स्त्रिया व मुले ह्यांना त्रास देऊ नये, अशी 'महाराजांची' आपल्या सैनिकांना सक्त ताकीद होती. सैन्यातील लोक वासुदेव बळवंतांना 'महाराज' असे म्हणत असत. महाराजांनी दौलतराव नाईक (रामोशी) ह्यास सरदार नेमले होते. दौलतराव तरुण, शूर, धाडशी, उमदा व विश्वासू होता. इमान व पराक्रम ह्यामुळे तो लवकरच वासुदेव बळवंतांचा उजवा

हात बनला. ठिकठिकाणी मोठमोठे दरवडे घालून त्याने अगणित लूट मिळविली. लुटीतील संपत्तीचा हिशोब ठेवणे, सैनिकांची हजेरी ठेवणे, पगार-



घाटपाचा हिशोब ठेवण्यासाठी दौलतरावाने एक ब्राह्मण हिशेबनीस नेमला होता. राज्यकारभाराला साजेसा कारभार त्या अडाणी रामोशी सरदाराने सुरू केला.

वासुदेव बळवंतांच्या सैन्याच्या पुंडाव्यामुळे शेट–सावकार व सरकारी अधिकारी घाबरून गेले. सरकारने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सैन्य पाठविले. दौलतराव ज्या जंगलात होता त्याला सैन्याने वेढा दिला. दोन्हीही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. मोठ्या सैन्यापुढे दौलतरावाचा टिकाव लागेना. साथीदार म्हणाले, "आपण शरण जाऊ." दौलतरावाच्या मानी मनाला ते पटले नाही. अखेर शत्रूशी लढता लढता त्याने देह ठेविला.

वासुदेव बळवंतास पकडून देणारास मोठे बक्षिस देण्याचे जाहीरनामे सरकारने ठिकाठिकाणी लावले आणि गंमत अशी की, वासुदेव बळवंतांचेही जाहीरनामे त्या सरकारी जाहीरनाम्याशेजारीच लागले गेले. जाहीरनाम्यातील मजकूर पुढीलप्रमाणे होता : 'मुंबईच्या गव्हर्नरचे डोके छाटून आणण्यासाठी पाच हजार रुपये व पुण्याचे कलेक्टर व सेशन्स जज्ज (जिल्हा न्यायाधीश) ह्यांच्या डोक्यांसाठी तीन तीन हजार रुपये देण्यात येतील.' जाहीरनाम्याच्या शेवटी अशी सही होती ——

——पेशव्यांचा नवा मुख्य प्रधान वासुदेव बळवंत फडके.

दौलतराव मारला गेला. पुढे सैन्यातील रामोशीही बेईमान झाले. ह्या सर्व प्रकाराने वासुदेव बळवंतांचे मन विषण्ण झाले. मनाला शांती लाभावी म्हणून एक जोडीदार बरोबर घेऊन ते प्रथम गाणगापूरला गेले. त्यांना पकडण्यासाठी सरकारने डॅनियल नावाच्या लष्करी अधिकाऱ्याची नेमणूक केली. सैन्य घेऊन डॅनियल वासुदेव बळवंतांच्या मागावर निघाला, परंतु

त्यांचा पत्ता लागेना. अशा स्थितीत त्याला अचानक बातमी मिळाली की, वासुदेव बळवंत गाणगापूरला आहेत. पुण्याची एक बाई गाणगापूरहून परत पुण्यास आली होती. ती कथा ऐकण्यासाठी देवळात गेली होती. तिथे बोलता बोलता इतर बायकांना ती म्हणाली, 'सरकार मारे इकडेच बक्षिसे लावते. वासुदेव बळवंत फडके तर गाणगापूरला मी प्रत्यक्ष पाहिले.' जवळ बसलेल्या एका जमादाराच्या पत्नीने ते ऐकले. बक्षिस मिळविण्याच्या आशेने तिने ती बातमी नवऱ्याला सांगितली. त्या जमादाराने डॅनियलला सांगितली.

वासुदेव बळवंत गाणगापूरहून निजामाच्या राज्यात गेले. इंग्रजांशी लढण्यासाठी त्यांनी तेथील घोडेस्वार रोहिल्यांशी करार केले. त्यानंतर ते नरसोबाच्या वाडीला दत्तदर्शनासाठी गेले. तेथून शैल मल्लिकार्जुन करून त्यांनी परत गाणगापुराची वाट धरली. लांबलांबच्या मजला मारल्यामुळे त्यांना थकवा आला होता. अंगात ताप होता. मध्ये भीमा नदी लागली. ती पुराने दुथडी भरली होती. विनंती केल्यावर एका नावाड्याने त्यांना घेऊन पुरात होडी ढकलली. पैलतीराला गेल्यावर वासुदेव बळवंतांनी नावाड्याला भरपूर बिदागी दिली व होडी पाण्यात बुडवून टाकली. कारण डॅनियल त्यांचा पाठलाग करीत आहे, ही बातमी त्यांना लागली होती. बरोबरच्या साथीदारांसह वासुदेव बळवंत शेजारच्या गावी गेले. गावात एक देऊळ होते. तेथे वाटसरू लोक मुक्कामास राहात असत. वासुदेव बळवंत देवळात झोपलेल्या वाटसरूंच्या मध्ये जाऊन झोपले. त्यांच्या पाठीवर असलेला डॅनियल निवडक शिपाई बरोबर घेऊन भोपळ्यांच्या तरीवरून नदी पार करून आला. रस्त्याने विचारपूस करीत तो त्या देवळात गेला. झोपलेल्या लोकांचे चेहरे चोरदिव्याच्या प्रकाशात निरखीत तो वासुदेव बळवंतांच्या जवळ आला. सरकारी जाहीरनाम्यात वासुदेव बळवंतांच्या दिलेल्या वर्णनाशी तो चेहरा जुळला. वासुदेव बळवंतांच्या शरीराजवळ अंथरुणात एक तलवार होती. डॅनियलने त्या तलवारीवर बुटाचा पाय ठेवला व तो वासुदेव बळवंतांच्या छातीवर बसला. वासुदेव बळवंत जागे झाले. परंतु शत्रूच्या अचानक हल्ल्यामुळे ते निरुपाय झाले. बेड्या घालून व साखळदंडाने बांधून त्यांना पुण्यास नेले. वासुदेव बळवंतांवर खटला चालून त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली. वासुदेव बळवंतांनी न्यायाधीशासमोर केलेल्या भाषणावरून, त्यांच्या ज्वलंत देशप्रेमाची व जनतेच्या कल्याणाविषयीची

कल्पना येऊ शकेल. " हिंदुस्थानातील जनता ब्रिटिश सत्तेच्या टाचेखाली चिरडली जात आहे. उपासमारीने आणि दारिद्र्याने लोक मृत्युपंथाला लागलेले आहेत. त्यांनी अन्नान्न करीत उपाशी मरावे, आणि आपण कुत्र्याप्रमाणे स्वतःचे पोट भरीत राहावे, हे माझ्याच्याने पाहवले नाही आणि म्हणून मी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारले. स्वराज्यासाठी लूट मारून पैसे मिळविण्याचे ठरविले. पुण्याचा खजिना लुटण्याची माझी योजना पुरी झाली होती. पण फितुरीने घात केला. माझे अंतिम उद्दिष्ट प्रजासत्ताक राज्याची स्थापना करणे हे होते. ते पूर्णपणे सिद्धीस गेले असते तर माझा आत्मा शांत झाला असता, पण ते होऊ शकले नाही. शेवटी मी अयशस्वी झालो. पण ईश्वरालाच माहीत की, मी हे सर्व देशासाठी केले. "

खटला संपल्यावर साखळदंड व बेड्यांनी बद्ध केलेले वासुदेव बळवंत पोलीस पहाऱ्यात न्यायालयाबाहेर पडले. एखाद्या राजाला द्यावी अशा प्रकारची वंदना जनतेने दिली व 'वासुदेव बळवंत फडके की जय !' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. त्यांना अंदमानच्या ऐवजी एडनच्या तुरुंगात इ. स. १८८० मध्ये ठेवण्यात आले. एडनचा भयंकर उन्हाळा, मचूळ पाणी, तुरुंगातील कदान्न, जनावराप्रमाणे करावे लागणारे कष्ट ह्यांमुळे त्यांची प्रकृती खूप अशक्त झाली. अशा नरकात कुजत मरण्यापेक्षा सुटकेचा धाडसी प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले. एके रात्री पहारेकऱ्याला गाढ झोप लागली असता त्यांनी सर्व शक्ती पणाला लावून हातातील लोखंडी बेड्या तोडल्या. कोठडीचे दरवाजे कुलुपासह मोडून ते तुरुंगाच्या तटापर्यंत घेऊन गेले. दरवाजाच्या फळ्या तटाच्या भिंतीला लावून ते तटावर चढले. तटावरून खाली उडी टाकताना त्यांचा पाय मुरगळला, तरी ते तसेच पळत बारा मैलांचे अंतर पळत गेले. कैदी पळून गेल्याचे सकाळी कळाले. चोहोकडे घोडेस्वार पिटाळण्यात आले. वासुदेव बळवंतांना पकडून परत तुरुंगात नेण्यात आले. इ. स. १८८३ मध्ये तुरुंगातच वयाच्या केवळ अडतिसाव्या वर्षी ते मरण पावले. एक महान तेजस्वी तारा अंतर्धान पावला. अंतर्धान पावला तरी भारताचा इतिहास उज्ज्वल करून गेला.


स्वातंत्र्यासाठी एक मोठी गरुडझेप !

* *

३. कुकांचे प्रतिसरकार

(रामसिंग कुका)

अठराशेसत्तावन्न साली स्वातंत्र्य-संग्रमात हिंदी जनतेचा पराजय झाला. हिंदुस्थानची महाराणी व्हिक्टोरिया हिने जाहीरनामा काढून संतप्त हिंदी मनांना शांत करण्याचा प्रयत्न केला. वरून जरी जनता शांत दिसत असली तरी पराजयाचा डंख अंतर्यामी खुपत होता. इंग्रजांनी हिंदुस्थानात शिक्षणाच्या सोयी, पोस्टाची सुविधा, आगगाड्या, जमीन-सुधारणा इत्यादी लोकोपयोगी कामे करून देखील काही लोक असे होते की, त्या गोष्टींमुळे त्यांचे समाधान झाले नाही. आपले स्वातंत्र्य इंग्रजांनी हिरावून घेतले, ही गोष्ट एखाद्या विखारी काट्याप्रमाणे त्यांच्या हृदयात सलत होती. अशा भावनेमुळे त्या लोकांनी इ. स. १८७२ मध्ये इंग्रजी राजवटीला आव्हान देऊन पंजाब प्रांतात स्वतःची राजवट सुरू केली. रामसिंग यांच्याकडे त्या लोकांचे नेतृत्व होते.



रामसिंग हे शीख होते. त्यांचा जन्म १८२४ मध्ये लुधियाना जिल्ह्यात झाला. सुरुवातीस ते रणजितसिंग ह्या पंजाबच्या शीख राजाच्या सैन्यात नोकरीस होते. रणजितसिंगांच्या मृत्यूनंतर त्यांनी ती नोकरी सोडली. त्यानंतर शीख समाजात धर्मसुधारणा व समाजसुधारणा करण्याच्या कार्यास ते लागले. असे म्हणतात की, महाराष्ट्रातील कोणी एक रामदासी पंथाचे बाबाजी पंजाबात गेले होते. त्यांनी रामसिंगांना राजकारणाचा गुरुमंत्र

दिला. त्यानंतर रामसिंगाचे अनुयायी राजकारणाच्या रिंगणात उतरले. रामसिंग व त्यांचे अनुयायी शीख हे जात्याच फार कडवे लढव्ये व शूर होते. त्यांना नामधारी असे म्हणण्यात येई. नामधाऱ्यांचे गुरू–रामसिंग यांनी स्थापन केलेल्या ह्या सांप्रदायाला 'कुका' संप्रदाय असे नाव पडले.

रामसिंग कुका यांनी राज्यव्यवस्थेसाठी पंजाब प्रांताची विभागणी बावीस जिल्ह्यांत करून तेथे अधिकारी नेमले. कुकांनी स्वतःची कोर्टे, कचेऱ्या शाळा व पोस्ट ऑफिसे सुरू केली. रामसिंग कुकांनी एक जाहीरनामा काढून स्वतःच्या अनुयायांना व जनतेला फर्माविले की, त्यांनी इंग्रजी शासन-पद्धतीशी संपूर्णपणे असहकार करावा. त्यांनी सुरू केलेल्या संस्थांवर बहिष्कार टाकावा. ह्या जाहीरनाम्याचा इतका परिणाम झाला की, इंग्रजांची राज्यव्यवस्था पंजाबात कोलमडून पडली. ह्यास्तव कुकांचे पारिपत्य करणे इंग्रजांना आवश्यक झाले.

गाईंचा वध करणाऱ्या खाटकांना कुकांनी देहान्ताची शिक्षा दिली. ह्याच सुमारास कुकांचे पारिपत्य करण्याची एक संधी इंग्रजांना मिळाली. बहिनीसाहेब या कुकांच्या ठाण्याच्या गावी त्यांच्या गुरूंचा उत्सव होता. त्यासाठी एक कुका मलारकोट ह्या शेजारच्या मुसलमान संस्थानच्या हद्दीतून जात असताना काही मुसलमानांनी त्यांच्यावर हल्ला केला. हे वृत्त कळताच चार पाचशे हत्यारबंद कुकांनी मलारकोट संस्थानावर हल्ला चढविला. त्यामुळे घाबरून जाऊन मलारकोटच्या संस्थानिकाने लुधियाना येथील डेप्युटी कमिशनरकडे मदत मागितली. डेप्युटी कमिशनर कोव्हन याने अम्बाला येथे असलेल्या कमिशनरला लिहून मदतीकरता सैन्याची मागणी केली. त्याप्रमाणे मेजर कोरिन हा सैन्य घेऊन मलारकोटमध्ये आला. डेप्युटी कमिशनर कोव्हन हाही तेथे गेला. इंग्रजी सत्तेची जरब बसविण्यासाठी त्याने गेल्या गेल्या पकडलेल्या पासष्ट कुकांना तोफेच्या तोंडी देऊन उडविण्याचा हुकूम दिला. दोन-तीन दिवसांनी आणखी सोळा कुकांना तोफेच्या तोंडी देऊन उडविण्यात आले. त्यानंतर इंग्रजी सैन्याने नामधारी कुकांचे धार्मिक अधिष्ठान जे बहिनीसाहेब त्याच्यावर हल्ला करून ते लुटले. काही कुकांची घरेदारे लुटली. काहींचा जमीनजुमला जप्त करण्यात आला. आपापल्या गावी कुकांना स्थानबद्ध करण्यात आले. सारांश, लढाऊ कुकांची ससेहोलपट सुरू झाली. १८८० साली

रामसिंग कुकांना पकडून इंग्रजांनी त्यांना अलाहाबादच्या किल्ल्यात तुरुंगात ठेवून काही दिवसांनी त्यांना तेथून हलवून ब्रह्मदेशात रंगून येथे तुरुंगात ठेविले व तदनंतर तुरुंगाच्या बाहेर बादशहा बहादूरशहा यांच्या थडग्याजवळ असलेल्या बंगल्यात ठेवण्यात आले. परंतु तेथून ते एकाएकी नाहीसे झाले. ते मरण पावल्याचे सरकारने घोषित केले. परंतु नामधारी कुकांची मात्र अशी दृढ श्रद्धा आहे की, गुरु रामसिंग हे स्वतःच्या दैवी सामर्थ्याने इंग्रजांच्या तावडीतून निसटून गेले व ते अद्याप जिवंत असावेत.

नामधारी कुकांची पाळेमुळे खणून काढण्याचे आटोकाट प्रयत्न इंग्रजांनी केले. काही काळ ते अचेतन झाल्यासारखे दिसले. परंतु त्यांच्यातील क्षात्रतेजाचा अंगार धगधगतच होता. १९२०–३० ह्या दशकात अकाली बालवीर ह्या रूपाने त्यांनी इंग्रजांना आव्हान दिले. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत हे अकाली नामधारी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेत होते.

नामधाऱ्यांची चळवळ सुरुवातीला अहिंसक व असहकाराची होती. त्यावरून गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीच्या किती तरी पूर्वी आपण ब्रिटिशांविरुद्ध असहकार पुकारून स्वतःची राज्यव्यवस्था सुरू केली होती, असे कुकांचे म्हणणे आहे. ते काहीही असो. १८५७ नंतर इंग्रजी राज्याला ह्या शूर कुकांनी जबरदस्त धक्का देण्याचे काम केले, एवढे मात्र निश्चित.

* *

४. "गोंद्या आला रे, आला"

(चाफेकर बंधू, रानडे, आपटे, साठे)

'गोंद्या आला रे, आला.' गोंद्या आल्याची वर्दी एका भावाने दुसऱ्या भावास दिली. हा गोंद्या कोणी हिंदी माणूस नसून इंग्रज माणूस होता हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल आणि त्याहीपेक्षा अधिक आश्चर्य वाटेल, जेव्हा तुम्हाला कळेल की, गोंद्या हे नाव कोणा उडाणटप्पू पोऱ्याचे नसून एका बड्या सनदी इंग्रज अधिकाऱ्याचे होते. ते एक सांकेतिक नाव होते. त्या नावाशी संबंधित असलेला इतिहास मोठ्या शौर्याचा, अभिमानाचा अतएव रोमांचकारी आहे.

इ. स. १८९६–९७ सालांत महाराष्ट्रात महाभयंकर दुष्काळ पडला होता. त्या आपत्तीत भर म्हणून प्लेगने कहर मांडला. पुणे शहरात प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. प्लेगच्या प्रतिबंधासाठी सरकारने पुणे शहरासाठी रँड या सनदी इंग्रज अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्याच्या मदतीला लेफ्टनंट आयर्स्ट ह्या लष्करी अधिकाऱ्याला दिले.

प्लेगवर प्रतिबंधक उपाय म्हणजे घरे जंतुनाशक औषधाने फवारावी लागत. घरे सोडून लोकांनी काही दिवस गावाबाहेर रानात झोपड्या बांधून रहावयाचे असे. प्लेगने लागण झालेले रोगी स्वतंत्र दवाखान्यात न्यावे लागत. प्लेगला आळा घालण्याच्या दृष्टीने ह्या गोष्टी योग्य होत्या. तथापि दिवस थंडीचे होते. सर्वच घरात पैसाअडका व मोलाचे सामान होते. त्यामुळे लोकांना सरकारी धोरणाची अंमलबजावणी तावडतोब करणे अवघड होऊन बसले होते. परंतु रँड आणि आयर्स्ट यांना सामोपचाराचे धोरण माहीतच नव्हते. लोकांची अळंटळं ही त्यांच्या इंग्रजी रक्ताला सरकारी धोरणाचा अपमान वाटला. त्यांनी गावातील लोकांना घराबाहेर काढण्याचा गोऱ्या सोजिरांना हुकूम दिला. त्या गोऱ्या सोजिरांनी बुटांनिशी देवघरे व स्वयंपाक-घरे येथपर्यंत धडक मारली. देवघरातील देवांच्या मूर्ती अंगणात भिरकावल्या. भांडीकुंडी रस्त्यावर फेकली. पुरुष माणसांना बंदुकांच्या दस्त्याने मारून घराबाहेर काढले. काही स्त्रियांना फरफटत ओढीत घराबाहेर काढले, तर काहींच्या अब्रूची विटंबना केली. घरातील दागदागिने व मौल्यवान वस्तू लुटून नेल्या. रँडच्या सोजिरांनी घातलेला धुमाकूळ पाहून प्लेगने देखील

शरमेने मान खाली घातली असेल! सरकारी अधिकाऱ्यांची ती अत्याचारी वागणूक इतकी चीड आणणारी होती की, नामदार गोखल्यांसारख्या सोज्वळ पुढाऱ्याने देखील हताश व त्रस्त जनतेला सल्ला दिला की, "भागूबाईसारखे रडता काय? आडदांडास कायदा शिकवा." आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, त्या आडदांडास कायदा शिकविला एका कथेकऱ्याच्या तरुण मुलांनी.



दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव ही हरिभाऊ चाफेकर ह्या कथेकऱ्याची मुले होती. हरिभाऊ हे पुण्यात राहत असून कथा-कीर्तने करून आपली उपजीविका करीत असत. त्यांचे थोरले चिरंजीव दामोदरपंत हे देखील कीर्तने करीत असत परंतु त्यांचा पिंड मात्र प्रवृत्ती-मार्गाचा होता. देश आणि धर्म हाच त्यांचा देव होता.

दामोदरपंत स्वतः तालीमबाज होते. बलाची उपासना करण्यासाठी त्यांनी तरुणांच्यासाठी आखाडा सुरू केला. लो. टिळकांनी सुरू केलेल्या शिवाजी-उत्सवात व गणेश-उत्सवात ते भाग घेत असत. युद्धकलेचे ज्ञान मिळविण्यासाठी त्यांनी लष्करात शिरण्याचा प्रयत्न केला, परंतु ब्राह्मण म्हणून त्यांना लष्करात प्रवेश मिळाला नाही. वासुदेव बळवंत फडके यांच्या क्रांति-


कारक जीवनापासून चाफेकर बंधूंना देशभक्तीची स्फूर्ती मिळाली होती. ब्रीटिशांच्या जुलमी राजवटीने त्यांची अंतःकरणे सूडाने पेटली होती. दामोदरपंतांनी तरवारी, बंदुका व पिस्तुले मिळविली होती. आखाड्यातील काही सहकाऱ्यांनी गावाबाहेर जंगलात नेऊन ते हत्यारे चालविण्याचे व नेमबाजीचे शिक्षण देत. ब्रिटिशांची सत्ता उलथून टाकण्यासाठी त्यांनी सशस्त्र क्रान्तीचा गुप्त मार्ग स्वीकारला. दामोदरपंतांना ब्रिटिश राज्याची किती चीड होती, हे पुढील गोष्टीवरून दिसून येईल. त्या वेळी इंग्लंडची राणी ही भारताची महाराणी होती. मुंबईमध्ये कोर्ट (फोर्ट) ह्या गजबजलेल्या भागात तिचा पुतळा होता. इंग्रजी राज्याचा केवढा दरारा! परंतु तशाही स्थितीत दामोदरपंतांनी दि. १६ ऑक्टोबर १८९६ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या त्या पुतळ्याच्या तोंडास डांबर फासले व गळ्यात फाटक्यातुटक्या पायतणांची माळ घातली

१२ जून १८९७ रोजी शिवाजी उत्सवानिमित्त लकडीपुलाजवळील विठ्ठल मंदिरात लो. टिळक व इतर काही पुढाऱ्यांची भाषणे झाली. त्यानंतर दामोदरपंत चाफेकर यांनी एक गीत म्हटले. सभेत वीरश्रीयुक्त भाषणे करणाऱ्या पुढाऱ्यांचा उल्लेख त्या गीतात नामर्द म्हणून करण्यात आला. सभा संपल्यानंतर लो. टिळक दामोदरपंत चाफेकरांजवळ जाऊन म्हणाले, "गीत म्हणणाऱ्याच्या अंगी पौरुष असते, तर पुण्यात हलकल्लोळ माजविणारा रँड जिवंत राहिलाच नसता."

लोकमान्यांच्या त्या टोमण्याने दामोदरपंतांच्या अस्मितेला डिवचले. त्यांच्या स्वत्वाच्या पात्याची धार परजली गेली. त्यांच्या पौरुषाने ते आव्हान झेलले. दामोदरपंतांनी आपले बंधू व मित्र यांच्या मदतीने रँडचा काटा काढण्याचे ठरविले. रँडवर पाळत ठेवून ते त्याला ठार करण्याच्या संधीची वाट पाहू लागले आणि दि. २२ जून १८९७ रोजी तो मुहूर्त साधण्याचे ठरले.

व्हिक्टोरिया राणीच्या हीरक महोत्सवानिमित्त गणेशखिंडीतील गव्हर्नरांच्या बंगल्यावर आनंदोत्सव होणार होता. त्या आनंदाप्रीत्यर्थ दिव्यांची रोषणाई, दारूकामाची आतषबाजी व सरकारी अधिकाऱ्यांना मेजवानी ह्या गोष्टी योजण्यात आल्या होत्या. सर्व गोरे अधिकारी ह्या प्रसंगी उपस्थित राहणार हे स्पष्ट होते.

ही संधी टिपण्याचे दामोदरपंतांनी ठरवले. रँडची गाडी पाहून ठेवण्यास वासुदेव चाफेकर ह्यांना पुढे पाठविण्यात आले. गणेशखिंडीच्या रस्त्याच्या कडेला एका ठराविक ठिकाणी लपून बसून रँडची गाडी आली की " गोंद्या आला रे, आला ! " हे परवलीचे वाक्य उच्चारण्यास त्यांना सांगण्यात आले. अंधार पडल्यावर दामोदरपंत, त्यांचे बंधू बाळकृष्ण व मित्र महादेव रानडे आणि विनायक आपटे हे आपआपले रिव्हॉल्व्हर (पिस्तुले) भरून गणेश



खिंडीच्या रस्त्यालगत ठरलेल्या ठिकाणी दबा धरून सावजाची वाट पाहात बसले. रात्री साडेबाराच्या सुमारास गव्हर्नमेंट हाऊसवरून अधिकारी परतु लागले. लेफ्टनंट आयर्स्टची गाडी हुबेहूब रँडच्या गाडीसारखी दिसे. आयर्स्टची गाडी प्रथम आली. ती दिसताच अंधारातून शब्द उमटले, " गोंद्या आला रे, आला ! " ते परवलीचे शब्द ऐकताच बाळकृष्ण चाफेकर त्या गाडीवर धावले. आत बसलेल्या साहेबाच्या डोक्यावर त्याने गोळी झाडली. तो साहेब खाली कोसळला. तो रँड नसून लेफ्टनंट आयर्स्ट होता. इतक्यात दुसरी गाडी आली. " गोंद्या आला रे, आला ! " असे म्हणत वासुदेव चाफेकर त्या गाडीमागे धावू लागले. ते पाहून दामोदरपंतांनी त्या गाडीवर उडी घेऊन रँडच्या पाठीवर गोळी झाडली. रँड गाडीत कोसळला व ३ जुलैला मरण पावला.

सरकारी समारंभाचा झगमगाट व रहदारीचा गजबजाट असतानाही रँड-आयर्स्ट या साहेबांवर झालेल्या खुनी हल्ल्यामुळे सरकारी वरिष्ठ अधिकारी

चकित झाले. रँडवर हल्ला झाला त्या ठिकाणाच्या जवळच एका खोंगळीमुळे रस्त्यावर जो पूल बांधला होता त्या पुलाखाली मुठीला तांबडी चिंधी बांधलेली तलवार तपास करताना पोलिसांना सापडली. ती तलवार दामोदरपंतांनी स्वतःबरोबर आणली होती. रँडला ठार मारल्यानंतर पळण्यास सोयीचे पडावे म्हणून तलवार बरोबर न घेता त्यांनी ती त्या पुलाखाली फेकून दिली होती. तेवढ्या एका खुणेशिवाय गुन्हेगारांसंबंधीचा अन्य कोणताही सुगावा सरकारला लागला नाही. गुन्हेगारांचा तपास लावून देण्यासाठी सरकारने वीस हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

एवढे मोठे बक्षीस जाहीर झाले असताही रँडच्या वध करणाऱ्यांचा तपास सरकारला लागेना. डोके फिरलेल्या पिसाटाप्रमाणे अधिकाऱ्यांनी लो. टिळक व नातू बंधू यांना पकडले. सरकारविरुद्ध 'केसरी'तून जहाल लेख येत असत. त्यामुळे संशयावरून लो. टिळकांना पकडले. आपल्या कृत्यामुळे इतरांना निष्कारण त्रास होत असल्याचे पाहून दामोदरपंतांना वाईट वाटले. रँडचा वध केल्यानंतर ते मुंबईत जाऊन राहिले होते. त्यांनी मुंबईतूनच मुंबईच्या गव्हर्नरला पत्र पाठविले. त्या पत्राबरोबर पाकिटात एक तांबड्या रंगाची चिंधी जोडली व पत्रात म्हटले, "रँडचा वध पुण्याच्या कोणी ब्राह्मणांनी केला नाही. तो मी केला आहे. सरकारने इतरांना पकडून निष्कारण त्रास देऊ नये. रँडच्या वधाच्या वेळी जी तलवार मी रस्त्याच्या पुलाखाली फेकून दिली होती, तिच्या मुठीला तांबड्या पागोट्याची जी चिंधी बांधली होती, त्याच पागोट्याची चिंधी पत्रासोबत जोडीत आहे. त्यामुळे मीच ते कृत्य केले याची खात्री पटेल." पत्राखाली सही होती 'गाझी' अशी.

चाफेकरांच्या ओळखीचे गणेश द्रविड हे खोट्या सह्या करण्याच्या गुन्ह्यावरून त्या वेळी तुरुंगात होते. त्यांच्या बंधूकडून त्यांना चाफेकर बंधू व त्यांचे मित्र यांच्या गुप्त हालचालींची माहिती मिळत होती. आपली शिक्षा माफ करून आपणास परत सरकारी नोकरीत घेतल्यास व गुन्ह्याचा शोध लावून देण्यासाठी ठेवलेले बक्षीस देण्याचे सरकारने कबूल केल्यास आपण रँडचे खुनी पकडून देऊ, असे गणेश द्रविडाने सांगितले. त्याप्रमाणे गणेशला तुरुंगातून सोडून देण्यात आले. तुरुंगातून बाहेर पडल्यावर चाफेकरांच्या काही मित्रांकडून त्याने बरीच माहिती मिळविली. त्या माहितीच्या आधाराने दामोदरपंतांना मुंबईस

पकडण्यात आले. त्यांच्यावर खटला चालून त्यांना दि. १८ एप्रिल १८९८ रोजी येरवड्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. हातात भगवद्गीता घेऊन ते फासावर चढले. बाळकृष्ण चाफेकर भूमिगत होते. तथापि दामोदरपंतांना फाशी दिल्याचे कळल्यावर ते अस्वस्थ झाले व स्वतः होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले.

द्रविड बंधूंनी आपल्या बंधूंचा विश्वासघात केला, ही गोष्ट वासुदेव चाफेकरांना कळाली. द्रविडांच्या निमकहरामीपणाचे प्रायश्चित्त त्यांना देण्याचे वासुदेवाने ठरविले. ते व महादेव रानडे ह्यांनी मुसलमानी पोषाख केला व ते द्रविडांच्या घरी गेले. ब्रुईनसाहेबाने गणेश द्रविडाला ताबडतोब बोलविले आहे, असे ते उर्दूतून बोलले. खटल्याच्या तपासाचे काम ब्रुईन नावाच्या पोलीस अधिकाऱ्याकडे होते. गणेश द्रविडाने गुन्ह्याचा तपास लावून दिल्यामुळे त्याला वारंवार ब्रुईनसाहेबाला भेटावे लागे. त्यामुळे वेषांतरित व्यक्तींनी सांगितलेला तो निरोप खरा समजून गणेश व रामचंद्र हे द्रविड बंधू घराबाहेर पडले. लगेच वेषांतरित चाफेकर-रानड्यांनी त्यांना आपली खरी ओळख दिली व पिस्तुलाच्या गोळ्यांनी ठार केले. रानडे व वासुदेवराव जेव्हा द्रविडांच्या वाड्याकडे गेले तेव्हा त्यांचे साथीदार खंडेराव साठे हे लाठी घेऊन गल्लीच्या कोपऱ्यावर पहारा करण्यासाठी उभे होते. वरील दोघांना द्रविडांचा काटा काढणे सोयीचे व्हावे, म्हणून त्या गल्लीत कुणाला न जाऊ देण्यासाठी सारे गल्लीच्या तोंडाशी थांबले. रात्रीचा साडेनवाचा सुमार होता. वासुदेव-रानड्यांनी द्रविड बधूंवर झाडलेल्या पिस्तुलाच्या गोळ्यांच्या बाराने रात्रीची ती शांत गल्ली दणाणून गेली. तथापि त्या आवाजाने लोक भयभीत अथवा आश्चर्यचकित झाले नाहीत. त्या वेळी होणारा तसला आवाज लोकांच्या परिचयाचा होता. त्या काळी रोज रात्री साडेनवाला सरकारी तोफ उडविण्यात येत असल्यामुळे झालेला बार तोफेचाच असावा असे लोकांना प्रथम वाटले. परंतु त्यानंतर थोड्याच वेळाने दररोज होणारा तोफेचा बार झाला. आज तोफ दोनदा का उडाली, हे पाहाण्यासाठी गल्लीतील लोक कुतूहलाने घराबाहेर पडले. घायाळ झालेल्या द्रविडबंधूंची शरीरे गल्लीच्या कोपऱ्यावर पडलेली त्यांना दिसली. तोपर्यंत वासुदेवराव, रानडे व साठे अंधारात नाहीसे झाले होते.

दुसऱ्या दिवशी ब्रुईन या पोलीस अधिकाऱ्याने द्रविडांच्या खुनाच्या

चौकशीसाठी वासुदेवरावांना पोलीस चौकीवर बोलाविले. उपरण्याच्या आतून खांद्याला अडकविलेल्या पिशवीत भरलेले पिस्तुल व एक मोठा चाकू घालून वासुदेवराव पोलीस चौकीत गेले. ब्रुईनसाहेब त्यांना प्रश्न विचारीत असता जवळच उभा असलेला रामा पांडू हा फौजदार उद्दामपणाने म्हणाला, "सर्व चापेकर साले हरामखोर !" ते हलकट उद्‌गार ऐकताच पिशवीतून पिस्तूल काढून वासुदेवरावांनी एक गोळी रामा पांडूवर झाडली. परंतु एक इंचाच्या अंतराने गोळीचा नेम चुकल्यामुळे रामा पांडू वाचला. लगेच ब्रुईनसाहेबावर दुसरा नेम धरला गेला. परंतु पिस्तुलाचा चाप ओढला जाण्यापूर्वीच ब्रुईन व इतर पोलिसांनी वासुदेवरावांवर झडप घालून त्यांना निःशस्त्र केले. रामा पांडू हा फार दुष्ट, निर्दय व हलकट वृत्तीचा माणूस होता. पोलीस चौकशीच्या वेळी दामोदरपंतांना त्याने शिव्या देऊन त्यांचा अपमान केला होता. त्यामुळे वासुदेवराव व त्यांचे मित्र यांचा त्याच्यावर दात होता. त्याला ठार करण्यासाठी त्यांनी केलेले दोन तीन प्रयत्न फुकट गेले होते.

वासुदेव, बाळकृष्ण, रानडे, आपटे, साठे यांच्यावर खटला चालून पहिल्या तिघांना फाशीची शिक्षा झाली. आपटे हे शेवटपर्यंत सरकारला सापडू शकले नाहीत. खंडेराव साठ्यांना दहा वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली.

वासुदेवरावांना त्यांच्या कोठडीतून जेव्हा फाशी देण्यासाठी फासाकडे चालविले, तेव्हा रानडे-बाळकृष्ण यांच्या कोठडीजवळ येताच ते मोठ्याने ओरडले, "बापू, रानडे, चलतो मी आता. राम राम." स्वर्गाच्या वाटेवरल्या त्या एकाकी पांथस्थाला दुसऱ्या दोघांनी कोठडीतूनच मोठ्या आवाजात प्रतिसाद दिला. "तू पुढे चालू लाग. आम्हीही येतो तुझ्यामागून. राम राम." दोन दोन दिवसांच्या अंतराने त्यांना पुणे येथील येरवड्याच्या कारागृहात फाशी देण्यात आले.

* *

५. भारतीय क्रांतिकारकांचे लंडनमधील घर

(पंडित श्यामजी कृष्ण वर्मा)

हिंदुस्थानात सशस्त्र क्रांती करण्याचे मनसुबे रचले जात होते. लंडनमध्ये आणि भारत भवन(-इंडिया हाऊस) या स्वतःच्या मालकीच्या वास्तूमुळेच



इंग्रजांच्या राजधानीच्या शहरात क्रान्तिकारकांची व्याख्याने, विचार-विनिमय, स्फोटक रसायनांच्या चाचण्या घेणे इत्यादी गोष्टी गुप्त राहू शकल्या. हिंदुस्थानच्या राजकारणाच्या व हिंदी राजकारणाच्या सोयीसाठी लंडनच्या भरवस्तीत सुंदर जागेत पंडित श्यामजी कृष्ण वर्मा या गृहस्थांनी ही सुंदर इमारत विकत घेऊन तिला 'इंडिया हाऊस' असे नाव दिले. भारताच्या राजकारणाबद्दल आस्था असणाऱ्या काही इंग्रज व हिंदी गृहस्थांच्या उपस्थितीत इ. स. १९०५ मध्ये भारत-भवनाचे समारंभपूर्वक उद्घाटन झाले. श्यामजी कृष्ण वर्मा यांच्यासारखा कच्छ–काठेवाडात गरीब कुटुंबात जन्मलेला एक माणूस लंडनला जातो काय, आणि स्वतःच्या देशवासीयांसाठी त्या शहरात एक अलिशान इमारत विकत घेतो काय, सारेच विलक्षण! तसे पाहिले तर श्यामजींचे सारेच आयुष्य मोठे लोकविलक्षण घटनांनी भरलेले. दरिद्री कुटुंबात जन्मलेल्या-बालपणीच पोरके झालेल्या श्यामजींच्या कुंडलीतील ग्रहमान फारच उच्चीचे असले पाहिजे. म्हणून कल्पनादेखील आश्चर्याने चकित होईल एवढी विद्या, वैभव, संपत्ती व सन्मान यांच्या सुवर्णपुष्पांची पखरण दैवाने त्यांच्यावर केली!

श्यामजी कृष्ण वर्मा यांचा जन्म इ. स. १८५७ मध्ये कच्छ संस्थानातील मांडवी या गावी एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वयाच्या नऊ-

दहा वर्षांच्या सुमारास त्यांची मातापितरे निवर्तली. त्यानंतर कुणा सहृदय माणसाने त्या पोरक्या मुलाला मुंबईस नेऊन त्याच्या विद्याभ्यासाची सोय केली. श्यामजींचे हायस्कूलमध्ये इंग्रजी शिक्षण चालू असतानाच त्यांनी संस्कृत पाठशाळेत संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. श्यामजींना दैवयोगे करून अत्यंत कुशाग्रबुद्धी लाभली होती. त्यामुळे अल्पावधीतच त्यांनी संस्कृत भाषा, धर्मशास्त्र व वाङ्मय यांत पारंगतता प्राप्त केली. संस्कृत भाषेवरील त्यांचे प्रभुत्व व पांडित्य पाहून विद्वान मंडळी देखील तोंडात बोटे घालू लागली. त्याच सुमारास सुप्रसिद्ध दयानंद सरस्वती हे आर्यसमाजाचे थोर संस्थापक आर्यसमाजाच्या प्रसारानिमित्त मुंबईस आले. श्यामजी त्यांच्या दर्शनासाठी गेले. श्यामजींची गाढी विद्वत्ता व संस्कृतवरचे प्रभुत्व पाहून दयानंदांनी त्यांना आर्यसमाजाची दीक्षा दिली. अशी एक आख्यायिका सांगितली जाते की, वामन पंडित हा कवी धर्मशास्त्राच्या ग्रंथांनी लादलेले उंट समवेत घेऊन ठिकठिकाणच्या पंडितांना वादविवादात हरवीत भारतभर भ्रमण करीत फिरला. अल्पवयात मिळालेल्या कीर्तीमुळे श्यामजींच्या मनाची वृत्ती काहीशी वामन पंडिताप्रमाणेच झाल्याचे दिसून येते. संस्कृतमधील स्वतःचे पांडित्य सिद्ध करण्यासाठी त्यांनी नासिक, पुणे, पैठण, काशी, लाहोर, अहमदाबाद इत्यादी धर्मपीठे व क्षेत्रस्थाने यांना भेटी देऊन स्वतःच्या ज्ञानाने तेथील पंडितांना दिपविले; त्यांच्या विद्वत्तेचा चौमुलखी बोलबाला झाला. त्यांच्या प्रगाढ पांडित्यावर प्रसन्न होऊन क्षेत्रस्थ विद्वानांनी श्यामजींना 'पंडित' ही पदवी दिली. त्याच सुमाराला म्हणजे इ. स. १८७५ मध्ये मुंबईचे धनाढ्य व्यापारी शेट छबीलदास लल्लुभाई यांच्या भानुमती नामक गुणी व सुस्वभावी कन्येशी श्यामजींचा विवाह झाला.

मोनिअर वुइल्यम्स हे ऑक्सफर्ड विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक त्या वेळी हिंदुस्थानात आले होते. ऑक्सफर्ड विद्यापीठासाठी त्यांना संस्कृत भाषेचा एक हिंदी प्राध्यापक हवा होता. ही गोष्ट श्यामजींच्या कानावर येताच त्यांच्या डोळ्यांसमोर विलायतेला जाण्याची स्वप्ने तरळू लागली. रावबहादूर गोपाळ हरी देशमुख, न्यायमूर्ती रानडे इत्यादी थोर गृहस्थांच्या शिफारशीवरून प्रा. मोनिअर यांनी पं. श्यामजींना ऑक्सफर्ड येथे नेण्याचे मान्य केले. परंतु श्यामजींनी विलायतेस आर्यसमाजाचे प्रचारक या नात्याने न जाता वैयक्तिक-

रीत्या जावे, अशी अट महर्षी दयानंद सरस्वतींनी त्यांना घातली. अशा घोळात मोनिअरसाहेब इंग्लंडला एकटेच निघून गेले. स्वदेशात मिळविलेल्या कीर्तीने श्यामजी कृष्णाची नजर फिरून गेली होती. इंग्रज राज्यकर्त्यांच्या देशात जाऊन स्वतःच्या विद्वत्तेचे चौघडे वाजवावेत, अशा जबर महत्त्वाकांक्षेने श्यामजींना पछाडले. स्वतःला मिळालेल्या स्त्रीधनातून काही रक्कम त्यांच्या पत्नीने पतीला देऊ केली. थोडी रक्कम काही हितचिंतकांकडून कर्जाऊ घेऊन श्यामजींनी एकदाचे इंग्लंड गाठले. त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात नाव दाखल केले. संस्कृत भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, त्यांची विद्वत्ता व तल्लख बुद्धिमत्ता पाहून ऑक्सफर्ड विद्यापीठात श्यामजींना चांगलाच मानसन्मान मिळू लागला. पाणिनीचे व्याकरण, धर्मशास्त्राच्या आज्ञा व संस्कृत वाङ्मयाचे गाढ ज्ञान या सर्वांचा समुच्चय पं. श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या रूपाने इंग्रज विद्वानांच्या समोर उभा राहिला. पौर्वात्य विद्येच्या त्या चालत्या-बोलत्या ज्ञान-कोशाने ब्रिटिश विद्वानांचा आदर मिळविला. पुढे श्यामजी ऑक्सफर्ड विद्यापीठाचे पदवीधर झाले व नंतर त्यांनी बॅरिस्टरीची परीक्षा दिली. त्यांची विद्वत्ता बघून भारतमंत्र्याने भारताचे प्रतिनिधी म्हणून इंग्रज सरकारतर्फे श्यामजींना जर्मनीत भरलेल्या विद्वज्जनांच्या परिषदेस पाठविले. त्यानंतर 'एम्पायर क्लब' ह्या वरिष्ठ पातळीवरील इंग्रज अधिकाऱ्यांच्या संस्थेने श्यामजींना त्या क्लबचे सभासदत्व बहाल केले. हिंदी लोकांच्या वाट्याला कधीही न येणारा हा मान श्यामजींच्या वाट्याला आला. त्यामुळे इंग्लंडचे पंतप्रधान ग्लॅडस्टन, भारतमंत्री मोर्ले इत्यादी वरिष्ठ पदांवरील इंग्रजांशी श्यामजींचा संबंध आला. श्यामजी कृष्णांनी अशा थोर सद्गृहस्थांची शिफारस-पत्रे मिळवून जवळ ठेवली. त्या सर्व शिफारसपत्रांचा आशय असा होता की, श्यामजी कृष्ण वर्मा हे एक असामान्य हुशार व विद्वान गृहस्थ असून हिंदुस्थान सरकारच्या शासन व्यवस्थेत त्यांची नेमणूक फार थोर अधिकारपदावर होण्यासारखी त्यांची पात्रता आहे. शिफारसपत्रांचे भेंडाळे काखेला मारून श्यामजी कृष्ण वर्मा इ. स. १८८५ मध्ये हिंदुस्थानात आले.

हिंदुस्थानात आल्यानंतर स्वतःची पात्रता व इंग्लंडमधील मोठ्या लोकांची शिफारसपत्रे यांच्या जोरावर त्यांना रतलाम संस्थानची दिवाणगिरी मिळाली. तिथे असताना त्यांनी रतलामच्या महाराजांची मर्जी इतक्या चांगल्या

प्रकारे संपादिली की प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे पुढे दोन-तीन वर्षांनी जेव्हा श्यामजींनी ती नोकरी सोडली, त्या वेळी रतलामच्या महाराजांनी त्यांना बत्तीस हजार रुपये भेट देऊन त्यांना प्रेमाचा निरोप दिला. त्यानंतर श्यामजींनी काही दिवस अजमेर येथील कोर्टात वकिली केली. त्या पेशातही त्यांना खूप मिळकत झाली. परंतु श्यामजींच्या मनाला निव्वळ संपत्तीने समाधान लाभेना. संपत्तीच्या जोडीला त्यांना अपार सत्ता हवी होती. त्याप्रमाणे थोडा प्रयत्न करून ते उदेपूर ह्या मोठ्या संस्थानचे दिवाण झाले. ह्या सर्व अवधीत श्यामजी आपले स्वामी व इंग्रजी पोलिटिकल एजंट यांना आपली कामगिरी व वागणूक याद्वारे खूष ठेवण्याचे प्रयत्न करीत असत. त्या काळात त्यांनी राजकारण तर सोडाच, पण कोणत्याही स्वरूपाच्या सामाजिक अथवा धार्मिक चळवळींशी देखील स्वतःचा संबंध येऊ देण्याचे कटाक्षाने टाळले. सत्ता व संपत्ती संपादन करणे हे त्या वेळी त्यांचे मुख्य ध्येय होते. आणि ते साध्य करण्यासाठी स्वतःच्या स्वदेशी धन्याची व परदेशी लाट-साहेबांची मर्जी सांभाळणे हा मार्ग होता. काही दिवसांनी उदेपूरची नोकरी सोडून ते जुनागड संस्थानमध्ये अधिक आर्थिक लाभाच्या दिवाणपदी रुजू झाले. परंतु ह्या वेळी मात्र श्यामजींचे ग्रह फिरले. जुनागडचा नबाब तरुण असून अविचारी होता. राज्यात सत्तेसाठी दोन पक्षांत रस्सीखेच चालू होती. आपल्या बाजूला एखादा बडा इंग्रज वेळप्रसंगी असावा म्हणून श्यामजींनी म्याकनारा नावाच्या आपल्या ऑक्सफर्ड महाविद्यालयातील सहकाऱ्याला मोठ्या हुद्दयावर नेमणूक दिली. परंतु म्याकनारा मित्रच पिंडीवरचा विंचू ठरला. श्यामजीचा काटा काढून आपणच संस्थानचा दिवाण होण्याचा घाट त्याने घातला. जुनागड संस्थानात भांडणाऱ्या दोन गटांपैकी एका गटास त्याने हाताशी धरून त्याला श्यामजीविरुद्ध चिथावून दिले आणि दुसरीकडून नबाबाचे व संस्थानच्या इंग्रज पोलिटिकल एजंटचे श्यामजीविरुद्ध कान फुंकले. याचा परिणाम असा झाला की त्या अविचारी तरुण नबाबाने 'तुमच्या दुर्वर्तनामुळे तुम्हाला नोकरीतून काढून, टाकले आहे. तुम्ही तात्काळ संस्थानच्या हद्दीबाहेर जावे' असे फर्मान सोडले.

श्यामजींच्या मानी मनाला अपमानाचा व अवहेलनेचा डंख विखारी बाणाप्रमाणे दग्ध करीत होता. ब्रिटिश लोकप्रतिनिधी व ब्रिटिश वरिष्ठ अधिकारी

हे अत्यंत उदार, समंजस, गुणग्राहक व न्यायप्रिय आहेत असे त्यांच्यासंबंधी श्यामजींचे प्रांजल मत होते. आतापर्यंत त्यांना फक्त इंग्रज माणसांच्या सरळ स्वभावाच्या एका बाजूचेच दर्शन झाले असल्यामुळे श्यामजींचा इंग्रजांच्या स्वभावाबद्दल वरीलप्रमाणे प्रामाणिक समज झाला होता. त्यामुळे जुनागड संस्थानने आपल्यावर केलेल्या अन्यायाची दाद आपण इंग्रजी अधिकाऱ्यांच्या सचोटीला कौल लावून घेऊ, या घमेंडीत श्यामजींनी हिंदुस्थानपासून इंग्लंडपर्यंत अधिकाऱ्यांकडे तक्रार गुदरली. परंतु तिचा काही उपयोग झाला नाही. निराश झालेले श्यामजी परत उदेपूरच्या महाराण्याकडे गेले. त्या उदार राजाने श्यामजींना आपला दिवाण नेमले. जुनागडच्या नबाबाने त्यांच्यावर केलेले आरोप त्यांनी खोडून काढल्याशिवाय त्यांच्या नेमणुकीस कर्झन वायली या पोलिटिकल एजंटाने मंजुरी देण्याचे नाकारले. एका इंग्रज अधिकाऱ्याने एकदा जो निर्णय श्यामजीविरुद्ध घेतला तोच निर्णय एकूण एक इंग्रज अधिकाऱ्यांनी शेवटपर्यंत उचलून धरल्याचे पाहून श्यामजींना इंग्रजांच्या स्वभावाच्या दुसऱ्या छद्मी बाजूची प्रचीती आली. ब्रिटिश सत्ताधिकाऱ्यांच्या खडकावर डोके फोडून घेण्यापेक्षा एखाद्या बलवत्तर हिंदी पुढाऱ्याकरवी आपल्यावर झालेला अन्याय वेशीवर टांगावा ह्या हेतूने श्यामजींनी त्या वेळचे झुंजार पत्रकार लोकमान्य टिळक यांना आपली कहाणी कळविली. टिळकांनी त्यांची सर्व कागदपत्रे पाठविण्यास त्यांना कळविले. परंतु पुढे थोड्याच दिवसांनी रँड खुनाच्या प्रकरणी लो. टिळकांना पकडण्यात आले. आपण इंग्रज अधिकाऱ्याविषयी ज्या तक्रारी केल्या त्यामुळे एखादे वेळेस आपलीही धरपकड होईल ह्या भीतीने श्यामजींनी सहकुटुंब हिंदुस्थान सोडले व ते इंग्लंडमध्ये राहण्यास गेले.

श्यामजी कृष्ण वर्मा यांचे इंग्लंडला झालेले स्थलांतर म्हणजे त्यांच्या जीवनाला मिळालेली एक कल्पनातीत विलक्षण कलाटणी होय. आतापर्यंत सत्ता, संपत्ती व वैभव या स्वार्थात मशगुल झालेल्या त्यांच्या विचारापुढे प्रथमच आपल्या देशाचे पारतंत्र्य उभे राहिले. स्वार्थाकडून परार्थाकडे त्यांची विचारधारा व द्रव्यधारा वाहू लागली. आतापर्यंत मिळविलेली अपार संपत्ती त्यांनी गिरण्यांच्या शेअर्समध्ये गुंतविली होती. तसेच ते स्टॉक एक्सचेंजमध्ये व्यापारी उलाढाली करीत होते त्यामुळे इंग्लंडसारख्या परदेशात सुखासीन जीवित जगण्याला लागण्यापेक्षा अधिक संपत्ती त्यांना मिळत होती. इंग्रजांच्या कुटिल

स्वभावाची त्यांना स्वतःच्या बाबतीवरून चांगलीच प्रचीती आली होती. तशात इंग्लंडमध्ये गेल्यावर श्यामजींचा परिचय प्रसिद्ध तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांच्या ग्रंथांशी झाला. हिंदुस्थानबद्दल स्पेन्सर यांना सहानुभूती वाटत होती. त्यामुळे इंग्रजांच्या जुलमी शासनपद्धतीवर स्पेन्सरने आपल्या ग्रंथात परखड विचार मांडून कठोर कोरडे ओढले. स्पेन्सरचा हा निःपक्षपाती दृष्टिकोन व भारताबद्दल त्यांना वाटणारे प्रेम यामुळे भारतीय जनतेला स्पेन्सरबद्दल आपलेपणा वाटत होता. इतका घरगुती जिव्हाळा वाटत होता की; हरबर्ट स्पेन्सर या ध्वनिसादृश्यामुळे हिंदी लोक आपलेपणाने त्याला ' हरभट (हर्बर्ट) पेंडसे (स्पेन्सर)' म्हणत. स्पेन्सरच्या लिखाणाचा पुढील नमुना पाहा : " आपल्या हाताखालील नेटिव्ह सैन्याच्याच हाताने नेटिव्हांना जिंकून दास्यात डांबून ठेवणाऱ्या सत्तेचा; मिठावरील त्रासदायक कराचा, बापड्या बिचाऱ्या प्रजेला पिळून काढून तिच्या भूमीच्या उत्पन्नाचा अर्धा भाग हिसकून घेणाऱ्या कारभाराचा निषेध केला पाहिजे;... इंग्रजांनी विशेषतः हिंदुस्थानात जे जे प्रदेश जिंकले किंवा हिसकावून जोडून घेतले ते सर्व दुष्ट नि स्वार्थी हेतूपायीच होत.... ब्रिटिशांचे परदास्याचे जोखड मानेवरून फेकून देण्याचा प्रयत्न जर हिंदुस्थानने केला तर तो अपराध ठरणार नाही." हरबर्ट स्पेन्सरच्या ग्रंथाचे वाचन चालू असतानाच श्यामजींचा संबंध आयरिश क्रांतिकारकांशी आला. त्यामुळे हिंदी काँग्रेसच्या राजनिष्ठ विचारांच्या कितीतरी पुढे त्यांच्या विचारांनी मजल मारली. इंग्रज लोक सहजासहजी हिंदी लोकांना कोणत्याही प्रकारचे राजकीय हक्क देणार नाहीत याची श्यामजींना खात्री पटली होती. त्यामुळे हिंदुस्थानला राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने त्यांनी ' इंडियन होमरूल ' सोसायटी स्थापन केली. आतापर्यंत हिंदी काँग्रेसची विचारधारा अशी होती की, भारतीयांच्या कल्याणासाठी हिंदुस्थानात इंग्रजांचे राज्य राहिलेच पाहिजे. इंग्रजांशी स्वामिनिष्ठ राहण्याने आमचे कल्याण होणार आहे. इंग्रज जनता तशी न्यायप्रिय आहे. तिच्या न्यायबुद्धीला आवाहन केल्यास ती आम्हांस राजकीय सुधारणा देईल. ह्या विचारप्रणालीवर श्यामजींचा अजिबात विश्वास नव्हता. 'इंडियन होमरूल' चळवळीच्या प्रचारासाठी त्यांनी ' इंडियन सोशिआलॉजिस्ट ' हे नियतकालिक काढले. ' इंडियन सोशिआलॉजिस्ट 'च्या अग्रभागीच त्याच्या अंतरंगा-

संबंधीचे धोरण स्पष्ट केले होते. ' स्वातंत्र्याचे आणि राजकीय, सामाजिक व धार्मिक सुधारणांचे मुखपत्र '. आक्रमणाचा प्रतिकार हा केवळ समर्थनीय आहे इतकेच नव्हे तर ते एक अपरिहार्य कर्तव्य आहे ! अप्रतिकाराने स्वार्थाचीच नव्हे तर परार्थाचीही हानी होते. शस्त्रबळाने इंग्रजांना हिंदुस्थानातून हुसकून लावणे शक्य होणार नाही. म्हणून भारतीयांनी इंग्रजांशी अप्रत्यक्ष प्रतिकार (पॅसिव्ह रेझिस्टन्स) करावा. संपूर्ण असहकार करावा, म्हणजे हाती शस्त्र न घेताही इंग्रजांना हिंदुस्थानबाहेर घालविता येईल.

' इंडियन होमरूल ' सोसायटीसाठी, राजकीय विचारविनिमयासाठी व हिंदी राजकारणी लोक व विद्यार्थी यांच्यासाठी श्यामजींनी स्वखर्चाने एक इमारत घेऊन ' भारत-भवन ' (इंडिया हाऊस) असे तिचे नाव ठेवले होते. भारता-मधून इंग्लंडमध्ये उच्च अभ्यासासाठी येथे होतकरू विद्यार्थ्यांना शक्य व्हावे म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपयांच्या पाच शिष्यवृत्त्या देण्याचे श्यामजींनी जाहीर केले. मात्र अट ही की, ही शिष्यवृत्ती घेऊन शिक्षण घेतलेल्या तरुणाने इंग्रजांची नोकरी धरता कामा नये.

हर्बर्ट स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाने श्यामजी कृष्ण वर्मा इतके प्रभावित झाले की, स्पेन्सरच्या अंत्यविधीच्या प्रसंगी श्यामजींनी एक हजार पौंडांची (सुमारे पंधरा हजार रुपये) देणगी स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानावर प्रतिवर्षी व्याख्याने घडवून आणण्यासाठी ऑक्सफर्ड विद्यापीठाला दिली.

श्यामजी कृष्णांनी देऊ केलेल्या पाचपैकी एक शिष्यवृत्ती (शिवाजी शिष्य-वृत्ती) घेऊन विनायकराव सावरकर इंग्लंडला गेले. सावरकर जरी बॅरिस्टरीचा अभ्यास करीत होते तरी ' अभिनव भारत ' या गुप्त क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारी चळवळ ते करीत होते. काही दिवसांनी मॅडम कामा, श्यामजी कृष्ण वर्मा, सरदारसिंग राणा ही मंडळी अभिनव भारत संस्थेचे सभासद झाली. सरदारसिंग राणा हे काठेवाडातील राहणारे असून बॅरिस्टर होण्यासाठी विलायतेला गेले. त्यांनीही भारतीय विद्यार्थ्यांसाठी दोन शिष्यवृत्त्या ठेवल्या. राणांनी पॅरिसमध्ये जवाहिराचा धंदा सुरू केला. त्यांनी सावरकरांच्या अभिनव भारत चळवळीत भाग घेतला. इंग्लंडमध्ये राहून चळवळ करणे अशक्य झाल्यावर ही सर्व मंडळी फ्रान्समध्ये पॅरिस ह्या शहरी राहावयास

गेली. तेथे राहून भारतातील क्रान्तिकारकांना क्रान्तिकारी मजकुरांची पत्रके, पुस्तके व रिव्हॉल्वर हे लोक पुरवीत असत.

सावरकर पकडले गेले. पहिले महायुद्ध सुरू झाले. इंग्रज व फ्रेंच हे मित्र होऊन जर्मनीशी लढू लागले. आता फ्रान्समध्ये राहणे धोक्याचे वाटून श्यामजी स्वित्झर्लंडला राहावयास गेले. संगती-सोबती नियतीने दूर ओढून नेले. अशा विषण्ण मनःस्थितीत भारतीय स्वातंत्र्याचा ध्यास करीत श्यामजी कृष्ण वर्मा १९३० मध्ये मरण पावले.

६. क्रान्तीची कालीमाता

(मादाम कामा)

" हा पाहा स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज ! नुकताच त्याचा जन्म झाला आहे. भारतीय हुतात्मा युवकांच्या रक्ताने तो पावन झाला आहे. उपस्थित सद्गृहस्थहो, आपण ह्या स्वतंत्र भारताच्या ध्वजाच्या सन्मानासाठी उभे राहून त्याला प्रणाम करावा, असे मी तुम्हाला आवाहन करीत आहे."



धीर गंभीर आवाजात केलेल्या आवाहनानुसार सभेतील सर्व मंडळी उठून उभी राहिली व त्यांनी स्वतंत्र भारताच्या त्या ध्वजास मानवंदना दिली.

इ. स. १९०७ साली जर्मनीमध्ये स्टटगार्ट शहरी आंतरराष्ट्रीय समाजवादी सभा भरली होती. त्या (इंटरनॅशनल सोशालिस्ट कॉन्फरन्स) सभेसाठी निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी तेथे जमले होते. त्या ठिकाणी जमलेल्या प्रतिनिधींनी देशोदेशींच्या ध्वजांना वंदना दिली होती. हिंदुस्थान त्या वेळी इंग्रजांच्या अंमलाखाली होता. इंग्रजांनी हिंदी राजेरजवाड्यांना जिंकल्याबरोबर भगवा झेंडा, जरीपटका, चांदतारा हे सर्व ध्वज खाली आले व युनियन जॅक हे इंग्रजांचे निशाण हिंदुस्थानच्या भूमीवर फडकू लागले. वस्तुस्थिती अशी असल्यामुळे १९०७ साली हिंदुस्थानही स्वतंत्र नव्हता व त्या स्वतंत्र हिंदुस्थानला ध्वज पण नव्हता. हिंदी स्वातंत्र्यासाठी ज्या कॉंग्रेसचा १८८५

मध्ये जन्म झाला तिला पण स्वतंत्र राष्ट्रध्वज नव्हता. इंग्रजांचे राज्य नाहीसे करून तेथे आम्हा हिंदी लोकांचे राज्य आणावयाचे, हे मुळी त्या काँग्रेसचे ध्येयच नव्हते. उलट इंग्रजांच्या कल्याणकारी राज्यात आमचे भले होईल, असा विश्वास त्या वेळच्या हिंदी पुढाऱ्यांना असल्यामुळे युनियन जॅकच्या ऐवजी अन्य स्वतंत्र ध्वजाची कल्पनाही त्यांच्या मनाला शिवली नसावी. तथापि प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठी इंग्लंडमध्ये गेलेल्या त्या हिंदी महिलेला आपल्या राष्ट्राचा स्वतंत्र ध्वज नाही, ह्या कल्पनेने अस्वस्थ केले. रात्रीतून तिने रेशमी कापडाचा तारांकित ध्वज तयार केला व दुसऱ्या दिवशीच्या त्या आंतर-राष्ट्रीय सभेमध्ये स्वतंत्र भारताचा तो नवजात ध्वज फडकाविला. त्या बहादर महिलेचे नाव मॅडम कामा.

कामाबाईंचा जन्म मुंबईस एका सधन पारशी कुटुंबात सन १८६१ मध्ये झाला. त्यांचे नाव भिकाजीबाई. रुस्तुमजी या पारशी बॅरिस्टराशी त्यांचा विवाह झाला. रुस्तुमजी कामा हे देखील फार श्रीमंत गृहस्थ होते व बॅरिस्टरीच्या पेशामुळे त्यांचे सरकारदरबारी चांगले वजन होते. पारशी समाज हा राहणीने इतर हिंदी लोकांच्या मानाने बराच पुढारलेला असे. त्यामुळे ह्या कामा दांपत्याला गव्हर्नर अथवा अन्य बड्या इंग्रज अधिकाऱ्यांनी आयोजिलेल्या समारंभाला व खाण्या-पिण्याच्या मेजवान्यांना जाण्याचे प्रसंग वारंवार येत असत. त्याचप्रमाणे त्यांच्याकडेही इंग्रज स्त्री-पुरुषांचे येणे, जाणे असे. इंग्रजी समाज, इंग्रज अधिकारी यांच्याशी येत असलेल्या या संबंधामुळे कामा कुटुंबाला एक प्रकारची सामाजिक उच्च प्रतिष्ठा लाभली होती.

भिकाजीबाईंना संपत्ती होती, वैभव होते व मुलेबाळेही होती. तथापि त्या गोष्टीत त्यांचे मन रमत नसे. रंजल्या-गांजल्यांची सेवा करावी, अशी ओढ त्यांच्या मनाला लागली व त्या समाजोपयोगी कामे करू लागल्या. एकोणि-साव्या शतकाच्या शेवटच्या दशकात (१८९० ते १९००) मुंबई इलाख्यातील बऱ्याच शहरांत प्लेगने कहर उडवून दिला होता. मुंबई शहर देखील प्लेगच्या फेऱ्यात सापडले. प्लेगची साथही नवीन असल्यामुळे त्या रोगावर त्या काळात प्रभावशाली औषधे निघाली नव्हती. म्हणून प्लेगची लागण झाली की, माणसे पटापट मरत असत व रोग्यांची शुश्रूषा करणाऱ्या माणसांना रोग्यांच्या संपर्कामुळे व संसर्गामुळे प्लेगची बाधा होत असे. ह्यास्तव रोग्यांची शुश्रूषा

करण्यास माणसे धजत नसत. रोग्यांच्या शुश्रूषेसाठी उभारण्यात आलेल्या स्वयंसेवक पथकात कामाबाईंनी स्वतःचे नाव नोंदविले. पगारी नोकरांपेक्षाही जास्त कळकळीने व मायेने त्यांनी रोग्यांची सेवा केली. असे कार्य चालू असतानाच त्या स्वतः प्लेगची शिकार झाल्या तथापि त्यांच्या आणि भारताच्या सुदैवाने त्या त्या आजारपणातून बचावल्या. परंतु त्या जीवघेण्या आजाराने त्यांची प्रकृती खूपच ढासळून गेली. प्लेगदूषित हवेपासून खूप दूर अशा आल्हाददायक व थंड हवेच्या देशात जाण्याचा सल्ला डॉक्टरांनी त्यांना दिला. त्याच सुमारास काही घरगुती कारणामुळे कामा पति-पत्नींचे आपसात न पटू लागल्यामुळे त्यांनी एकमेकांपासून विच्छेद घेतला व बाई प्रकृती सुधारण्यासाठी १९०२ साली इंग्लंडला गेल्या.

इंग्लंडला गेल्यानंतर मॅडम कामा ह्यांनी त्या वेळी तेथे राहात असलेल्या दादाभाई नौरोजी यांची गाठ घेतली. दादाभाई एक तर कामाबाईंच्या पारशी समाजाचे होते व दुसरे म्हणजे काँग्रेसचे एक नामवंत पुढारी म्हणून लंडन-मध्ये त्यांना मान दिला जात होता. सुरुवातीला काही दिवस कामाबाईंचे लक्ष दादाभाईंच्या राजकीय चळवळीकडे आकर्षले गेले. परंतु फक्त सुरुवातीचे काही दिवसच. त्यांचा पिंड लढाऊ व बाणेदार वृत्तीचा होता. त्यामुळे लौकरच श्यामजी कृष्ण वर्मा व सरदारसिंग राणा यांच्या सान्निध्यात आल्यावर लढाऊ व चढाऊ राजकारणाचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले.

स्टटगार्ट येथील समाजवादी राष्ट्रांच्या परिषदेनंतर मॅडम कामा अमेरिकेत गेल्या. अमेरिकन जनतेपुढे दिलेल्या एका भाषणात त्या म्हणाल्या, "आमच्या देशातील उत्तमोत्तम माणसांना हद्दपार तरी करण्यात येत आहे, किंवा गुन्हेगारांप्रमाणे तुरुंगात तरी लोटले जात आहे. आणि तेथे त्यांच्या पाठीवर चाबकाचे फटकारे मारून रक्तबंबाळ स्थितीत त्यांना इस्पितळात जावे लागत आहे. आम्ही शांतताप्रिय लोक आहोत, आम्हाला रक्तलांच्छित क्रान्तीची हाव नाही, परंतु आम्हाला आमच्या जनतेला तिच्या हक्कांची जाणीव करून देऊन तिच्यावर लादलेले पारतंत्र्याचे जोखड उखडून टाकायचे आहे." इजिप्तमध्ये सुरू असलेल्या क्रान्तीच्या चळवळीला सहानू-भूती दाखविण्यासाठी त्यांनी इजिप्तलाही भेट दिली.

सन १९०६ साली स्वा. सावरकर बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी इंग्लंड-

मध्ये गेले. पं. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी हिंदी विद्यार्थी व हिंदी राजकारणी व्यक्तींच्या उपयोगासाठी लंडनमध्ये खरेदी केलेल्या भारत-भवन (इंडिया हाऊस) या इमारतीत सावरकर राहू लागले. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी पुरस्कारिलेल्या शिष्यवृत्त्यांपैकी एक शिष्यवृत्ती मिळवून सावरकर विलायतेस गेले होते. लंडनला पोहोचल्यावर थोड्याच दिवसांत सावरकरांनी आपल्या अभिनव भारत ह्या गुप्त क्रान्तिकार्याची मुहूर्तमेढ रोवली. लाला हरदयाळ, सरदार सिंह राणा, श्यामजी कृष्ण वर्मा, मॅडम कामा या सर्वांना त्यांनी अभिनव भारताची शपथ दिली. त्यामुळे कामाबाईंच्या भाषणातील शब्द ठिणग्यांचा दाहकपणा घेऊन निघू लागले.

अमेरिकेहून आल्यानंतर १९०८ साली त्यांनी इंग्लंडमध्ये दिलेले प्रसिद्ध भाषण पाहा : "अत्याचारी किंवा हिंसक चळवळीचे नुसते नाव उच्चारले तरी मला तीन वर्षांपूर्वी त्या गोष्टीचा तिटकारा वाटत असे. परंतु लिबरल पक्षातील (उदार मतवादी) लोकांचा ढोंगीपणा, पाजीपणा व निर्घृणपणा यामुळे आता माझी ती विचारसरणी पूर्णपणे पालटून गेली आहे. आम्ही बळाचा वापर करतो, कारण बळाचा वापर करण्यास आम्हाला भाग पाडण्यात येत आहे. रशियन सोफी परव्होस्काई व तिचे सहकारी यांनी ज्या गोष्टी केल्या व ज्या कारणाकरता केल्या त्या गोष्टींसाठी इंग्रज स्त्री-पुरुषांच्या दृष्टीने ते क्रांतिवीर आणि क्रांतिबाला ठरत आहेत. आणि तंतोतंत त्याच गोष्टी व त्याच कारणासाठी केल्या असता ही मंडळी आम्हां क्रांतिकारकांना मात्र गुन्हेगार समजून तुरुंगात डांबतात. रशियात झालेल्या हिंसा-अत्याचाराचे तुम्ही पोवाडे गाता. मग त्याच गोष्टी हिंदुस्थानात घडल्यानंतर हा न्याय त्यांना का लागू नसावा ? जुलूम, तो कोठेही घडला तरी जुलूमच आणि पीडा-पिळवणूक ती कोणीही केली तरी पीडा–पिळवणूकच. कृतीचे मोल तिच्या यशानेच जोखले जाते. परकीय सत्तेविरुद्ध बंड यशस्वी झाले की तेच देशाभिमान ठरते. ह्यास्तव मित्रहो, आपल्या मनातील सर्व शंका, भीती व अडचणी दूर फेकून द्या."

मॅडम कामांच्या वरील स्वरूपाची जहाल विचारसरणी व त्यांच्या हालचाली यामुळे त्यांच्या दृष्टीने आता इंग्लंडमध्ये राहाणे असुरक्षितपणाचे होते. ह्यामुळे क्रांतिकारकांच्या हालचालींच्या दृष्टीने सुरक्षित असलेली

जागा म्हणजे फ्रान्समधील पॅरिस हे शहर होय. त्यामुळेच पं. श्यामजी कृष्ण वर्मा, सरदारसिंग राणा व सावरकर हे पॅरिस येथे राहू लागले होते. मॅडम कामाही पॅरिस येथे राहाण्यास गेल्या. फ्रान्समधील उच्च वर्णीय समाजातील स्त्री-पुरुषांच्या सांस्कृतिक चळवळीत त्या मनोभावे भाग घेऊ लागल्या. त्यांच्या उमद्या स्वभावामुळे फ्रेंच समाजात त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. हिंदी जनतेमध्ये क्रांतीचे विचार प्रसृत करण्यासाठी त्यांनी 'वंदे मातरम्' नावाचे मासिक पत्रक सुरू केले होते. 'वंदे मातरम्' पत्रातील पुढील उताऱ्यावरून त्या पत्राच्या लिखाणाची कल्पना येऊ शकेल. सन १९११ च्या सुमारास पंचम जॉर्ज बादशहाच्या राज्यारोहणाच्या निमित्ताने हिंदुस्थानातील संस्थानिक भारी कपडे व दागदागिन्यांनी सजून लंडनच्या रस्त्यातून लाचारीने परेडने चालत होते. त्याच वेळी दक्षिण हिंदुस्थानात पांची अय्यरने कलेक्टर ॲशचा व दुसऱ्या एका क्रांतिकारकाने एका फौजदाराचा वध केला होता. त्या घटनेला उद्देशून "ज्या वेळी सोन्याच्या अलंकारांनी मढवलेले हिंदुस्थानातील गुलाम (राजेरजवाडे) इंग्लंडच्या बादशहाच्या चरणांशी गाईप्रमाणे लोळण घेण्यासाठी शाही सर्कशीचे कसरतपटू म्हणून लंडनच्या रस्त्याने परेड करीत जात होते, त्याच वेळी तिनेवेल्ली आणि मैमनसिंग येथे आमच्या दोन तरुण बांधवांनी शौर्याची व धैर्याची कृत्ये करून हिंदुस्थान जागा आहे, हे जगाला दाखवून दिले आहे. (१२ जुलै १९११ चा 'वंदे मातरम्'चा अंक)

निरनिराळ्या क्रांतिकार्यांना व क्रांतिकारकांना मॅडम कामा आर्थिक साह्य करीत असत. १८५७ च्या समराचा पन्नासावा स्वातंत्र्य-दिन स्वा. सावरकरांनी लंडनमध्ये साजरा केला. त्या वेळी राणांच्या हाती कामा बाईंनी द्रव्यसाह्य पाठविले होते. सावरकरांना पकडल्यानंतरच्या काळात त्यांच्या कुटुंबियांना बाईंनी वेळोवेळी द्रव्यसाह्य केले.

केवळ भारताच्या स्वातंत्र्याकरताच नव्हे तर आपल्या पूर्वेकडील देशांच्या स्वातंत्र्याची तळमळ मॅडम कामांना लागली होती. इजिप्त, इराण चीन व तुर्कस्थान या देशातील क्रांतिकारक त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांच्या-कडे जात. पहिल्या महायुद्धाच्या काळात इंग्रजांच्या चिथावणीवरून फ्रेंच सरकारने त्यांच्यावर खूप बंधने घातली. आठवड्यातून एकदा त्यांना

पोलीस चौकीवर हजेरी लावावी लागे. गतिचक्र व विचारचक्र यांमुळे त्यांची प्रकृती संपूर्णपणे ढासळून शारीरिक दृष्ट्या त्या पूर्णपणे अगतिक बनल्या. हिंदुस्थान सरकारने त्यांचे घर, जमीनजुमला इ. लाखांची मिळकत जप्त केली.

अशा असहाय स्थितीत सर कावसजी जहांगीर यांनी सरकारला विनंती केल्यावरून मॅडम कामांना हिंदुस्थानात आणण्याची परवानगी मिळाली.

मुंबईमधील पेटिट इस्पितळात बरीच वर्षे अंथरुणाला खिळलेल्या असहाय्य, अगतिक, अभागी अवस्थेत दिवस काढून दि. ११ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी प्राण सोडला. जिच्या शब्दांच्या सामर्थ्याने प्रबल साम्राज्यशाही एकेकाळी हादरत होती, ती भारतीय क्रांतीची कालीमाता मुंबईसारख्या गजबजलेल्या नगरात अगदी अज्ञात अवस्थेत इहलोक सोडून गेली. ना तिच्या शवावर हिंदी जनतेने फुले उधळली, ना अश्रू ढाळले ! तिच्या स्मृतीवर ना चिरा, ना पणती !

* * *

७. आई, तू मला कधी भेटशील ?

(स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर)

"हे हुतात्म्यांनो, आम्ही तुम्हाला विसरलो नाही. शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत इंग्रजांशी लढा देऊ, ज्या कार्यासाठी तुम्ही तुमच्या प्राणांच्या आहुती दिल्या ते कार्य पुढे चालू ठेवू, अशी प्रतिज्ञा तुमच्या स्मृतींच्या साक्षीने आम्ही करीत आहोत." इंग्रजांच्या राजधानीतून अशी आरोळी एका तरुण क्रांतिकारकाने ठोकली. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाच्या अर्धशत-सांवत्सरिक उत्सवाच्या प्रसंगी 'हुतात्म्यांनो' वरील मजकुराची ही पत्रके त्या तरुणाने तयार केली. विनायक दामोदर सावरकर हे त्या तरुण क्रांतिकारकाचे नाव. नासिकजवळच्या भगूरचा राहणारा हा तरुण बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी इ. स. १९०६ मध्ये इंग्लंडला गेला होता. १९०७ साली सत्तावनच्या घटनेला पन्नास वर्षे झाली होती. ह्या स्वातंत्र्याचा अर्धशत-सांवत्सरिक उत्सव आपल्या सहकाऱ्यांसह साजरा केला. इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयात जाऊन त्यांनी अठराशेसत्तावनच्या उठावाच्या अस्सल कागद-पत्रांवरून 'अठराशेसत्तावनचा स्वातंत्र्यसंग्राम' हा ग्रंथ तयार केला. सावरकरांच्या वेळचे व नंतरचे सशस्त्र क्रांतिकारक ह्या ग्रंथाला गीतेसारखे पूज्य मानीत असत. ह्या ग्रंथाने तरुणांची मने सशस्त्र क्रांतीच्या विचाराने पेटवून दिली. ह्या पुस्तकाचे हे विलक्षण सामर्थ्य पाहून सरकारने ते जप्त केले. तरी देखील गुप्त रीतीने त्याच्या प्रती भारतात व इतर देशांत गेलेल्या हिंदी क्रांतिकारकांकडे पाठविण्यात आल्या.

सावरकरांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण नासिक येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण पुण्यास होऊन ते बी. ए. झाले. प्रसिद्ध क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे बॅरिस्टर होण्यासाठी ते लंडनला गेले. श्यामजी कृष्ण वर्मा ह्यांनी लंडनमध्ये एक प्रशस्त इमारत विकत घेतली होती. इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, म्हणून त्या इमारतीचा उपयोग केला जात होता. विनायकराव सावरकर त्याच इंडिया-हाऊस (भारत भवन) वसतिगृहात राहात होते. त्या वेळी हिंदुस्थानातून निवडक बुद्धिमान विद्यार्थी निरनिराळ्या क्षेत्रांतील उच्च शिक्षण घेण्यासाठी

इंग्लंडमध्ये जात होते. त्या बुद्धिमान व कर्तबगार विद्यार्थीवर्गाकडे पुढे हिंदुस्थानचे नेतेपण जाणार होते. म्हणून सावरकरांनी त्यांना सशस्त्र क्रांतीची दीक्षा देण्यास सुरुवात केली. नासिक येथे सावरकर व त्यांचे सहकारी ह्यांनी सशस्त्र क्रांतीसाठी 'अभिनव भारत' नावाची एक गुप्त संघटना सुरू केली होती. त्या संघटनेची शाखा त्यांनी लंडनमध्ये इंडिया हाऊसमध्ये उघडली. सावरकरांच्या 'सत्तावनाचा संग्रामा'च्या वाचनाने, त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने व जाज्वल्य देशाभिमानाने इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी गेलेले हिंदी विद्यार्थी त्यांच्याकडे आकृष्ट होत. देवीच्या मूर्तीसमोर शपथ देववून सावरकर ह्या तरुणांना अभिनव भारत संस्थेचे सभासद करून घेत. क्रांतीच्या विचारांबरोबरच त्यांना शस्त्रांचीही माहिती देण्यात येई. पुढे ज्यांची माहिती देण्यात आली आहे, ते मदनलाल धिंग्रा, लाला हरदयाल, भाई परमानंद, सेनापती बापट वगैरे क्रांतिकारकांनी सावरकरांपासून त्यांच्या जीवनकार्याला स्फूर्ती घेतली. सावरकर व त्यांची 'अभिनव भारत' संस्था म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या क्रांतिकार्याची गंगोत्रीच. तिच्यातून निघालेल्या क्रांतिकारकांच्या जीवन-प्रवाहांनी भिन्न भिन्न क्षेत्रात क्रांतिकार्याचा फैलाव केला.

विद्यार्थी असतानाच विनायकराव सावरकर यांनी त्यांचे वडील बंधू गणेशपंत, धाकटे बंधू नारायणराव, खरे, वामनशास्त्री दातार, वैद्य, केळकर, भट, कर्वे, देशपांडे, अपंग शाहीर गोविंद इत्यादींच्या सहकार्याने 'मित्र-मेळा' नावाची संस्था काढली. त्या संस्थेमार्फत शिवाजी उत्सव व गणेशोत्सव साजरे केले जात असत. त्या वेळी भाषणे व मेळ्यांतील पदे ह्यांच्या योगाने जनतेत इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध प्रतिकार करण्याची चिथावणी देण्यात येत असे. त्याच मित्रमेळ्याचे पुढे 'अभिनव भारत' असे रूपांतर झाले. क्रांतिकार्याला वाहून घेणे, संघटनेशी एकनिष्ठ राहाणे, कार्याची गुप्तता पाळणे इत्यादी गोष्टींसंबंधी अभिनव भारताचा सभासद होणाऱ्याला देवीच्या मूर्तीसमोर शपथ देण्यात येई. विनायकराव सावरकर हे विद्यालयीन शिक्षणासाठी पुण्यास गेल्यावर तेथे त्यांनी अभिनव भारत संस्थेच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. तेथे त्यांनी एकदा विलायती कापडाची मोठी होळी केली. त्यामुळे महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांना दंड केला. प्राचार्यांच्या व सरकारच्या रोषाची त्यांनी पर्वा केली नाही.

सावरकरांनी इंग्लंडमधून जाडजूड पुस्तकाची पाने कोरून त्या पोकळीत पिस्तुल घालून अशी काही पिस्तुले नासिकला अभिनव भारताच्या कार्यकर्त्यांकडे पाठविली, तसेच इंडिया हाऊसमध्ये आचारी म्हणून काम करीत असलेल्या चतुर्भुज ह्या माणसाबरोबर वीस पिस्तुले त्याच्या पेटीच्या तळाशी भरून हिंदुस्थानात पाठवून दिली. पिस्तुलाच्या वरच्या बाजूला फळ्या ठोकून वर इतर सामान व कपडे भरलेले होते. त्यामुळे चतुर्भुज हिंदुस्थानात आल्यावर सामान तपासणीत ती पिस्तुले उघडकीस आली नाहीत. चतुर्भुजाने ती पिस्तुले मुंबई येथे अभिनव भारताच्या कार्यकर्त्यांकडे पोहचती केली. सावरकरांनी पाठविलेल्या पिस्तुलांपैकी एका पिस्तुलानेच अनंता कान्हेरे यांनी नासिकच्या विजयानंद नाट्यगृहात जॅक्सन कलेक्टरला ठार मारले. (तो प्रसंग पुढे वाचावयास मिळेल.) अनंता कान्हेरेची चौकशी सुरू झाल्यानंतर त्यांच्याजवळ सापडलेले पिस्तुल सावरकरांनी इंग्लंडमधून पाठविल्याचे निष्पन्न झाले. म्हणून ब्रिटिश सरकारने सावरकरांना लंडन येथे पकडले.



त्यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या संबंधात सावरकरांना हिंदुस्थानात आणण्यासाठी पोलिस पहाऱ्यात 'मोरिया' बोटीवर चढविण्यात आले. बोटीच्या प्रवासात कोणत्या ठिकाणी सुटका करून घ्यावी ह्यासंबंधीची विचारचक्रे त्यांच्या मनात फिरू लागली. बोटीवरील संडासाच्या बिवराचे (पोर्टहोल) माप त्यांनी दोरीने घेऊन ठेवले व त्या बिवरातून त्यांचे शरीर मावते का नाही, ह्याचा अंदाज त्यांनी बांधून ठेवला व योग्य संधीची ते

वाट पाहू लागले. प्रवास सुरू झाल्यावर बोटीच्या यंत्रात काही बिघाड झाल्यामुळे बोट फ्रान्सच्या किनाऱ्यावरील 'मार्सेल्स' या बंदराजवळ नांगरली गेली. ही संधी योग्य आहे असे वाटून सावरकर संडासात गेले. संडासात असलेल्या आरशात आपले प्रतिबिंब बाहेर पहाऱ्यावर असलेल्या पहारेकऱ्यास दिसू नये म्हणून त्यांनी आपला अंगरखा त्या आरशावर टाकला. शरीराचे शक्य तेवढे आकुंचन करून त्यांनी पोर्टहोलमध्ये शरीर कोंबले व समुद्रात उडी टाकली. बोटीवरील एका अधिकाऱ्याने ते पाहिले. कैदी पळाल्याची गोष्ट अधिकाऱ्यांच्या ध्यानात आली. बोटीवरून त्यांच्या रोखाने गोळीबार करण्यात आला. सुदैवाने सावरकरांना गोळी लागली नाही. काही शिपायांनी त्यांना पकडण्यासाठी लगेच समुद्रात उड्या टाकल्या. सुमारे मैलभर अंतर पोहत जाऊन सावरकर फ्रान्सच्या किनाऱ्याला लागले. किनारा गाठताच 'गाडी गाडी' असे ओरडत ते घोडागाडीच्या शोधासाठी पळू लागले. रस्त्यात एक फ्रेंच पोलीस उभा होता. सावरकर आश्रयासाठी त्याच्याजवळ गेले. ते आता एका स्वतंत्र देशाच्या भूमीवर उभे होते. नियमाप्रमाणे आता त्यांना ब्रिटिश पोलीस पकडू शकत नव्हते. तथापि त्या फ्रेंच पोलिसाने आपल्या कर्तव्यपालनात कसूर केली. त्याने सावरकरांच्या पाठीमागून पाठलाग करीत असलेल्या ब्रिटिश पोलिसांच्या स्वाधीन त्यांना केले.

हिंदुस्थानात आणल्यावर सावरकरांवर खटला भरण्यात आला. सावरकरांनी हिंदुस्थानातून इंग्रजांचे राज्य घालवून देण्याचा प्रयत्न केला. इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करण्यासाठी पिस्तुले पुरविली इत्यादी आरोपांखाली त्यांना दोन जन्मठेपेची– पन्नास वर्षे काळ्या पाण्याची– शिक्षा ठोठविण्यात आली. (इ. स. १९१०).

सावरकरांच्या हातापायांत लोखंडी बेड्या ठोकण्यात आल्या व साखळदंड अडकवण्यात आले. बोटीतून त्यांना समुद्राच्या पलीकडे, दूरदूर काळ्या पाण्यावर न्यावयाचे होते. अंगात कैद्याचा पोषाख घातलेले सावरकर अंदमानास जाणाऱ्या बोटीकडे संगीनधारी पोलिसांच्या पहाऱ्यात चालले होते. त्यांच्या हातापायांना बांधलेले साखळदंड खळखळ वाजत होते. बुटांच्या धडधड आवाजाला, साखळदंडाचा खळखळ आवाज साथ देत होता. एका धीरगंभीर प्रसंगाला एका बेसूर नादाची पार्श्वसाथ ! भारताचा किनारा

सोडताना सावरकर जमिनीवर वाकले. धरणीवरची चिमुटभर माती उचलून त्यांनी आपल्या कपाळी लावली, तोंडात घातली व धरणीमातेला वंदन केले. त्यांचे मन जणू म्हणत होते, 'भारतमाते, तुझ्या स्वातंत्र्यासाठी मी हे सर्व केले. आई, मला तू कधी भेटशील ? आपल्या बाळाचा शेवटचा नमस्कार घे आणि आशीर्वाद दे.' केवढे हे देशप्रेम ! केवढा हा देशाभिमान !

बोटीने भारताचा किनारा सोडला. भारतापासून तीन-चारशे कोसांवर अंदमान नावाचे बेट आहे. त्या बेटावर अट्टल दरवडेखोर, खुनी व भयंकर अशा कैद्यांना ठेवण्यासाठी खूप कोठ्या असलेला एक तुरुंग आहे. त्याला 'सेक्युलर' जेल (खोल्यांचा तुरुंग) असे म्हणत असत. काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी तेथे ठेवण्यात येत असत. अंदमानची हवा फार वाईट होती. बेटावरील दाट झाडींमुळे हवा रोगट होती. कैद्यांच्या खोल्यांतून डास, ढेकूण, पिसवा व इतर कीटक यांचा सुळसुळाट होता. गवतात असलेल्या जळवा कैद्यांच्या अंगात तोंड खुपसून त्यांचे रक्त शोषून घेत असत. जर एखाद्या कैद्याने मोठ्या प्रयासाने पळून जाण्याचा प्रयत्न केला तर तो जिवावर बेतत असे. अंदमान बेटावरील जंगलात तेथील मूळच्या रहिवासी रानटी लोकांची वसाहत होती. ते लोक नरमांसभक्षक होते पळून जाणाऱ्या अशा कैद्यांची ते लगेच शिकार करीत.

अशा त्या राक्षसी तुरुंगात सावरकरांना ठेवण्यात आले. तेथे त्यांना जड जाते ओढीत दळण दळावे लागे (चक्की पिसणे). काही वेळेला त्यांना तेलघाण्याला बैलाप्रमाणे जुंपले जाई. काथ्याचे दोर हाताने वळताना त्यांचे तळहात रक्तबंबाळ होत. त्या राक्षसी श्रमांनी त्यांचा ऊर फुटून निघून तोंडातून रक्त येई. क्रूर बारीबाबा जेलरचे चाबूक देखील खावे लागत. तरी देखील हा स्वातंत्र्यवीर त्या यमयातनांना डरला नाही, नमला नाही. खरा मृत्युंजय वीर !

साखळदंडाने जखडलेला हा देशभक्त दिवसभराचे जीवघेणे काम संपल्यावर संध्याकाळी अफाट पसरलेल्या या सागराच्या क्षितिजकक्षेपलीकडे असलेल्या आपल्या मातृभूमीकडे दृष्टी रोखीत त्या सामर्थ्यवान सागराची मनोमन आळवणी करीत असे.

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला ।।

* * *

८. भारताची अस्मिता

(मदनलाल धिंग्रा)

पं. श्यामजी कृष्ण वर्मा यांनी लंडनमध्ये 'इंडिया हाऊस' (भारत भवन) नावाची एक इमारत इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी गेलेल्या हिन्दी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी विकत घेतली होती. स्वतः श्यामजी कृष्ण वर्मा हे क्रांतिकारक होते. क्रांतिकारक हिंदी विद्यार्थ्यांना ते उत्तेजन देत असत. त्यामुळे इंडिया-हाऊस म्हणजे क्रांतिकारक हिंदी विद्यार्थ्यांचे सशस्त्र क्रांतीच्या चळवळीचे केंद्र बनले होते. सन १९०६ मध्ये विनायक दामोदर सावरकर हे बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी लंडन येथे गेले. ते 'इंडिया हाऊस'मध्येच राहात असत. सावरकरांनी इंडिया हाऊसमध्ये 'अभिनव भारत' ह्या त्यांच्या सशस्त्र गुप्त संघटनेची शाखा उघडली. इंग्लंडला आलेल्या हिंदी विद्यार्थ्यांना शपथ देऊन सावरकर त्यांना 'अभिनव भारताचे' सभासद करून घेत. मदनलाल धिंग्रा हा पंजाबी विद्यार्थी अशाच प्रकारचा एक सभासद होता.

इंडिया हाऊसच्या माळ्यावरील एका खोलीत एकदा सावरकर एक काचेचे भांडे तापवीत होते. त्या काचेच्या भांड्यात काही स्फोटक द्रव्ये होती. ते भांडे फार तापले होते व लगेच खाली उतरविणे आवश्यक होते, नाही तर काचपात्रातील द्रव्याचा मोठा स्फोट झाला असता आणि त्याबरोबरच गुप्ततेचाही स्फोट झाला असता. काचेचे भांडे पकडण्याचा चिमटा जवळपास आढळेना. पुढे घडणारी ही गंभीर घटना लक्षात येताच थोडाही विचार न करता सावरकरांच्या जवळ बसलेल्या मदनलालने उघड्या हाताने ते काच-पात्र पकडून खाली उतरून ठेविले. तापलेल्या काचपात्राने मदनलालच्या हाताच्या तळव्याची नाजूक कातडी भाजून करपून गेली, तरी देखील स्वतःच्या दुःखापेक्षा पुढे घडणारा अनर्थ आपण टाळू शकलो, ह्या विचाराने त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे स्मित झळाळत होते.

मदनलालचे वडील अमृतसर येथे शल्यचिकित्सकाच्या (सिव्हिल सर्जन) हुद्द्यावर काम करीत होते. पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची परवानगी मदनलालने वडिलांच्याजवळ मागितली. परंतु मुलाच्या हूड स्वभावामुळे वडिलांनी त्याला तशी परवानगी दिली नाही म्हणून मदनलाल

एके दिवशी गुपचुपपणे घरातून बाहेर पडला. इंग्लंडला जाणाऱ्या बोटीवर इंजिनात कोळसे टाकण्याची नोकरी पत्करून तो इंग्लंडला गेला. तेथे तो स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करू लागला. इंग्लंडात असताना तो सावरकरांच्या सहवासात आला व ' अभिनव भारत ' संस्थेचा सभासद बनला.

हिंदुस्थानचा व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन ह्याने हिंदुस्थानातील राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्याचे धोरण अवलंबिले होते. बंगाली देशभक्तांच्या संघटनेची शक्ती खच्ची करण्यासाठी त्याने बंगाल प्रांताची फाळणी केली होती. पंजाबचे पुढारी लाला लजपतराय ह्यांना हद्दपार केले होते. लो. टिळकांना मंडाले (ब्रह्मदेश) येथे तुरुंगात ठेवले होते. राष्ट्रीय चळवळ दडपून टाकण्याचे हुकूम सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यानुसार नासिक येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट जॅक्सन ह्यांनी सावरकरांचे वडील बंधू गणेश दामोदर सावरकर ह्यांना काळ्या पाण्याची शिक्षा दिली होती. कारण काय तर त्यांनी देशभक्तिपर कवितांचे पुस्तक प्रसिद्ध केले होते.

ही सर्व परिस्थिती ऐकून मदनलाल धिंग्रा यांच्या अंगाची संतापाने लाही लाही झाली होती. भारतातील दडपशाहीच्या व जुलमाच्या राजवटीस सर कर्झन वायली हा भारतमंत्र्याचा चिटणीस (स्टेट सेक्रेटरी फॉर इंडिया) व भारताचा गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन हे दोघे जबाबदार आहेत, असे धिंग्रांना वाटले. त्या दोघांचा काटा काढण्याचा बेत त्यांनी मनाशी ठरविला. आपल्या योजनेची पूर्वतयारी म्हणून त्यांनी एक पिस्तुल विकत घेतले व नेमबाजी शिकण्याच्या वर्गात नाव नोंदविले. थोड्याच दिवसात नेमबाजीत ते तरबेज झाले.

आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी सर कर्झन वायलीशी परिचय करून घेतला व त्याच्याकडे वारंवार जाणे-येणे सुरू केले. थोड्याच दिवसांत धिंग्रांनी कर्झन वायलीचा विश्वास संपादन केला. कर्झन वायलींना वाटले, ह्या तरुण मुलाच्या पोटात शिरून क्रांतिकारकांच्या गटातील गुप्त बातम्या काढून घेण्याचा मार्गच उपलब्ध झाला आहे.

एके दिवशी हिंदुस्थानचा व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन ह्याचे लंडनमध्ये व्याख्यान होते. त्या प्रसंगी सर कर्झन वायलीही उपस्थित राहाणार होता. दोघांनाही ठार करण्याची ही संधी पाहून, भरलेली दोन पिस्तुले घेऊन

मदनलाल त्या ठिकाणी गेले तथापि ते जाण्याच्या अगोदरच व्याख्यान सुरू झाल्यामुळे सभागृहाचे दरवाजे बंद झाले होते म्हणून निराशेने मदनलाल परत गेले. कर्झनसारख्या अरेरावी व जुलमी अधिकाऱ्याची मोठी शिकार हातची गेल्याने ते खिन्न झाले.

त्यानंतर दि. १ जुलै १९०९ हा दिवस. तो दिवस 'नॅशनल इंडियन असोसिएशन' ह्या संस्थेचा वार्षिक दिन. वार्षिक दिनानिमित्त खाणे-पिणे, व्याख्याने अशा पद्धतीने तो साजरा झाला. सर कर्झन वायली हा त्या संस्थेचा सभासद होता. मदनलाल देखील त्या संस्थेचे सभासद होते.

समारंभ संपला. सर कर्झन वायली जाण्यासाठी बाहेर पडू लागले. मदनलाल देखील त्यांच्यामागून गेले. त्यांनी पंजाबी पद्धतीचा पेहराव केला होता. डोक्यावर पंजाबी पद्धतीची टोपी व तिच्याभोवती साफा (फेटा)



गुंडाळला होता. अंगरख्यात दोन-तीन पिस्तुले व एक मोठा पात्याचा चाकू लपवून घेतलेला होता. जणू काही तरी गुप्त बातमी सांगण्याच्या मिषाने त्यांनी कर्झन वायलीच्या चेहऱ्याजवळ (कानाजवळ) तोंड नेले. इतक्यात खिशातून पिस्तूल काढून मदनलालनी कर्झन वायलीच्या तोंडावर गोळी झाडली. कर्झन वायली लगेच जमिनीवर कोसळले व गतप्राण झाले. त्यांना

घाचविण्यासाठी लालकाका नावाचा पारशी डॉक्टर मध्ये पडला. त्यांच्यावरही गोळी झाडून मदनलालनी त्याला ठार केले. त्यानंतर स्वतःच्या कपाळावर गोळी झाडण्यासाठी मदनलालने पिस्तूल धर केले. इतक्यात जमलेल्या मंडळींपैकी काही जणांनी त्यांच्या हातातील पिस्तूल काढून घेतले व त्यांना पकडले. त्यांच्यावर खटला भरण्यात आला. फाशीची शिक्षा होऊन त्यांना दि. १७ ऑगस्ट १९०९ रोजी लंडनमधील पेंटन व्हिले कारागृहात फाशी देण्यात आले.

लंडनमध्ये असणाऱ्या काही राजनिष्ठ हिंदी लोकांनी मदनलालच्या कृत्याचा धिक्कार करण्यासाठी एक सभा भरविली. त्या सभेस इंग्रज लोकही उपस्थित होते. सभेत मदनलालचा निषेध करणारा ठराव आला. त्या वेळी सावरकर उभे राहिले व म्हणाले, “ ह्या निषेधाच्या ठरावास माझा विरोध आहे. ” सावरकरांचे हे शब्द ऐकताच एका इंग्रज मनुष्याने रागाने त्यांच्या तोंडावर बुक्का मारला. त्यांचे तोंड रक्तबंबाळ झाले.

मदनलाल धिंग्रांना फाशीची शिक्षा सांगण्यात आली त्या वेळी त्यांच्या मनाची थोडी देखील चलबिचल झाली नाही. मातृभूमीच्या प्रेमाने त्यांचे हृदय किती भारावले होते व मृत्यूदंडाच्या शिक्षेला ते किती धैर्याने व सहजतेने सामोरे जात होते, हे त्यांनी न्यायालयात त्यांच्या पुढीलप्रमाणे केलेल्या भाषणावरून दिसून येईल.

आव्हान

“ देशभक्त हिंदी युवकांच्या निर्दय फाशीच्या शिक्षांचा आणि सीमापारींचा अल्पसा प्रतिशोध (सूड) म्हणून परवा एका इंग्रजाचं रक्त सांडण्याचा मी प्रयत्न केला, हे मी मान्यच करतो. या प्रयत्नात माझ्या सद्सद्विवेक बुद्धीवाचून दुसऱ्या कोणाचाही मी विचार घेतला नाही. माझ्या कर्तव्यबुद्धीवाचून दुसऱ्या कोणाशीही मी कट केला नाही.

माझा असा विश्वास आहे की, परकीय संगिनींच्या साह्याने परदास्यात जखडलेलं राष्ट्र हे नित्य युद्धमानच असतं. निःशस्त्र जमातीला उघड युद्ध करणं अशक्य असल्यानं मी दबा धरून हल्ला चढवला. मला बंदुका मिळू शकल्या नाहीत, म्हणून मी माझं पिस्तूल बाहेर काढलं आणि झाडलं.

हिंदू म्हणून माझी अशी भावना आहे की, माझ्या मातृभूमीवर झालेला अन्याय हा परमेश्वराचा अपमान होय. तिचं कार्य हे प्रभू रामचंद्राचं कार्य आहे. तिची सेवा ही श्रीकृष्णाची सेवा आहे. निकृष्ट प्रकृतीच्या नी बुद्धीच्या माझ्यासारख्या मुलाजवळ स्वतःच्या रक्तावाचून मातेला अर्पण करता येईल असं दुसरं काही नाही आणि म्हणून मी तेच तिच्या वेदीवर अर्पण केलं आहे.

हिंदुस्थानला सध्या ज्या एकाच शिकवणीची आवश्यकता आहे, ती म्हणजे आत्मबलिदान कसं करावं ही होय, आणि ती शिकवण देण्याचा मार्ग म्हणजे स्वतःच आत्मार्पण करणं हा होय. म्हणून मी आत्मयज्ञ करीत आहे आणि माझ्या हौतात्म्याचा मला अभिमान वाटत आहे. सध्याचे अस्वाभाविक संबंध संपुष्टात आले नाहीत तर, हिंदुस्थान आणि इंग्लंड यांच्यामधील हे स्वातंत्र्य-युद्ध हिंदू आणि इंग्रज हे दोन वंश विद्यमान असेतोपर्यंत चालूच राहील परमेश्वरापाशी माझी इतकीच प्रार्थना आहे की, हे कार्य यशस्वी होऊन मानवाच्या हितासाठी आणि परमेश्वराच्या वैभवासाठी ती स्वतंत्र होईपर्यंत याच मातृभूमीच्या पोटी मला पुनर्जन्म प्राप्त होवो आणि त्याच पवित्र कार्यात मला पुन्हा मृत्यू येवो !"

वंदे मातरम्

* * *

१. भस्मासुराची विद्या

(बॉम्बवाले बापट)

सन एकोणीसशे दोनचा सुमार. पुण्यातील डेक्कन कॉलेजातील वसतिगृहात एक कॉलेज विद्यार्थी गंभीर मुद्रेने बसला होता. त्याच्या समोर एका स्नेह्याने नंगी तरवार ठेवली होती. नंग्या समशेरीच्या धारदार, चकाकत्या पात्याला हाताच्या बोटांनी स्पर्श करून तो विद्यार्थी हलक्या आवाजात म्हणत होता : " मी पांडुरंग महादेव बापट, या नंग्या समशेरीची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञा करतो की, माझ्या परतंत्र मायभूमीला स्वतंत्र करण्यासाठी मी आजपासून काया-वाचा-मनाने (काया = शरीर, वाचा = वाणी, बोलणे) झटेन, आणि तिची हाक येताच तिच्या सेवेसाठी धावत येईन. या कामी मला देहाचा होम (सर्वनाश, मृत्यूला कवटाळणे) करावा लागला तरी मी फिरून याच भरतखंडात (भारत – हिंदुस्थान) जन्म घेईन व अपुरे राहिलेले काम पुरे करून दाखवीन. ही माझी प्रतिज्ञा पुरी करण्यास श्रीहरी (परमेश्वर) मला जरूर ती बुद्धी, युक्ती आणि शक्ती देवो ! वंदे मातरम् ! "

शपथ घेणारा हा कॉलेज विद्यार्थी नगर जिल्ह्यातील पारनेर ह्या तालुक्याच्या गावचा राहणारा. पारनेरपासून थोड्या अंतरावर डोंगराच्या पोटाशी असलेल्या गणेशखिंडीतील गणपतीच्या मंदिरात त्याची मातापितरे राहात होती. डोक्यावर लांबसडक पांढरे केस व छातीवर रुळणारी रुपेरी दाढी ह्यामुळे त्याचे म्हातारे वडील एखाद्या ऋषीप्रमाणे दिसत असत आणि त्यांचे जीवन (आयुष्य, जगणे) देखील ऋषीप्रमाणे निर्मळ आणि परोपकारी होते. पोथ्यपुराणांचे वाचन व कथानिरूपण (कथा सांगणे) ह्यात त्यांचा काळ जात असे. आई देखील तशीच धार्मिक वागणुकीची होती. सांजसकाळ गणरायाच्या मंगलमूर्तीपुढे व तुळशीच्या वृंदावनापुढे नंदादीप लावणे व मंदिराला आणि तुलसीवृंदावनाला एकशेआठ प्रदक्षिणा (फेऱ्या) घालण्याचा त्या माउलीचा नेम कधी चुकत नसे. देवदर्शनाला आलेल्या माणसाला मूठभर प्रसाद व घोटभर पाणी दिल्याशिवाय ती माउली कधी राहिली नाही. आई-वडिलांच्या निर्मळ व परोपकारी वागणुकीचे प्रतिबिंब शपथ घेणाऱ्या त्या


विद्यार्थ्यांच्या बालमनावर पडले असण्यास नवल नाही. गणेश खिंडीच्या प्रसन्न परंतु एकान्त वातावरणात वाढल्यामुळे त्यांचा स्वभाव गंभीर व उदात्त (थोरपणाचा) झाला होता.

बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठीच बापट विलायतेला गेले. उच्च शिक्षणासाठी त्यांना एका धनिक व्यापाऱ्याने ठेवलेल्या शिष्यवृत्तीपैकी एक शिष्यवृत्ती मिळाली. एडिंबरो (आयर्लंड) येथील इंजिनिअरिंग महाविद्यालयात यांत्रिकी शिक्षण घेण्यासाठी त्यांनी प्रवेश घेतला. बापटांचे हात यंत्रावरून फिरत होते, डोळे अभ्यास-पुस्तकावरून फिरत होते. परंतु मन लागले होते पारतंत्र्यात पडलेल्या मातृभूमीकडे, हिंदभूमीकडे. हिंदुस्थानवर असलेले इंग्रजांचे राज्य घालविले पाहिजे, हा एकच विचार सदोदित त्यांच्या मनात घोळत होता. त्या दृष्टीने बापटांनी स्वतः तयारी सुरू केली. इंग्लंड हा स्वतंत्र देश. तेथे कोणालाही लष्करी शिक्षण घेता येते. क्वीन्स रायफल्स पलटणीत लष्करी शिक्षण घेण्यासाठी त्यांनी नाव नोंदविले. गुप्तपणे दारूगोळा तयार करून त्याच्या साह्याने ठिकठिकाणी इंग्रजांचे अधिकारी व पलटणी यांच्यावर हल्ले केले पाहिजेत तरच भारतातील इंग्रजी सत्ता संपुष्टात येईल. तेव्हाच इंग्रज भारतातून आपले चंबू गबाळे गुंडाळतील, अशी बापटांची ठाम समजूत होती.

वरील विचारामुळे त्यांनी औषधे विकणाऱ्या एका जर्मन व्यापाऱ्याशी संधान (संबंध जुळविले, मैत्री जोडली) बांधले. बाँब बनविण्याची कृती असलेले एक चोपडे (हस्तलिखित, वही) त्यांच्याजवळ होते, तथापि ते रशियन भाषेत होते. डॉक्टर अन्याखोस ही रशियन विद्यार्थिनी जर्मनीतील बर्लिन शहरी वैद्यकीय महाविद्यालयात शिकत होती. बापटांनी तिचा स्नेह संपादन केला. बॉम्बच्या कृतीच्या रशियन भाषेतील चोपड्यांचे डॉ. अन्याखोसने बापटांना इंग्रजीत भाषांतर करून दिले त्या कामामुळे त्या बिचारीचा अभ्यास बुडाला व तिचे वर्ष फुकट गेले. तथापि पारतंत्र्यातील लोकांच्या प्रयत्नाला आपण हातभार (मदत) लावीत आहोत, ह्या विचारामुळे अभ्यासाचे वर्ष वाया गेल्याबद्दल तिला वाईट वाटले नाही. अशा रीतीने भस्मासुराची विद्या सिद्ध झाली.

बॉम्ब तयार करून इंग्रजांच्या पार्लमेंटवर (कायदे करणाऱ्या मंडळाचे

सभागृह) टाकण्याचा बापटांचा बेत होता. तथापि तसे केल्याने आपल्या पुढील कामात विघ्न (संकट) येईल, असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांना सांगितले. सावरकरही त्या वेळी इंग्लंडमध्ये शिकत होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांचे देखील गुप्तपणे प्रयत्न चालूच होते. बॉम्बच्या कृतीच्या भाषांतराचे फोटो घेऊन त्या फोटोच्या प्रती बापटांनी भारतात पाठवून दिल्या. त्यानंतर बापट भारतात परत आले (सन १९०८).



बापटांनी पाठविलेल्या बॉम्बच्या कृतीच्या कागदावरून बंगाल प्रांतात काही क्रांतिकारकांनी (इंग्रजांचे राज्य घालवून देण्यासाठी गुप्तपणे शस्त्रांचा उपयोग करून इंग्रजांवर हल्ले करणारी मंडळी म्हणजेच क्रांतिकारक) बॉंब तयार केले. किंग्जफोर्ड नावाचा एक इंग्रज (न्यायाधीश) अधिकारी होता. त्याने बंगालमधील क्रांतिकारकांना शिक्षा दिली. त्या गोष्टीचा सूड घेण्यासाठी बंगाली क्रांतिकारकांनी किंग्जफोर्डच्या बगीवर बॉम्ब टाकून त्याला ठार करण्याचे ठरविले. खुदिराम बोस नावाच्या तरुणाने किंग्जफोर्डच्या बंगल्यातून निघालेल्या एका बगीवर बॉम्ब टाकला. ती बगी दिसायला किंग्ज-

फोर्डच्या बगीसारखीच होती. तथापि ती केनेडी नावाच्या साहेबाची असून बगीत त्याची पत्नी व मुलगी होती. बॉम्बमुळे त्या दोघी ठार झाल्या. खुदिराम बोस पोलिसांच्या स्वाधीन झाला. त्यानंतर बॉम्ब तयार करणाऱ्या तरुणांच्या टोळीला पोलिसांनी पकडले. पकडलेल्यांपैकी एक तरुण नरेंद्र गोस्वामी याने बॉम्बच्या कृतीवरून बापटांचे नाव पोलिसांना कळविले. ही बातमी वर्तमानपत्रात प्रसिद्ध होताच बापट भूमिगत झाले. त्यांनी पुणे सोडले. काही दिवस शेतकरी म्हणून ते राहू लागले. नंतर वेष व नाव पालटून औरंगाबाद येथे आचारी म्हणून राहिले. तेथून ते इंदूरजवळ देवास येथे गेले. विद्यार्थी म्हणून ते तेथील हायस्कूलमध्ये अभ्यास करून मॅट्रिकच्या परीक्षेस बसले. त्यानंतर नाव बदलून काशी येथे एका पंडिताजवळ संस्कृतचा अभ्यास करू लागले. काही दिवसांनंतर परत देवास येथे शिक्षकाची नोकरी करून ते विंध्य पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या एका दाट अरण्यात गेले. तेथे त्यांचा एक स्नेही कंत्राटाची कामे करीत होता. कोणाला संशय येऊ नये म्हणून त्या कंत्राटदाराच्या पत्नीला शिकवण्याचे काम ते करू लागले. बापट जरी वेष पालटून गावोगाव हिंडत होते तरी इंग्रज सरकारचे पोलीस देखील एकसारखे त्यांचा शोध करीत, त्यांच्या पाळतीवर होते. पोलीस जेव्हा एकदा त्या कंत्राटदाराच्या झोपडीकडे बापटांच्या तपासासाठी गेले त्या वेळी बापट त्या किर्र झाडीत एका उंच झाडावर चढून गर्द पालवीत दोन दिवस लपून बसले. पुढे ते इंदूरला गेले. तेथे एका गृहस्थाच्या विश्वासघातामुळे पोलिसांनी त्यांना पकडले. बापटांवर कोणत्याही प्रकारचे अपराध सिद्ध न झाल्यामुळे सरकारने त्यांना सोडून दिले.

त्यानंतर काही काळ ते पारनेर येथे होते. त्या वेळी पहाटेच उठून हातात खराटा घेऊन ते गावातील गल्ल्या झाडून टाकीत. रस्त्याच्या कडेला कोणी शौचास बसून घाण केली असल्यास ती घाण उचलून दूर नेऊन टाकत असत. रात्री हरिजनवाड्यात जाऊन हरिजनांच्या मुलांना शिकवीत असत. हातातील झाडूने ते गावातील घाण झाडून काढून गाव प्रसन्न करीत होते. महारवाड्यात जाऊन स्वतःच्या ज्ञानाने अज्ञानी मुलांच्या अंधाऱ्या मनात ज्ञानाच्या पणत्या पेटवीत होते.

पुण्याजवळ मुळशी ह्या नावाचे एक गाव आहे. त्या भागाला मावळ

असे म्हणतात. त्या ठिकाणी टाटा नावाचा धनाढ्य गृहस्थ वीज निर्माण करण्यासाठी धरण बांधणार होता. त्या धरणाखाली गरीब शेतकऱ्यांची शेते पाण्यात जाणार होती. हजारो गरीब मावळ्यांचे संसार मोडले जाणार होते. ही गोष्ट बापटांना पाहवेना. त्यांनी सर्व मावळ्यांची संघटना केली. ते त्या संघटनेचे नेतृत्व करू लागले. बापटांच्या मार्गदर्शनाखाली मावळ्यांचा सत्याग्रह सुरू झाला. बापट सेनापती व मावळे सैनिक. त्या वेळेपासून लोक बापटांना 'सेनापती बापट' ह्या नावाने ओळखू लागले. टाटाचा नोकरवर्ग धरणाचे काम करण्यास आल्यास ही मंडळी मध्ये आडवी पडून त्यांना काम करू देत नसत. ते लोक निर्दयपणे ह्या सत्याग्रही लोकांची उचलबांगडी करीत व त्यांना मारहाण करीत. त्यांना धडा शिकविण्यासाठी बापटांनी देखील त्या नोकरांवर हल्ला करून त्यांना थोडी शिक्षा केली. त्यामुळे सरकारने त्यांना सात वर्षे तुरुंगात पाठवून दिले. त्यानंतर देखील सेनापती बापटांना लोककल्याणासाठी बऱ्याच वेळा तुरुंगात जावे लागले.

सेनापती म्हणजे एखादा रसाळ फणसच. वरून खडबडीत दिसणाऱ्या फणसाप्रमाणे सेनापतींचा स्वभाव वरून कठोर, गंभीर व उग्र दिसत असला तरी अंतर्यामी (आतून) ते फार प्रेमळ होते. जणू फणसाचे रसाळ गोड गोड गरेच ! परमेश्वराने निर्माण केलेल्या सर्व प्राणिमात्रांवर ते प्रेम करीत असत.

एकदा घरातील छोट्या भाचीने कार्तिकी एकादशीच्या दिवशी जाग्रण करण्यासाठी सोंगट्या मागितल्या. प्रेमळ सेनापतीने छोट्या मुलीचा हट्ट पुरविण्यासाठी बाजारात जाऊन सोंगट्या व पट आणला. घरात एकदा एक साप निघाला. जमलेले लोक त्या सापाला मारण्याच्या तयारीला लागले. सेनापतींना त्या सापाची दया आली. ते म्हणाले, " तो बिचारा काही तुम्हांला डसण्याच्या उद्देशाने नाही आला, भक्ष्यासाठी किंवा गारठ्यामुळे बिळातून बाहेर आला. " त्यांनी सापाचे वेटोळे पत्र्याच्या तुकड्यावर ठेवून दूर सोडून दिले.

मात्र तसे ते फार शिस्तप्रिय होते. तुरुंगाचे नियम ते काटेकोरपणे पाळीत. सेनापतींना तुरुंगात भेटण्यासाठी काही आप्तमंडळी गेली. भेटीचा वेळ पंधरा मिनिटांचा असे. त्यांच्या छोट्या मुलीने त्यांच्यासाठी झग्याच्या खिशात खाऊ आणला होता. तुरुंगाच्या नियमाप्रमाणे कैद्याला घरून आणलेले पदार्थ देता येत नाहीत. त्या छोट्या मुलीला ह्या गोष्टीची काय कल्पना ! बालस्वभावा-

नुसार फारा दिवसांनी भेटणाऱ्या वडिलांना ती खाऊ देऊ लागली. सेनापतींनी नकारार्थीने मान हालविली. "तुरुंगाच्या नियमाप्रमाणे मला तो खाऊ घेता येणार नाही, बाळ. शिवाय भेटीची पंधरा मिनिटेही संपत आली आहेत. तेव्हा "तुम्ही जा." असे म्हणून सेनापती तुरुंगाच्या आत जाऊ लागले. त्यांच्या हातापायांना बांधलेल्या साखळदंडांचा खळखळ असा आवाज होत होता. त्यांच्या छोट्या मुलीच्या डोळ्यांतून गंगा-यमुना (डोळ्यांतून पाणी) वाहात होत्या. तुरुंगाच्या शिपायाचे डोळे देखील पाणावले होते.

नंग्या समशेरीची शपथ घेऊन देवाला वाहिलेले त्यागी जीवन!

* * *

१०. विजयानंद नाट्यगृहात पिस्तुलाचा बार

(कान्हेरे, कर्वे, देशपांडे)

काही वर्षांपूर्वी येवल्याची बाजारपेठ रेशमी व जरतारी कापडाबद्दल फार प्रसिद्ध होती. म्हणून दूरदूरचे व्यापारी खरेदीसाठी तेथे येत असत. औरंगाबाद हे शहर त्या वेळी निजामाच्या हैदराबाद या संस्थानात होते. तेथील एक व्यापारी गंगाराम रूपचंद हा माल खरेदी करण्यासाठी येवल्यास आला होता. नाशिकचा एक, गृहस्थ त्या दुकानदाराकडे बसला होता. गप्पांच्या ओघात त्याने गंगाराम रूपचंद यांच्याकडे सहज चौकशी केली की' औरंगाबाद येथे पिस्तुले, जंबिये, तरवारी अशा प्रकारची हत्यारे मिळू शकतील की काय ? औरंगाबादला तशी हत्यारे मिळू शकतील, असे गंगाराम रूपचंदने त्याला सांगितले. कारण औरंगाबाद हे संस्थानात असल्यामुळे व संस्थानात हत्यारबंदीच्या कायद्याची अंमलबजावणी इंग्रजी मुलुखाप्रमाणे कडक नसल्याने, तेथे हत्यारे मिळू शकत होती.

त्यानंतर नासिकहून 'अभिनव भारत' ह्या क्रांतिकारकांच्या संघटनेचे काही सभासद औरंगाबादला गंगाराम रूपचंदकडे गेले. त्यांनी तेथे जंबिये, पिस्तुले, तरवारी इत्यादी हत्यारांची खरेदी केली. त्यानंतर गप्पा चालू असता, गंगारामाकडे अनंता कान्हेरे नावाचा अठरा-एकोणीस वर्षांचा एक तरुण आला. तो गंगारामचा मित्र होता. औरंगाबाद येथे नवीनच सुरू झालेल्या व्यायामशाळेत तो जात असे. व्यायामशाळेत काही महाराष्ट्रीय तरुण येत असत. त्यांच्याशी कान्हेरे याची ओळख झाली. त्यांच्या संगतीने अनंताच्या मनात सशस्त्र क्रांतीच्या विचारांचे वारे घाहू लागले. गंगाराम याचा देखील संबंध गुप्त-चळवळी करणाऱ्या लोकांशी होता. अशा परिस्थिती-मुळे अनंता कान्हेरे याला तेथे असलेल्या नाशिककर मंडळींच्या संभाषणात निःसंकोचपणे सामील होता आले.

नाशिक येथे एक गाडीवान गाडी हाकीत रस्त्याने जात होता. मागून वुईल्यम्स नांवाच्या एका इंग्रज इंजिनियरची बग्गी येत होती. गाडीवानाचे बैल मरतुकडे असल्याने लवकर कडेला होईनात. काळा आदमी आपल्याला वाट देत नाही,

हे पाहून त्या गोऱ्या इंजिनियरचे पित्त भडकले. तो बगीच्या खाली उतरला व हातातील कातडी चाबकाचे फटकारे त्याने भराभर त्या गाडीवानाच्या अंगावर ओढले. गाडीवानाच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. त्यातच पुढे त्याचा अंत झाला. त्या गोऱ्या इंजिनियरवर पुढे खटला भरला. खटला जॅक्सन या मॅजिस्ट्रेटपुढे चालला. त्याने आपल्या गोऱ्या देशबांधवाला निर्दोषी म्हणून सोडून दिले. त्याच्या हिशोबी, एका जित काळ्या माणसाचे प्राण कवडी-मोलाचे होते. ह्या उलट, देशभक्तिपर कविता असलेले एक पुस्तक त्याला संहारकारी भयंकर बॉंबगोळ्याप्रमाणे वाटले. त्या पुस्तकाचे प्रकाशक विनायकराव सावरकरांचे वडील बंधू गणेश दामोदर सावरकर ह्यांना त्या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल जॅक्सनने काळ्या पाण्याच्या शिक्षेवर अंदमानाला पाठविले होते.

ह्या गोष्टी अनंता कान्हेरे याच्या कानांवर आल्या होत्या. म्हणून शस्त्रे घेण्यास आलेल्या नासिककर मंडळाची त्याने हेटाळणी केली. नासिकला एवढा जुलूम करणारा अधिकारी अद्यापि जिवंत कसा राहू शकला, असे अनंताने त्यांना हिणविले. आपणास पिस्तूल मारण्याचे शिकविल्यास आपण जॅक्सनला ठार करण्यास तयार आहोत, असे अनंता म्हणाला.

अनंता कान्हेरे यांचे वडील इंदूर येथे राहात होते. इंदूर येथे काही शिक्षण घेतल्यावर ते औरंगाबाद येथे मामाकडे पुढील शिक्षणासाठी गेले. तेथे ते हायस्कूलमध्ये व एका धंदेशिक्षणाच्या शाळेत शिक्षण घेऊ लागले. नासिककर मंडळींची औरंगाबाद येथे गाठ पडल्यानंतर काही दिवसांनी त्यांनी अनंताला नासिक येथे बोलाविले. जॅक्सनला ठार मारण्याचे कृत्य करण्याइतपत धैर्य अनंताच्या अंगी आहे की नाही, अशी शंका काही क्रांतिकारकांना आली. त्यांची खात्री पटविण्यासाठी समोर जळत असलेल्या दिव्याची तापलेली काच अनंताने हातात घट्ट पकडून ठेवली. हाताच्या कातडीला खूप चटके बसत असतानाही त्याने हूं की चूं केले नाही. त्याच्या मनाची अशी खंबीर तयारी पाहून मग त्याला पिस्तुलाची नेमबाजी करण्याचे शिक्षण देण्यात आले. जॅक्सनसाहेब कचेरीत जाता-येताना वारंवार त्याला दाखविण्यात आले. अनंताच्या डोळ्यांत त्याची ओळख पक्की ठसली.

जॅक्सन कलेक्टरची नाशिकहून मुंबईस वरिष्ठ जागेवर बदली झाली.

होती. त्यामुळे त्याला निरनिराळ्या ठिकाणी पानसुपाऱ्या होत होत्या. जॅक्सन याला संस्कृत भाषेची आवड होती. तसेच त्याला मराठीही चांगले येत होते त्या वेळी नासिक येथे किर्लोस्कर नाटक मंडळीचा मुक्काम होता. जॅक्शनसाहेबाने 'शारदा' ह्या नाटकाचा प्रयोग पाहण्यास येण्याचे मान्य



केले होते. त्याच्याच सूचनेवरून मंगळवार दि.२१।१२।१९०९ ह्या दिवशी रात्री ते नाटक करण्याचे ठरले.

ह्या दिवशी नासिकचे विजयानंद नाट्यगृह प्रेक्षकांनी फुलून गेले होते. अनंता कान्हेरे हा नाटकाचे तिकीट काढून नाट्यगृहात खुर्च्यांच्या रांगामागील बाकावर प्रवेशद्वाराजवळच बसला. त्याचे साथीदार कृ. गो. कर्वे (अण्णा) एलएल. बी. चा विद्यार्थी पंचवटीतील शिक्षक वि. ना. देशपांडे थोड्या अंतरावर निरनिराळ्या जागी बसले होते. नाटकाला सुरुवात झाली. तथापि अद्याप नाटकाचा मुख्य पाहुणा जॅक्सन ह्याचा पत्ता नव्हता. नाट्यगृहातील प्रेक्षकांच्या नजरा रंगभूमीवरच्या झगमगाटावर केंद्रित झाल्या. प्रेक्षकांची अंतःकरणे आनंदाने बहरून गेली. तथापि अनंता कान्हेरे याचे डोळे व मन ही रंगभूमीवरच्या त्या झगमगाटाने व सुंदर दृश्याने इतर प्रेक्षकांप्रमाणे बहरून गेले नव्हते. त्याच्या मनात झंझावाती वादळ उसळले होते. त्याची दृष्टी चित्याच्या खदिरांगारी डोळ्यांनी

आपल्या सावजाचा वेध घेत प्रवेशद्वारावर खिळली होती. आणि इतक्यांत जॅक्सन-साहेब प्रवेशद्वारातून आत आले. ते खुर्च्यांच्या रांगेत मध्यभागी बसण्यास जाऊ लागले तोच अनंताने चित्त्याच्या चपळाईने त्या दिशेला झेप घेऊन जॅक्सन-च्या पाठीवर पिस्तुलाने गोळी झाडली. लगेच जॅक्सनच्या समोर जाऊन त्याने एकामागून एक अशा गोळ्या त्याच्या छातीवर मारल्या. जॅक्सनचे शरीर रक्ताच्या थारोळ्यात पडले. बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती की, एका सुंदर नाटकाच्या नांदीच्या पार्श्वभूमीवर भारतीय इतिहासातील दुसऱ्या रौद्र-भीषण नाट्याची भैरवी क्रांतिकाली गाणार होती! आणि खलनायकाची भूमिका निष्ठुर नियतीने आपणावरच लादली होती.

अनंताला पकडण्यात आले. त्याच्याजवळचे पिस्तुल पोलिसांनी हस्तगत केले. ते पिस्तुल व तशा प्रकारची आणखी एकोणवीस पिस्तुले सावरकरांनी इंग्लंडातून 'अभिनव भारत' संस्थेकडे गुप्त रीतीने पाठविली होती, असे तपासात आढळून आले. म्हणून सावरकरांना लंडन येथे पकडण्यात आले.

नासिक कटाच्या संबंधात एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेली धरपकड ही काही अंशी योगायोगाची व काही अंशी गाफिलपणातून उद्भवलेली दुर्दैवी घटना होय. वास्तविक पाहाता जॅक्सन साहेबाचा वध इ. स. १९१० च्या अगोदर करावयाचा विचार कृ. गो. तथा अण्णा कर्वे यांच्या मनात नव्हता. परंतु जॅक्सनसाहेबाची नेमणूक कमिशनर म्हणून बढतीने झाली असल्यामुळे नासिकहून तो जाण्यापूर्वी त्याचा काटा काढणे आवश्यक झाले. ह्यास्तव विनायकराव देशपांडे व गणू वैद्य हे दोघे अनंतराव कान्हेरे यांना आणण्या-साठीं तातडीने औरंगाबादला गेले. वैद्य व देशपांडे औरंगाबादहून परतल्यानंतर दुसऱ्या दिवशी अनंता कान्हेरे ह्यांनी नासिककडे प्रयाण केले. त्यांच्याबरोबर औरंगाबादमधील त्यांचे दोन क्रान्तिकारक शाळासोबती अंकुशकर व दत्तू जोशी हे दोघे किर्लोस्कर कंपनीची नाटके पाहाण्यासाठी नासिकला जाण्यास निघाले. ते दोघे एका डब्यात व अनंता रेल्वेच्या दुसऱ्या डब्यात कोणास संशय येऊ नये म्हणून मुद्दामच बसले.

अंकुशकर व दत्तू जोशी ह्या दोन मुलांना गणू वैद्य याच्या घरी ठेवण्यात आले. अनंता विनायकराव देशपांडे यांच्याकडे उतरले. विनायकराव देशपांडे

हे पंचवटीतील प्राथमिक शाळेत ट्रेन्ड शिक्षक होते. त्यांचे वय वीस-बावीस वर्षांचे होते. त्यांचे दुसरे सहकारी वामनराव ऊर्फ दाजी जोशी हे देखील त्यांच्याच शाळेत शिक्षक असून त्या वेळी ते धुळे येथे ट्रे. कॉ. त शिक्षणासाठी गेले होते. कृ. गो. ऊर्फ अण्णा कर्वे हे बी. ए. होऊन एलएल. बी. च्या अभ्यास करीत होते. त्यांचे वय २२-२३ वर्षांचे होते. त्यांचे वडील जॅक्सन कलेक्टरांच्या कचेरीत नोकरीला होते. गणू वैद्य हा वरकांती बढाईखोर होता तथापि खरोखर फार भित्रा होता. देशपांडे मास्तरांच्या घराचे मालक चंद्रात्रे व शं. रा. सोमण हा विद्यार्थीही त्यांच्या मसलतीत सामील असे.

स्वा. सावरकरांनी त्रिभुवन चतुर्भुज या आचाऱ्याच्या हाती हिंदुस्थानात जी वीस पिस्तुले पाठविली ती त्याने सरदारगृहात अभिनव भारताचे एक सभासद पाटणकर यांच्याकडे दिली. अण्णा कर्व्यांनी त्यांपैकी सात पिस्तुले विकत घेतली. त्यांपैकीच एक पिस्तुल अनन्ता कान्हेरे यांना देण्यात आले होते.

जॅक्सनचा वध झाल्यानंतर देशपांडे मास्तर व अण्णा कर्वे हे कर्व्यांच्या घरी गेले. सर्व हत्यारे लपवून ठेवण्याच्या सूचना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिल्या हत्यारांचा साठा गणू वैद्याच्या घरी असे. हत्यारे दूर कोठे तरी लपविण्यास सांगण्यात आले. त्याच्या भित्र्या स्वभावामुळे जॅक्सन वधाच्या योजनेचा गणूला पत्ताही लागू देण्यात आला नव्हता. परंतु वध झाल्यानंतर हत्यारांबाबत सूचना देताना गणूला ती बातमी समजली. अंकुशकर व दत्तू जोशी ही जी औरंगाबादची मुले गणूकडे उतरली होती त्यांना ताबडतोब रात्रीच्या गाडीने मुंबईला पाठवून देण्याचे व तेथून औरंगाबादकडे पाठविण्याचे काम गणूला सांगण्यात आले. परंतु जॅक्सनच्या वधाची बातमी ऐकताच गणू खूप हबकून गेला. दत्तू जोशी व अंकुशकर यांच्या रेल्वेभाडयासाठी गणूने भावाकडे पैसे मागितले. एकूण वृत्तान्त ऐकून गणूचा भाऊ रागाने खूप भडकला. त्याने अण्णा कर्व्यांकडून पैसे आणून गणूला दिले. गणूने त्या मुलांना नासिक स्टेशनवर पाठवून दिले वास्तविक त्याने त्यांना ताबडतोब रात्रीच्या रात्री आगगाडीत बसवून द्यावयास पाहिजे होते. ती मुले नासिक येथे नवखी असल्याने स्टेशन-वर जाऊन ताबडतोब गाडी पकडू शकली नाहीत. सकाळी गाडीची वाट पहात फलाटावर चकरा मारीत असताना स्टेशनवरील रेल्वेफौजदाराने त्यांना पाहिले व त्यांची चौकशी केली. पोलीस फौजदाराच्या अचानक भेटीमुळे ती मुले

गडबडली. एक म्हणाला, 'मुंबईहून आलो' तर दुसरा म्हणाला, 'मी बनारसहून आलो.' त्यांच्या बोलण्यातील विसंगतीचा संशय येऊन फौजदाराने त्यांची रवानगी नासिक शहरातील सरकारवाडा या पोलीस ठाण्याकडे केली. पोलीसी मात्रा उगाळणे सुरू होताच त्या दोघांनी खरा प्रकार सांगितला. त्यावरून गणूला पकडले. गणूने सर्व सहकाऱ्यांची नावे सांगितली व लपविलेली शस्त्रे दाखवून दिली. अशा गणूच्या जबानीवरून अण्णा कर्वे विनायकराव देशपांडे, सोमण, वामनराव जोशी, चंद्रात्रे इ. ना पकडण्यात आले.

खटला चालून अनंता व त्याचे दोन साथीदार, कर्वे एलएल. बी. ला विद्यार्थी व देशपांडे शिक्षक ह्यांना फाशी देण्यात आले. ह्या कटाच्या संदर्भात 'अभिनव भारताच्या बऱ्याच सभासदांना कमी-अधिक मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या. न्यायमंदिरातील कान्हेरे यांची जबानी-"जनतेच्या न्यायालयातील नियम असा आहे की, जो हिंदी लोकांचे प्राण कवडीमोलाचे आहेत असे सुचवितो, त्या अपराध्याला देहान्ताची शिक्षा देण्यात यावी; ती शिक्षा जॅक्सनला देण्याचे काम माझ्या अंगावर पडल्याने मी ही गोष्ट केली आहे. इंग्रजांच्या जुलुमाचा सूड उगविण्यासाठी मी हे कृत्य केले आहे."

फाशी जाण्याच्या आदल्या दिवसाची रात्र. उद्या आपले प्राण जाणार या भीतीने त्या तिघांच्या मनात विचारांची कालवाकालव चालली नव्हती. ह्या उलट आयुष्यात अनुभवली नसेल इतकी गाढ झोप त्यांना लागली होती. कदाचित् कर्तव्यपूर्तीच्या आनंदाची ती समाधी असेल! पहारेकऱ्याने त्यांना जागे केले. प्रातर्विधी व स्नान करून मातृभूमीचे नामस्मरण करीत त्यांनी प्रफुल्लित मनाने स्वतःच्या हातांनी दोराचे फास आपल्या गळ्याभोवती अडकवून घेतले.

* * *

११. आग्या मोहोळ उठले

(खुदिराम बोस, प्रफुल्ल चाकी, सत्येंद्र, कन्हय्यालाल दत्त)

मध्यरात्रीची भयानक वेळ. मंदिरातील अंधार समयांच्या ज्योतींच्या प्रकाशात उजळला होता. त्या मंद प्रकाशात कालीमातेची शस्त्रधारी मूर्ती उग्र दिसत होती. त्या मूर्तीच्या समोर पूजेचे साहित्य असून देवीपुढे काही तरुण बसले होते. काहींनी कालीमातेच्या पायाशी पिस्तुले ठेवली होती. काहीजण डोक्यावर भगवद्गीता व तरवार धरून पाळीपाळीने शपथ व प्रतिज्ञा उच्चारीत होते. स्वतःच्या सुखासाठी देवीजवळ मागणे मागण्यासाठी जमलेले ते भक्त नव्हते, तर कालीमातेला साक्ष ठेवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी गुप्त रीतीने टकरा देण्यासाठी सज्ज झालेला तो बंगालमधील तरुणवर्ग होता. इ. स. १९०५ च्या पुढे बंगाल्यात ठिकठिकाणी देवीच्या मंदिरात व काही ठिकाणी स्मशानात देखील वरील प्रकारचा शपथविधी चालत असे.

भारतात इंग्रजांचे पाय रोवले गेले ते प्रथम बंगालमध्ये, त्यामुळे पाश्चात्त्य शिक्षणाचा सर्वांत प्रथम व सर्वांत अधिक परिणाम झाला बंगाली लोकांवर. इंग्रजी शिक्षणाने जसे काही खर्डेघाशी कारकून तयार झाले, तसेच इंग्रजी वाघिणीच्या दुधाने करारी विचारवंतही निर्माण झाले होते. इंग्रजांचे राज्य हे वरदान नसून शाप आहे, अशी पक्की खात्री त्या करारी बंगाल्यांची झाली होती. आधीच बंगाली लोक फार भावनाप्रधान. आणि त्यांच्या भावनाप्रधान डोळ्यांना इंग्रजी सत्तेने चालविलेल्या जुलूमाचे हृदयविदारक चित्र दिसत होते. तशात बंगाली लोकांची चळवळ दडपून टाकण्यासाठी त्या वेळचा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन याने बंगाली लोकांचे बळ खच्ची करण्याकरिता बंगाल प्रांताचे दोन तुकडे पाडले. बंगाली लोकांनी कर्झनचा कावा ओळखला. शाळा–कॉलेजात जाणाऱ्या भावनाप्रधान तरुणांना बंगालची फाळणी म्हणजे आपल्या मातृभूमीच्या हृदयावर केलेला जिव्हारी वारच वाटला. त्यांचे डोळे त्वेषाने रक्ताळले. त्यांची मने सूडाने पेटली.

'अनुशीलन समिती' नावाची गुप्त संघटना ढाका व कलकत्ता या ठिकाणी स्थापन करण्यात आली. तिच्या शाखा ठिकठिकाणी उघडल्या गेल्या. भारतातून इंग्रजी राज्य उलथून पाडण्यासाठी. जिवावर उदार झालेले तरुण

ह्या गुप्त संघटनेत सामील झाले. इंग्रज अधिकाऱ्यांचे प्राण घेण्यासाठी गुप्तपणे पिस्तुले व बंदुका जमविण्याचे काम सुरू झाले, सेनापती बापट हे इंग्लंडहून गुप्तपणे हिंदुस्थानात आले होते. बॉम्ब बनविण्याची कृती ते एका रशियन क्रांतिकारक मुलीजवळून शिकून आले होते. ती विद्या त्यांनी बंगाली क्रांतिकारकांना शिकविली. बारिंद्रकुमार घोष ह्यांचा माणिकतोळा बाग म्हणजे बंगाली क्रांतिकारकांचा अड्डा बनला. तेथे बॉम्ब तयार करण्यात येऊ लागले.

बारिंद्रकुमार हे अरविंद घोषांचे धाकटे बंधू. त्यांचे वडील कृष्णधन हे लंडन येथे डॉक्टर होते. अरविंद व बारिंद्रकुमार ह्या दोघांचेही शिक्षण इंग्लंडमध्येच झाले. आय. सी. एस्. परीक्षेत अरविंदबाबू अश्वारोहणात नापास झाले. त्यानंतर बडोद्याचे राजे श्रीमंत सयाजीराव महाराज ह्यांनी त्यांना बडोदा महाविद्यालयाचे प्राचार्य नेमले. पुढे वडील निवर्तल्यामुळे बारिंद्रकुमार बडोद्यास वडील बंधूकडे राहू लागले. इ. स. १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली बंगालवर कोसळलेल्या ह्या आपत्तीने अरविंदबाबूंना मनस्वी दुःख झाले व इंग्रजांबद्दल संताप वाटू लागला. नोकरीचा राजीनामा देऊन ते कलकत्त्यास गेले. इंग्रजांविरुद्ध लोकमत तयार करण्यासाठी त्यांनी 'वंदेमातरम्' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. क्रांतिकारकांची संघटना करण्याकरिता 'युगांतर' नावाचा आश्रम सुरू केला. बारिंद्रकुमारांनी 'युगांतर' हे बंगाली व 'संध्या'


अरविंद घोष
बारिंद्रकुमार घोष
खुदीराम बोस
सत्येंद्र बोस
कन्हय्यालाल दत्त

हे इंग्रजी वर्तमानपत्र सुरू केले. तरुण क्रांतिकारांची मने ह्या वर्तमानपत्रातील लिखाणामुळे कशी चेतावली जात होती ह्याची कल्पना " युगांतर " पत्रातील पुढील धर्तीच्या मजकुरावरून येऊ शकेल :

"ब्रिटिश राज्य आता मोडकळीस आले असून त्याचे तुकडे तुकडे होत आहेत. एक जोराचा फटका दिल्यास ते कोलमडून जाईल. बंगालमध्ये लबाडी करून, खोटे कागदपत्र करून नागरिकांना फसवून इंग्रजांनी बंगालचा कबजा घेतला. त्या पापातून उत्पन्न झालेला काळसर्प आता फूत्कार करीत असून तोच ब्रिटिश राज्याचे निर्दालन करील. तो काळसर्प आता बंगाली लोकांच्या हाती आहे."

'युगांतर' पत्रात प्रसिद्ध झालेल्या 'निर्भय व्हा' ह्या लेखातील हा उतारा आहे. लेखक होते भूपेंद्रनाथ दत्त. विश्वविख्यात स्वामी विवेकानंदांचे धाकटे बंधू भूपेंद्रनाथ दत्त देखील क्रांतिकारक असून बारिंद्रकुमारांचे मित्र होते.

बंगालमध्ये सशस्त्र क्रांतीच्या ज्वाला भडकू लागल्या. सरकारने अनुशीलन-समिती बेकायदा ठरविली. क्रांतिकारकांची धरपकड सुरू झाली. इंग्रजी न्यायाधीश व मॅजिस्ट्रेट क्रांतिकारकांना जरब बसावी म्हणून जबर शिक्षा ठोठावू लागले. त्यामुळे क्रांतिकारकांना अधिक त्वेष आला, आगगाडीच्या रुळांवर बॉम्ब टाकून गव्हर्नरची आगगाडी उलथविण्याचा प्रयत्न तीन वेळा करण्यात आला. तथापि तो फसला. क्रांतिकारकांना शिक्षा देणाऱ्या इंग्रज जिल्हा मॅजिस्ट्रेट व न्यायाधीश ह्यांच्या टेहळणीवर पिस्तुलधारी क्रांतिकारक राहू लागले.

किंग्जफोर्ड हा मुजफरपूरचा जिल्हा मॅजिस्ट्रेट होता. त्याने क्रांतिकारकांना जबर शिक्षा सुनावल्या होत्या. त्यामुळे तो क्रांतिकारकांच्या डोळ्यांत सलत होता. त्याचा काटा काढण्याचा बेत माणिकतोळा बागेत करण्यात आला. खुदीराम बोस व प्रफुल्लचंद्र चाकी हे दोघे अठरा-एकोणीस वर्षांचे तरुण बॉम्ब व पिस्तुले घेऊन कामगिरीवर निघाले. क्रांतिकारकांना जबरदस्त शिक्षा देऊन क्रान्तीची चळवळ दडपून टाकण्याच्या बहुमोल कामगिरीबद्दल किंग्जफोर्डला जिल्हा न्यायाधीश म्हणून सरकारने बढतीच्या जागेवर नेमले. सर्व युरोपियन (इंग्रज) अधिकारी व त्यांच्या बायका संध्याकाळी एका क्लबमध्ये जमत असत.

किंग्जफोर्डला रात्री क्लबमधून बंगल्यावर परत जात असता त्याला दि. ३० एप्रिल १९०८ ला ठार मारण्याचे ठरले. ठरलेल्या बेताप्रमाणे खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी हे पिस्तुल व बॉम्ब घेऊन क्लबच्या जवळपास दबा धरून बसले. काही वेळाने क्लबमधून एक बगी बाहेर पडली. ती हुबेहूब किंग्जफोर्डच्या बगीसारखी होती. त्या बगीत किंग्जफोर्डच असणार अशा कल्पनेने खुदीरामने त्या बगीवर बॉम्ब फेकला. ' धुम धाम ' असा भयंकर आवाज झाला. त्या स्फोटाबरोबरच स्त्रियांच्या किंकाळ्यांचे आवाज उठले. त्या गाडीत किंग्जफोर्ड नसून सरकारी वकील केनेडी यांची पत्नी व मुलगी होती. बॉम्बच्या स्फोटात त्या दोघी ठार झाल्या. किंग्ज फोर्ड व केनेडी यांच्या गाड्यांच्या सारखेपणामुळे खुदीरामची फसगत झाली.

बॉम्बचा स्फोट केल्यानंतर खुदीराम व प्रफुल्ल हे दोघेही अंधारात पळत सुटले. अंधारात वाटेची कल्पना यावी म्हणून ते रेल्वे रस्त्याच्या कडेने जात होते. रात्रीतून त्यांनी चोवीस मैलांची मजल मारली. झुंजुरका झुंजुरका ते एका रेल्वे स्टेशनच्या जवळच्या झाडीत विसाव्यासाठी थांबले. बॉम्ब फेकण्याच्या प्रसंगी अंगात संचारलेल्या विजेची शक्ती मनावर पडलेला प्रचंड दाब व रात्रीच्या अवसरातील ती दमछाक दौड यामुळे एव्हाना खूपच कमी झाली होती. पहाटे झाडावर कावळे काव काव करू लागले होते. आणि त्या दोघांच्या पोटातही कावळ्यांची कावकाव सुरू झाली होती. स्टेशनच्या आसमंतात तुरळक तुरळक माणसे वावरू लागली होती. एखादे दुकान उघडले असल्यास खाण्यासाठी काही मिळते की काय, हे पाहाण्याच्या उद्देशाने खुदीराम स्टेशनवर गेले. तेथे स्टेशनमास्तर पोर्टरला सांगत होते, "अरे, रात्री मुझफरपूरला काय भयंकर घटना घडली ती ऐका. किंग्जफोर्ड ऐवजीवर म्हणून टाकलेला बॉम्ब चुकून केनेडी नावाच्या वकिलाच्या गाडीवर पडून गाडीतील दोन बाया मात्र मेल्या. सुदैवाने किंग्जफोर्ड बचावले. स्टेशनमास्तरच्या तोंडचे ते शब्द ऐकताच खुदिरामच्या तोंडून अचानकपणे न कळत उद्गार बाहेर पडले, " काय, किंग्जफोर्ड मेला नाही ?" ते उद्गार स्टेशनमास्तरने ऐकले खुदीरामांचा भांबावलेला चेहरा, त्यांचा वेष व ते विस्मयदर्शक शब्द ऐकून स्टेशनमास्तरला त्यांचा संशय आला. ती गोष्ट लगेच त्याने पोलिसांच्या कानावर घातली पोलिसांनी विचारपूस करताच खुदीराम यांच्याकडून असंबद्ध उत्तरे मिळाली. त्यांना पकडून पोलीस

चौकीवर नेण्यात आले. प्रफुल्ल चाकी ज्या झाडीत दडून बसले होते तेथे जाऊन पोलिसांनी त्यांना पकडले. पोलिसांच्या छळामुळे आपल्या सहकाऱ्यांची नावे सांगण्याचे घोर पातक आपल्या हातून होऊ नये ह्यास्तव स्वतःजवळच्या पिस्तुलाने त्यांनी स्वतःच्या कानशिलावर गोळी झाडून प्राणत्याग केला. फौजदार नंदलाल बानर्जी याने खुदीरामांना पकडून मुझफरपूरला नेले.

खुदीरामचा प्रयत्न फसला. किंग्जफोर्ड वाचला. म्हणून त्याला मारण्याचा क्रांतिकारकांनी परत प्रयत्न केला. एका पुस्तकाच्या पानांचा भाग कोरून त्या पोकळीत बॉम्ब घालण्यात आला. पुस्तकाचे पार्सल किंग्जफोर्डकडे पाठविण्यात आले. तथापि किंग्जफोर्डचे दैव शिकंदर. ह्या वेळीही तो वाचला. पार्सल स्वतः न फोडता ते दूर अंतरावर नोकरास खबरदारीने उघडण्यास त्याने सांगितले. त्यामुळे बॉम्बला धक्का लागला नाही व स्फोट न होता तो तसाच शाबूत राहिला.

खुदीरामने केनेडी मायलेकीवर फेकलेला बॉम्ब व किंग्जफोर्डला पुस्तकाच्या पार्सलमधून पाठविलेला बॉम्ब ह्या घटनांवरून बॉम्बच्या कटामागे सशस्त्र क्रांतिकारकांची टोळी असावी अशा सरकारने अंदाज बांधला. माणिकतोळा बाग व बागेतील बारिंद्रकुमार घोष ह्यांचे घर यावर पोलिसांनी छापा घातला. तेथे पोलिसांना बॉम्ब, बॉम्ब बनवावयाची रसायने, पिस्तुले, बंदुका इत्यादि साहित्य मिळाले. म्हणून अरविंद घोष, बारिंद्रकुमार, नरेंद्र गोस्वामी, सत्येंद्र बोस, कन्हयालाल दत्त इ. पंचवीस जणांना पकडण्यात येऊन त्यांच्यावर खटला भरण्यात आला. अलीपूर कटाचा अथवा माणिकतोळा बाग कटाचा खटला म्हणून तो प्रसिद्ध आहे.

न्यायालयात खटला चालू झाला. खुदीरामांना पकडणाऱ्या नंदलाल बानर्जी या फौजदाराला सरकारने त्याच्या भारी कामगिरीबद्दल एक हजार रुपयांचे पारितोषिक दिले. ह्या बातमीमुळे क्रांतिकारकांच्या काळजावर कढत तेल पडल्यासारखे चटके बसले. नंदलालच्या ह्या भारी कामगिरीबद्दल त्याच्या भाच्याने भर कलकत्त्यात त्याला गोळी घालून यमसदनास पाठविले. समस-उल-आलम हा डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडेंट राजकीय बंदिवानाचा खूप छळ करीत असे. त्याचा क्रूरपणा व मगरूरपणा क्रान्तिकारकांच्या डोळ्यांत त्रिखारासारखा

खुपत होता. इतर उन्मत्त व जुलमी अधिकाऱ्यांवर वचक बसविण्यासाठी दिवसा-ढवळ्या व सार्वजनिक ठिकाणी त्याचा काटा काढण्याचे क्रांतिकारकांनी ठरविले. त्याप्रमाणे भर दुपारी गजबजलेल्या न्यायालयाच्या पायऱ्या उतरत असताना शमस-उल-आलम याच्यावर वीरेंद्रकुमार दत्तगुप्त ह्या तरुण क्रांतिकारकाने पिस्तुलातून गोळ्या झाडून ठार केले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी क्रांतिकारकांची चांगलीच दहशत घेतली. अशुतोष विश्वास हे सरकारी वकील पूर्वी राष्ट्रवादी असून अरविंदबाबूंचे एके काळचे सहकारी होते परंतु पुढे सरकारी मानमान्यता व पैसा यांच्या मदाने त्यांच्या डोळ्यांवर धुंदी चढली व क्रांतिकारांच्या विरुद्ध खोटेनाटे पुरावे तयार करून त्यांनी त्यांच्या माना फासा अडकविण्याचा सपाटा चालविला. तशा प्रकारच्या वागणुकीपासून परावृत्त होण्याच्या सूचना देऊनही अशुतोष विश्वास यांनी त्या सूचनांकडे दुर्लक्ष केले. ह्यास्तव ते क्रान्तिकारकांच्या रोषाचे लक्ष्य व भक्ष्य बनले. चारुचंद्र बसू नावाचा एक थोर क्रान्तिकारक होता. बाँब बनविताना स्फोट होऊन त्याचा हात तुटला होता. त्या थोट्या हाताला त्याने पिस्तुल बांधले व दुसऱ्या हाताने पिस्तुलाचा चाप ओढून कोर्टाच्या आवारात अशुतोष विश्वास यांना ठार केले. चारुचंद्रांना इ. स. १९०९ मध्ये व वीरेंद्र दत्तगुप्त यांना इ. स. १९१० मध्ये फाशी देण्यात आले.

सत्येंद्रनाथ बोस, उल्हासकर दत्त, इंदुभूषण रॉय व कन्हय्यालाल दत्त हे सर्व क्रांतिकारक माणिकतोळा बागेत सापडलेली शस्त्रास्त्रे. बॉम्ब व अन्य दारूगोळा ह्या प्रकरणी पकडले गेले. सत्येंद्र बोस हे बाबू अरविंद घोष यांचे मामा होते. उल्हासकर दत्त हे एक अत्यंत उत्साही तरुण क्रान्तिकारक असून ते बॉम्ब बनविण्याच्या कामात फार वाकबगार होते. बंगालचे प्रसिद्ध पुढारी बिपिनचंद्र पाल यांचे ते जावई. इंदुभूषण रॉय हे बुद्धिमान तरुण एका वृत्तपत्राचे संपादक असून उत्तम वक्ते होते. कन्हय्यालाल दत्त हे कलकत्त्याजवळच्या श्रीरामपूरचे रहिवासी महाविद्यालयीन शिक्षण चालू असतानाच त्यांनी क्रान्तिकारकांच्या 'अनुशीलन समिती' ह्या गुप्त संघटनेशी संधान बांधून क्रान्तिकार्यात भाग घेण्यास सुरुवात केली. कलकत्त्याजवळ चंद्रनगर येथे फ्रेंचांची वसाहत होती. त्या भागात शस्त्रबंदीचा कायदा नसल्यामुळे बाजारात उघड उघड शस्त्रास्त्रे मिळत असत. कन्हयालाल दत्त हे चंद्रनगरला राहून कलकत्त्या-

तील आपल्या साथीदारांना शस्त्रास्त्रे पुरवीत. त्याचप्रमाणे तरुणांना अनुशीलन-समितीचे सदस्यत्व देऊन ते क्रांतिकारकांच्या संघटना बांधण्याचे कार्यही करीत होते. माणिकतोळा बाग बॉम्ब प्रकरणी पकडला गेलेला नरेंद्र गोस्वामी हा क्रांतिकारक कन्हय्यालाल दत्त यांच्या गावचा असून कन्हय्यानेच त्याला क्रान्तिकार्याची दीक्षा दिली.

माणिकतोळा बागेत पकडलेल्या क्रांतिकारकांकडून कटाची माहिती काढून घेण्यासाठी पोलिसांनी त्याचा अतोनात छळ केला. त्या शारीरिक यातनांना कंटाळून नरेंद्र गोस्वामी हा माफीचा साक्षीदार झाला व त्याने क्रान्तिकारकांच्या कार्यासंबंधाने पोलिसांना माहिती दिली. आपल्या गावचा व आपण क्रान्तीची दीक्षा दिलेला नरेंद्र गोस्वामी याने फितूर होऊन संघटनेचा घात करावा हे पाहून कन्हय्यालाल दत्त यांना मनस्वी दुःख झाले. त्या विश्वासघातकी माणसाचा काटा काढण्याचे त्यांनी ठरविले. पण हे जमावे कसे? कारण ते सुद्धा इतर क्रान्तिकार्यांच्या समवेत अलीपूरच्या कारागृहात होते.

खटल्याच्या कामानिमित्त राजकीय कैद्यांना न्यायालयात आणले जाई. त्या ठिकाणी कैद्यांचे नातेवाईक व साथीदार येत असत. अशाच एका साथीदाराला आपणास तुरुंगात पिस्तुल पाठविण्यासंबंधाने कन्हय्यालालनी सांकेतिक भाषेत कळविले. पिस्तुल कशासाठी पाहिजे, हे नरेंद्र गोस्वामी ह्या राजबंद्याकडे इशाऱ्याचा दृष्टिक्षेप करीत कळविले. स्वतः केलेल्या विश्वासघातामुळे नरेंद्र गोस्वामी क्रान्तिकारकांच्या डोळ्यांत सलत होताच. इशाऱ्याचा संदेश मिळालेल्या साथीदाराने चार आठ दिवस टेहळणीवर राहून तुरुंगात दैनंदिन जाणाऱ्या व येणाऱ्या व्यक्ती व वहाने यांच्या व्यवहारावर लक्ष ठेवून मग आपला बेत आखला. कारागृहाच्या आवारात दररोज जी गवताची गाडी येते; त्या गाडीचा गाडीवान बनून आपण ती गाडी घेऊन आत येऊ, त्या वेळी तयार रहावे, असा संदेश त्याने न्यायालयात इतर राजबंद्यांबरोबर आलेल्या कन्हय्याला दिला. राजकीय बंद्यांच्या जवळपास जी मंडळी आपसात बोलत उभी होती त्यांच्या बोलण्यात जणू भाग घेत आहोत अशा मिषाने सांकेतिक बोलण्यातून त्या साथीदाराने कन्हय्याला आपली योजना कळविली.

ठरल्याप्रमाणे तो साथीदार गाडीवान बनून नेहमीप्रमाणे गवताची गाडी घेऊन तुरुंगाच्या महाद्वारातून आवारात शिरला. कैद्यांच्या खोल्यापुढे

त्याला कन्हय्या दिसला. गाडीवानाने गाडीचे बैल त्या बाजूला वळविले. कन्हय्या जवळ गाडी येताच पेंढ्या पडल्याचे निमित्त करून त्याने गवताच्या पेंढीतुन कन्हय्याला पिस्तुल देऊन खाली पडलेल्या पेंढ्या गाडीवर टाकून गाडी पुढे हाकारली.

पिस्तुल मिळताच कन्हय्याने आपण आजारी असल्याचे निमित्त करून कारागृहातील दवाखान्यात प्रवेश मिळविला. सत्येंद्रनाथ बोस हे देखील रोगी बनून दवाखान्यात दाखल झाले. दवाखान्यात औषधासाठी येणाऱ्या एका आजारी कैद्याच्या हाती त्यांनी नरेंद्राला निरोप पाठविला. नरेंद्र स्वामी हा माफीचा साक्षीदार झाल्यामुळे इतर क्रांतिकारकांपासून त्याच्या जिवास धोका होऊ नये म्हणून त्याला युरोपियन कैद्यांच्या वार्डाजवळ युरोपियन शिपायांच्या पहाऱ्यात ठेवले होते. पोलिसांच्या मारहाणीमुळे आपणही संत्रस्त झाले असून आजारी पडलो व उपचारासाठी दवाखान्यात आहोत, हा जाच सहन होत नसल्यामुळे आपणासही माफीचे साक्षीदार व्हायचे आहे. ह्यास्तव तू आम्हांला दवाखान्यात येऊन एकान्तात भेट व सल्ला दे. सत्येंद्र–कन्हय्यांनी रोगी कैद्याबरोबर पाठविलेला हा निरोप मिळताच नरेंद्राला फार आनंद झाला. सत्येंद्र व कन्हय्यालाल हे दोघे आता आपल्या जोडीला येणार असल्यामुळे आता आपणास क्रांतिकारकांपासून फार धोका नाही, असे त्याला वाटले. त्याने सत्येंद्र–कन्हय्यांच्या निरोपाची बातमी अधिकाऱ्यांना सांगून त्यांना भेटण्याची परवानगी मिळविली. आणखी क्रान्तिकारक फितूर झाल्यामुळे आपणास अधिक माहिती मिळेल. ह्या आशेने एक युरोपियन शिपाई समवेत देऊन त्यांनी नरेंद्राला सत्येंद्र–कन्हय्यांना भेटण्यास पाठविले.

दवाखान्याच्या एका खोलीत त्या तिघांचे बोलणे सुरू झाले. युरोपियन शिपायाला दूर अंगणात उभे राहाण्यास सांगण्यात आले. इतक्यात कन्हय्याने सदऱ्याच्या खिशातून पिस्तुल काढून नरेंद्रावर गोळी झाडली. नेम चुकला. नरेंद्राने खोलीबाहेर धूम ठोकली. कन्हय्याने दुसरी गोळी झाडली. ती नरेंद्राच्या पायाला लागली. तो तसाच लंगडत तुरुंगाच्या कार्यालयाकडे पळू लागला. तो कार्यालयात शिरला की, हातची शिकार जाणार. हा विचार मनात येताच कन्हय्याने निकराने पाठलाग करून कार्यालयाच्या पायऱ्या चढत असताना नरेंद्राला गाठून त्याच्यावर भराभर गोळ्या झाडल्या. नरेंद्र रक्ताच्या

थारोळ्यात खाली कोसळला. त्याच्या कलेवराला लाथ मारीत कन्हय्या संतापाने म्हणाले,

"हे घे फितुरीचे बक्षीस."

नरेंद्राची कोर्टापुढे जबानी झाली असती तर आणखी किती तरी क्रान्तिकारक पकडले गेले असते व क्रान्तिकारकांचे मनसुबे उघड झाले असते. ह्यास्तव कोर्टापुढील जबानीपूर्वीच सत्येंद्र–कन्हय्यांनी त्याची जबान बंद करून टाकली.

नरेंद्राच्या वधाबद्दल कन्हय्यालाल दत्त यांना १० नोव्हेंबर रोजी १९०८ ला अलीपूरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. त्याच्या थोडे दिवस अगोदर कन्हय्यालाल बी. ए. ची परीक्षा पास झाल्याचा निकाल बाहेर पडला होता. दत्तांना फाशी दिले. त्या वेळी तुरुंगाबाहेर खूप मोठा जमाव जमला होता. कन्हय्यालालांचे बंधू दत्त व इतर नातलगांनी कन्हय्यालालांचा मृतदेह तुरुंगाबाहेर आणला. त्या हुतात्म्याच्या मृतदेहाला अत्तर व चंदनाची उटी लावून शेवटचे स्नान घालण्यात आले. सुवासिनींनी अत्तराच्या निरांजनांनी ओवाळले. फुलांच्या थराने तो देह झाकाळला गेला होता. चंदनाच्या चितेवर त्या हुतात्म्याने शेवटची काळनिद्रा घेतली.

कन्हय्यालालांच्या जंगी अंत्ययात्रेची सरकारला कल्पना आली होती. म्हणून सत्येंद्रनाथांचे प्रेत त्यांच्या नातेवाइकांच्या ताब्यात न देता सरकारने तुरुंगाच्या आवारातच त्यांचे दहन केले. त्यांच्या अगदी जवळच्या दहा-पंधरा नातेवाईकांनाच फक्त अंत्यसंस्काराच्या वेळी उपस्थित राहाण्याची परवानगी देण्यात आली.

दि. २१ नोव्हेंबर १९०८ रोजी सत्येंद्रांना फाशी देण्यात आले. फाशी जाण्यापूर्वी ते वेदातील संस्कृत मंत्र म्हणत होते.

ह्या खटल्यात देशबंधू चित्तरंजन दास ह्यांनी क्रांतिकारकांची विनामूल्य वकिली केली. अरविंदबाबू निर्दोषी सुटले. बारिंद्रकुमारांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. सत्येंद्र बोस व कन्हयालाल यांना नरेंद्राचा वध केला म्हणून फाशी देण्यात आले आणि खुदीराम बोस यांना दि. ११ ऑगस्ट १९०८ रोजी फाशी देण्यात आले. हातात गीता घेऊन हसतमुखाने ते फासावर चढले.

खुदीरामच्या उदात्त मरणामुळे त्यांच्या जाळलेल्या देहाची पवित्र राख जनतेने सोन्याचांदीच्या करंडकांतून ठेविली.

* * *

१२. अभिमन्यूचा वारसा

(सुशील सेन व प्रफुल्ल चक्रवर्ती)

कौरव–पांडवांच्या युद्धात छोट्या अभिमन्यूने भीमपराक्रम करून अभेद्य असा चक्रव्यूह भेदला व कौरवांच्या सैन्याला त्राहीं भगवान करून सोडले. व्यूहाच्या चक्रात सापडलेल्या बालअभिमन्यूवर रणधुरंधर अशा शेकडो कौरव वीरांच्या गदा व तरवारी कोसळल्या. अभिमन्यूला वीर-मरण आले, परंतु त्याच्या दिव्य पराक्रमाने भरतभूमीची कूस पावन झाली. त्याच्या शौर्याने पराक्रमाची परंपरा तळपत राहिली. एका अभिमन्यूच्या बलिदानाबरोबर शौर्याची ती उज्ज्वल परंपरा विराम पावली नाही. तेव्हा-पासून तो आत्तापर्यंत तशा शेकडो अभिमन्यूंना ह्या भरतभूमीने जन्म दिला आहे. अशा भरतभूमीत आपण जन्माला आलो, हे आपले महद्भाग्य. धन्य ती वीरप्रसवा भारत माता! असाच एक बालअभिमन्यू बंगाल्यात जन्माला आला. त्याचे नाव सुशील सेन.

भूपेंद्रनाथ दत्त हे स्वामी विवेकानंदांचे बंधू. स्वातंत्र्याच्या आकांक्षेने ज्या बंगाली तरुणांची हृदये पेटली होती, अशांपैकी ते एक. त्यांच्या वाणीतून निघणाऱ्या शब्दांत अग्नीचा दाहकपणा होता. लेखणीतून स्रवणाऱ्या-अक्षरांतून विजेची धारा वहात होती. बीरेंद्रकुमार घोष ह्या देशभक्त क्रांतिकारकांच्या 'वंदे मातरम्' ह्या वृत्तपत्रात भूपेंद्रनाथ दत्त इंग्रजांच्या जुलुमी राजवटीवर स्फोटक लिखाणाच्या द्वारे विजेचे कोरडे ओढीत होते. 'वंदे मातरम्'-मधील त्या लेखांनी तरुणांची हृदये पेट घेत होती. त्या लेखातील आगीने इंग्रजांची नोकरशाही होरपळू लागली होती. राजद्रोहाचा आरोप ठेवून सरकारने भूपेंद्रनाथांवर त्या लेखांमुळे खटला भरला.

सन २६ ऑगस्ट १९०७ रोजी कलकत्त्याच्या कोर्टात खटला सुरू झाला. बंगालचे प्रसिद्ध पुढारी बिपिनचंद्र पाल ह्यांना सरकारने भूपेंद्रनाथांच्या विरुद्ध साक्ष देण्यासाठी साक्षीदार म्हणून कोर्टात बोलाविले होते. पंजाबचे देशभक्त लाला लजपतराय, महाराष्ट्राचे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व बंगालचे बिपिनचंद्रपाल ह्या तीन पुढाऱ्यांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात केलेल्या

महान कामगिरीमुळे लाल-बाल-पाल ही नावे भारतीय जनतेच्या मुखात त्या काळी मंत्रशब्दाप्रमाणे होती. भूपेंद्रनाथांच्या पवित्र देशभक्तीशी द्रोह करण्याचे विचार पालबाबूंसारख्या थोर देशभक्ताच्या मनात देखील येणे शक्य नव्हते. परंतु एका थोर देशभक्ताला भूपेंद्रनाथांच्याविरुद्ध साक्ष देण्यास भाग पाडून कपटी सरकार बंगाली जनतेच्या स्वातंत्र्याच्या भावनेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करीत होते; हिंदी जनतेत दुहीचे विष पेरण्याचा कुटिल डाव खेळत होते. परंतु पालबाबूंनी साक्ष देण्यास व खटल्यात भाग घेण्यास पूर्णपणे नकार दिला. इंग्रज न्यायाधीश संतापाने जळफळला. पालबाबूंनी साक्ष देण्याचे नाकारले, हे कृत्य त्या न्यायाधीशाला अपमानास्पद वाटले. कोर्टाच्या अपमानाच्या आरोपावरून त्याने पालबाबूंना सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा दिली.

न्यायाधीशाचा निकाल ऐकताच कोर्टाबाहेर जमलेल्या हजारो बंगाली लोकांनी ' वंदे मातरम् ' च्या आरोळ्या देण्यास व सरकारच्या धिक्काराच्या घोषणा देण्यास सुरुवात केली. ते पाहून चिडलेल्या अधिकाऱ्यांनी जमावावर लाठीहल्ला करण्याचा आदेश पोलिसांच्या लाठ्या सपासप लोकांच्या अंगावर पडू लागल्या. एकच आरडाओरडा व हलकल्लोळ उठला.

इतक्यात सुशील सेन हा चौदा-पंधरा वर्षांचा विद्यार्थी त्या रस्त्याने जात होता. गुरांढोरांना निर्दयपणे बडवावे तसे पोलीस गरीब जनतेवर हात टाकीत असल्याचे पाहून त्याचे हृदय द्रवले. त्याच्या त्वेषाने पेट घेतला. तापलेल्या शिशाच्या रसाप्रमाणे रक्त सळाळून उठले. नागाच्या त्वेषाने आणि जोशाने त्याने लाठीप्रहार करणाऱ्या एका गोऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर (सार्जंट) झडप घालून त्याच्या हातातील लाठी हिसकावून घेतली आणि त्याचे शरीर त्याच्याच लाठीने फोडून काढले. रक्तबंबाळ झालेला सार्जंट जमिनीवर कोसळला. शत्रूला घायाळ करणाऱ्या त्या बालअभिमन्यूभोवती लगेच पोलिसांचे कडे पडले व त्यांनी त्याला पकडून नेले. यथावकाश त्याच्या-वर खटला भरण्यात आला. कोर्टाभोवती जमलेल्या जमावाजवळून आपण रस्त्याने जात असताना पोलिसांनीच आपणास बेदम मारले व पकडून आणिले. आपण पूर्णपणे निरपराधी आहोत, असा जबाब त्याने कोर्टापुढे दिला. परंतु तरुणाच्या इंग्रजाविरुद्धच्या अत्याचारांनी इंग्रज न्यायाधीशाचे डोके

भडकलेले असल्यामुळे तो सुशील सेनसारख्या तरुण मुलाची गय करणे शक्य नव्हते. गुन्हेगारला देतात तशी पंधरा फटक्यांची सजा त्याला देण्यात



आली. तुरुगांच्या आवारात सुशीलच्या कोवळ्या अंगावर वेताचे फटके बसत असताना रक्ताच्या चिळकांडया उठल्या तरी त्याने हुं की चूं केले नाही. इतक्या कोवळ्या वयातही त्याने अपार मनोनिग्रह दाखविला.

तुरुगातून बाहेर पडताच जनतेने त्याची मिरवणूक काढली. त्याच्या सन्मानार्थ विराट सभा भरून बंगालचे प्रसिद्ध पुढारी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या हस्ते त्याला सुवर्णपदक देऊन जनतेने 'वंदे मातरम'च्या जयघोषात त्याचा गौरव केला.

किंग्जफोर्ड ह्या आढ्यतेखोर न्यायाधीशाने क्रांतिकारकांना निर्घृण शिक्षा देण्याचा सपाटा चालविला होता. त्यामुळे तो क्रांतिकारकांच्या डोळ्यावर येणे साहाजिक होते. त्यांनी त्याचा काटा काढण्याचे ठरविले. खुदीरामने केलेला प्रयत्न फसून केनेडी मायलेकी ठार झाल्या व किंग्जफोर्ड वाचला. क्रांतिकारकांनी फिरून प्रयत्न करण्याचे ठरविले.

सेनापती बापट व हेमचंद्र दास ह्यांनी इंग्लंडहून भारतास परतताना बॉम्बच्या कृतीचा पाठ (फार्म्युला) आपल्या समवेत आणला होता. तोच

पाठ बंगाली क्रांतिकारकांकडे पाठविण्यात आला. त्या पाठानुसार बंगाली क्रांतिकारक बॉम्ब तयार करू लागले. किंग्जफोर्डला मारण्यासाठी उल्हास दत्त याने बॉम्ब तयार केला. त्याची चाचणी घेण्यासाठी तो, प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती, सुशील सेन इत्यादि क्रांतिकारक कलकत्त्याजवळ एका अरण्यात गेले. प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती हातात बॉम्ब घेऊन त्याचा स्फोट करण्यासाठी काही अंतरावर गेला; बाकीचे तरुण बॉम्बस्फोटापासून सुरक्षित राहाण्यासाठी आडोशाला लपले. कानठळ्या बसण्यासारखा बॉम्बचा स्फोट झाला. स्फोटानंतर सर्वजण स्फोटाच्या जागेकडे आनंदाने पळत गेले. बॉम्बच्या यशस्वितेमुळे त्यांना आनंद झाला होता परंतु स्फोटाच्या जागी पोहोचताच त्यांची धाबी दणाणली. प्रफुल्लचंद्र रक्ताच्या थारोळ्यात गतप्राण होऊन पडला होता. त्याच्या मस्तकाची छकले होऊन मेंदू व डोळे बाहेर पडले होते. क्रांतिकालीने आपला हविर्भाग घेतला ! त्याचे शव पुरण्यासाठी दुसऱ्या दिवशी टिकाव फावडे घेऊन क्रांतिकारक तेथे गेले तो तेथे प्रेताचा पत्ता नव्हता. कुणी तरी अज्ञात क्रांतिकारकांनी ते प्रेत हलवून पुरावा नाहीसा केला होता.

बॉम्बच्या अवेळी स्फोट होण्यामागची चूक दत्तांच्या लक्षात आली. योग्य ती खबरदारी घेऊन त्यांनी दुसरा एक बॉम्ब तयार केला. एका जाडजूड पुस्तकाची मधली पाने डबीच्या आकाराची कोरून त्या खोबणीत बॉम्ब असलेली डबी बसविण्यात आली. डबी एका स्प्रिंगने पुस्तकाला जोडली होती. पुस्तक उघडताच स्प्रिंग ताणली जाऊन स्फोट व्हावा, अशी योजना करण्यात आली होती. तथापि किंग्जफोर्डकडे ते पुस्तक नेऊन देण्याचे धाडस कोण करील ? सिंहाच्या गुहेत जाऊन त्याची आयाळ घेऊन येण्याइतकेच धाडसाचे हे काम होते. काम साधले तर यश, फसले तर मृत्यू–फाशी. परंतु सुशील सेनने ते काम पत्करले. शाळकरी विद्यार्थ्याच्या वेषात तो किंग्जफोर्ड न्यायाधीशाच्या बंगल्यावर गेला. भट्टाचार्य वकिलांनी साहेबास देण्यासाठी हे पुस्तक पाठविले असा निरोप सांगून त्याने ते पुस्तक शिपायाजवळ दिले. परंतु किंग्जफोर्डचे दैवच शिकंदर! त्याने ते पुस्तक न उघडता बाजूला ठेवण्यास सांगितले. काही दिवसानंतर एक पोलिस अधिकारी (सुरेश मुकर्जी) ते पुस्तक उघडू लागताच बॉम्बचा स्फोट होऊन ठार झाला.

त्यानंतर सरकारने सुशील सेनला अरविंद घोष (अरविंदबाबू), बारिन्द्र, कुमार इत्यादींवर सुरू असलेल्या अलीपूर खटल्यात गोविले. त्या खटल्यात त्याला काळ्या पाणीची शिक्षा ठोठावण्यात आली. त्या शिक्षेवर उच्च न्यायालयाकडे अपील करण्यात आले. त्या न्यायालयाने त्याला निर्दोषी ठरविले. तो निकाल होईपर्यंत त्याची दोन-अडीच वर्षे तुरुंगात निघून गेली होती. [१९०८ ते १९१०]. अशीच चार-पाच वर्षे निघून गेली. इ. स. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. भारताला स्वतंत्र करण्याची एक नामी संधी चालून आली. अमेरिकेत गेलेल्या भारतीयांनी भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ' गदर ' पक्ष स्थापन केला. गदरच्या क्रांतिकारकांचे हस्तक इराण, अफगाणिस्तान, चीन, जपान, ब्रह्मदेश, इंडोचायना या सर्व भागातील भारतीय लोकांत भारतात इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्याचा प्रयत्न करीत होते. तसेच भारतीय जनता व लष्कर ह्यांना इंग्रजांविरुद्ध बंड करण्यासाठी त्यांच्यात गुप्तपणे प्रचार करीत होते. बंगाल्यातही काही क्रांतिकारक इंग्रजांविरुद्ध बंड करण्याचे गुप्त बेत करीत होते. या कार्यासाठी हत्यारे व दारूगोळा खरीदण्यासाठी पैसा हवा होता. सरकारी खजिने व जुलमी सावकार, जमीनदार यांची लूट करून पैसा जमविण्याचे ठरविण्यात आले.

एके दिवशी दोन तरुण एका क्रांतिकारकाचे खुणेचे पत्र घेऊन सुशील सेनकडे आले. हत्यारे खरीदण्यासाठी द्रव्य उपलब्ध करण्यास्तव एका श्रीमंत गृहस्थाच्या घरावर दरोडा घालण्याच्या कामी त्यांना सुशीलचे नेतृत्व हवे होते. रामकुंवर हा एका पोलीस अधिकाऱ्याचा भाऊ होता. भावाने लबाडीने मिळविलेली गडगंज संपत्ती त्याच्याजवळ होती. लबाडीने व जुलमाने मिळविलेली ती संपत्ती देशकार्यासाठी लुटण्याचा बेत त्या तरुण क्रांतिकारकांनी आखला. जोगेश्वर नावाच्या क्रांतिकारकाने पोलिसांच्या जाचाला कंटाळून पूर्वी काही क्रांतिकारकांची नावे सांगून फितुरी केली होती. ती गोष्ट त्याच्या मनात सुईसारखी सलत होती. कृतकर्माचा त्याला पश्चात्ताप होत होता. हा जोगेश्वर त्या धनाढ्य गृहस्थाच्या घरी नोकरीस होता. केलेल्या पापाचे परिमार्जन म्हणून त्या सावकाराचे द्रव्य क्रांतिकारकांना देशकार्यासाठी मिळवून द्यावे अशी त्याला उपरती झाली. त्याने वाड्यात संपत्ती ठेवलेल्या सर्व ठिकाणांचा तपशील क्रांतिकारकांना

सांगितला. एकदा केलेल्या फितुरीमुळे आपणांवर क्रांतिकारकांचा विश्वास बसणार नाही, ह्यास्तव आपल्याला ताब्यात घ्यावे व सुचविल्याप्रमाणे वाड्यात धन न मिळाल्यास आपले मुंडके छाटावे असे त्याने सांगितले.

जोगेश्वरला ताब्यात घेऊन सुशील सेनच्या नेतृत्वाखाली त्या क्रांतिकारक तरुण मुलांनी एके रात्री रामकुवर सावकाराच्या घरावर सशस्त्र दरवडा घातला. जोगेश्वराने सांगितलेल्या जागी त्यांना धन मिळाले. धनाने भरलेल्या पिशव्या घेऊन सुशील सेन, महेशचंद्र व हरीष इत्यादी तरुण दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दोन होडयांमधून नदीतून पैलतीराला जात होते. पैलतीरावर लोकांचा जमाव दिसला. रात्री पडलेल्या दरवडयाचे वृत्त दुसऱ्या दिवशी भोवतालच्या गावांपर्यंत पोहोचले होते. लोकांचा जमाव पाहून पैलतीराला न जाता त्यांनी होडया नदीच्या पात्राने खाली वल्हविल्या. काही अंतर गेल्यावर त्यांनी होडया पैलतीराला लावल्या. अंधार पडला होता. श्रमामुळे त्यांना भूक लागली होती. शेजारच्या गावातून तांदूळ आणून व एका शेतकऱ्याच्या छपरातून एक पातेले आणून त्यांनी भात शिजत घातला. त्यांचा भात शिजत असतानाच पहारा करीत असलेल्या क्रांतिकारक तरुणांना पोलिसांची चाहूल लागली. अन्नब्रह्माला नमस्कार करून त्यांनी होडयांकडे धूम ठोकली पोलिसांनी त्या पळणाऱ्या मुलांच्या दिशेने बंदुकीतून गोळ्या झाडल्या. सुशील आपले साथीदार होडयात सुरक्षितपणे असेपर्यंत किनाऱ्यावरून आपल्या पिस्तुलातून पोलिसांच्या दिशेने गोळ्या झाडीत होता. त्या धामधुमीत सुशीलला पोलिसांनी झाडलेल्या दोन गोळ्या लागल्या. जखमी सुशीला साथीदारांनी होडीवर ओढून घेतले. खाली खोल काळे काळे पाणी व वर घोर निबिड अंधःकार. अज्ञात अंधार कापीत होडया पुढे सरकत होत्या आणि त्या अंधारातून अज्ञाताच्या उजेडाकडे सुशीलचे डोळे लागले होते. मरणाच्या वाटेवर असणारा सुशील आपल्या साथीदारांना म्हणाला, " मी आता काही क्षणांचाच सोबती. आता फक्त एक करा. मी मरताच माझे मुंडके ह्या जांबियाने धडापासून कापून टाका. धड एका ठिकाणी तर मुंडके दुसऱ्या ठिकाणी पुरा म्हणजे पोलिसांना कशाचाच पत्ता लागणार नाही व तुम्ही सर्वजण सुरक्षित राहाल. भावनाविवश होऊन असे करण्यास कचरू नका. मला तसे वचन द्या! " असे म्हणून त्याने स्वतःजवळचा जांबिया त्यांच्या हवाली केला.

होड्या पैलतीराला लागल्या. सुशीलचे प्राणही तत्पूर्वीच पैलतीराला लागले होते. सुशीलला दिलेल्या वचनपूर्तीसाठी साथीदारांनी जड अंतःकरणांनी सुशीलचे मुंडके धडापासून वेगळे केले. नदीच्या पात्राशेजारी खड्डे खणून शीर व धड भिन्न भिन्न ठिकाणी परंतु थोड्या अंतरावर पुरण्यात आले. लुटीत मिळविलेल्या तीस हजारांच्या धनाने भरलेल्या पिशव्या घेऊन ते क्रांतिकारक जड पावलांनी अंधारात अदृश्य झाले.

क्रांतीची वाट ही रक्ताच्या रांगोळ्यांनी रंगलेली असते. क्रांतिकाली ही एक उग्रमंगल देवता आहे. वेदीवर अर्पिलेल्या बलींच्या नरमुंडांच्या माळा गळ्यात घालून रक्ताने रंगविलेल्या हातात मांगल्याचा, जनक कल्याणाचा नंदादीप घेऊन ती त्या वाटेने येते. तिच्या स्वागतासाठी प्राणांचे अनुष्ठान मांडणारे सुशील सेन व प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती धन्य होत !

* * *

१३. दक्षिण हिंदुस्थानातही वादळ उठले

(वांछीनाथ अय्यर)

ॲश या इंग्रज कलेक्टरच्या छातीवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या-नंतर तो तरुण रेल्वे स्थानकावरील स्वच्छतागृहाकडे (शौचकूप) पळत गेला. त्याच्या मागून रेल्वे पोलीस धावत होते. त्या तरुणाने शौचकूपाचे दार आतून लावून घेतले. परत एकदा पिस्तुलाच्या बाराने रेल्वे स्थानक हादरले. आणि मग आरडाओरडीच्या कोलाहलाची गती एकदम बंद झाली. पोलिसांनी शौचकूपाला गराडा घातला. खुनी माणसाला दार उघडण्यास सांगितले. परंतु आतून उत्तर येईना. सर्वत्र सामसूम. पोलिसांनी दार फोडले. रक्ताच्या थारोळ्यात कोलमडलेला एक तरुण तेथे पडलेला त्यांना आढळला. त्याच्या कलेवराजवळ त्याचे पिस्तुल पडले होते. पिस्तुलाच्या गोळीने त्याच्या शिराची शकले उडाली होती. फलाटावरील गोळीबाराने त्याने कलेक्टर ॲशचा बळी घेतला आणि स्वच्छतागृहात उडविलेल्या शेवटच्या गोळीने त्याने स्वातंत्र्याच्या वेदीवर स्वतःचे बलिदान केले होते.

त्याच्या खिशात पोलिसांना एक कागद सापडला. त्या कागदावर असा मजकूर होता : "आज प्रत्येक हिंदी मनुष्य इंग्रजांना हिंदुस्थानातून बाहेर हाकून लावून स्वराज्य आणि सनातन धर्म यांची पुन्हा स्थापना करण्याचा प्रयत्न करीत आहे. राम, शिवाजी, कृष्ण, गुरू गोविंदसिंग आणि अर्जुन यांनी सर्व धर्मांचे रक्षण करूनच या देशावर राज्य केले. पण आता मात्र गोमातेचे मांस भक्षण करणारा म्लेंच्छ पंचम जॉर्ज याला हिंदुस्थानात राज्याभिषेक करण्याची सिद्धता इंग्रज लोक करीत आहेत. बादशहा पंचम जॉर्ज ह्या देशात उतरताच त्याला ठार मारण्याची शपथ तीन सहस्र मद्रासी बांधवांनी घेतलेली आहे. त्यांचा हा निश्चय सर्वांना ज्ञात व्हावा म्हणून त्यांच्यातला एक सर्वांत लहान माणूस जो मी, त्या वांछीने (वांछी अय्यर) आज ही कृती केली आहे."

पिस्तुल आणि पिस्तुलाच्या गोळ्या ह्यांच्यापेक्षा देखील तो कागद महाभयंकर स्फोटक होता. कलेक्टर ॲशच्या शरीरात थोडी धुगधुगी होती.

म्हणून त्याला व वांछी अय्यरच्या मृतदेहाला परत जाणाऱ्या आगगाडीने तिनेवेल्लीला पाठविण्यात आले. बळी आणि हुतात्मा यांचा प्रवास एकाच गाडीने सुरू झाला. त्यांचे आत्मे अधांतरी अनंताची वाटचाल करीत होते. त्यांची शरीरे घेऊन आगगाडी जमिनीवरून धावत होती.

सन १९१० च्या आसपासचा तो काळ होता. अठराशे सत्तावन्नचा स्फोट, वासुदेव बळवंतांची चढाई, पंजाबातील रामसिंग कुका यांनी दिलेले आव्हान चाफेकर बंधूंचा उठाव इत्यादींचे हादरे व स्फोट यांच्या तडाख्यातून हिंदुस्थानातील इंग्रजी सत्ता सहीसलामत निभावून गेली होती व आता त्या सत्तेचा प्रासाद भक्कम पायावर डौलाने उभा राहिला होता. त्या सत्तेपुढे मान वाकवून असहाय्य सामान्य जनता आता निमूटपणे रुळू लागली होती. आणि इतक्यात सातासमुद्रापार लंडनमध्ये इंग्रजाच्या राजधानीतच मदनलाल धिंग्राने भर सभागृहात कर्झन वायलीवर गोळ्या झाडल्या. बंगालात खुदीराम बोसने बॉम्बचा स्फोट केला. बंगालमध्ये क्रांतिकारकांवर इंग्रजी सत्तेच्या अमानुष जुलुमाचा वरवंटा फिरू लागला. लाला लजपतराय, सरदार अजित-सिंग इत्यादी पुढाऱ्यांनी करबंदीच्या चळवळीने पंजाबात रान उठविले. महाराष्ट्रात अनंत कान्हेरे, रानडे व देशपांडे यांनी भरल्या नाट्यगृहात जॅक्सन कलेक्टरचा वध केला. लोकमान्य टिळकांनी जनतेच्या ह्या असंतोषाला 'केसरी'पत्रातून कडक व कठोर शब्दांतून वाचा फोडली. साम्राज्य-सत्तेला दिलेली ही आव्हाने सरकारने कठोरपणे स्वीकारली. लाला लजपत-राय व सरदार अजितसिंग यांना देशाबाहेर तडीपार केले. लोकमान्य टिळकांना ब्रह्मदेशात मंडाले येथील तुरुंगात पाठविले. बाबाराव सावरकर यांना काळ्या पाण्यावर पाठविले. कान्हेरे, रानडे, देशपांडे, खुदीराम बोस, चारुचंद्र बोस, वीरेंद्र दत्तगुप्त, सत्येंद्र बोस, कन्हय्यालाल इत्यादी क्रांतिकार-कांना फासावर चढाविले व कित्येकांना काळ्यापाण्यावर पाठवून दिले. स्वातंत्र्यवीर सावरकरांना दोन जन्मठेपींच्या काळ्या पाण्यावर अंदमानला पाठविण्यात आले.

क्रांतिकार्याची रणभूमी आतापर्यंत पंजाब, बंगाल व महाराष्ट्र ह्या भागांपुरतीच मर्यादित होती. दक्षिण हिंदुस्थानात मात्र सर्वत्र सामसूम होते. नाशिकला गंगेच्या काठी लाविलेल्या 'अभिनव भारत,' ह्या

रोपट्याची एक फांदी स्वा. सावरकरांनी इंग्लंडला जाताना स्वतःसमवेत नेली होती. लंडनजवळच्या टेम्स नदीकाठच्या भूमीत ती चांगलीच रुजली. व्ही. व्ही. एस्. अय्यर, एम्. पी. टी. आचार्य हे मद्रास प्रांतातील विद्यार्थी लंडनमध्ये होते. त्यांनी मद्रास प्रांतात अभिनव भारताच्या शाखा उघडल्या.

कित्येक प्रसंगी असे आढळते की, असामान्य, दैवी तेज सामान्य दिसणाऱ्या हृदयातून प्रगट होते. वांछी अय्यर हा अशाचपैकी एक तरुण होय. मद्रास प्रांतात एका गरीब ब्राह्मण कुळात त्याचा जन्म झाला. बाप एका मंदिरात नोकरीला होता. वांछीने जेमतेम प्राथमिक शिक्षण पुरे केले आणि तो जंगलखात्यात वनरक्षक (फॉरेस्ट गार्ड) ह्या नोकरीला लागला. वास्तविक पाहाता वांछीची परिस्थिती व शिक्षण ह्या गोष्टींचा विचार करता इंग्रजांच्या राज्यातील जुलूम, क्रांतिकारकांचे कार्य व उद्दिष्ट इत्यादी गोष्टींचे पाणी वांछीच्या डोक्यावरून जात होते. तथापि कसे कोण जाणे परंतु त्या वेळच्या चळवळीच्या वातावरणातील वारे वांछी अय्यरच्या कानातून आत घुसले व त्याच्या हृदयात सुप्तावस्थेत असणाऱ्या त्या दिव्यत्वाच्या स्फुलिंगाला त्याने फुंकर घातली. श्री. व्ही. व्ही. एस्. अय्यर व एम्. पी. टी. आचार्य यांनी सुरू केलेल्या 'भारतमाता संगम' (सोसायटी) ह्या क्रांतिकारकांच्या गुप्त संस्थेत तो सामील झाला. नीलकंठ ब्रह्मचारी, शंकर कृष्ण अय्यर इत्यादी बरेच तरुण त्या गुप्त संस्थेचे सभासद होते. नीलकंठ ब्रह्मचारी यांच्याकडे त्या तरुण क्रांतिकारकांचे नेतृत्व होते. गुप्त संघटनेत सामील होताना पुढीलप्रमाणे दीक्षाविधी होई– संघटनेत सामील होणाऱ्या तरुणांना वर्तुळाकार बसविण्यात येई. मध्यभागी कालीमाता अथवा सरस्वतीचे चित्र ठेवण्यात येऊन त्या चित्रापुढे निरांजन तेवत ठेवले जाई. पुढे रामायणाची पोथी व सामील होणाऱ्या तरुणांची नावे लिहिलेला कागद ठेवला जाई. नीलकंठ ब्रह्मचारी चित्रप्रतिमेवर कुंकू व फुले वाहून तिची पूजा करीत. त्यानंतर प्रत्येक तरुण एका सुईने स्वतःच्या अंगठ्यास टोचून निघणाऱ्या रक्ताने त्या कागदावर स्वतःच्या नावापुढे अंगठा उठवीत असे व पुढील अर्थाची प्रतिज्ञा करीत असे : "मी संघटनेशी प्रामाणिक राहीन. विश्वासघात करणार नाही. केला तर पूज्य ऋषी व पवित्र काळी कपिला गाय यांच्या वधाचे पाप मला लागो !"

संघटनेची गोप्ये फोडणाऱ्या सभासदाला गोळी घालून ठार करण्यात येईल, असा इशारा नीलकंठ ब्रह्मचारी त्यांना देत असत.

चिदंबरम् पिळ्ळे व सुब्रह्मण्यम् शिव या दोन तरुण नेत्यांनी त्या वेळी व्याख्यानांच्या द्वारे जनमत जागृत करून इंग्रजी राजवटीविषयी जनतेत असंतोष निर्माण करण्याचे कार्य सुरू केले होते. चिदंबरम् पिळ्ळे यांनी 'स्वदेशी स्टीम नेव्हिगेशन कंपनी' नावाचा जहाजबांधणी उद्योगही सुरू केला होता. देशी उद्योगधंद्याला चालना देणे, क्रांतिकारकांना साहाय्य करणे शक्य झाल्यास अंदमानातील बंदीवान क्रांतिकारकांची त्या जहाजांच्या योगाने सुटका करणे, अशा प्रकारच्या उद्दिष्टांनी प्रेरित होऊन पिळ्ळे यांनी हा उद्योग हाती घेतला होता.

याच सुमारास तिन्नेवेल्ली जिल्ह्याला ॲश नावाचा असिस्टंट कलेक्टर (उप-जिल्हाधिकारी) म्हणून नेमण्यात आला होता. इंग्रजी राजवटीविरुद्ध प्रचार करणारे देशभक्त व वृत्तपत्राचे संपादक यांना तुरुंगात डांबण्याचा सपाटा त्याने सुरू केला. चिदंबरम् पिळ्ळे व सुब्रह्मण्यम् शिव यांना तुरुंगात टाकले. स्वदेशी स्टीम नेव्हिगेशन कंपनी संपुष्टात आणली. त्याच्या ह्या चांगल्या कामगिरीमुळे सरकारने त्याची लौकरच तिन्नेवेल्लीचा जिल्हाधिकारी म्हणून नेमणूक केली. आपल्या चढाईच्या धोरणामुळे तो क्रांतिकारकांचे लक्ष्य बनला.


स्वा. सावरकरांना इंग्लंडात पकडून हिंदुस्थानकडे आणण्यात येत असताना संधी साधून वाटेत त्यांची सुटका करावी ह्या उद्देशाने श्री. व्ही. व्ही. एस्. अय्यर इंग्लंडहून हिंदुस्थानकडे येण्यास निघाले. स्वा. सावरकरांच्या भोवतालच्या कडेकोट बंदोबस्तामुळे त्यांना आपले ईप्सित साध्य करता आले नाही.

हिंदुस्थानात आल्यावर मद्रासजवळच्या पाँडेचरी ह्या फ्रेंच वसाहतीत राहून त्यांनी गुप्त कार्य सुरू केले त्या ठिकाणी त्यांनी नीलकंठ ब्रह्मचारी, वांछी अय्यर, शंकर कृष्ण अय्यर, धर्मराज अय्यर वेंकटेश्वर पिळ्ळे इत्यादी क्रांतिकारकांना व्ही. व्ही. एस्. अय्यरांनी पिस्तुलाच्या नेमबाजीत तरबेज केले.

क्रांतिकारकांना, त्याने दिलेल्या जबर तुरुंगवासाच्या शिक्षांमुळे जिल्हाधिकारी हा क्रांतिकारकांच्या डोळ्यांत सलत होता. वांछी अय्यर

त्याचा काटा काढण्याच्या संधीची वाट पाहात होता. आणि एकदाची ती संधी चालून आली.

वांछी अय्यर अशा संधीच्या पाळतीवर असताना एके दिवशी त्याला बातमी लागली की, जिल्हाधिकारी तिन्नेवेल्लीहून कोडाईकनालला जाणार आहे. कोडाईकनालला जाताना मन्याची स्टेशनवर गाडी बदलावी लागत असे. ह्या प्रवासमार्गामध्येच ॲशला ठार करण्याच्या विचाराने वांछीने ॲश जाणार असलेल्या गाडीने प्रवास करण्याचे ठरविले. आपला मेहुणा शंकर कृष्ण अय्यर याला वांछीने बरोबर घेतले. वांछीने अंगात खाकी रंगाचा कोट घातला. खिशात भरलेले पिस्तूल टाकले. शंकर कृष्ण अय्यरने



सदऱ्याच्या खिशात पिस्तूल घेतले व वरून अंगावर उपरणे पांघरून घेतले. स्टेशनवर त्यांना ॲश दिसला. समवेत त्याची पत्नी होती. सामानाबरोबर एक चपराशी होता. वांछी व शंकर यांनी दुसऱ्या वर्गाची तिकिटे काढली. गाडी मन्याची स्टेशनवर आल्यावर ॲश व त्याची पत्नी गाडीतून खाली उतरले. कोडाईकनालकडे जाणाऱ्या गाडीला वेळ होता. म्हणून दुसऱ्या फलाटाला उभ्या असलेल्या एका गाडीच्या डब्यात ॲश आणि त्याची पत्नी यांची तोपर्यंत विश्रांतीसाठी स्टेशनमास्तरने सोय केली. थोड्या वेळाने वांछीने फलाटावर येरझाऱ्या घालीत परिस्थितीचा अंदाज घेतला. लगेच डब्याच्या खिडकीजवळ जाऊन वांछीने ॲशच्या छातीवर

गोळी झाडली. त्याच्या छातीतून रक्ताचे फवारे उडाले व अॅश आपल्या पत्नीच्या अंगावर कोसळला. अॅशच्या मरणाची खात्री पटताच वांछी फलाटावरून स्वच्छतागृहाकडे पळू लागला. रेल्वे स्थानकात एकच हलकल्लोळ उठला. पाठलाग करणाऱ्या पोलिसावर पिस्तूल रोखीत वांछीने स्वच्छतागृह गाठले. आतून कडी लावून त्याने पिस्तुलाची नळी स्वतःच्या तोंडात घालून चाप दाबला. कानठळ्या बसविणारा आवाज झाला.

ह्या कृत्यामागे क्रांतिकारकांचा कट असावा असे सरकारला वाटले. संशयित क्रांतिकारकांची धरपकड होऊन त्यांच्यावर खटले भरले गेले. खटल्यात कट सिद्ध झाला नाही. तथापि सरकारविरोधी राजद्रोही कृत्या-बद्दल नीलकंठ ब्रह्मचारी, शंकर नायर इत्यादी क्रांतिकारांना निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा झाल्या.


अॅशच्या वधानंतर वांछी अय्यरच्या घराची झडती घेण्यात आली. झडतीतील कागदपत्रांत आपल्या नावाचा संदर्भ असल्यामुळे पोलीस आपल्याला पकडतील व आपल्या साथीदारांची माहिती सांगण्यासाठी अनन्वित छळ करतील. त्या छळामुळे वैतागून मित्रांची नावे प्रकट करण्याचा द्रोह आपल्या हातून होऊ नये, ह्या उदात्त विचाराने प्रेरित होऊन धर्मराज अय्यर यांनी विष प्राशन करून प्राण दिला व वेंकटेश्वर पिल्ले यांनी स्वतःच्या हाताने आपले शिरकमळ कापून घेतले. दवाखान्यात नेताना ते मरण पावले. इंग्रजांना वाटत होते दक्षिण शांत आहे. परंतु तेथेही चक्री-वादळ उठले.

* * *

१४. हिंदू पीराची इराणात कबर

(सुफी अंबाप्रसाद व अजितसिंग)

संस्कृत भाषेत अशा अर्थाचे एक सुभाषित आहे की, पुरुषाचे भाग्य देवाला देखील माहीत असत नाही, मग मनुष्याची काय कथा? पुरुषाचे भाग्य देवाला माहीत असते की नाही ह्याचा पडताळा देवाची प्रत्यक्षात गाठ पडून त्याला विचारल्याशिवाय सांगता येणे शक्य नाही. मनुष्य-मात्राला मात्र दुसऱ्याच्या तर राहूच द्या, पण स्वतःच्या दैवातील देखील किती तरी घटनांची पुसट कल्पना सुद्धा असू शकत नाही, हे मात्र खरे आहे.



म्हणूनच संयुक्त प्रांताच्या सुपीक भूमीत जन्माला आलेल्या सुफी अंबाप्रसाद यांना आपला मृत्यू इराणच्या वाळवंटी भूमीत होईल ह्या गोष्टीची यत्किंचित

देखील कल्पना नव्हती. आणि त्या परकी मुस्लीम देशात त्यांच्यासारख्या हिंदु माणसाची समाधी एखाद्या पिराच्या कबरीसारखी मोठ्या भक्ति-भावाने पूजिली जाईल, असे भविष्य जर एखाद्या ज्योतिष्याने त्यांना सांगितले असते, तर सुफिजींनी यावर विनोद करीत त्या ज्योतिष्याला बिदागी दिली नसतीच, उलट त्यालाच विनोदाने सवाल केला असता, 'आता काय मागतोस मजजवळ पैसे! मी देव झाल्यावर माग, म्हणजे भरपूर तरी मिळतील.

सुफी अंबाप्रसाद यांचा स्वभाव फार विनोदी होता. जन्मतःच त्यांचा एक हात थोटा होता. त्या शारीरिक व्यंगाबद्दल कोणी विचारले तर सुफीजी म्हणायचे, "त्याचे असे झाले की, अठराशेसत्तावन्नच्या स्वातंत्र्य-संग्रामात लढताना माझा तो हात तुटला गेला. ह्या जन्मात मला घालताना तो तुटलेला हात दुरुस्त करावयाचे देव विसरून गेला!"

एकोणिसाव्या शतकाची अखेर व विसाव्या शतकाची सुरुवात ह्या कालखंडात उत्तर भारतात इंग्रजी सत्तेच्या जुलमी राज्यकारभाराविरुद्ध असंतोष पसरविण्याचे कार्य ज्या देशभक्तांना केले त्यांपैकी सुफी अंबाप्रसाद एक होते. सुफीजींचा जन्म इ.स. १८६८ साली संयुक्त प्रांतात मोरादाबाद येथे झाला. त्यांचे उर्दू भाषेवर फार प्रभुत्व होते. त्यांनी 'जामल असफ' नावाचे उर्दू वर्तमानपत्र काढून त्याच्या द्वारे जनतेत जागृती करण्याचे कार्य सुरू केले. त्याच सुमारास पंजाबात सरदार अजितसिंह यांनी इंग्रजी राजवटी-विरुद्ध किसानांमध्ये जागृती करण्यासाठी 'भारतमाता' सोसायटी स्थापन केली होती. सुफी अंबाप्रसादांनी सरदार अजितसिंहांना त्यांच्या कार्यात साहाय्य केले. सरदार अजितसिंह हे भगतसिंगांचे चुलते होत. राज-द्रोहाच्या आरोपावरून त्यांना सन १८९४ साली दीड वर्षाची शिक्षा झाली होती. इ. स. १९०६ च्या सुमारास भारतमाता सोसायटीच्या चळवळीने पंजाबात बराच जोर धरल्यामुळे इंग्रजांनी त्या चळवळीशी संबंध असलेल्या पुढाऱ्यांची धरपकड सुरू केली. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने अजितसिंह, सुफी अंबाप्रसाद व इतर सहकारी साधुवेषाने नेपाळात पळून गेले. त्यांच्यामध्ये एक इंग्रजांचा हेर त्यांना पत्ता लागू न देता सामील झाला होता. त्याने त्यांच्या हालचालींची बातमी सरकारला

कळविल्यामुळे त्यांना नेपाळातून पकडून आणून त्यांच्यावर खटला भरला. परंतु ते निर्दोषी म्हणून सुटले.

ह्यानंतर सुफीजींनी 'पेशवा' नावाने वर्तमानपत्र काढून जनतेत इंग्रजीसत्तेविरुद्ध उठाव करण्याचा जोरदार प्रचार चालविला. त्याच सुमारास बंगालमध्ये अरविंद घोष, बारिंद्रकुमार घोष, भूपेंद्रनाथ दत्त इत्यादी क्रांतिकारांनी सशस्त्र हल्ल्यामुळे सरकारला सतावून सोडले होते. महाराष्ट्रांत लोकमान्य टिळकांनी असंतोष फैलावण्याचे कार्य चालविले होते. त्यामुळे लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला भरून त्यांना ब्रह्मदेशात मंडाले येथे स्थानबद्ध करून ठेविले होते. महाराष्ट्र व बंगाल या प्रांतांतील ज्वाला पंजाबात भडकू नयेत म्हणून सरकारने पंजाबात धरपकडीचे सत्र सुरू केले. आपल्यावरही ती पाळी येईल हे हेरून सरदार अजितसिंह व सुफी अंबाप्रसाद यांनी गुपचिपपणे देश सोडून इराणात जाण्याचे ठरविले. त्यांच्याबरोबर जाऊल हक्क ह्या नावाचा एक क्रांतिकारक होता. हे तिघेजण गुप्तपणे भारताच्या बाहेर पडून इराणात शिरले. परंतु बक्षिसाच्या आशेने पुढे जाऊल हक्क ह्याची बुद्धी फिरून आपल्या दोन साथीदारांना इंग्रजांच्या स्वाधीन करून देण्याचे त्याने ठरविले. ह्या ठरविलेल्या बेताप्रमाणे त्याने त्या दोघांना आपल्या बरोबर चलण्यास सांगितले. 'तू पुढे चल. आम्ही तुझ्या पाठोपाठ येतोच' असे त्या दोघांनी त्याला उत्तर दिले. त्याप्रमाणे हक्क पुढे गेला, व आयताच इंग्रजांच्या तावडींत सापडला.

अंबाप्रसाद व अजितसिंह ह्यांना हिंदुस्थानातून इराणपर्यंत निरनिराळ्या प्रदेशांतून जात असताना कित्येक वेळा वेष पालटावे लागले व अडचणींना तोंड देत जावे लागले. एकदा सारवानांच्या उंटांच्या तांड्याबरोबर प्रवास करीत असताना रस्त्यात इंग्रज अधिकाऱ्यांनी तांड्याची तपासणी केली. दूर अंतरावरून इंग्रज लोक दिसताच सुफीजी उंटाच्या पाठीवर असलेल्या एका पेटीत दडून बसले. त्यामुळे ते तपासणीतून निसटले. दुसऱ्या एका प्रसंगी इंग्रजांच्या तावडीतून निसटून जाण्यासाठी त्यांना एका अरब सारवानाची बायको बनून गोषा पांघरून जावे लागले.

काही दिवस इराणात राहिल्यानंतर सुफीजींचे इराणी राजकारणात वजन वाढले. लोक त्यांना मान देऊ लागले जर्मनीने इंग्रजांच्याबरोबर युद्ध

पुकारल्यानंतर इराण, अफगाणिस्तानच्या बाजूने खानखोजे, पिंगळे इत्यादी गदर कार्यकर्त्यांनी हिंदुस्थानवर (इंग्रजांवर) हल्ला करण्यासाठी सैन्य आणले. सुफी अंबाप्रसाद यांचे इराणात बरेच वजन असल्यामुळे गदर सैन्याला इराणी जनतेचे बरेच साहाय्य झाले. खानखोजे यांच्या नेतृत्वाने गदरी सैन्याने इंग्रजांच्या इराणातील सैन्यावर हल्ला चढविला. हातात पिस्तुल घेऊन अंबाप्रसाद इंग्रजी सैन्याशी लढत होते. लढता, लढता ते इंग्रजी सैन्याच्या हाती सापडले व त्यांना पकडण्यात आले. त्यांच्यावर लगेच लष्करी कोर्टात खटला भरण्यात आला. इंग्रजांविरुद्ध बंड पुकारल्याच्या आरोपावरून लष्करी कोर्टाने त्यांना फांशीची शिक्षा ठोठावली. फाशीच्या शिक्षेपूर्वीच्या रात्री सुफीजींनी स्वतःच्या इच्छाशक्तीने शरीरातून प्राण ओढून घेऊन सोडून दिले. सुफी अंबाप्रसादाचे प्रेत इराणी जनतेने ताब्यात घेतले व त्यावर सुंदर कबर बांधली. अजूनही त्या कबरीची दर वर्षी मोठी जत्रा भरते. भक्तिभावाने लोक कबरीची पूजा करतात व तिला नवस करतात सुफीजींची कबर नवसाला पावते अशी त्या भागातील जनतेची श्रद्धा आहे.

* * *

१५. चंदनाचे खोड

(बाबा सोहनसिंह भकना)

गदर चळवळीचे एक प्रमुख संस्थापक बाबा सोहनसिंह भकना यांचे जीवनकार्य भारताच्या स्वातंत्र्यचळवळीशी फार निगडित आहे.

बाबा सोहनसिंह हे पंजाबात राहणारे गृहस्थ. अमेरिकेत मजुरीसाठी गेले होते. पुढे त्यांनी लाकडाचा धंदा सुरू केला व त्यात पुष्कळ संपत्ती मिळविली. त्यांच्या आयुष्याला कशी कलाटणी मिळाली हे पाहणे मोठे मनोरंजक आहे.



त्यांचा जन्म पंजाबात एका सधन शेतकरी कुटुंबात झाला. ते एक वर्षाचे असतानाच त्यांचे वडील निवर्तले. आई रामकौर, सावत्र आई हरकौर व आत्या हुक्मकौर ह्यांनी त्यांचे पालनपोषण योग्य प्रकारे केले. एकुलता एक मुलगा असल्यामुळे तो फार लाडात वाढत होता. त्या वेळी शिक्षणाचा फारसा प्रचार नव्हता त्यामुळे गुरुमुखीतून कामापुरते ग्रंथवाचनाचे मामुली शिक्षण सोहनसिंहाला मिळाले. त्यानंतर गावात उर्दू शाळा उघडल्यानंतर त्यांचे थोडे प्राथमिक शिक्षण झाले. शिक्षण संपल्यानंतर तरुणपणी ते गावातील टारगट तरुणांचे म्होरके बनले. घरी ५०-६० एकर सुपीक जमीन असल्यामुळे भरपूर उत्पन्न येत होते. खाण्या-

पिण्याची ददात नसल्यामुळे ख्याली खुशाली, दारूसारखा व्यसने व टारगटपणा ह्यात ते काळ घालवू लागले.

एक दिवस ते केदारसिंह नावाच्या सत्पुरुषाचे कीर्तन ऐकावयास गेले. कीर्तन ऐकून त्यांना उपरती झाली. व्यसनी लोकांची संगत सोडून ते सन्मार्गाने वागू लागले. व्यसनापायी होणारा खर्च सत्पुरुषांच्या सेवेत खर्च होऊ लागला. वयाच्या सत्रिसाव्या वर्षी परिस्थिती घसरत जाऊन सोहनसिंहांना उदरनिर्वाहाची भ्रांत पडू लागली. अशा परिस्थितीत एका मित्राच्या सल्ल्यावरून नोकरीधंद्यासाठी ते अमेरिकेस गेले. सुरुवातीला लाकडाच्या कारखान्यात मजुरीची, कष्टाची कामे त्यांनी केली. हलके हलके ते लाकडाच्या व्यापारात पडले. त्या व्यापारात त्यांनी अलोट पैसा मिळविला. अमेरिकन लोक हिंदी लोकांना तुच्छ लेखीत असत. हिंदी लोकांच्या मताने अशी वागणूक मिळण्याचे कारण म्हणजे हिंदी लोक हे ब्रिटिशांचे गुलाम होते, हे होय. अमेरिकेत त्याच वेळी रशिया, तुर्कस्तान, इजिप्त, चीन इत्यादी देशांतूनही मजूर लोक आले होते. ते लोक आपल्या देशातील जुलमी राजसत्ता उलथून टाकण्यासाठी बेत आखीत होते. ह्या क्रांतिकारक लोकांच्या संपर्कात अमेरिकेत गेलेले हिंदी लोक आले. हिंदुस्थानातून ब्रिटिशांची सत्ता उलथून टाकण्यासाठी सशस्त्र क्रांती केली पाहिजे ह्या विचाराने प्रेरित होऊन हिंदी लोकांनी सॅन्-फ्रान्सिस्को येथे गदर संस्थेची स्थापना केली. ही संस्था स्थापन करण्यात बाबा सोहनसिंह यांचा मोठा वाटा होता. गदर संस्थेने गदर पत्राच्या द्वारे अमेरिकेतील हिंदी लोकांच्या मनात हिंदुस्थानातून ब्रिटिशांच्या राजवटीबद्दल अप्रीती निर्माण केली. हिंदुस्थानातून ब्रिटिशांच्या सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी पैसा उभा केला, शस्त्रे उभारली व कार्यकर्ते तयार केले.

१९१४ मध्ये जर्मनी व इंग्लंड यांच्यामध्ये युद्ध पुकारले गेले. ह्या युद्धाच्या परिस्थितीचा फायदा घेण्याचे गदर कार्यकर्त्यांनी ठरविले. त्यांनी अमेरिकेतील जर्मन वकिलाचे साहाय्य त्या कामी मिळविले. जर्मनी हिंदुस्थानावर बाहेरून जेव्हा हल्ला करील त्याच वेळी हिंदुस्थानातून गदर कार्यकर्त्यांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध उठाव करण्याचे ठरविले. डॉ. खानखोजे ह्यांनी अमेरिकेत लष्करी शिक्षण घेतले होते. डॉ. खानखोजे व विष्णुपंत

पिंगळे ह्यांनी हिंदुस्थानात उठाव करण्यासाठी गदर कार्यकर्त्यांचे सैन्य तयार केले. बरेचसे सैन्य इराण, अफगाणिस्तान ह्या मार्गाने हिंदुस्थानकडे रवाना करण्यात आले. हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या सत्तेविरुद्ध प्रक्षोभ उठविण्यासाठी काही गदर कार्यकर्ते जहाजाने पाठविण्याचे ठरविले.

त्याच सुमारास 'कोमागातामारू' हे जहाज हिंदी लोकांना घेऊन कॅनडाच्या बंदराजवळ आले. परंतु हिंदी लोकांना अमेरिकेत येऊ देण्यास कॅनडाच्या सरकारने बंदी घातली. जहाजातील हिंदी लोकांनी अमेरिकेत उतरण्याचा हट्ट धरला. प्रकरण फारच हातघाईवर आले. कॅनडाच्या सरकारने कोमागातामारू जहाज बंदरातून हुसकून देण्यासाठी त्याच्यावर आपले लढाऊ जहाज पाठविले व धमकी दिली की, जर कोमागातामारू निघून गेले नाही तर ते तोफेने उडवून देण्यात येईल. कॅनडाच्या सरकारने कोमागातामारूवरील प्रवाशांना अन्न व पाणी यांचा पुरवठा करण्याचे देखील नाकारले. ही परिस्थिती पाहून कॅनडातील हिंदी रहिवाशांनी कॅनडाच्या सरकारला असा दम दिला की, जर कोमागातामारू जहाजाला तोफेने उडविण्यात आले तर आम्ही शहरच पेटवून देऊ. त्यामुळे कॅनडाचे सरकार नरम आले. जहाजावरील लोकांना अन्नपाण्याचा पुरवठा करण्यात आला व ते जहाज मायदेशी येण्यास निघाले.


बाबा सोहनसिंह भकना हे गदर पार्टीचे फार मोठे कार्यकर्ते होते. त्यांच्यासह काही गदर कार्यकर्त्यांनी हत्यारे जमवून हिंदुस्थानात प्रवेश करावा. वाटेत चीन, जपान, ब्रह्मदेश इ. पूर्वेकडील देशांत धंद्यानिमित्त वसत असलेल्या हिंदी लोकांची गाठ घ्यावी. त्या देशांतून देखील शस्त्रे जमवून हिंदुस्थानात घेऊन जावी. ठरल्याप्रमाणे बाबा सोहनसिंह आपल्याबरोबर काही कार्यकर्त्यांना घेऊन कोमागातामारू जहाजातून निघाले. जपान, ब्रह्मदेश ह्या देशांत थांबले. त्या त्या शहरातून त्यांनी बंडासाठी हिंदी लोक तयार केले. त्याच-प्रमाणे शस्त्रे जमविली. हिंदुस्थानात बंड उभारण्यासाठी शस्त्रे व कार्यकर्ते घेऊन बाबा सोहनसिंह भकना कलकत्त्यास आले. कोमागातामारू जहाज कलकत्ता बंदरास लागले. इंग्रज सरकार त्यांच्या स्वागतासाठी तयारच होते. जहाज बंदरास लागताच ह्या लोकांची तपासणी सुरू झाली. बहुतेक सर्व कार्यकर्ते पकडले गेले. त्यांची रवानगी पंजाबच्या तुरुंगात करण्यात आली.

बाबा सोहनसिंह अगदी सरळ स्वभावाचे सज्जन गृहस्थ होते. त्यांना

राजकारणातील छक्के पंजे माहीत नव्हते. त्यांनी कधी क्रान्तीचा इतिहास वाचला नव्हता. त्यामुळे कोमागातामारू जहाजावर व निरनिराळ्या बंदरांतून त्यांनी इंग्रजांविरुद्ध बंडाचा प्रचार केला. तसेच जपान व सिंगापूर येथून त्यांनी जमविलेली हत्यारे लोकांच्या नजरेतून निसटू शकली नाहीत. शिवाय अमेरिकेत असताना सोहनसिंहाचा जो पोषाख होता त्याच प्रकारच्या पोषाखात ते प्रवास करीत होते. त्यामुळे त्यांच्या सर्व हालचाली निरनिराळ्या ठिकाणच्या इंग्रज लोकांच्या लक्षात आल्या होत्या. त्या अनुरोधाने त्यांनी इंग्रज सरकारला कोमागातामारू जहाजासंबंधीची इत्थंभूत माहिती कळविली होती. त्यामुळे बंडासाठी मोठ्या हिमतीने आलेले गदर कार्यकर्ते आपल्याच चुकांमुळे आयतेच जाळ्यात अडकले गेले.

त्यानंतर गदर कार्यकर्त्यांवर खटला चालून काहींना फाशी देण्यात आले व काहींना काळ्या पाण्यावर अंदमानला पाठविण्यात आले. बाबा सोहनसिंह भकना ह्यांनाही १९१५ साली काळ्या पाण्यावर पाठविण्यात आले. अंदमानमध्ये असताना हे राजकीय कैदी एकजुटीने तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी भांडत. म्हणून त्यांना एकत्र ठेवणे धोक्याचे आहे असे सरकारला वाटले. त्यामुळे त्यांना मद्रास येथील तुरुंगात पाठविण्यात आले. तुरुंगात असताना कैद्यांच्या हक्कसंरक्षणासाठी त्यांनी कित्येक वेळा दीर्घ मुदतीचे उपवास केले. १९३० साली त्यांची मुक्तता झाली.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी काळ्या पाण्यावर गेलेल्या बाबा सोहनसिंहाला स्वतःच्या आयुष्यातच भारत स्वतंत्र झालेला दिसला. स्वतंत्र भारतात देखील बाबांनी किसानांच्या चळवळीत भाग घेऊन परत कारावास भोगला. १९६८ साली ते मृत्यू पावले.



१६. दुर्दैवी देशभक्त

(लाला हरदयाळ)

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस इंग्रजांच्या जुलमी सत्तेने हिंदुस्थानात पक्के पाय रोवले होते. अशा वेळी एक गरीब पंजाबी प्राध्यापक अमेरिकेत



राहून हिंदवी स्वराज्याची स्वप्ने पाहात होता. त्याच्या अंगी त्याग, निःसीम देशनिष्ठा व प्रकांड पांडित्य होते. त्याचप्रमाणे कुशाग्र बुद्धिमत्ता, अमोघ वक्तृत्व व कुशल संघटनाचातुर्य ह्या गुणांमुळे त्यांच्याकडे अमेरिकेतील हिंदी लोकांचे नेतृत्व ओघानेच आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आमरण भगीरथ प्रयत्न करणारा त्यांच्यासारखा त्यागी पुरुष आढळणे विरळाच. लाला हरदयाळ यांची जीवनकहाणी म्हणजे एक उदात्त व करुणरसपूर्ण महाकाव्य आहे.

लाला हरदयाळ यांचा जन्म दिल्ली येथे १८७६ मध्ये झाला. वडील कोर्टात कारकून होते. घरची गरिबी. त्यांना आणखी तीन भाऊ होते. ही मुले गरीब असली तरी बुद्धीने फारच कुशाग्र होती. तशीच दिसावयास देखील फार नाजूक व सुंदर होती. लाला हरदयाळ मात्र रूपाने सुंदर असून देखील चेहऱ्यावर वेंधळे भाव व गबाळा पोशाख ह्यामुळे बावळट दिसत असत.

दिल्लीच्या सेंट स्टीफन्स महाविद्यालयातून ते १९०३ साली बी. ए. पास झाले. दोन वर्षांनी इंग्रजी विषय घेऊन त्यांनी लाहोर विद्यापीठाची एम्. ए. ची पदवी मिळविली. इंग्रजी विषयातील उच्च गुणवत्तेमुळे सरकारने त्यांना शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडला पाठविले. ऑक्सफर्ड येथील 'बेलीयन' महाविद्यालयात ते शिक्षण घेऊ लागले.

हरदयाळ यांच्या मनाचा ओढा अध्यात्माकडे होता. दयानंद सरस्वतींनी सुरू केलेल्या आर्यसमाजाचा त्यांच्या मनावर मनस्वी प्रभाव पडला. आर्यसमाजाच्या शिक्षणसंस्थेस जीवन अर्पण करून त्यागी जीवन जगावे, असे त्यांच्या मनाने घेतले.

त्याच सुमारास (१९०६) स्वा. वीर सावरकर हे बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडमध्ये गेले होते. हिंदी विद्यार्थ्यांसाठी पं. श्यामजी कृष्णवर्मा यांनी 'भारत-भवन' ही इमारत खरेदी केली होती. त्याच ठिकाणी लाला हरदयाळ यांचा सावरकरांशी संबंध आला. सावरकर यांनी हरदयाळ यांच्या मनात सशस्त्र क्रांतीची बीजे पेरली. लाला हरदयाळ हे 'अभिनव भारत' संस्थेचे सभासद झाले. इंग्रजांनी भारतात चालविलेल्या जुलुमाचे इतके शहारे आणणारे चित्र सावरकरांनी लाला हरदयाळ यांच्या मनावर बिंबविले की, त्यांना इंग्रजांची घृणा आली. इंग्रजी पद्धतीचा पेहराव टाकून ते धोतर, कफनी व फेटा वापरू लागले. इंग्रजांच्या हातचे अन्न देखील खाणे नको म्हणून ते स्वतः हाताने स्वैपाक करून अथवा हिंदी आचाऱ्याकडून स्वैपाक तयार करून घेऊन खात असत. तसे न जमल्यास उपाशी राहत. त्यांच्या अशा वागणुकीमुळे ते आजारी पडले. म्हणून सावरकरांनी त्यांना पॅरिस येथे बॅ. राणा ह्यांच्याकडे पाठविले. बॅ. राणा हे (पॅरिसमधील) हिंदी लोकांचे क्रांति-केंद्र होते. त्यांनी एका जर्मन बाईशी विवाह केला होता. लाला हरदयाळांना गोऱ्या लोकांची इतकी चीड होती की, ते राणाजींच्या पत्नीशी बोलत देखील नव्हते. नंतर त्यांना सांगण्यात आले की, त्या बाई, इंग्रज नसून जर्मन आहेत व जर्मन लोक हे हिंदी लोकांचे मित्र आहेत. तेव्हापासून ते राणाजींच्या पत्नीशी बोलू लागले.

इ. स. १९०८ च्या सुमारास सरकारने पंजाबचे पुढारी लाला लजपतराय यांना पकडले. त्यामुळे पंजाबात सरकारविरुद्ध चालणाऱ्या

चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी योग्य पुढाऱ्यांची आवश्यकता होती. म्हणून सावरकरांनी लाला हरदयाळ यांना त्या कामासाठी हिंदुस्थानला पाठवून दिले. अशा रीतीने लालाजींच्या मनातील अध्यात्माच्या विचारांची जागा देशप्रेम व क्रांतीच्या विचारांनी घेतली.

लाला हरदयाळ यांनी लाहोर येथे राहून पंजाब प्रांतभर किसानांची चळवळ सुरू केली. त्यामुळे सरकारने त्यांना पकडण्याचा हुकूम सोडला. हे कळताच हरदयाळ भूमिगत झाले व गुप्तपणे फ्रान्सला गेले. पुढे मदनलाल धिंग्राने १ जुलै १९०९ ला कर्झन वायलीचा वध केला. मदनलालला फाशी देण्यात आले. सावरकरांना जॅक्सन कलेक्टर यांच्या खूनखटल्यात पकडले व दोन जन्मठेपींची शिक्षा देण्यात आली. ह्या घटनांचा लाला हरदयाळ ह्यांच्या मनावर फारच गंभीर परिणाम झाला. भाई परमानंद हे त्या वेळी पॅरिस येथे राहात होते. भाई परमानंद हे एम्. ए. असून विद्वान व सच्छील होते. ते देखील त्यागी जीवन जगून आर्य समाजाचा प्रचार व प्रसार करीत होते. त्यांना पंजाबातील चळवळीमुळे सरकारने हद्दपार केले होते. भाई परमानंदांच्या सहवासामुळे लाला हरदयाळ परत राजकारणाकडे ओढले गेले व मायदेशी परत आले. त्यानंतर भाई परमानंद यांच्याबरोबर ते अमेरिकेत गेले. भाई परमानंद ह्यांच्या शिफारशीवरून त्यांना अमेरिकेत सॅन्-फ्रॅन्सिस्को येथे संस्कृतच्या प्राध्यापकाची जागा मिळाली.

त्या वेळी अमेरिकेत व्यापारधंद्यानिमित्त अनेक शीख, पंजाबी व बंगाली माणसे जाऊन स्थायिक झाली होती. रशिया, चीन, तुर्कस्तान ह्या देशातील काही कामगारही अमेरिकेत काम करीत होते. आपआपल्या देशातील राजसत्ता सशस्त्र क्रांतीच्या योगाने उखडून टाकावी, अशा विचारांचे वारे त्या कामगारांच्या मनात वाहात होते. त्यांच्या सहवासाने अमेरिकेतील हिन्दी लोकांना देखील हिंदुस्थानातून इंग्रजांची सत्ता उखडून टाकावी असे वाटू लागले. त्या दृष्टीने त्यांनी 'गदर' नावाची एक संस्था स्थापन केली व 'युगान्तर' नावाचा आश्रम स्थापन केला. लाला हरदयाळ ह्यांच्यासारख्या विद्वान्, बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न माणसाकडे गदरपार्टीचे नेतृत्व आले. गदर ह्या शब्दाचा अर्थच मुळी बंड. इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंड करण्याची चेतावणी देण्यासाठी 'गदर' ह्या नावाचे एक वर्तमानपत्र काढण्यात आले. ते पत्र इंग्रजी

पंजाबी, हिंदी, उर्दू, गुजराथी, मराठी व बंगाली ह्या भाषांतून काढले जात होते. जगभर पसरलेल्या हिंदी लोकांकडे ते अंक पाठविण्यात येत असत. 'गदर' पत्राचे अंक भारतातही गुप्त रीतीने पाठविले जात असत. (१९१३).

सन १९१४ च्या जुलैमध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. ऑगस्ट १९१४ मध्ये इंग्रज त्या युद्धामध्ये जर्मनीविरुद्ध उतरले. ही संधी गदर पार्टीच्या लोकांना इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्यास योग्य वाटली. अमेरिकेतील जर्मन वकिलाने जर्मनीतर्फे हिंदी क्रांतिकारकांना साहाय्य देण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे अमेरिकेत हिंदुस्थानच्या लढ्यासाठी सैन्य उभारण्याचे काम विष्णू गणेश पिंगळे, बाबा सोहनसिंह, डॉ. खानखोजे इत्यादी गदर कार्यकर्ते करू लागले. लाला हरदयाळ ह्यांनी अमेरिकेतील निरनिराळ्या शहरांत फिरून तेथील हिंदी रहिवाश्यांपासून युद्धासाठी पैसा व स्वयंसेवक उभे केले. लाला हरदयाळ हे अमेरिकेतील हिंदी लोकांना इंग्रजांच्या विरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त करीत असून हिंदुस्थानातील पंजाब, संयुक्त प्रांत व बंगाल ह्या प्रांतांतील जनतेला इंग्रजांच्या विरुद्ध भडकावीत आहेत, असे इंग्रज सरकारने अमेरिकेला कळविले. ह्यास्तव अमेरिकन सरकारने लाला हरदयाळ ह्यांना अटक केली. हिंदी लोकांनी बऱ्याच मोठ्या रकमेच्या जामिनावर त्यांची सुटका केली. सावरकरांच्याप्रमाणे पकडले जाण्याचा प्रसंग लाला हरदयाळ ह्यांच्यावर येऊ नये, म्हणून गदर कार्यकर्त्यांनी जर्मन वकिलाच्या साहाय्याने त्यांना गुप्तपणे अमेरिकेतून स्वित्झर्लंडला पाठविले.

स्वित्झर्लंडला गेल्यानंतर त्यांनी जर्मनीचा बादशहा कैसर ह्याची भेट घेतली. जर्मनीच्या मदतीने युद्धाच्या वेळी सिंगापूर, ब्रह्मदेशमार्गे हिंदुस्थानवर हल्ला चढवावयाचा, अंदमानच्या तुरुंगावर हल्ला करून तेथील तुरुंगात कोंडलेल्या राजकीय कैद्यांची सुटका करावयाची वगैरे योजना त्यांनी आखल्या होत्या. दुर्दैवाने त्या योजनेचे कागदपत्र कोमागातामारू जहाजावरील हिंदी क्रांतिकारकांच्या धरपकडीच्या वेळी इंग्रज सरकारच्या हाती पडले. कोमागातामारू जहाजावरील गदर क्रांतिकारक भारताच्या किनाऱ्यावर उतरताच त्यांची धरपकड झाली. त्यानंतर पिंगळे, कर्तारसिंह, सोहनसिंह, पं. परमानंद प्रभृति कार्यकर्ते पंजाबात पकडले गेले आणि लाला हरदयाळ ह्यांच्या हृदयातील स्वप्न बिलोरी झुंबराप्रमाणे खळकन गळून फुटले. पुढे जर्मनीचा बादशहा कैसर

ह्यांच्याकडूनही ह्यांना मदत मिळेना आणि गदरचे सहकारी काही फासावर लटकवले तर काहींना अंदमानात पाठविण्यात आले. अशा परिस्थितीत जीवनाचे अखेरचे क्षण हताश मनाने मोजीत ते स्वित्झर्लंडमध्ये अत्यंत दैन्यावस्थेत कालक्रमणा करू लागले स्वित्झर्लंडच्या आल्हादकारी व निसर्गरम्य अशा सुंदर भूमीवर त्यांचे शरीर पडले होते. परंतु डोळे लागले होते भारतमातेकडे। मन आसुसले होते मातृभूमीच्या भेटीसाठी. तथापि भारताकडे येण्यास पैसाही नव्हता व परवानाही नव्हता. अंदमानचा कारावास संपवून भाई परमानंद जेव्हा भारतात परत आले, तेव्हा लालाजींच्या हलाखीची स्थिती त्यांना कळाली. त्यांनी लाला हरदयाळ यांच्याकडे भारतात येण्यासाठी लागणार परवाना व पैसे पाठविले.

तथापि फिर्दोसी कवीच्या दैवाची नियतीने जशी क्रूर चेष्टा केली काहीसा तसलाच प्रकार लालजींच्या अंत्यसमयी घडला.

गझनीच्या सुलतान महमूद याच्या पदरी फिर्दोसी ह्या नावाचा कवी होता. फिर्दोसीने सुलतानाची स्तुती असलेले 'शहनामा' नावाचे काव्य लिहिले. काव्याच्या प्रत्येक श्लोकागणिक सुवर्ण दिनाराचे नाणे सुलतानाने फिर्दोसीला देण्याचे कबूल केले होते. तथापि प्रत्यक्षात त्या लोभी सुलतानाने स्वतःचा शब्द फिरवून सोन्याच्याऐवजी चांदीची नाणी फिर्दोसीला देऊ लागले. फिर्दोसीने ही नाणी न घेता सुलतानाची निर्भत्सना केली. त्यामुळे सुलतानाने फिर्दोसीला पकडण्याचा हुकूम सोडला. त्यामुळे फिर्दोसी गझनीबाहेर दूर पळून गेला. तथापि पळून जाण्यापूर्वी त्याने गझनीच्या मुख्य मशिदीच्या भिंतीवर पुढील अर्थाचा श्लोक लिहिला: 'दोन-चार मोती मिळविण्यासाठी मी सागरात बुडी मारली. माझ्या हाताला मोती तर लागले नाहीतच, परंतु त्या सागरानेच मला गिळंकृत करण्यासाठी स्वतःचा जबडा उघडला.' काही वर्षांनंतर सुलतान त्या मशिदीत गेला. त्याने तो श्लोक वाचला व त्याच्या डोक्यात स्वतःच्या कृत्याबद्दल लख्ख प्रकाश पडला. सुवर्ण मुद्रांनी लादलेले उंट सुलतानाने फिर्दोसीकडे पाठविले. फिर्दोसीचा शोध घेत घेत सांडणीस्वार एका गावाच्या वेशीजवळ आले. सुवर्णमुद्रांनी लादलेले उंट फिर्दोसीचे भाग्य उजळावयासाठी ज्या वेळी वेशीतून आत प्रवेश

करीत होते. त्याच वळी लोक फिर्दोसीचे कलेवर दफनासाठी खांद्यावर घेऊन वेशीतून बाहेर पडत होते.

भाई परमानंदांनी लालाजींना भारतात येण्यासाठी म्हणून पाठविलेले पैसे व परवाना ज्या दिवशी स्वित्झर्लंडमध्ये पोहोचले, त्याच दिवशी लाला हरदयाळांचे प्राण स्वित्झर्लंडची भूमी सोडून परलोकच्या प्रवासाला लागले होते. किती करुण, दारुण, विचित्र योगायोग !


देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगीरथ प्रयत्न करणाऱ्या एका उत्तुंग, भव्य, दिव्य जीवनाची करुण कहाणी मातृभूमीपासून दूर दूर अशा परकीय भूमीच्या मातीत विराम पावली !



१७. डफेदाराने विश्वासघात केला

(विष्णू गणेश पिंगळे)

पिंगळे हे पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे येथील राहणारे. तळेगाव दाभाडे येथील समर्थ विद्यालयाचे ते सुरुवातीच्या विद्यार्थ्यांपैकी. विद्यालयाच्या इमारतीचा पाया भरण्यापासून तो छताची लाकडे तासण्यापर्यंतची कामे त्यांनी निष्ठेने व श्रद्धेने केली. व्यायाम करून त्यांनी शरीरबल संपादन केले होते. त्यांच्या अंगात इतकी शक्ती होती की, एकदा समर्थ रामदास स्वामींच्या समाधीच्या दर्शनासाठी आपल्या वृद्ध पित्यास पाठकुळीस घेऊन ते सज्जनगड चढून गेले होते.



पिंगळे ह्यांचे बालपण विपन्नावस्थेत गेले होते. चरितार्थासाठी त्यांनी मराठवाड्यात लातूर येथे विणकामाचे माग बसविले होते. परंतु महत्त्वाकांक्षा त्यांना स्वस्थ बसू देईना. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेण्यासाठी इ. स. १९११ मध्ये ते अमेरिकेस गेले. भारतात असताना श्री. पिंगळे ह्यांचा सशस्त्र क्रांतिकारकांशी संबंध आला होता. अमेरिकेत असताना त्यांचा संबंध बाबा सोहनसिंह, लाला हरदयाळ, डॉ. खानखोजे इत्यादी गदर पार्टीच्या कार्यकर्त्यांशी

आला. हिंदुस्थानला ब्रिटिशांच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी गदर पार्टीने जी सैन्य-उभारणी केली तिचे नेतृत्व डॉ. खानखोजे व पिंगळे यांच्याकडे होते. (गदर पार्टीची स्थापना १० मे १९१३. गदर पत्रिका पहिला अंक प्रसिद्धी १-११-१३). पहिल्या महायुद्धाच्या वेळच्या परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांच्या विरुद्ध उठावणी करण्याच्या उद्देशाने ते भारतात आले. पिंगळे ह्यांचा स्वभाव व व्यक्तिमत्त्व लोभस होते. त्यामुळे ते लगेच दुसऱ्यावर छाप पाडीत असत. शिवाय त्यांना मराठी, इंग्रजी, गुरुमुखी, बंगाली, हिंदी अशा बऱ्याच भाषा येत होत्या. ते उत्कृष्ट वक्ते होते. त्यामुळे निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांत प्रचार करणे त्यांना सोपे जात होते. कानपूर, अमृतसर, लाहोर, मीरत इत्यादी ठिकाणच्या लष्करी छावण्यांतून गुप्तपणे प्रचार करून त्यांनी इंग्रजांच्या विरुद्ध सैन्य फितविण्यास सुरुवात केली.

इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्यासाठी लाहोर येथे एका घरात गुप्त बैठक भरली होती. तिची बातमी एका फितुराने इंग्रजांस दिली. इंग्रजांनी घरास वेढा दिला. फक्त पिंगळे व रास बिहारी तेथून निसटले. इतर कार्यकर्ते पकडले गेले.

त्यानंतर पिंगळे बॉम्बची पेटी घेऊन मीरत येथील लष्करी छावणीत प्रचारास गेले. इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्यास सैन्य (मीरत छावणीतील) अनुकूल झाले. इंग्रजांविरुद्ध उठावाची तारीख २१ फेब्रुवारी १९१५ ही ठरली होती. तथापि एका फितुराने (कृपालसिंग नावाचा गुप्तहेर) बातमी दिल्यामुळे पिंगळे ह्यांना मीरतच्या लष्करी छावणीतच पकडण्यात आले. लष्करातील एका अफगाण डफेदाराने विश्वासघात करून त्यांना पकडून दिले. त्यांच्या पेटीत महाभयंकर असे १८ ज्वालाग्राही बॉम्ब होते. एकेका बॉम्बची शक्ती लष्कराची अर्धी पलटण उध्वस्त करण्याइतकी होती.


२३ मार्च १९१५ ला ते पकडले गेले. १४ सप्टेंबर १९१५ ला त्यांना फाशीची शिक्षा झाली व १६ नोव्हेंबर १९१५ ला त्यांना लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. ह्या लाहोर-कटाच्या खटल्यातील ६ जणांना फाशी देण्यात आले व ४० जणांना काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली.

फाशीची शिक्षा ऐकून पिंगळे म्हणाले, " इतकीच शिक्षा ? " न्यायालयात स्वतःची बाजू मांडताना ते म्हणाले, " देश स्वतंत्र करणे हा मुळीच

गुन्हा नाही. हे कार्य करीत असताना कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यात मी पाप मानीत नाही. मातृभूमी स्वतंत्र करणे हा एकच ध्यास मला लागला आहे. आमचा लढा इंग्रज ह्या व्यक्तीशी मुळीच नाही. इंग्रजांनी भारतीय जनतेला जे पारतंत्र्यात खितपत ठेवले आहे, त्या राज्ययंत्रणेशी आमचा लढा आहे. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हेच माझे ईप्सित आहे. हा लढा या आयुष्यात यशस्वी झाला नाही तर पुनरपि जन्म घेऊन आम्ही लढयाला सिद्ध होऊ. ''

फाशी जाताना पिंगळे यास 'अखेरची इच्छा काय ?' असे विचारण्यात आले. " माझ्या हातातील बेडया काढा. मला दोन्ही हात जोडून परमेश्वराची प्रार्थना करू द्या. " असे त्यांनी सांगितले. " हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हेच आमचे अंतिम ईप्सित आहे. मी जे काही केले ते ह्याच एका उद्देशाने केले. कोणत्याही व्यक्तीचा, जातीचा अथवा पंथाचा द्वेष करून अथवा स्वार्थमय आकांक्षा अंतःकरणात बाळगून नव्हे. ज्या पवित्र कार्याकरिता आमचे प्राण आम्ही बलिदान करीत आहोत, ते कार्य तू पूर्ण कर, हीच माझी परमेश्वराजवळ शेवटची प्रार्थना आहे. वन्दे मातरम् ! " असे म्हणून ते फासावर चढले.

सर चार्ल्स क्लीव्हलँड नावाचे हिंदुस्थान सरकारच्या गुप्तचर (गुप्त पोलीस) खात्याचे मुख्य इंग्रज अधिकारी श्री. पिंगळे ह्यांचे व्यक्तिमत्त्व, उदात्त हेतू, धाडस इत्यादीमुळे फार प्रभावित झाले होते. त्यांनी पिंगळेंना वाचविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु यश आले नाही. पिंगळे ह्यांच्याबद्दल ते म्हणतात, " पिंगळे ह्यांची स्मृती माझ्या हृदयपटलावरून कधीही पुसली जाणार नाही. त्यांच्याइतके दुर्लभ मानवी गुण-समुच्चयाचे व चारित्र्याचे निधान असलेली दुसरी व्यक्ती मी पाहिली नाही. "



१८. बागी कर्तारसिंह

कर्तारसिंह सरावा ह्यांचा जन्म पंजाब प्रांतात लुधियाना येथे झाला. त्यांचे वडील पुढे नोकरीनिमित्त ब्रह्मदेशात गेले. कर्तारचे नवव्या इयत्ते-पर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. त्यानंतर काही मित्रांच्या मदतीने ते अमेरिकेत सॅन्-फॅन्सिस्को येथे पुढील शिक्षण घेण्यासाठी गेले. (सन १९११).



अमेरिकेत शिक्षण घेत असता, बाबा सोहनसिंह भकना, लाला हरदयाळ इत्यादी गदर कार्यकर्त्यांशी त्यांचा संबंध आला. कर्तारसिंह कविता करीत असत. त्यांच्या भाषणात स्फूर्ती देण्याचे सामर्थ्य होते. तसेच त्यांच्या अंगी संघटना-कौशल्यही होते.

अमेरिकेत निरनिराळ्या शहरांत जे हिंदी लोक व्यापार, धंदे, मजुरी इत्यादी कामे करीत होते त्यांच्यात गदर पार्टीच्या उद्देशाचा प्रचार व प्रसार करण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले. 'गदर' पत्रिकेत लेख लिहून कर्तारसिंहाने अमेरिकेतील भारतीयांत संघटना निर्माण केली व इंग्रजांच्या विरुद्ध उठाव करण्यास त्यांची मने तयार केली.

जुलै १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. ह्या संधीचा फायदा घेण्याचे गदर कार्यकर्त्यांनी ठरविले. काही हत्यारे, दारूगोळा इत्यादी युद्धोपयोगी सामान बाबा सोहनसिंहाबरोबर पाठविण्यात आले. त्यांना कोमागातामारू जहाजातून कलकत्ता येथे उतरतांना पकडण्यात आले. त्यामुळे

सावध होऊन पिंगळे व कर्तारसिंह अत्यंत गुप्तपणे अमेरिकेतून निघाले, व कोलंबो (श्रीलंका) मार्गे भारतात आले. ते रासबिहारी बोसांना भेटले. कर्तारसिंहाने पंजाब ही आपली कार्यभूमी ठरविली. इंग्रजांच्या विरुद्ध लढा देण्यासाठी शस्त्रे खरेदी करण्याकरिता लागणारा पैसा उपलब्ध होण्यासाठी कर्तारसिंह व त्यांचे साथीदार दरवडे घालीत असत. जे धनिक अथवा जमीनदार सरकार-धार्जिणे होते व स्वातंत्र्याच्या चळवळीला खीळ घालीत होते. फक्त अशांच्याच घरांवर दरवडे घालण्यात येत. असाच एक दरवडा फेब्रुवारी १९१५ मध्ये पंजाबातील लुधियाना जिल्ह्यातील रब्बो या गावी एका घरावर घालण्यात आला. ते घर एका श्रीमंत बाईचे असून घरात ती व तिची मुलगी अशा फक्त दोघीजणीच राहात असत. क्रान्तिकारकांपैकी एक जणाचे मन त्या सौंदर्यसंपन्न युवतीकडे जाऊन त्याच्या मनातील सैतान जागा झाला. त्याने तिचा हात धरला. त्याबरोबर ती युवती बेअब्रूच्या भीतीने किंचाळली. तिची करुण आर्त किंकाळी ऐकून कर्तारसिंह तेथे आले. त्या अपराधी सहकाऱ्याच्या छातीवर पिस्तूल रोखून स्त्रियांच्या विटंबनेच्या कर्माबद्दलच्या शिक्षेची त्यांनी त्याला कल्पना दिली. स्वतःच्या सहकाऱ्याच्या घोर अपराधाबद्दल कर्तारसिंहांनी त्या युवतीच्या म्हाताऱ्या आईच्या पायांवर मस्तक ठेवून तिची क्षमा मागितली आणि तिच्या घरातील गोळा केलेले सर्व धन त्यांनी तिला परत केले. आपण चोर, लुटारू नसून देशासाठी आपणास द्रव्य हवे आहे असे त्यांनी सांगितले. दरवडेखोराच्या रूपात देव उभा राहिल्याचे पाहून म्हातारीचे अंतःकरण गहिवरून आले. “ बाळ, देव जागा आहे. तुझ्या रूपाने त्यानेच आमची विटंबना थांबविली. देशासाठी घरेदारे सोडून तुम्ही कोवळी मुले जिवावर उदार झालात. त्या माझ्या द्रव्यापैकी काही भाग मी परत तुम्हाला देत आहे. तेवढीच तुमच्या कामात मदत. मला तरी एवढ्या द्रव्याची काय जरुरी ? देव तुमचे भले करो ! तुमच्या देशकार्यात मदत करो. ” आशीर्वाद देत म्हातारी म्हणाली.

पिंगळे, पं. परमानंद, इत्यादी गदर कार्यकर्त्यांची जेंव्हा धरपकड झाली तेंव्हा कर्तारसिंह अफगाणिस्तानकडे पसार होण्यासाठी भारताच्या सरहद्दीपर्यंत जाऊन पोहोचले होते. तथापि आपल्या सहकारी मित्रांना

सोडून त्यांना पुढे जाववेना. म्हणून ते भारतात परत आले व पकडले गेले. ते अमेरिकेतून पंजाबात आले त्या वेळी अमेरिकेपासून इंग्रजांचे लक्ष त्यांच्या हालचालींकडे होते. तथापि कर्तारसिंह निरनिराळे वेष पालटून अगदी गुप्त रीतीने आपल्या हालचाली करीत असत. त्यामुळे आटोकाट प्रयत्न करूनही त्यांच्या पाळतीवर असणाऱ्या इंग्रज हेर खात्याला ते सापडू शकले नाहीत.

गदर चळवळीचे सुमारे ८० कार्यकर्ते पकडले गेले. कृपालसिंग ह्या नावाच्या गुप्त पोलीस खात्यातील हेराला इंग्रज सरकारनें गदर चळवळीची माहिती काढण्यासाठी अमेरिकेस पाठविले होते. हा घरभेद्या कित्येक दिवसपर्यंत गदर कार्यकर्त्यांशी एकरूप झाल्याचे नाटक बेमालूमपणे करीत होता. फक्त रासबिहिरींना त्याचा संशय आला होता व त्यांनी त्याला ठार करा, असे सांगितले होते. परंतु इतरांना ते पटले नाही. त्याच्या हालचालींवर सक्त नजर ठेवावी असे ठरले. तथापि हाच कृपालसिंग अस्तनीतील निखारा ठरला. २१ फेब्रुवारी १९१५ ला भारतात इंग्रजांविरुद्ध सार्वत्रिक उठावणी करण्याच्या गदर कार्यकर्त्यांच्या मसलतींची बातमी कृपालसिंगाने इंग्रज अधिकाऱ्यांना दिल्यामुळे गदर कार्यकर्त्यांची तत्पूर्वी धरपकड झाली.

ह्या कैद्यांना लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवण्यात आले. जेलमध्येच त्यांच्या खटल्यासाठी कचेरी उघडण्यात आली. तुरुंगाभोवती लष्करी घोडे-स्वारांचा पहारा बसविण्यात आला.

खटल्याचा निकाल सांगण्यासाठी कैद्यांना तुरुंगाच्या कोठडीतून बाहेर काढण्यात आले व जोडीने त्यांच्या हातात बेड्या घालण्यात आल्या. ह्या वेळी ४०।५० पोलिस अधिकारी शे-दोनशे हत्यारबंद पोलिस कैद्यांना नेण्या-साठी आले होते.

सर्व कैदी सजा ऐकण्यासाठी तुरुंगातच परंतु न्यायासाठी उघडलेल्या न्यायालय कचेरीजवळ उभे होते. त्या सर्व कैद्यांच्या वतीने खटला चाल-विणाऱ्या वकील-बॅरिस्टरांची आतबाहेर ये-जा चालू होती. इतक्यात एकोणवीस वर्षांचा उमदा कर्तारसिंह पं. परमानंदांना म्हणाला, “पंडितजी, ते गाणं एकदा म्हणा ना.”

"कोणतं गाणं ?" पं. परमानंदांनी विचारलं.

"ते — हमारा हिंद भी फूले—फलेगा एक दिन लेकिन"

लगेच क्रांतिकारी बंदी पं. परमानंदांनी ते गाणे म्हणण्यास सुरुवात केली :

"खुशी के दौरे दौरे में है रंजोमहन् पहले,
बहार आती है पीछेसे खिजो गरदे चमन पहले।
मुनव्बर अंजमन होती है, महफिल मर्म होती है,
मगर कब जब कि खुद जलती शमाये अंजुमन पहले।
मुसीबत आ कयामत आ कहाँ जंजीरे। जिंदा है,
यहाँ तैयार बैठे है गरीबाने वतन पहले।
हमारा हिंद भी फूले—फलेगा एक दिन लेकिन,
मिलेंगे खाक में लाखों हमारे गुलबदन पहले।
हमें दुख भोगना लेकिन हमारी नस्ल सुख पावे,
ये दिल में ठान लो अपने ए हिंदी मर्द जन पहले।"

पं. परमानंदांच्या मुखातून गाण्याचे स्वर बाहेर पडू लागले. सर्व राजबंदी त्यांच्या सुराशी सूर मिसळून ते गाणे म्हणू लागले. मृत्यूच्या उंबरठ्यावर उभे असलेल्या त्या क्रांतिवीरांच्या ज्वलंत भावनेतून वाहणाऱ्या ह्या उदात्त सुराने जेलचे क्रूर व भयाण वातावरण देखील भरून व भारून गेले. भोवतालचे वकील, नोकर व पोलिस अधिकारी यांच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. ती परिस्थिती पाहून न्यायाधिशाने सर्व कैद्यांना त्यांच्या कोठड्यांत परत नेण्यास सांगितले.

त्यानंतर दुपारी कैद्यांना पाच-पाचच्या समूहाने खटल्याचा निकाल सांगण्यासाठी न्यायालयात नेण्यात आले. कर्तारसिंहाला फाशीची शिक्षा सांगण्यात आली. शिक्षा ऐकल्यावर कर्तारसिंह न्यायाधिशाला हसत हसत म्हणाले, "शिक्षेबद्दल आपला आभारी आहे. आपण इंग्रजी साम्राज्यशाहीचे हस्तक आहात. ह्यास्तव माझ्या अंगावरचा हा कोट, पायजमा व पायांतील बूट ह्यांचा लिलाव करून आलेले पैसे त्या साम्राज्यशाहीच्या खजिन्यात भरा." कर्तारसिंहाचे हे उद्गार ऐकून सर्व अधिकारी चिन भिन होऊन गेले. जेलच्या सुपरिंटेंडेंटने त्याला तुरुंगाच्या कोठडीकडे नेण्यासाठी पकडले. जेल

सुपरिंटेंडेंट मि. टॉपर हा जरी इंग्रज होता तरी कर्तारसिंहासारख्या कोवळ्या उमद्या मुलाचे ते वीरोचित उद्गार ऐकून म्हणाला, " शाब्बास ! "

खटल्याचा निकाल लागल्यानंतर फाशी देण्याच्या दिवसाच्या मध्यंतरीच्या काळात पंजाबचा गव्हर्नर ओडवायर ह्याने लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये जाऊन राजकीय बंद्यांची व्यक्तिशः गाठ घेतली. तो कर्तारसिंहाच्या कोठडीजवळ आला व पंजाबी भाषेत त्यांना म्हणाला, " मि. कर्तारसिंह, तुमचे वय तर फारच कमी आहे. ह्यास्तव फाशीची शिक्षा टाळण्यासाठी तुम्ही दया-याचनेचा अर्ज करा. म्हणजे फाशीऐवजी काळ्या पाण्याची शिक्षा तुम्हांला मिळेल. तुमचे प्राण वाचतील. " ओडवायरची नोकरी पंजाब प्रांतात बरेच दिवस झाली होती. म्हणून त्याला पंजाबी भाषा येत होती.

ओडवायरचा तो सल्ला ऐकताच कर्तारसिंह तिरस्काराने उद्गारले, " मेहेरबानी करून तुम्ही माझ्या कोठडीपासून चालते व्हा. "

१६ नोव्हेंबर १९१५. फाशी देण्याच्या तक्त्याकडे पिंगळे व कर्तारसिंह ह्यांना चालविले होते. कर्तव्यपूर्तीचे समाधान व आनंद त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत होता. तुरुंगात कर्तारसिंहांचे वजन १० पौंडांनी वाढले होते. फासाकडे जाताना ते गाणे म्हणत चालले होते :

नमाज संध्या यही हमारी और
प्राठ पूजा भी सब यही है।
धरम, करम सब यही है प्यारो
यही खुदा और राम अपना।
तेरी सेवा में ए भारत
अगर तन जाये सिर जाये।
तो मैं समझु कि है मरन।
यहाँपर मुक्तिपथ मेरा।

* * *

१९. स्टेशनमास्तरच्या भाकरीबडव्या

(पंडित परमानंद)

पं. परमानंद झाशी हे बुंदेल खंडातील झाशीचे राहणारे. विद्यार्थी म्हणून ते प्रयागला शिक्षणासाठी गेले होते. विद्यार्थिदशेतच त्यांचा क्रांतिकारकांशी संबंध आला व १९०५-०६ च्या सुमारास त्यांनी बॉम्ब देखील तयार केले होते. वेळप्रसंगी तुरुंगात जाण्याची पाळी आल्यास दळण्याच्या चक्कीचा अनुभव असावा म्हणून ते जात्यावर दळण्याचा सराव देखील करीत असत.



इंग्रजांविरुद्ध उठाव करण्यासाठी, हत्यारे जमविण्यासाठी व जपानमधील हिंदी रहिवाश्यांत इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्याच्या प्रचारासाठी ते जपानला गेले होते. पहिले महायुद्ध सुरू झाले. गदर पार्टीचे काही लोक भारतात उठाव करण्यासाठी अमेरिकेतून जपानात आले एमडेन ह्या जर्मन युद्धनौकेने हिंदी महासागरात धुमाकूळ घातला होता. त्यामुळे पूर्वेकडील देशांशी इंग्रजांच्या वाहतूक करणाऱ्या जहाजांचा संबंध सुटला होता. फक्त जपानी जहाजांनाच प्रवास करण्याची परवानगी होती. दोन महिने थांबल्यानंतर त्या प्रवाशांना

हिंदुस्थानला जाणाऱ्या ' तोसामारू ' ह्या जपानी जहाजात जागा मिळाली. अमेरिकेतून आलेल्या गदर कार्यकर्त्यांबरोबर पं. परमानंद व जपानात गदर पार्टीचा प्रचार करीत असलेले इतर क्रांतिकारकही ' तोसामारू ' जहाजाने निघाले. वाटेत ते जहाज सिंगापूर, रंगून इ. बंदरात थांबत थांबत कलकत्ता बंदराला लागले.

अमेरिकेतून आलेले गदर क्रांतिकारक ठिकठिकाणांहून हत्यारे गोळा करीत होते व जहाजांवर निरनिराळ्या बंदरांत व जपानमध्ये असणाऱ्या हिंदी लोकांना हिंदुस्थानात जाऊन इंग्रजांच्या विरुद्ध उठावणी करण्याचा संदेश देत होते. ही गोष्ट जहाजावरील इंग्रज प्रवासी व अधिकारी यांच्या नजरेतून सुटणे शक्य नव्हते. जपानमध्ये असणाऱ्या ब्रिटिश वकिलालाही गदर-क्रांतिकारकांच्या हालचालींची बित्तं बातमी लागत होती. ह्या इंग्रज अधिकाऱ्यांनी क्रांति-कारकांच्या हालचालींची आगाऊ सूचना इंग्रज सरकारला दिली. त्यामुळे ' तोसामारू ' जहाजातील उतारूंच्या स्वागतासाठी इंग्रज सरकारने कलकत्ता बंदरावर सैन्य तयार ठेवले होते.

जहाज कलकत्ता बंदरास लागताच इंग्रजांचे मुलकी व लष्करी अधि-कारी भराभर बोटीवर चढले. त्यांनी प्रत्येक उतारूची कसून तपासणी करण्यास सुरुवात केली. पिस्तुले, बंदुका इत्यादी शस्त्रे जवळ असणाऱ्या क्रांति-कारकांची धरपकड सुरू झाली. हा बाका प्रसंग पाहून पं. परमानंदांनी त्या गर्दीत स्वतःचा वेष पालटला. काही हिंदी मजूर ब्रह्मदेशातून हिंदुस्थानला येण्यासाठी रंगून येथे ' तोसामारू ' जहाजात बसले होते. मजुरासारखा पेहराव करून व जहाजावर पडलेली एक जुनी बादली घेऊन व फाटक्या बुटांचा जोड तिच्यात घालून पं. परमानंदही मजुरांच्या त्या घोळक्यात घुसले. त्यांच्या तपासणीची वेळ आली तेव्हा अधिकाऱ्याने विचारले, " तू रे कुठून आलास ? "

" रंगूनहून. " पंडितजींनी उत्तर दिले.

" तेथे काय उद्योगधंदा करीत होतास ? "

" एका स्टेशनमास्तरच्या घरी भाकऱ्या बडवीत होतो. "

परमानंदांचा तो अवतार पाहून अधिकाऱ्यांचा त्यांच्या म्हणण्यावर विश्वास बसला. " त्याला बंदराच्या फाटकाच्या बाहेर सोडून द्या. " झडती

घेणाऱ्या शिपायांना त्याने आज्ञा केली. फक्त पंडितजीच एकटे. त्यांच्या बेमालूम बतावणीमुळे त्या संकटातून सहीसलामत सुटले. उरलेले सर्व गदर-कार्यकर्ते पकडले गेले होते. पंजाबातील मुलतान येथील तुरुंगात त्यांची रवानगी एका स्पेशल आगगाडीने करण्यात आली.

पं. परमानंद बंदराच्या बाहेर सहीसलामत पडले. गदर-पार्टीच्या सद्भाग्याच्या दृष्टीने ही गोष्ट फार महत्त्वाची होती. पं. परमानंद ह्यांनी जपानमधील जर्मन राजदूताकडून हिंदुस्थानचा युद्धोपयोगी नकाशा मिळविला होता. त्यात हिंदुस्थानावर हल्ला करण्याच्या दृष्टीने पूल, लष्करी छावण्या, महत्त्वाची शहरे, बंदरे इत्यादी मोक्याच्या गोष्टी नमूद केलेल्या होत्या. जर्मन युद्धखात्याने तो नकाशा तयार केलेला होता. त्या नकाशावर जर्मन युद्ध-खात्याची मोहर (शिक्का) होती. तो नकाशा पंडितजींच्या खिशात होता. पंडितजींची झडती न घेतली गेल्यामुळे तो नकाशा बचावला होता.

बंदराबाहेर पडताच पंडितजींनी टांगा पकडला व ते कलकत्त्यातील एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले. लगेच रात्रीच्या गाडीने ते लाहोरला रवाना झाले. लाहोर येथे भाई परमानंद राहात होते. भाई परमानंद हे एम. ए. असून फार विद्वान व चारित्र्यसंपन्न गृहस्थ होते. काही दिवस ते आर्य समाजाने चालविलेल्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत होते. आर्य समाजाच्या प्रचारकार्यासाठी ते आफ्रिका, अमेरिका, इंग्लंड इ. देशांतही जाऊन आले होते. आफ्रिकेतील त्यांच्या एका सभेला महात्मा गांधी हे अध्यक्ष होते. गांधीजी, पं. मालवीय व पं. मोतीलाल नेहरू ही सर्व मंडळी भाई परमानंदांना फार मान देत असत. पुढे पंजाबात सरकारविरुद्ध साराबंदीची चळवळ सुरू झाली. त्या वेळी लाला लजपतराय, अजितसिंह इ. पुढाऱ्यांबरोबर भाई परमानंदांनाही इंग्रज सरकारने पंजाबातून हद्दपार केले. त्यामुळे ते अमेरिकेत गेले. त्यांच्याच प्रेरणेने लाला हरदयाळ अमेरिकेत गेले. अमेरिकेत असताना भाईजींचा गदर कार्यकर्त्यांशी घनिष्ठ संबंध आला. ते इंग्लंडमध्ये गेले असताना त्यांचा स्वा. सावरकर व त्यांच्या 'अभिनव भारत' ह्या क्रांति-कारी संघटनेशी संबंध आला होता. अशा रीतीने सशस्त्र क्रांतिकारांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. ते जरी प्रत्यक्ष सशस्त्र चळवळीत भाग घेत नसले, तरी क्रांतिकारकांना सर्वतोपरी मदत करीत असत.

पं. परमानंद हे भाई परमानंदांना जाऊन भेटले. झालेली हकीकत त्यांनी भाईजींना सांगितली. भाईजी त्यांना म्हणाले, " बाकीची सर्व मंडळी कलकत्त्यास पकडली गेली असून त्यांना मुलतानच्या तुरुंगात धाडण्यात आले आहे, अशी बातमी आहे. तुम्ही फार सावधानतेने वागा, कर्तारसिंह व पिंगळे ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन भारतात आले आहेत. एक–दोन दिवसांत ते येथे येतील. त्यानंतर पुढील बेत तुम्ही ठरवा. तोपर्यंत इथेच विश्रांती घ्या, मात्र त्यानंतर लागलीच काही दिवस कपूरथाळ्यास जाऊन राहा. कपूरथाळा संस्थान असल्यामुळे त्या संस्थानच्या हद्दीत इंग्रजांचा ससेमिरा तुमच्या पाठीमागे लागणार नाही. "

भाईजींनी सांगितल्याप्रमाणे पिंगळे आणि कर्तारसिंह तेथे आले. पं. परमानंद, पिंगळे, कर्तारसिंह भाईजींच्या सांगण्याप्रमाणे कपूरथाळ्यास गेले. साधूचा वेष घेऊन ते एका मंदिरात गेले. पं. परमानंदांनी जपानहून आणलेला तो नकाशा कर्तारसिंह, पिंगळे व सचिंद्र संन्याल ह्या आपल्या सहकाऱ्यांना दाखविला. त्या नकाशावर महत्त्वाच्या बाबींवर पंडितजींनी लाल शाईने खुणा केल्या होत्या. त्या अनुरोधाने पुढील बेत ठरविण्यात आले. पिंगळे व कर्तारसिंह ह्यांनी सैन्य फितूर करण्याच्या दृष्टीने सैनिकी छावण्यांतून प्रचार सुरू केला. पं. परमानंदांनी एका सहकाऱ्याच्या मदतीने दोन डझन बॉम्ब तयार केले. जर्मन युद्धखात्याने तयार केलेल्या हिंदुस्थानच्या नकाशात २२ पूल महत्त्वाचे दाखविले गेले होते. हे २२ पूल उडवून देण्यासाठी दोन डझन बॉम्ब तयार केले होते. तारायंत्र व टेलिफोनच्या तारा तोडण्याची सामुग्रीही पं. परमानंदांनी जमविली होती. २१ फेब्रुवारी १९१५ ला सर्व बाजूंनी भारतात उठाव करण्याची, एकाच वेळी पूल उडवून देणे, टेलिफोन व तारायंत्रांच्या तारा तोडणे, व सैन्याच्या फितूर छावण्यांनी इंग्रजांविरुद्ध बंड उभारणे– तारीख ठरविण्यात आली होती. परंतु दैवाचे फासे उलटे पडले. फितुरीने दगा दिला. फितूर कृपालसिंग ह्या सरकारी हेराने ती बातमी इंग्रजांना दिली. चोहींकडे धरपकड सुरू झाली. पिंगळे मीरतच्या लष्करी छावणीत बॉम्बच्या ट्रंकेसह पकडले गेले. पं. परमानंदांना लाहोर येथे पकडण्यात आले. भारताचा तो खुणा असलेला नकाशा त्यांच्या खिशात सापडला. ८६ लोकांना पकडण्यात आले. भाई परमानंदांचा जरी प्रत्यक्ष कटाशी काही

संबंध नव्हता तरी सरकारने खोटाच पुरावा तयार करून त्यांना ह्या खटल्यात अडकवून दिले. कावीळ झालेल्या व्यक्तीस सर्व गोष्टी पिवळ्या दिसतात. इंग्रज सरकारला देखील भाईजींसारखी विद्वान, स्वतंत्र विचाराची व समाजावर वजन असणारी माणसे शत्रूप्रमाणे वाटत होती. म्हणूनच सरकारने भाईजींना ह्या कटात गोवले. खटल्याचा निकाल लागून सर्वांना फाशीची शिक्षा देण्यात आली.

भाई परमानंदांसारख्या सज्जन माणसाला फाशीची शिक्षा सांगणे म्हणजे साप साप म्हणून भुई बडविण्यासारखे होते. पं. मालवीय वगैरे पुढाऱ्यांनी व्हॉईसरायची गाठ घेऊन खटल्याचा फेरविचार करण्याची विनंती केली. व्हॉईस रॉयने खटला प्रिव्ही कौन्सिलकडे (इंग्लंडमधील वरिष्ठ कोर्ट) पाठविला. काही दिवसांनंतर प्रिव्ही कौन्सिलचा निकाल आला. पिंगळे, कर्तारसिंह इत्यादी सात जणांना फाशीची शिक्षा व इतरांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली.

पंजाबचा गव्हर्नर ओडवायर याने लाहोर तुरुंगात इतर कैद्यांप्रमाणे पं. परमानंदांची गाठ घेऊन शिक्षा कमी होण्यासाठी दयेचा अर्ज सरकारकडे करण्यास सांगितले. बावीस वर्षांची उमर असलेले पं. परमानंद उत्तरले, " मी व माझे साथीदार ह्यांनी जे केले ते देशाच्या संरक्षणासाठी केले. म्हणून आम्ही स्वतःला निरपराधी समजत आहोत. इंग्लंडला विजयी करण्याचे विचार आम्ही स्वप्नातही आणले नाहीत. ह्यास्तव इंग्रज सरकारजवळ प्राणांची भिक्षा मागून आमच्या देशाच्या उज्ज्वल इतिहासाला आम्ही कलंकित करू इच्छीत नाही. "

परमानंद अंदमानला काळ्या पाण्याची शिक्षा भोगीत होते. बारी ह्या नावाचा गोरा इसम त्या कारागृहाचा जेलर होता. तो स्वतःला अंदमानचा देव समजत असे व राजबंद्यांना सैतानाप्रमाणे छळीत असे. अट्टल खुनी व दरवडेखोर कैदी देखील त्या सैतानाला पाहून थरथर कापत असत.

एकदा बारीसाहेबाने परमानंदांचा अपमान केला. मानी मनाच्या व ताठ मानेच्या परमानंदांना तो अपमान सहन झाला नाही. त्यांनी फाडदिशी बारीसाहेबांच्या थोबाडावर लाथ मारली.

पं. परमानंदांनी एकूण सुमारे ३० वर्षे शिक्षा भोगली. पं. जवाहरलाल व सुभाषबाबू ह्यांच्या प्रयत्नाने त्यांची सुटका झाली.


* * *

२०. गदरचा सेनापती

(डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे)

पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीच्या सुमाराचा काळ. (१९१४). त्या काळाच्या सात-आठ वर्षांपूर्वी नागपूरजवळील वर्ध्याचा एक सामान्य विद्यार्थी शिक्षणासाठी अमेरिकेस जातो काय आणि दुसऱ्या महायुद्धाची संधी साधून हिंदुस्थानातून इंग्रजांचे राज्य घालवून देण्यासाठी वीस हजार फौज घेऊन हिंदुस्थानावर चाल करून येतो काय, सारेच अतर्क्य, सर्वच असामान्य तथापि ते अतर्क्य ते असामान्य व ते अशक्य पांडुरंग सदाशिव खानखोजे ह्या तरुणाने शक्य करून दाखविले.

खानखोजे हे विदर्भ प्रांतातील रहिवासी. विद्यार्थीदशेतच खानखोजे ह्यांचा संबंध बंगालमधील गुप्त क्रांतिकारकांच्या 'अनुशीलन' ह्या संघटनेशी आला होता. हिंदुस्थानात माध्यमिक शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते अमेरिकेस जाण्यास निघाले. वाटेत काही दिवस ते जपानमध्ये व चीनमध्ये थांबले. तेथे जपानी व चिनी क्रांतिकारकांशी संधान साधून त्यांनी शस्त्रास्त्रे, स्फोटक पदार्थ, दारूगोळा इ. ची माहिती मिळविली व नंतर ते अमेरिकेस गेले.



अमेरिकेत गेल्यानंतर त्यांनी शेती शास्त्राचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्या शास्त्रातील एम्. एस्सी. ही उच्च पदवी त्यांनी संपादन केली. त्याच

काळात खानखोजे ह्यांनी लष्करी विद्यालयात (मिलिटरी ॲकॅडमी) नाव नोंदवून लष्करी शिक्षण घेतले. व त्या शिक्षणाची पदविका मिळविली. खानखोजे हे जरी शेतीशिक्षण घेत होते तरी त्यांच्या मनात क्रांतीच्या विचारांच्या ज्वलंत भावना पेटलेल्या होत्या. त्या विचाराची परिपूर्ती करण्यासाठी लष्करी शिक्षण व स्फोटक पदार्थांचे शास्त्रीय ज्ञान ह्या गोष्टींची फार आवश्यकता होती. खानखोजे ह्यांनी त्या गोष्टी हस्तगत केल्या.

त्या वेळी हिंदी लोकांनी उद्योगधंदे, नोकरी, व्यापार, शिक्षण ह्यांसाठी इंग्लंड, अमेरिकेत विनाप्रयासाने जाता येत होते. हल्लीप्रमाणे बंधने नव्हती त्यामुळे पंजाब, सिंध, संयुक्त प्रांत व बंगाल ह्या प्रांतातून बरेच हिंदी लोक अमेरिकेत जाऊन स्थायिक झाले होते. त्यांची सांपत्तिक स्थिती चांगलीच समाधानकारक बनली होती. त्या सुमारास चीन, जपान, रशिया तुर्कस्तान ह्या देशांतूनही तेथील काही लोक हिंदी लोकांप्रमाणेच अमेरिकेत गेले होते. त्या देशात राजेशाहीविरुद्ध जनतेचे संघर्ष सुरू झाले होते. त्यामुळे तेथून अमेरिकेत गेलेल्या लोकांच्या मनात स्वतःच्या देशात सशस्त्र क्रांती करण्याचे विचार घोळत होते. एकंदरीत त्या सुमाराचा काळ असा होता की, बऱ्याच देशांत राजसत्तेविरुद्ध काही जहाल देशभक्तांनी क्रांतीची कुंडे पेटविली होती. ह्या लोकांच्या संपर्काने अमेरिकेतील हिंदी लोकांच्या मनातही इंग्रजी राजसत्ता हिंदुस्थानातून उखडून टाकण्याचे विचार येऊ लागले.

लष्करी शिक्षण पुरे झाल्यानंतर खानखोजे वरीलप्रकारच्या हिंदी लोकांना जाऊन मिळाले. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ह्या सर्व मंडळींनी एक संघटना स्थापन केली. त्या संघटनेच्या शाखा अमेरिकेतील निरनिराळ्या शहरांत उघडण्यात आल्या. ह्या संघटनेचेच पुढे 'गदर' संघटनेत रूपांतर झाले. गदर पक्षाचे प्रचारकार्य लाला हरदयाळ ह्यांच्याकडे गेले. लष्करसिद्धतेचे काम खानखोजे यांच्यावर सोपविण्यात आले.

पहिले महायुद्ध सुरू झाले. हिंदुस्थानात अंतर्गत उठाव करण्याच्या कार्यासाठी बाबा सोहनसिंह भकना, बाबा पृथ्वीसिंह आझाद इ. गदर कार्यकर्ते कोमागातामारू जहाजातून हिंदुस्थानात रवाना झाले. खानखोजे, पिंगळे व कर्तारसिंह यांनी वीस हजार सैन्य व भरपूर दारूगोळा भरून तीन जहाजे इराण, तुर्कस्थानकडे रवाना केली. त्यानंतर पिंगळे व कर्तारसिंह हिंदी

लष्करात फितुरी फैलावण्यासाठी हिंदुस्थानात रवाना झाले. इराण अफगाणिस्तानमार्गे हिंदुस्थानावर हल्ला करण्याची कामगिरी खानखोजे यांच्याकडे आली.

खानखोजे यांनी इराणमधील ब्रिटिश सैन्यावर हल्ला करून त्यांचा पराभव केला व ते अफगाणिस्थानात आले. तेथे असलेल्या ब्रिटिश सैन्याने खानखोजे ह्यांच्या सैन्याचा पराभव केला. खानखोजे पकडले गेले. इंग्रजांच्या लष्करीकैदेत असताना त्यांनी पहारेकऱ्यांशी संधान बांधले. लष्करी शिपायाचा गणवेश मिळवून तो पोषाख चढवून ते ब्रिटिशांच्या लष्करी छावणीतून निसटले व डोंगरी भागात जाऊन पहाडी लोकांच्या टोळीत सामील झाले. टोळीवाल्यांनी त्यांना फार आपलेपणाने आश्रय दिला. खानखोजे ब्रिटिशांच्या लष्करी तुरुंगातून निसटल्यानंतर त्यांच्या तपासासाठी चोहोकडे शोधाशोध सुरू झाली. ब्रिटिशांच्या लष्करी अधिकाऱ्यांनी टोळीवाल्यांच्या वस्तीमध्येही चौकशी केली. परंतु खानखोजे ह्यांनी टोळीवाल्यांप्रमाणे वेषांतर इतके बेमालूम केले होते की, अधिकारी त्यांना ओळखू शकले नाहीत. त्यानंतर टोळीवाल्यांच्या साहाय्याने ते गुपचूपपणे हिंदुस्थानात आले. परंतु हिंदुस्थान सरकारला गदर कटाचा सुगावा लागून त्याने गदरच्या सर्व कार्यकर्त्यांची धरपकड करून काहींना फासावर चढविले होते, तर काहींना अंदमानला काळ्या पाण्यावर पाठविले होते. अशा स्थितीत खानखोजे ह्यांनी हिंदुस्थानात राहाणे धोक्याचे आहे अतएव त्यांनी परत परदेशात जावे असा लो. टिळकांनी त्यांना सल्ला दिला. त्यामुळे ते रशिया व जर्मनी ह्या देशांतून अमेरिकेस गेले तेथे स्थायिक झाले.

त्यांनी शेतीचे उत्पादन सुधारण्यासाठी बरेच मौलिक संशोधन-कार्य केले. त्यामुळे मेक्सिकोच्या (अमेरिका) सरकारने त्यांचा मोठा सन्मान केला व त्यांना डॉक्टरेट दिली.

स्वतःला मिळणारे मानसन्मान व सुखी जीवन ह्याच्यावर पाणी सोडून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अमेरिकेसारख्या परदेशात सैन्य उभारून इराणची वाळवंटे व अफगाणिस्तानचे बर्फाच्छादित वैराण दऱ्या-खोरी व पहाड ओलांडीत हिंदुस्थानचा उंबरठा गाठणाऱ्या खानखोजेंचा लष्करी डावपेचाचे, अतुल साहसाचे, संघटना—चातुर्याचे, कुशाग्र बुद्धिमत्तेचे व उत्कट देशप्रेमाचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

* * *

२१. अफगाणिस्तानात हिंद सरकारची स्थापना

(राजा महेंद्र प्रताप)

काही माणसे एखाद्या ध्येयाच्या मागे लागून आयुष्यभर त्या ध्येयाचा पाठपुरावा करतात राजा महेंद्र प्रताप अशा व्यक्तींपैकी होत. हिंदवी स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी ह्या माणसाने उभी हयात घालविली. हृदयांत स्वातंत्र्याच्या कल्पनेचा अमोल ठेवा साठवून व पायाला चक्रे बांधून हा देशभक्त पृथ्वीच्या गोलाला चक्कर मारून आला. ओसाड आफ्रिडी मुलूख, सैबिरियाची वाळवंटे, तिबेटातील बर्फ व दुर्गम खिंडी, चिनी-जपान्यांचे मुलूख आणि अथांग प्रशान्त महासागर ओलांडून अमेरिकेची सुवर्णभूमी-जगाच्या ह्या सर्व भागात राजा महेंद्र प्रताप फिरले. आणि फिरले ते एकाच जबरदस्त आकांक्षेने स्वतंत्र भारताची राज्यस्थापना करण्यासाठी.



२० डिसेंबर १९१४ रोजी महेंद्र प्रताप भारतातून गुप्तपणे निसटून खैबर खिंड मार्गाने आफ्रिडी टोळीवाल्यांच्या मुलखातून अफगाणिस्तानात गेले व काबूल ह्या राजधानीत पोहोचले. त्या वेळी अफगाणिस्तानवर अमीर हबिबुल्लाखां राज्य करीत होता. राजा महेंद्र प्रताप यांनी जर्मनीचा प्रमुख कैसर याचे पत्र अमिराला आणविले. परंतु अमीर इंग्रजांच्या पूर्णपणे कच्छपी गेला असल्यामुळे तो कैसरच्या सल्ल्याप्रमाणे इंग्रजांशी युद्ध पुकारण्यास तयार होईना. त्या वेळी जर्मनीने इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारले होते. तथापि अमिराने राजा महेंद्र

प्रताप यांच्याशी वाटाघाटी करून काबूल येथे हंगामी हिंद सरकार स्थापण्यास मान्यता दिली. ह्या हंगामी सरकारला इंग्रजांशी लढण्यासाठी पन्नास हजार अफगाण सैन्य अमिराने द्यावी, युद्धात ठार झालेल्या अफगाण सैनिकांच्या दरडोई दहा हजार रुपये स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारने अफगाणिस्तानास द्यावे व सिंधू नदी हिंदुस्थान व अफगाणिस्तान ह्यांच्या दरम्यानची सरहद्द असावी अशा अटी ठरल्या. दिनांक १ डिसेंबर १९१५ रोजी काबूल येथे पहिले हंगामी हिंदी सरकार स्थापन झाले. राजा महेंद्र प्रताप हे त्या राज्याचे अध्यक्ष निवडले गेले. भोपाळचे डॉ. बरकतुल्ला हे प्रधान मंत्री व मौलाना उबेदुल्लाह गृहमंत्री व प्रचारमंत्री म्हणून निवडले गेले. लाहोर येथील वीस तरुण विद्यार्थी व दोन शीख गृहस्थ मिळून सचिवालय तयार झाले.

राजा महेंद्र प्रताप व मौलाना उबेदुल्लाह यांनी हिंदुस्थानात निरनिराळ्या व्यक्तींना पत्रे पाठवून हंगामी हिंद सरकार स्थापन झाल्याची वार्ता व पुढे करावयाच्या कामांची योजना कळविली. महेंद्र प्रताप यांनी पं. मदन मोहन मालवीय यांच्याशीही विचारविनिमय सुरू केला होता.

पेशावर येथे अमीरचंद बम्बवाल हे हंगामी सरकारकडून येणाऱ्या गुप्त संदेशांचा प्रसार व प्रचार व करीत होते. त्या कामी त्यांना सरदार गुलाम हैदरखांचे खूप साह्य लाभत होते. गुलाम हैदरखां हे अफगाणिस्तानचे पेशावर येथील पोस्टमास्तर होते. मौलवी अबदुल्लाह हे एक गृहस्थ अमीचंदांचे मित्र असून ब्रिटिश रियासतीच्या उच्चाटनाच्या प्रयत्नांना साह्य करीत असता पुढे त्यांना इंग्रजांनी पकडले, परंतु पोलिसांना मोठ्या शिताफीने चुकवून ते अफगाणिस्तानात पसार झाले. डेरा इस्माईलखानचे नबाब हे हंगामी हिंद सरकारला सहानुभूती दाखविणारे राज्यकर्ते होते. त्यामुळे इंग्रज अधिकारी नबाबाचा द्वेष व हेटाळणी करीत असत. एका इंग्रज अधिकाऱ्याने तर स्वतःच्या कुत्र्याचे नाव 'नबाब' असे ठेवले. तो कुत्रा भुंकू लागला की, तो इंग्रज अधिकारी हिंदी अधिकाऱ्यांना म्हणे, 'तुमचा नबाब ह्या कुत्र्यासारखा फक्त भुंकत राहतो.' ही गोष्ट नबाब कासिमखां यांच्या कानावर गेली. त्या इंग्रज अधिकाऱ्याचे दात त्यांच्याच घशात घालण्याची एक नामी युक्ती त्यांनी शोधून काढली. स्वतः पाळलेल्या कुत्र्यांना त्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांची नावे दिली. एवढेच नव्हे तर नबाबांचे कुत्रे संपून काही इंग्रजांची नावे शिल्लक

राहिली होती. तेवढ्यासाठी नबाबानी त्या उरलेल्या अधिकाऱ्यांच्या संख्ये-इतकी आणखी कुत्री विकत घेऊन त्यांना त्या अधिकाऱ्यांची नावे दिली. काही अधिकाऱ्यांना कुत्रे बनविले व काहींना नाही, असाच उगाच पंक्तिप्रपंच नबाबासारख्या खानदानी माणसाला कसा आवडेल ? नबाब कासिमखाँ यांच्या दिवट्या चिरंजीवाने त्यांचे एक गुप्त पत्र इंग्रजांना नेऊन दिले. त्यामुळे नबाबाला कैद करून त्यांच्या त्या निमकहराम मुलाला इंग्रजांनी गादीवर बसविले.

राजा महेंद्र प्रताप यांनी सोन्याच्या पत्र्यावर मजकूर कोरून ते पत्र रशियाचा बादशहा झार याला देण्यासाठी डॉ. मथुरासिंग समशेरसिंग व खुशी मोहंमद या दोन राजदूतांबरोबर पाठवून दिले. रशियन हद्दीत जाताच रशियन गव्हर्नरने ते पत्र झारकडे पोहचते करण्याचे वचन देऊन परत पाठविले. रशियाकडून काहीच उत्तर न आल्यामुळे सरदारसिंग व दुसरे एक अधिकारी परत रशियाला जाण्यास निघाले. वाटेत ते पकडले गेले व त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन करण्यात आले. इंग्रजांनी त्यांना पेशावर येथे फाशी दिले. नेपाळ, चीन, जपान या देशांकडेही महेंद्र प्रतापांनी आपले राजदूत पाठविले. इराणला पाठविलेले दूत करसास्प व एक शीख सरदार वाटेत पकडले गेले. त्यांना गोळ्या घालून इंग्रजांनी ठार केले. करसास्प हे पारशी गृहस्थ बडोद्याच्या दिवाणांचे चिरंजीव होते.

सन १९१८ साली डॉ. बरकतुल्लाह मास्कोला गेले. त्यांनी रशियन नेत्यांशी जोडलेल्या सौजन्यपूर्ण संबंधामुळे राजा महेंद्र प्रताप यांचेही रशियात हार्दिक स्वागत झाले. त्यांना एका स्वतंत्र आगगाडीने ताश्कंदहून लेनिनग्राडला नेण्यात आले. रशियन-क्रांतीची धुमश्चक्री चालू होती. बरकतुल्लाह यांच्या प्रयत्नामुळे कॉम्रेड लेनिन यांच्याबरोबर महेंद्र प्रताप यांची मुलाखत झाली. महेंद्र प्रताप यांची सभा आयोजित करण्यात आली. त्या काळी त्या सभेला पंचवीस हजार श्रोते उपस्थित होते. त्यानंतर १९१९ मध्ये महेंद्र प्रताप युरोपात गेले. ते जर्मनीत असता त्यांना बातमी मिळाली की अफगाणि-स्तानचा अमीर हबिबुल्ला याचा खून होऊन शहाजादा (राजपुत्र) अमानुल्लाह हा अफगाणिस्तानचा अमीर झाला आहे. ही बातमी समजताच राजा महेंद्र प्रताप काही अनुयायी बरोबर घेऊन बर्लिनहून मास्कोमार्गे काबूलला पोहोचले. रशियन लोकांच्या आपसातील चकमकी- (झारचे पक्षपाती व साम्यवादी

यांच्यातील)मुळे व घोडयावर बसून लांब पल्ल्याचा प्रवास करावा लागल्या-मुळे त्यांना काबूलला पोहोचण्यास बरेच दिवस लागले.

दिवंगत अमीर हबिबुल्लाखां यांचे बंधू नसरुल्लाखां हे अफगाणिस्तानचे वजीर होते. वजीर नसरुल्लाखां व शहाजादा अमानुल्लादखां हे इंग्रजांचे द्वेष्टे होते. नसरुल्लाखां यांनी स्वखर्चाने बारा हजार आफ्रिकी लोकांची फौज हंगामी हिंद सरकारसाठी ठेवली होती. त्या फौजेने इंग्रजांच्या सरहद्दीवरील लष्करी ठाण्यांवर वारंवार हल्ले चढवून त्यांना सळो की पळो करून सोडले होते. अशा परिस्थितीमुळे तरुण शहाजादा अमानुल्लाद गादीवर येताच राजा महेंद्र प्रताप यांच्या डोळयापुढे इंग्रजांचा पराभव करून काबूल येथील हंगामी हिंद सरकार हिंदुस्थानात नेण्याचे स्वप्न तरळू लागले. त्या दृष्टीने पंजाबात उठावणी करण्याचे ठरले. तीन बाजूंनी उठावणी झाली परंतु पेशावरच्या बाजूने उठावणी होण्यापूर्वीच इंग्रजी सैन्याने पेशावरला वेढा घातला. सरदार गुलाम हैदर यांचे उठावणी करण्यासंबंधीचे एक पत्र इंग्रजांच्या हातात पडल्यामुळे असा घात झाला. गुलाम हैदर, अमीरचंद बम्बवाल इत्यादी कार्यकर्त्यांना पकडण्यात आले. शिवाय खैबर खिंडीच्या बाजूने अफगाण सेनापती सालिह मुहमदखां यांच्या मूर्खपणामुळे त्या बाजूचा हल्ला फसला.

राजा महेंद्र प्रताप यांना अमीर अमानुल्लाहखां याने सदिच्छा मंडळ सदस्य म्हणून चीन, जपान, तिबेट, सयाम, जर्मनी, तुर्कस्तान व अमेरिकेला जावे असे सांगितले. त्याप्रमाणे त्या कामगिरीवर ते निघाले. इकडे अमीर व इंग्रज यांचा सलोखा झाला त्यामुळे राजा महेंद्र प्रताप यांच्यासमवेत बर्लिनहून आलेल्या सहकाऱ्यांना ताबडतोब अफगाणिस्तान सोडण्याची अमीराने आज्ञा केली. तसेच हंगामी हिंद सरकारचे गृहमंत्री उबेदुल्लाह यांना त्यांच्या सरकारचे चंबुगबाळे अफगाणिस्तानातून आवरण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते व बरकतुल्ला मॉस्कोला गेले. राजा महेंद्र प्रताप अमीराचे सदिच्छा मंडळ सोडून अमेरिकेला गेले.

काबूलमध्ये हंगामी हिंद सरकारचा औट घटकेचा खेळ दैवगतीने उधळल्यानंतर राजा महेंद्र प्रताप सन १९२५ साली अमेरिकेत कॅलिफोर्निया संस्थानात गेले. हृदयात अपार देशप्रेम, डोक्यात स्वतंत्र हिंदचे विचार व पाठी-वर हिंदी राज्याच्या आराखड्याचे बोचके घेऊन नावाप्रमाणेच प्रतापी असलेला हा राजा स्वतःचे स्वप्न साकार करण्यासाठी महिनाभर वाऱ्यासारखा फिरत होता.

गदर चळवळीचे कार्यकर्ते व अफगाण असोसिएशन्स यांच्या साह्याने त्यांनी हिंदी मजुरांकडून बारा हजार डॉलरची रक्कम जमविली, त्यांपैकी काही रक्कम त्यांनी बर्लिन येथील आपले सहकारी बरकतुल्ला व इतर यांच्यासाठी पाठविली. काही रक्कम व सात हिंदी स्वयंसेवकांसमवेत घेऊन राजाजींनी परत उगवत्या सूर्याच्या देशाकडे प्रस्थान ठोकले. चीनममध्ये उतरून काही खेचरे व घोडे खरेदी करून व सोबतीला काही चिनी व तिबेटी नोकर घेऊन महेंद्र प्रताप तिबेटच्या लामांची गाठ घेण्यासाठी निघाले. वाटेत त्यांना तिबेटच्या गव्हर्नरने थांबवून त्यांचे स्वागत केले व लामांची परवानगी येईपर्यंत थांबण्यास सांगितले. काही दिवसानंतर लामांचा निरोप आला. राजा महेंद्र प्रताप यांनी तिबेटमध्ये हवे तितके दिवस राहाण्याची परवानगी देण्यात आली. तथापि ल्हासा या राजधानीच्या गात्री जाऊन लामांची गाठ घेण्यास त्यांना नकार देण्यात आला. नेपाळच्या तिबेटातील वकिलांची गाठ घेऊन नेपाळ प्रवेशाबाबत त्यांनी विचारणा केला. परंतु नेपाळ नरेशांकडून उत्तर येईना. वीस-पंचवीस माणसे व तितकीच खेचरे यांच्या राहण्याखाण्याचा खर्च वाढत होता. काम होण्याचे — हिंद सरकार स्थापण्यासाठी राजकीय साहय — दिसेना. जवळचा पैसा-अडका संपुष्टात येऊ लागला त्यामुळे महेंद्र प्रतापांचे हे सैन्य वैराण बर्फाळ प्रदेश व दुर्गम खिंडी ओलांडून परत चीनमध्ये आले. एव्हाना दुसऱ्या महा-युद्धाचे कुंड पेटले होते. त्याच्या ठिणग्या चीन, जपान, सयाम या पूर्वेकडील देशांपर्यंत उडत होत्या.

ह्या संधीचा फायदा घेण्यासाठी राजा महेंद्र प्रताप पुढे सरसावले. त्या वेळी जपानमध्ये असलेले रास बिहारी बोस यांची त्यांनी गाठ घेतली. हिंदी स्वातंत्र्याबद्दल तळमळ असलेल्या पूर्वेकडील देशातील काही भारतीयांची बैठक घेण्यात येऊन दुसऱ्या हंगामी हिंद सरकारची सन १९४१ मध्ये जपानमध्ये स्थापना करण्यात आली. इटली, जर्मनी व जपान या देशांच्या सरकारांनी त्यांना साह्य करण्याचे आश्वासन दिले. जपानी सैनिकांनी भारतामध्ये प्रवेश करता कामा नये, अशा मताचे महेंद्र प्रताप होते. या मतभेदामुळे त्यांनी रासबिहारींच्या बरोबर काम करणे सोडून दिले. पुढे सुभाषचंद्र बोस त्या आघाडीवर आले व त्यांनी हंगामी हिंद सरकार व आझाद हिंद फौज यांचे अधिपत्य सांभाळले.

आणि भारतीय स्वातंत्र्याचे राजकारण जगभर खेळवणारा हा पराक्रमी व त्यागी राजा आज स्वतंत्र भारतात ओढगस्तीत वार्धक्याचे दिवस मोजीत आहे.


* * *

२२. पत्त्यांचे डाव

(रासबिहारी बोस)

रासबिहारी बोस ह्यांनी जीवनाला सुरुवात केली जंगल खात्यातील कारकुनीने. तथापि एके काळच्या ह्या सामान्य कारकुनाच्या शेवटच्या आजारपणात जपान ह्या स्वतंत्र राष्ट्राचे बादशहा त्याच्या समाचारासाठी हॉस्पिटलमध्ये गेले. एवढेच नव्हे तर, सूर्याचे दुहेरी वलय असलेले सर्वोच्च जपानी मानचिन्ह (सेकंड ऑर्डर ऑफ मेरिट) त्यांनी रुग्णशय्येवर पडलेल्या रासबिहारींना आदरपूर्वक अर्पण केले. जेमतेम मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या रासबिहारींचा एवढा मोठा सन्मान होण्याइतकी महान कामगिरी त्या माणसाच्या कर्तृत्वामागे उभी होती.





रासबिहारी विनोदबिहारी बोस हे कलकत्त्याचे राहाणारे. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. विद्यार्थिदशेतच ते 'अनुशीलन समिती' ह्या बंगालमधील क्रान्तिकारकांच्या संघटनेत सामील झाले त्यामुळे त्यांनी पुढील शिक्षणास राम राम ठोकला. लष्करी शिक्षण मिळविण्यासाठी त्यांनी लष्करात शिरण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना लष्करात घेण्यात आले नाही. एक-दोन ठिकाणी किरकोळ नोकऱ्या करून मग ते डेहराडून येथील जंगल संशोधन कचेरीत नोकरीस लागले. रासबिहारी जरी डेहराडून येथे नोकरी करीत होते तरी तेथे

राहून ते बंगाल व संयुक्त प्रांतात गुप्त क्रान्तिकारकांची संघटना बांधीत होते. रासबिहारींची वागणूक इतकी सभ्यपणाची व सौजन्याची होती व आपले बेत ते इतक्या गुप्तपणे आखीत की, त्यांच्या ह्या पाताळयंत्री स्वभावाची कल्पना त्यांच्या सभोवतालच्या सरकारी अधिकाऱ्यांनाही येऊ शकली नाही.

त्यांचा एक सहकारी शचींद्रनाथ संन्याल हा कलकत्त्याहून बनारसला येऊन राहिला होता. तो देखील गुप्त क्रान्तिकारक चळवळीत भाग घेत होता. बनारस येथे राहून तो संयुक्त प्रांतात क्रान्तिकारकांची संघटना बांधीत होता. त्या संघटनेबद्दल संशय वाटू नये म्हणून तिला 'यंग मेन्स असोसिएशन' (तरुण मित्र मंडळ) असे नाव दिले. नोकरी सोडून रासबिहारी बनारसला शचींद्रनाथ संन्यालजवळ येऊन राहिले. तेथे राहून त्यांनी पंजाबमधील क्रान्तिकारकांची संघटना बांधली. हिंदुस्थानातून ब्रिटिशांचे राज्य हुसकून देण्याचा डाव ते खेळत होते.

एकोणिसशे बारा सालची गोष्ट. त्या साली गव्हर्नर जनरल दिल्लीच्या नव्या राजधानीत प्रवेश करणार होते. ती संधी साधून रासबिहारी पहिला डाव खेळले. इंग्रजी राज्याच्या नव्या राजधानीत हजारो लोकांच्या डोळ्यांदेखत दिवसाढवळ्या त्या राज्याचा मुख्य नियंत्रक जो गव्हर्नर जनरल त्यालाच खतम करून इंग्रजी सत्तेला हादरा द्यावयाचा, असा हा डाव होता. रासबिहारींच्या योजनेप्रमाणे वसंतकुमार बिश्वासने फेकलेल्या बाँबने जर व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज हे ठार झाले असते तर ब्रिटिश सत्तेला लावलेला तो मोठाच सुरुंग ठरला असता. कदाचित् मानसिक प्रतिक्रिया भारतीयांच्या दृष्टीने फारच मोलाची ठरली असती. आखणीप्रमाणे योजनेची अंमलबजावणी अगदी तंतोतंत बरोबर झाली. गव्हर्नर जनरलच्या पाठीमागे उभ्या असलेल्या हुजऱ्याच्या शरीराच्या त्या बाँबने चिंधड्या होतात. त्या हत्तीपासून काही अंतरावर उभा असलेला प्रेक्षक ठार होतो. आणि हुजऱ्याच्या अगदी पुढेच अंबारीत बसलेला गव्हर्नर जनरल वाचतो. ही केवळ दैवगतीच ! अत्यंत हुषारीने खेळलेला डाव रासबिहारी हरले.

तथापि डाव हरला तरी रासबिहारी हरले नाहीत. नव्या उमेदीने व नव्या जिद्दीने त्यांनी दुसरा डाव मांडला. हार्डिंज बॉम्ब प्रकरणाचे मुख्य

सूत्रधार रासबिहारी होते. अशी मिळालेल्या पुराव्यावरून सरकारची खात्री झाली. त्यांचे फोटो वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात आले. मोठमोठ्या शहरांतून भिंतीवर लावण्यात आले. त्यांचा तपास सांगणाऱ्याला सात हजार रुपयांचे बक्षीस देण्याचे जाहीर करण्यात आले. अशा रीतीने सर्व बाजूंनी हेरांचे व गुप्त पोलिसांचे जाळे त्यांच्याभोवती विणले जात असतानाही रासबिहारींची आगेकूच चालूच होती. महायुद्ध सुरू झाल्यावर इ. स. १९१४ मध्ये अमेरिकेतून कर्तारसिंह व विष्णुपंत पिंगळे हे गदर पार्टीचे क्रान्तिकारक इंग्रजांविरुद्ध लोकांची उठावणी करण्यासाठी हिंदुस्थानात आले. त्यांनी रासबिहारींची भेट घेतली. त्या दोघांच्या बरोबर रासबिहारी पंजाबात व संयुक्त प्रांतात लष्करी छावण्यांतून हिंडले. इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्यास सैनिकांची मने त्यांनी तयार केली. पश्चिमेस पंजाब ते पूर्वेस सिंगापूरपर्यंत एकाच दिवशी उठावणी करायची योजना रासबिहारींनी आखली. बंगाल, आसाम, ब्रह्मदेश, सिंगापूर ह्या भागातील क्रान्तिकारकांना त्याप्रमाणे सूचना देण्यात आल्या. दि. २१ फेब्रुवारी १९१५ ही उठावणीची तारीख ठरविण्यात आली. परंतु दुर्दैवाने हा दुसराही डाव रासबिहारींच्या अंगावर आला. फितुरीमुळे ती तारीख व क्रांतिकारांच्या बेतासंबंधीची माहिती सरकारला कळली. पिंगळे, पं. परमानंद, कर्तारसिंह, पृथ्वीसिंह आजाद, बाबा सोहनसिंह, भाई परमानंद, शचींद्र संन्याल इत्यादी कार्यकर्त्यांची धरपकड झाली आणि इंग्रजांचे राज्य उलथून टाकण्याचा मोठा प्रयत्न फसला.

इंग्रजांच्या हेरखात्याने व पोलीस खात्याने आटोकाट प्रयत्न करूनही पंजाब ते बंगालपर्यंत फिरणारे रासबिहारी त्यांना सापडू शकले नाहीत.

गदर पार्टीच्या क्रान्तिकारकांची मोठ्या प्रमाणावर धरपकड झाल्यावर हिंदुस्थानात राहाणे धोक्याचे आहे असे रासबिहारींना वाटले. म्हणून वेषांतर करून गुप्तपणे हिंदुस्थानातून ते जपानात गेले (१९१५) तेथून ते हत्यारे व दारूगोळा हिंदी कार्यकर्त्यांना गुप्तपणे पाठवू लागले. ही गोष्ट इंग्रज सरकारला कळली त्या वेळी जपान हे राष्ट्र इंग्रजांच्या बाजूने जर्मनीविरुद्ध युद्धात उतरले होते. म्हणून इंग्रजांनी जपानकडे रासबिहारींची मागणी केली. रासबिहारींना ह्या सर्व गोष्टी कळत होत्या. जपानमध्ये 'ब्लॅक ड्रॅगन'

नावाची एक मोठी राजकीय संस्था होती. त्या संस्थेला जपानचे सरकार देखील घाबरत असे. रासबिहारी स्वतःच्या चातुर्याने त्या संस्थेच्या अध्यक्षाच्या घरीच त्यांचा पाहुणा म्हणून राहू लागले. त्यामुळे जपान सरकारला इंग्रजांच्या सांगण्याप्रमाणे रासबिहारींना पकडता आले नाही.

जपानमध्ये राहून हिंदी क्रान्तिकारकांना साह्य करण्याचे रासबिहारींचे काम चालूच होते. एका जपानी महिलेशी लग्न करून ते जपानातच राहू लागले. ते जपानी भाषा शिकले. जपान, मलाया, थायलंड, ब्रह्मदेश इत्यादी राष्ट्रांत हिंदी स्वातंत्र्याचा प्रचार करण्यासाठी त्यांनी पुस्तकेही लिहिली.

इ. स. १९३९ हे साल उगवले. दुसरे महायुद्ध सुरू झाले. जपान इंग्रजांच्या विरुद्ध जर्मनीच्या बाजूने युद्धात उतरला. भारतीय स्वातंत्र्यासाठी रासबिहारींना आता उघड उघड प्रयत्न करता येऊ लागले. जपान व हिंदुस्थानच्या पूर्व सरहद्दीवरील मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेश, थायलंड, जावा, सुमात्रा इत्यादी राष्ट्रांत त्यांनी प्रचारदौरा करून त्या भागातील हिंदी लोकांची संघटना तयार केली. इंग्रजांच्या दास्यातून हिंदुस्थानची मुक्तता करण्यासाठी 'इंडियन नॅशनल आर्मी' उभी केली. हे सैन्य म्हणजेच 'आझाद हिंद सेना.' त्या कामी जपानी सरकारनेही त्यांना साह्य केले. स्वतंत्र हिंदुस्थानचे मुख्य संचालक असा मान जपानी सरकार त्यांना देऊ लागले. त्यानंतर सुभाषबाबूंच्या योग्यतेची कल्पना होती. त्यांनी आझाद हिंद सेनेच्या नेतेपणाची माळ सुभाषबाबूंच्या गळ्यात घातली. केवढा हा मनाचा मोठेपणा! केवढा हा कीर्तीचा त्याग! सुभाषबाबूंनीही त्यांना आझाद हिंद सरकारचे सल्लागार नेमले.

तथापि सुभाषबाबू विमान-अपघातात ठार झाले. जपान युद्धात हरले आणि आझाद हिंद सेनेचा पराभव झाला. रासबिहारींचा हया वेळेचा डावही दैवाने उधळून लावला. हा पराजय देखील त्यांनी पचविला. कारण रासबिहारी म्हणजे देशाच्या दास्यविमोचनासाठी अविरत प्रयत्न करणारे एक कर्मयोगी होते. त्यांनी कधी जयापजयाची पर्वा केली नाही.

शेवटी आजारपणामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. त्यांच्या जीवनकार्याने भारावून गेलेल्या जपानच्या बादशहाने दवाखान्यात जाऊन त्यांची भेट घेतली व त्यांचा सन्मान केला.

प्रखर देशप्रेम, प्रचंड प्रयत्नवाद, प्रभावी संघटनाचातुर्य, अद्वितीय मुत्सद्देगिरा, संकटकाळी सावधानता, कुशाग्र बुद्धिमत्ता इ. गुणसमुच्चयामुळेच रासबिहारी पंजाबपासून जपानपर्यंतच्या आघाडीवर इंग्रजांसारख्या प्रबळ राज्यकर्त्यांशी झुंज देऊ शकले.

रासबिहारी डाव हरले, तथापि इंग्रजांना हार गेले नाहीत !

* * *

२३. असा बुलंद पती, अशी बुलंद सती

(भाई बालमुकुंद, अमीरचंद व अवध बिहारी, वसंत विश्वास)

लॉर्ड कर्झन ह्या गव्हर्नर जनरलने इ. स. १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली. त्यामुळे संतापलेल्या बंगाली क्रांतिकारकांनी इंग्रज अधिकाऱ्यांना पिस्तुलाच्या गोळ्या घालून व बॉम्ब टाकून ठार करण्याचा सपाटा चालविला. महाराष्ट्र व पंजाबातही सशस्त्र क्रांतिकारकांनी इंग्रज सत्तेवर प्रहार करण्यास आरंभ केला होता. त्याच सुमारास इंग्लंडच्या गादीवर पाचवा जार्ज हा राजा आला. इंग्लंडचा राजा हा हिंदुस्थानचा बादशहा असे. सिंहासनावर आल्यावर पंचम जॉर्ज बादशहा इ. स. १९११ साली हिंदुस्थानात आले. त्यांनी दिल्ली येथे मोठा दरबार भरविला. त्या दरबारात बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. त्याचप्रमाणे हिंदुस्थानची राजधानी कलकत्त्याहून दिल्ली येथे नेण्याचे जाहीर केले. हिंदुस्थानात असंतोषाच्या भडकलेल्या ज्वाला ह्या घोषणांनी शान्त होतील, असे इंग्रजांना वाटले. परंतु इंग्रजांच्या जुलमी राजवटीने संतापलेले ते तरुण ती राजवट उलथून पाडण्यासाठी सशस्त्र क्रांतीकडे बंगालच्या फाळणीपूर्वीच वळले होते. क्रांतिकारकांनी पिस्तुलाने झाडलेल्या गोळ्या अथवा फेकलेले बॉम्ब हे बंगालच्या फाळणीचे कारण नव्हे. इंग्रजी राजवटीविरुद्ध वाटणाऱ्या संतापाच्या उद्रेकाला फाळणी हे निमित्त झाले इतकेच. सशस्त्र क्रान्तीची चळवळ फाळणीपूर्वीच सुरू झाली होती.

परंतु इंग्रज राज्यकर्त्यांना वाटले की; बंगालची फाळणी रद्द केल्यामुळे व हिंदुस्थानच्या मूळच्या राजधानीच्या ठिकाणी राजधानी आणल्यामुळे हिंदी लोकांच्या मनातील असंतोषाचा अग्नी विझून गेला असेल. दि. २३ डिसेंबर १९१२ रोजी हिंदुस्थानचा नवा गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज हा मोठ्या डौलदार मिरवणुकीने नवीन बांधलेल्या ‘ नवी दिल्ली ’ ह्या राजधानीत प्रवेश करण्यासाठी निघाला तो हत्तीवर असलेल्या चांदीच्या अंबारीत बसला होता. त्याच्या शेजारी त्याची पत्नी बसली होती. पाठीमागे चवऱ्या ढाळीत हुजऱ्या उभा होता. गव्हर्नर जनरलच्या मागे आणखी काही हत्तींची रांग

होती. त्या हत्तींवरील अंबाऱ्यात हिंदी राजे (संस्थानिक) व बडे इंग्रज अधिकारी आपआपल्या मानाप्रमाणे विराजमान झाले होते. वाद्यांच्या गजरात मिरवणूक दिल्ली शहराच्या चांदणी चौकात आली. मिरवणुकीचा थाट बघण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा घराघरात व घरांच्या गच्च्यांवर स्त्री-पुरुष व मुलांची दाटी झाली. गव्हर्नर जनरलचा हत्ती चांदणी चौकातील पंजाब नॅशनल बँकेच्या इमारतीसमोर आला. दुपारी बारा वाजण्याचा सुमार होता. इतक्यात आकाशातून डोळे दिपविणारा, विजेचा लोळ कोसळावा असा भास झाला. गव्हर्नर जनरलच्या अंबारीवर तो प्रकाशाचा लोळ उठला. कानठळ्या बसविणाऱ्या त्या महाभयंकर आवाजाने इमारती हादरल्या. सारा चांदणी-चौक काळ्याकुट्ट धुराने भरून गेला. काय भयंकर प्रकार घडला, हे कुणालाच समजेना. गर्दीत पळापळी, रेटारेटी व आरडाओरड सुरू झाली.

गव्हर्नर जनरलच्या अंबारीवर बॉम्ब पडला होता. त्या बॉम्बच्या स्फोटामुळे अंबारीमागे चवरी ढाळणाऱ्या हुजऱ्याचे शरीर छिन्नभिन्न होऊन त्याचे प्रेत अंबारीच्या दोराला लोंबकळत होते. मिरवणूक पाहात असलेला एक प्रेक्षक बॉम्बचा कवचा लागून ठार झाला होता. काही प्रेक्षक जखमी झाले होते. आणि जखम झाल्यामुळे गव्हर्नर जनरल अंबारीतच बेशुद्ध पडले होते.

पोलिसांची धावपळ सुरू झाली. चौकशी-चक्रे फिरू लागली. तथापि शिकस्तीने प्रयत्न करूनही तो बॉम्ब कोणी टाकला याचा पत्ता सरकारला लागू शकला नाही.

गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज यांच्यावर फेकण्यात आलेला बॉम्ब क्रान्तिकारकांनीच फेकला असल्याची सरकारची खात्री झाली. वर्ष दीड वर्ष लोटले तरी गुन्हेगारांचा यत्किंचितही मागमूस सरकारला लागू शकला नाही. म्हणून दिल्ली, कलकत्ता, लाहोर इत्यादी ठिकाणी संशयित क्रांतिकारकांच्या हालचालींवर व पत्रव्यवहारावर सरकारी गुप्त पोलीस खात्याने टेहळणी ठेवली. गुन्हेगारांचा तपास लावून देणारास सरकारने एक लाखाचे पारितोषिक जाहीर केले. तर काश्मिरच्या महाराजांनी दहा लाखाचे व ग्वाल्हेरच्या महाराजांनी आठ हजारांचे बक्षिस जाहीर केले. जनतेच्या पैशाने ढोंगी राजनिष्ठेचे मानभावी प्रदर्शन ! तथापि योगायोग जसे सुदैवाने घडून येतात, तसेच दुर्दैवाने देखील.

एके दिवशी एम्. एस्. ह्या सांकेतिक सहीने अवध बिहारी यांच्या नावाने दिल्लीच्या पत्त्यावर पत्र आले. पत्र लाहोरहून टाकले होते. 'तुमचा मित्र येथे आला असून तो पैशाच्या अडचणीत आहे. पैसे पाठवा!' असा मजकूर पत्रात होता. पत्रातील मजकूर व एम्. एस्. ही सांकेतिक सही पाहून पत्रव्यवहाराच्या पाळतीवर असलेल्या गुप्तचरांना संशय आला. पोस्टमनच्या मागोमाग जाऊन त्यांनी अवध बिहारींना गाठले. एम्. एस्. म्हणजे दीनानाथ एवढेच त्याचे नाव माहीत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. लगेच दिल्लीच्या पोलीस अधीक्षकाने (डी. एस. पी.) लाहोरच्या अधीक्षकाला तार करून दीनानाथाला पकडण्यास सांगितले. तार मिळताच पोलिसी चौकशीची चक्रे फिरू लागली. दीनानाथ नावाच्या सापडेल त्या माणसास तुरुंगात आणून डांबण्यात आले. लाहोरातील दीनानाथ नावाच्या सर्व व्यक्ती आठ घटका शनीच्या फेऱ्यात सापडल्या गेल्या. आंधळं दळतं नी कुत्रं पीठ खातं तशातला प्रकार. शेवटी हवा असलेला दीनानाथ एकदाचा साण्डला.

हा दीनानाथ मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेला एक तरुण होता. कुठे तरी खाजगी कंपनीत हिशोब लिहिण्याचे काम तो करीत असे. रासबिहारी, मास्टर अमीरचंद, अवध बिहारी ह्या क्रांतिकारकांच्या जथ्यात त्याने शिरकाव करून घेतला. तथापि त्याच्या भित्र्या स्वभावामुळे त्याला मोठ्या स्वरूपाच्या मसलतीत घेतले जात नसे. रासबिहारींचे दैव असे शिकंदर की, दिनानाथाला पकडण्यासाठी पोलीस जेव्हा त्याच्या घरी गेले त्याच्या अगदी थोडे क्षणच अगोदर रासबिहारी बोस पठाणाच्या वेशात घरातून बाहेर पडले होते म्हणून बचावले. बॉम्बचे साहित्य, व शस्त्रे यासाठी रासबिहारींना पैशाची आवश्यकता होती. म्हणून त्यांनी दीनानाथ यास अवध बिहारींना पत्र लिहिण्यास सांगितले होते.

दीनानाथला क्रान्तिकारांनी केलेल्या कोणत्याच घटना-प्रसंगाची माहिती नव्हती. तथापि क्रांतिकारांची गुप्त पत्रके, बॉम्ब तयार करणे इत्यादी मोघम गोष्टी त्याला माहीत होत्या. पोलिसी रट्टा बसताच भित्र्या दीनानाथाची भीतीने गाळण उडाली. त्याच्या निवेदनावरून दिल्ली येथे अवध बिहारी व मास्टर अमीरचंद यांना पकडले. छापे मारले म्हणून लाहोरहून कलकत्त्याला घरी गेलेल्या वसंतकुमार विश्वासला पकडून दिल्लीस आणण्यात आले.

मास्टर अमीरचंद हे दिल्लीचे रहिवासी. त्यांचे वडील हुकुमचंद हे पंजाबात असिस्टंट कमिशनर होते. व भाऊ रतनचंद हे हैद्राबाद येथे न्यायाधीश होते. अमीरचंदानी बॅरिस्टर होऊन यावे, अशी त्यांच्या वडलांची इच्छा होती. परंतु अमीरचंदाने महाविद्यालयीन शिक्षणाच्या दुसऱ्या वर्षातून शिक्षणास रामराम ठोकला व मिशन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी धरली. इंग्रजी, संस्कृत, उर्दू व फारसी या भाषांवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व होते. मास्टर अमीरचंद हे दिसायला फार कुरूप होते. परंतु या माणसाचा स्वभाव फार प्रेमळ, विनोदी व परोपकारी होता. ते स्वतःच्या कुरूपपणामुळे ' बंदर (वानर) मास्तर ' असे स्वतःचे नाव गमतीने सांगत असत. अध्यापन, विषयांचे ज्ञान व प्रेमळपणा यामुळे ते विद्यार्थ्यांत फारच प्रिय झाले होते. त्यांना मूलबाळ नसल्यामुळे त्यांनी बंधू रतनचंद यांचा मुलगा सुलतानचंद याला दत्तक घेतले होते. अवध बिहारी हे अमीरचंदांचे विद्यार्थी. अमीरचंदांनी त्यांना स्वतःच्या घरी ठेवून शिक्षण दिले. पुढे ते बी. ए., बी. टी. झाले. बी. टी. च्या परीक्षेत ते सर्वप्रथम येऊन अवध बिहारींना सुवर्ण पदक मिळाले. लाहोरला अध्यापन महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून नोकरीस लागले.

लाला हरदयाळ गुप्तपणे पंजाब प्रांत सोडून परदेशात गेले. आपल्यामागे क्रांतिकारकांची संघटना करणे, क्रांतिकार्य करणे इत्यादी गोष्टींची धुरा लालाजींनी मास्टर अमीरचंद व भाई बालमुकुंद यांच्या खांद्यावर दिली. भाई मुकुंद हे बी. ए. झाले होते व जोधपूरच्या राजपुत्राचे शिक्षक होते. पंजाबचे ख्यातनाम आर्य समाजी पुढारी भाई परमानंद यांचे ते चुलतभाऊ. मास्टर अमीरचंद, भाई बालमुकुंद व अवध बिहारी हे प्रसिद्ध बंगाली क्रांतिकारक नेते रासबिहारी बोस यांच्या सल्ल्याप्रमाणे दिल्ली, संयुक्त प्रांत व पंजाबात क्रांतिकार्य करू लागले. रासबिहारींनी बालमुकुंद व अवध बिहारींना बॉम्ब विद्या शिकविली. मास्टर अमीरचंद दिल्लीहून लिबर्टी, नावाची सरकारविरोधी पत्रके काढीत असत. सरकारच्या दबावामुळे मिशन हायस्कूलने अमीरचंदांना नोकरीतून काढून टाकले. त्यानंतर ते काही दिवस एका संस्कृत पाठशाळेत व पुढे हनुमान सहाय यांच्या राष्ट्रीय शाळेत शिक्षक म्हणून काम करू लागले.

भारताची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला नेण्यात यावयाची होती. हिंदुस्थानचा व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज याच्या हस्ते नव्या राजधानीचे उद्घाटन


व्हावयाचे होते. धाडसी व पाताळयंत्री व दूरदृष्टीच्या रासबिहारींना इंग्रजी सत्तेला हादरा देण्याची ही संधी नामी वाटली. त्यासाठी त्यांनी कलकत्याला जाऊन वसंतकुमार विश्वास या देखण्या व नाजुक बांध्याच्या मुलाला आपला नोकर म्हणून डेहराडूनला बरोबर नेले. काही बॉम्बही बरोबर नेले. हळूहळू त्यांनी वसंतकुमार विश्वासला अचूक बॉम्बफेकीत तरबेज केले. रास-बिहारी म्हणजे क्रान्तिकार्याचे मुख्य कार्यालय, वसंतकुमारसारख्या नवख्या व अगदी कोवळ्या तरुणाला एकसारखे जवळ ठेवणे हे गुप्त योजनांच्या धोक्याचे होते. म्हणून रासबिहारींनी त्याला बालमुकुंद यांच्याकडे पाठवून दिले. वसंतकुमारचे शिक्षण कमी झाले. ह्यास्तव त्याला बालमुकुंदांच्या ओळखीमुळे लाहोर येथे पाप्युलर डिस्पेन्सरीत औषधे खपविण्याची नोकरी मिळाली.

लॉर्ड हार्डिंज यांच्या दिल्ली प्रवेशाच्या वेळी रासबिहारींनी बाल-मुकुंद व वसंतकुमार विश्वास यांना दिल्लीला बोलावून घेतले. मिरवणूक चांदणी चौकात आली की, चौकात असलेल्या पंजाब नॅशनल बँकेच्या वरच्या गच्चीवर वसंतकुमार विश्वासने गोषाधारी महिलेच्या वेषात व्हाईसरॉयच्या अंबारीवर बॉम्ब फेकावा, अशी योजना रास बिहारींनी आखून दिली होती. वसंतकुमारचा नेम यदाकदाचित चुकला तर स्वतः रासबिहारी व बाल-मुकुंद हे त्यानंतर बॉम्ब फेकण्यासाठी योग्य ठिकाणी थांबणार होते. ठरल्याप्रमाणे वसंतकुमार विश्वासने पडदानशीन स्त्रीवेषात गच्चीवर जाऊन व्हॉईसरॉयच्या अंबारीवर बॉम्ब फेकला व त्यानंतर उडालेल्या गर्दी-गोंधळात तो स्त्रियांच्या घोळक्यातून ताबडतोब बँकेच्या इमारतीतून बाहेर पडला व गर्दीत नाहीसा झाला. त्याच्या नाजूक अंगकाठीमुळे त्याचे सोंग बुरखाधारी स्त्रियांत संपादून गेले. सरकारने जंग जंग पछाडले, परंतु बॉम्बचे सूत्रधार कोण याचा पत्ता सरकारला लागला नाही.

दीनानाथला ह्या योजनेतील अवाक्षरही सांगण्यात आले नव्हते. परंतु ह्या प्रसंगानंतर रासबिहारी थोडेच स्वस्थ बसणार ? त्यांनी लाहोरच्या मेयो गार्डन मॉंटगामेरी हॉलमधील युरोपियन अधिकाऱ्यांच्या क्लबवर बॉम्ब टाकण्याची योजना आखली. योजनेप्रमाणे अवध बिहारी व वसंतकुमार विश्वास यांनी सायकलवर जाऊन संध्याकाळच्या अंधारात दि. १७ मे १९१३ रोजी

क्लबच्या इमारतीत बॉम्ब ठेवला. तेथील वर्दळीमुळे वसंतकुमारने घाईत भल-त्याच रस्त्यात बॉम्ब ठेवला. त्या बाजूला अधिकारी जात नसत. काही वेळाने बागेचा माळी तिकडे गेला. त्याचा धक्का लागून बॉम्बचा स्फोट झाला व माळी ठार झाला. संध्याकाळी मोहिमेवर जाताना वसंतकुमारने दीनानाथची सायकल त्याच्याकडून मागून नेली होती. दुसऱ्या दिवशी स्फोटाची बातमी प्रसिद्ध होताच दीनानाथने अंदाज बांधला की, बॉम्ब वसंतकुमारनेच ठेवला असला पाहिजे व तेवढ्याचसाठी त्याने आपली सायकल नेली असली पाहिजे.

दीनानाथाला पकडल्यावर त्याने मोघम दिलेल्या माहितीच्या आधारे मास्टर अमीरचंद, अवध बिहारी, वसंतकुमार विश्वास, हनुमान सहाय, भाई बालमुकुंद यांना पकडण्यात आले. तथापि हार्डिंजवर झालेल्या बॉम्बफेकीची योजना दीनानाथला माहिती नसल्याने ती सरकारला कळू शकली नाही व आरोप सिद्ध होणारा प्रत्यक्ष पुरावा सरकारला मिळू शकला नाही.



दीनानाथाच्या फितुरीमुळे बॉम्ब-स्फोटाच्या रहस्याचा स्फोट झाला नाही, तरी अमीरचंद, बालमुकुंद, अवध बिहारी व वसंतकुमार विश्वास ह्यांना पकडून दिल्ली येथे तुरुंगात ठेवण्यात आले. खटला चालू असताना बाल-मुकुंदची पत्नी त्यांना भेटण्यासाठी तुरुंगात गेली होती. नुकतेच एक वर्षा-पूर्वी त्यांचे लग्न झाले होते. तिचे नाव होते लज्जावती. लज्जावती एखाद्या लावण्यसुंदर राजकुमारीसारखी होती. राजकुमाराप्रमाणे असणाऱ्या आपल्या

राजबिंड्या पतीची दशा तिने पाहिली. डास, ढेकूण, झुरळे, पिसवा इत्यादींनी भरलेल्या एका अंधारकोठडीत बाल-मुकुंद ह्यांना ठेवण्यात आले होते. झोपायला एक खडबडीत तरट व खाण्याला कदान्नाची भाकरी त्यांना तेथे देण्यात येत असे. लज्जावती घरी आली. ती पतिव्रता तरुणी एका फाटक्या पोत्यावर घरातील अंधाऱ्या खोलीत झोपू लागली. कुजक्या धान्यांच्या भेसळीची रोटी करून त्यावर ती राहू लागली. पतीचे सुखदुःख हेच तिचे सुखदुःख होते. त्याच्या जीवनात अर्धांगी म्हणून ती समरस होत होती.

मास्टर अमीरचंद, अवध बिहारी, भाई बालमुकुंद व वसंतकुमार विश्वास यांना फाशीची शिक्षा देण्यात आली व हनुमान सहाय यांना काळया पाण्याची. रासबिहारी बोसांच्या शिरासाठी एक लाखाचे पारितोषिक लावले असताही ते सापडू शकले नाहीत.

खटला चालून फाशीची शिक्षा झाली. दि. ११ मे १९१५ रोजी त्यांना अंबाला जेलमध्ये फाशी देण्यात आले. त्यांच्या शिक्षेचा दिवस जाहीर झाला. त्या दिवशी स्नान करून लज्जावती पांढरी वस्त्रे परिधान करून गोणपाटाच्या आसनावर बसली. डोळे मिटून ती पतीचे ध्यान करीत बसली आणि शेवटी जोराने दीर्घ श्वास घेत तिने शरीरातील प्राण बाहेर ओढून घेतले. अशी होती लज्जावतीची पतिभक्ती, पतिनिष्ठा आणि पतीवरील प्रेम !

असा देशभक्त बुलंद पती आणि अशी पतिनिष्ठ सती !


* * *

२४. अकाली बाब्बर हुतात्मे

(मास्टर मोटासिंग किशनसिंग)

पंजाबातील शूर व लढवय्या शीख जमातीतील काही कडव्या लोकांनी बाब्बर अकाली हे नांव धारण केले. बाब्बर म्हणजे सिंह. अकाली म्हणजे चिरंतन असणारा पुरुष, म्हणजे परमेश्वर. चिरंतन असणाऱ्या एका परमेश्वराला भजणारे ते अकाली. सिंहासारख्या शूर अशा त्या बाब्बर अकाली वीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेला त्याग, दाखविलेले शौर्य आणि फाशीच्या तख्तावर चढताना दाखविलेले धैर्य यांची कथा जितकी रोमांचकारी व उदात्त आहे, तितकीच हृदयद्रावक आहे.

गदर चळवळीत भाग घेणारे बरेच स्वातंत्र्ययोद्धे हे ह्या शीख जमातीतीलच होते. गदर चळवळीच्या योजनेच्या गौप्याचा स्फोट होऊन



त्या चळवळीशी संबंध असणाऱ्या कर्तारसिंग, विष्णुपंत पिंगळे इत्यादी स्वातंत्र्यवीरांना फाशी देण्यात आले. बाबा सोहनसिंह, पं. परमानंद, भाई परमानंद इत्यादींना काळ्या पाण्यावर पाठविण्यात आले. रासबिहारी बोस ह्यांच्या शिरासाठी सकारने तीस हजारांचे बक्षीस लावले तरी ते सापडू शकले नाहीत. ते गुप्त रीतीने निसटून गेले. अशा रीतीने पहिल्या महायुद्धाच्या

अखेरीस, (सन १९१८) उत्तर भारतात, स्वातंत्र्यासाठी पेटलेल्या उपरोक्त होमकुंडातील अग्नी शांत झाला होता.

स्वातंत्र्यासाठी लढणारे काही वीर जरी फाशी गेल्यामुळे हे जग सोडून गेले व काळ्या पाण्याच्या शिक्षेमुळे काहीजण ह्या राजकीय रण-भूमीवरून दूरदूर गेले, तरी त्यांनी पेटविलेल्या होमकुंडातील अग्नीच्या ठिणग्यांनी बाब्बर अकाली वीरांच्या हृदयात प्रवेश केला होता. होमकुंड विझले होते, परंतु त्यातून उडालेल्या ठिणग्यांनी हृदये पेट घेत होती.

बाब्बर अकालींची चळवळ सुरुवातीला धार्मिक स्वरूपाची होती. निरनिराळ्या गुरुद्वारांतील महंत विलासी व दुर्वर्तनी बनले होते. नानकाना साहिब येथील गुरुद्वाराचा महंत नारायणदास ह्याने तर एक नर्तकी रखेली म्हणून ठेविली होती. गुरुद्वाराच्या सभागृहात देखील तिचे नृत्य करविले जाई. असाच प्रकार थोड्याफार प्रमाणात इतर काही गुरुद्वारांत चालत असे. असल्या किळसवाण्या प्रकारांनी काही सुशिक्षित, सुविचारी अकालींच्या विचारांना धक्का बसला व गुरुद्वारांच्या व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणण्याची त्यांनी आघाडी उघडली. स्वतःच्या अस्तित्वावर येणाऱ्या ह्या गंडांतराला तोंड देण्यासाठी महंत नारायणदास यानेही चंग बांधला. समान-शील अशा महंतांची त्याने एकजूट केली. नानकाना साहिब गुरुद्वारावर अकालींनी मोर्चा नेला. त्या मोर्चाची आगाऊ बातमी नारायणदास व त्याचे साथीदार यांना लागली असल्यामुळे मोर्चेवाल्यांचे परिपत्य करण्यासाठी ते हत्यारानिशी तयारीत होते. मोर्चातील अकाली गुरुद्वाराजवळ येताच आतील हत्यारबंद महंत, तलवारी, कुऱ्हाडी व मशाली घेऊन त्यांच्यावर तुटून पडले. त्यांनी मोर्चेवाल्यांच्या शरीरांची खांडोळी करून त्यांच्यावर रॉकेल ओतून ती पेटवून दिली व अकालींपासून संरक्षण मिळण्यासाठी सरकारकडे धाव घेतली.

गदर चळवळीपासून सरकारचा पंजाबी शीखांवर रोष होताच. त्यांची पाळेमुळे खणून काढण्याची संधी अशा रीतीने अनायासेच चालून आली. इंग्रज सरकारने बाब्बर अकालींची धरपकड सुरू केली. त्यांच्याभोवती गुप्तहेरांचे जाळे पसरविले. त्यांचे नातेवाईक व त्यांना मदत करणारे ह्यांना खूप त्रास दिला. कित्येकांची घरेदारे व जमीनजुमला जप्त करण्यात आला.

सन १९२० मध्ये गांधीजींनी असहकाराची चळवळ पुकारली. परदेशी कपड्यांच्या होळ्या पेटविण्यात आल्या. शाळा, कॉलेजे व कोर्ट-कचेऱ्यांवर बहिष्कार घालण्यात आला. राष्ट्रीय शाळा-कॉलेजे निघाली. सरकारी यंत्रणा व संस्था यांच्यावर बहिष्कार घालून असहकाराने सरकार उलथून पाडण्याच्या मोहिमेत विद्यार्थी, वकील, प्राध्यापक, डॉक्टर, सरकारी नोकर व अन्य नागरिक सामील झाले. ह्या सार्वत्रिक उठावामुळे आता सरकार निश्चितपणे उलथून पडेल ह्या विजिगीषू विचाराने जनतेची अंतःकरणे उचंबळून आली होती. इतक्यात चौरीचुरा येथे जमावाने पोलीस चौकीला आग लावून चौकी-तील पोलिसांना जाळले. ह्या हिंसक प्रकारामुळे गांधीजींनी असहकाराची चळवळ स्थगित केली. सरकारच्या दडपशाहीच्या वरवंट्याखाली जनता रगडून निघू लागली. असहकाराची चळवळ मागे घेण्यात आल्यामुळे जनते-तील उत्साह खाली खेचला गेला. त्या उत्साहावर अगतिकतेच्या व वैफल्याच्या भावनेचे सावट पसरले. तथापि काही तरुणांच्या मनात धुमसत असलेला असंतोष, चीड व त्वेष ह्यांच्या अतिरिक्त धक्क्यामुळे काही तरुण हे अशां-पैकीच होत.

मास्टर मोटासिंग व जथेदार किशनसिंग गर्गिट हे अकालींचे पुढारी गावोगाव हिंडून इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध जनतेचा असंतोष शिल-गावीत होते. त्यांच्या भाषणातील शब्दाशब्दातून रसरशीत अंगाराची आग बाहेर पडत होती. श्रोत्यांची मने पेटली जात होती. त्यांच्या सभा इतक्या योजनाबद्ध असत की, त्यांना पकडण्यासाठी आलेल्या पोलिसांच्या हातावर तुरी देऊन ते सभेत अदृश्य होत. व्यासपीठाभोवती फक्त त्यांच्या शरीर-संरक्षकांचा ताफा मात्र उभा दिसे. इतक्या विद्युत्-वेगाने ते सभेतून अदृश्य होत की, श्रोत्यांना देखील ती गोष्ट उमजून येत नसे. त्यामुळेच त्यांच्या अंगी दैवी शक्ती आहे असा त्यांच्या अनुयायांचा समज झाला आणि म्हणूनच अशा रोमांचकारी घटनांमुळे मास्टर मोटासिंग व किशनसिंग यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक प्रकारचे तेजोवलय निर्माण झाले.

बाब्बर अकाली क्रांतिकारकांनी एका अज्ञात ठिकाणी छापखाना सुरू केला होता. त्या छापखान्यात, 'बाब्बर अकाली पत्रिका' नावाचे त्यांचे साप्ताहिक मुखपत्र गुरुमुखी भाषेत छापले जात असे. ह्या साप्ताहिकातून

जुलुमी राजवटीविरुद्ध जळजळीत प्रचार केला जात असे. जुलूम करणारे सरकारी अधिकारी, 'क्रांतिकारकांसंबंधी सरकारला माहिती पुरविणारे घरभेदे, ह्यांची नावे अकालीं पत्रिकेत छापली गेली की, त्या संबंधित व्यक्तींचा भीतीने थरकाप उडत असे. स्वतःचे नाव पत्रिकेत येणे म्हणजे मृत्यूघंटेचा नाद निघू लागला आहे असेच ते जुलमी अधिकारी व घरभेदे समजत. कारण पत्रिकेत नाव आलेल्या व्यक्ती थोड्याच अवधीत बाब्बर अकालींच्या नेमाचे निशाण बनत असत. ह्या अकालींची भाषाही सांकेतिक कोडाची असे. 'सुधार' म्हणजे जुलमी अधिकाऱ्याचा काटा काढणे; 'मक्का' म्हणजे मोटासिंगाचे जन्मगाव. 'हायकोर्ट' म्हणजे ज्या अधिकाऱ्यांचा 'सुधार [णा]' करावयाचा त्यांच्या नावाची पत्रिकेत छापण्यासाठी यादी तयार करण्याचे ठिकाण. स्त्रिया, मुले, वृद्ध व निरपराधी लोक यांचे कोणत्याही परिस्थितीत संरक्षण करणे हे त्यांचे ब्रीद होते.

बाब्बर अकालींची चळवळ इ. स. १९२२ ते २६ एवढीच अल्पकाळ होती. तथापि तेवढ्या छोट्या अवधीतही तिने सरकारच्या तोंडचे पाणी पळविले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात स्वतःच्या रक्ताने अकालींनी एक उज्ज्वल चित्र रेखाटले आहे.

सरकारने अकाली क्रांतिकारकांना पकडण्याचे सत्र सुरू केले. होशियारपूर जिल्ह्यातील एका खेडेगावात धनसिंग नावाचा भूमिगत बाब्बर अकाली क्रांतिकारक झोपला होता. त्याच्या मागावर असलेला युरोपियन पोलिस अधिकारी व पाच पोलिस ह्यांनी त्या अवस्थेत त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. बाका प्रसंग पाहून धनसिंगाने स्वतःच्या अंगाला एक जोराचा झटका दिला. त्याबरोबर कपड्यात लपवून ठेवलेल्या बॅाबचा स्फोट झाला. स्वतःच्या मृत्युबरोबरच त्याने तो गोरा पोलिस अधिकारी व पाच पोलिस ह्यांचेही बळी घेतले.

दुसरा एक अकाली क्रांतिकारक रतनसिंग. त्याला पकडून अंदमानला नेले होते. त्यानंतर बेड्या घालून पोलिस पहाऱ्यात त्याला हिंदुस्थानात परत आणण्यात आले. पोलिस पहारा तोडून तो हातात बेड्या असता शे-पाऊणशे मैल पळत गेला व एका घरात आश्रयाला राहिला. पोलिसांनी त्या घराला आग लावली. रतनसिंगाच्या देहाची राख जळालेल्या खांबा-वाशांच्या राखेत

मिसळून गेली. त्याचा उज्ज्वल आत्मा ज्वालांच्या शिखांतून अंतराळात विलीन झाला. पकडलेल्या बाब्बर अकाली ९१ क्रांतिकारकांवर खटले भरण्यात आले. त्यांपैकी ५१ जणांना निरनिराळ्या मुदतीच्या कारावासाच्या व काळ्या पाण्याच्या शिक्षा झाल्या. किशनसिंग, सन्तासिंग, दिलीपसिंग, धरमसिंग, करमसिंग आणि नंदसिंग यांना फाशीची शिक्षा सांगण्यात आली. दि. २७ फेब्रुवारी १९२६ रोजी ह्या सहाजणांना फाशी देण्यात आले. फाशीच्या तख्तावर उभे असताना किशनसिंगाने इंग्रजांनी आपल्या देशावर केलेल्या जुलमांचे इतके हृदयविदारक वर्णन केले की, तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी डोळ्यांना रुमाल लावले.

'वंदे मातरम्' व 'सत श्री अकाल' ह्या घोषणा देत ते फासावर चढले.

धन्य ते ध्येयवेडे आणि धन्य त्यांचे बलिदान !

* * *

२५. आगगाडीतील खजिन्यांवर हल्ला

(रामप्रसाद बिसमिल, गेंदालाल दीक्षित, राजेंद्र लाहिडी, रोशनसिंह)

परदेशातून काही हत्यारे विक्रीसाठी आली होती. क्रांतिकारकांना ती हत्यारे घ्यावयाची होती. परंतु जवळ पैसा नव्हता. पैसा मिळविण्यासाठी कोठे तरी सरकारी खजिन्यावर धाड घालण्याचा बेत ठरविण्यात आला. त्या वेळी रामप्रसाद 'बिसमिल' हे क्रांतिकारकांचे (संयुक्त प्रांतातील) नेते होते. त्यांना अशी बातमी लागली की, लखनौहून सहराणपूरला आगगाडीच्या डब्यातून तीन लाखांचा सरकारी खजिना जाणार आहे. त्याबाबतची निश्चित



माहिती काढण्यासाठी रामप्रसाद बिसमिल मुकिंदीलाल, चंद्रशेखर आजाद इत्यादी क्रांतिकारक वेष पालटून रेल्वेच्या धर्मशाळेत थांबले. तेथून ते गुप्तपणे रेल्वेने रवाना होणाऱ्या सरकारी खजिन्यांचा शोध घेत होते, वेध घेत होते. तपासाअंती त्यांना कळले की, तीन लाखांचा खजिना घेऊन जाणारी गाडी नुकतीच गेली होती.

त्यानंतर दि. ९ ऑगस्ट १९२५ चा दिवस. संध्याकाळ होऊन अंधार पडू लागला होता. एक आगगाडी लखनौहून निघून सहराणपूरकडे निघाली. त्या गाडीत शहाजापूर स्टेशनवर काही तरुण चढले. काहीजण दुसऱ्या वर्गाच्या डब्यात व काहीजण तिसऱ्या वर्गाच्या डब्यात घुसले. गाडी हलली. थोड्याच वेळात तिने वेग पकडला व ती काकोरी स्टेशनाच्या रोखाने धावू लागली. इतक्यात गाडीतील धोक्याच्या वेळची साखळी ओढली गेली. गाडीचा वेग कमी कमी होत जाऊन गाडी थांबली. साखळी कोणी ओढली

हे पाहण्यासाठी आगगाडीचा गार्ड डब्यातून खाली उतरला. इतक्यात बंदुकीचे बार होऊ लागले. एका पिस्तुलधारी माणसाने गार्डवर पिस्तूल रोखून त्याला जमिनीवर गुपचूप पडून राहण्यास फर्मावले. गाडीच्या दोन्ही बाजूंनी काही शस्त्रधारी बंदुकीचे बार काढून कोणीही गाडीच्या बाहेर पडू नये असे लोकांना बजावत होते. रात्रीचा अंधार व अनपेक्षितपणे झालेला हल्ला ह्यामुळे गाडीतील प्रवाशांचीच काय पण रेल्वेच्या डब्यात खजिन्याच्या रक्षणासाठी असलेल्या हत्यारबंद हिंदी व गोऱ्या शिपायांची देखील भीतीने गाळण उडून गेली. गाडीवर हल्ला करणाऱ्यांची संख्या किती आहे हे अंधारामुळे कळणे शक्य नव्हते. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने डब्यात गुपचूप बसून राहाण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. हल्लेखोरांपैकी काहीजण ज्या डब्यात रेल्वेच्या पैशांच्या पेट्या व पिशव्या होत्या त्या डब्यात चढले. त्यांनी त्या डब्याच्या खाली लोटून दिल्या. तिजोरी घणाने फोडली. सर्व ऐवज घेऊन ते हल्लेखोर अंधारात पसार झाले.

खजिना लुटण्याचे काम क्रांतिकारकांचेच असले पाहिजे, असे सरकारला वाटले. त्या दृष्टीने लखनौ, शहाजहापूर इ. ठिकाणी गुप्त पोलिसांच्या चौकशा सुरू झाल्या. खजिना-लुटीत चोरीस गेलेल्या काही भारी किंमतीच्या नोटा शहाजहापूरच्या व्यापारी पेठेत आढळून आल्या. त्यावरून चौकशीची चक्रे फिरून क्रांतिकारकांची धरपकड सुरू झाली. बनवारीलाल ह्या नावाचा एक क्रांतिकारक होता. तो सरकारला फितूर झाला. त्याने हल्ल्याची सर्व हकीगत सरकारला पुरविली. त्या माहितीच्या आधारे सरकारने काकोरीजवळ रेल्वेवर हल्ला करणारे हल्लेखोर पकडण्यास सुरुवात केली.

पं. रामप्रसाद बिसमिल ह्यांना शहाजहापूर येथे त्यांच्या घरी पकडण्यात आले. त्यानंतर रामचंद्र लाहिडी व ठाकूर रोशनसिंग यांना पकडण्यात आले. भगतसिंग, चंद्रशेखर आजाद व अशफाक उल्लाखाँ हे भूमिगत झाल्याने सरकारला सापडू शकले नाहीत. सापडलेल्या हल्लेखोरांवर सरकारने खटला भरला. हा खटला काकोरी कटाचा खटला म्हणून प्रसिद्ध आहे.

रामप्रसादाचे गाव ग्वाल्हेरजवळ होते. उद्योगधंद्यानिमित्त त्यांचे आजोबा लखनौजवळ शहाजहापूरला आले. तेथेच रामप्रसादाचे उर्दूचे शिक्षण झाले. त्यानंतर ते माध्यमिक शिक्षण घेत असताना त्यांच्याघर आर्य समाजी

पुढे त्यांच्या त्यागी जीवनाचा फार प्रभाव पडला. भाई परमानंदासारख्या त्यागी, सच्छील व थोर विचारवंतांना सरकारने गदर चळवळीत हेतुपुरःसर अडकवून काळ्या पाण्यावर अंदमानला पाठविले. ह्या विचाराने रामप्रसादांच्या मनात सरकारबद्दल असंतोष निर्माण झाला. सरकारची सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारकांत ते सामील झाले. गेंदालाल दीक्षित ह्या नावाचे एक मुख्याध्यापक होते. त्यांनी मातृदेवी नावाची क्रांतिसंस्था काढली होती. पं. गेंदालाल हे लो. टिळकांचे भक्त होते. ते विद्यार्थ्यांना इंग्रजाविरुद्ध उठावणी करण्याचे शिक्षण देत. त्यामुळे त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. ह्यास्तव त्यांनी स्वतःची राष्ट्रीय शाळा काढली. त्यानंतर क्रांतिकारकांसाठी शस्त्रे घेण्यासाठी, पैसा मिळविण्याकरिता गेंदालाल दीक्षित व त्यांचे अनुयायी दरवडे घालू लागले. रामप्रसाद व काकोरी-कटातील रामप्रसादांचे एक सहकारी मुकिंदीलाल हे दोघेही पं. गेंदालालांचे शिष्य असून त्यांच्या संघटनेत काम करीत असत.

पं. गेंदालाल ह्यांना ब्रह्मचारीजी नावाच्या लष्करातील गृहस्थांचे त्यांच्या कार्यात फार साह्य झाले. ब्रह्मचारीजी, पं. गेंदालाल व इतर सहकारी मैनपुरीच्या जंगलात असताना हिंदुसिंह ह्या नावाच्या माणसाने विश्वासघात करून सरकारला त्यांच्या हालचालींची माहिती कळविली. एवढेच नव्हे तर देवाचा अंगारा म्हणून विषमिश्रित राखेच्या पुड्या हिंदुसिंहाने त्यांना खाण्यास दिल्या. हिंदुसिंह हा इंग्रजांचा हेर असून क्रांतिकारकांच्या बातम्या काढण्यासाठी त्यांच्या गोटात शिरला होता. ही गोष्ट लक्षात येताच त्याला पुढे ब्रह्मचारीजींनी गोळ्या घालून ठार केले. हिंदुसिंहाने पुरविलेल्या बातमीनुसार ५०० पोलिसांनी मैनापूरच्या जंगलाला वेढा दिला. क्रांतिकारकांनी चांगलीच झुंज दिली. ३५ पोलीस ठार झाले. ब्रह्मचारीजी मारले गेले. गेंदालालना पकडण्यात आले. पुढे त्यांनी माफीचा साक्षीदार होण्याचा बहाणा केला व ते तुरुंगातून निसटले. बाहेर कोणीच थारा देईना, म्हणून नाव बदलून आजारपणात ते दिल्ली येथे गेले. तेथेच हॉस्पिटलमध्ये ते मरण पावले. रामप्रसाद ह्या हल्ल्यातून निसटले व नेपाळ येथे जाऊन जंगलात राहिले. काही दिवसांनंतर वातावरण शांत झाल्यावर ते परत आपल्या गावी आले. उदरनिर्वाहासाठी काही तरी उद्योग करण्यासाठी ते रेशमाचे विणकाम करू लागले.

ह्या धंद्यात त्यांचे मन रमेना. हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन ह्या क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेत ते सामील झाले. रामप्रसाद हे कवी व लेखक होते. 'बिस्मिल' ह्या नावाने ते कविता प्रसिद्ध करीत असत. ते निर्व्यसनी होते मीठ देखील खात नसत. व्यायाम करून त्यांनी शरीर कमविले होते. अंगचे गुण व उमदे व्यक्तिमत्त्व ह्यांच्या योगाने ओघानेच संघटनेचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. काकोरीजवळ रेल्वे खजिन्यावर झालेला हल्ला त्यांच्याच नेतृत्वाखाली झाला.

रामप्रसाद, राजेंद्र लाहिडी, ठाकूर रोशनसिंह इत्यादी क्रांतिकारक कैद्यांना लखनौच्या तुरुंगात ठेवले होते. तेथून निसटून जाण्याची संधी आली असतानाही रामप्रसादांनी ती सोडून दिली. रामप्रसादांची सोज्वळ वागणूक व पूजा-अर्चा ह्यामुळे तुरुंगातील शिपाई व अधिकारी त्यांच्यावर प्रेम करीत असत. आपल्या पळून जाण्याने त्या बिचाऱ्यांना विनाकारण त्रास होईल ह्या विचाराने तुरुंगातून निसटून जाण्याच्या संधीवर त्यांनी पाणी सोडले.

काकोरी कटाच्या खटल्यात रामप्रसाद बिसमिल, राजेंद्र लाहिडी, ठाकूर रोशनसिंह ह्यांना फाशीची शिक्षा सांगण्यात आली. मन्मथ गुप्त, सचींद्रनाथ संन्याल, रामकृष्ण खत्री, मुकिंदीलाल ह्यांना दहा ते चौदा वर्षे मुदतीच्या शिक्षा झाल्या. काहींना ३ ते ७ वर्षांच्या शिक्षा झाल्या.

रामप्रसादांना फाशीची शिक्षा सांगण्यात आल्याचे ऐकून त्यांची आई त्यांना भेटण्यास आली. आईला पाहताच रामप्रसादांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ते पाहून ती वीरमाता त्वेषाने म्हणाली, "माझ्या शूर मुलाला इंग्रज लोक चळचळा कापत होते, हे ऐकून माझी छाती अभिमानाने भरून येत होती. परंतु तोच माझा मुलगा आता मरणाला भिऊन रडत आहे, हे पाहून मला चीड आली आहे." त्यावर बिस्मिल म्हणाले, "या मरणाला पाहून माझं फत्तरासारखं काळीज डरत नाही. परंतु तुझी प्रेमळ मूर्ती यापुढे माझ्या डोळ्यांना दिसणार नाही, ह्या दुःखामुळे डोळे भरून आले."

दिनांक १९ डिसेंबर १९२७ रोजी रामप्रसाद, ठाकूर रोशनसिंह यांना व १७ डिसेंबर रोजी राजेंद्र लाहिडींना फाशी दिले. वंदे मातरम् म्हणत ते वधःस्तंभावर चढले.

* * *

२६. पठाण युवकाचे इमान

(अशफाकउल्लाखां)

रामप्रसाद बिस्मिल ह्यांनी मैनापुरी येथे झडलेल्या रणसंग्रामांत ब्रह्मचारीजी व पं. गेंदालाल दीक्षित यांच्या खांद्याशी खांदा लावून इंग्रज सैन्याबरोबर झुंज दिली. त्या झुंजीत ब्रह्मचारीजी मारले गेले. गेंदालाल पकडले गेले व क्रांतिकारकांची हार झाली. तथापि त्या धरपकडीत इंग्रजांच्या



हातावर तुरी देऊन रामप्रसाद निसटले. ते नेपाळांत जाऊन अज्ञातवासांत राहिले. त्यानंतर त्यांना पकडण्यासंबंधीचे वॉरंट सरकारने मागे घेतले. हे कळाल्या नंतर रामप्रसाद परत शहाजहापूर ह्या गांवी आले. उदरनिर्वाहासाठी ते रेशमी कापडाच्या विणकामाचा धंदा करू लागले.

एके दिवशी एक पठाण विद्यार्थी त्यांच्याकडे आला. त्याला रामप्रसादांच्या साहसी जीवनाबद्दल फार आदर वाटत होता. त्याने जिज्ञासेने रामप्रसादांना मैनपुरीच्या संग्रामासंबंधी कांही माहिती विचारली. एक यःकश्चित शाळकरी मुलगा आणि तोही मुसलमान धर्माचा. भलत्याच भयंकर स्वरूपाच्या विषयांची माहिती आपणास विचारीत आहे, ही गोष्ट राम-प्रसादांना आवडली नाही. एक तर मैनापूरचे प्रकरण म्हणजे एक धगधगता अंगार होता. तो धगधगता निखारा आतां काळाच्या ओघाबरोबर परिस्थितीच्या राखेखाली झाकला गेला होता. त्याच्यावर एका अजाण मुसलमान पोराने फुंकर घालणे रामप्रसादासारख्या कट्टर आर्यसमाजी क्रांतिकारकाला आवडणे शक्य नव्हते. कारण आर्यसमाजाच्या शुद्धीकरणाच्या धोरणामुळे आर्यसमाजी मंडळी व मुसलमान ह्यांचे हाडवैर होते. अशा वस्तुस्थितीमुळे त्या पठाण

मुलाच्या विचारपूसकडे रामप्रसादजींनी संशयी दृष्टीने पाहणे साहजिकच होते. म्हणून त्यांनी त्या मुलाच्या जिज्ञासेला जुजबी उत्तरे देऊन त्याला वाटेला लाविले.

त्या मुलाचे नाव होते अशफाकउल्लाखाँ. त्याचा जन्म शहाजहापूर येथे एका उमराव पठाण कुटुंबात झाला होता. विद्यार्थिदशेत असतानाच अशफाकउल्लाखाँचा ओढा क्रांतिकार्याकडे लागला. रामप्रसादांच्या बहादुरी-विषयी अशफाकउल्लाखाँ ह्यांनी बऱ्याच गोष्टी ऐकल्या होत्या. म्हणूनच त्यांच्यासंबंधी तरुण अशफाकला जबरदस्त आकर्षण वाटत होते. त्याने काही दिवसांतच रामप्रसादांचा विश्वास संपादन केला व हलके हलके तो क्रांतिकारकांच्या हालचालींत भाग घेऊ लागला. स्वतःच्या सच्च्या वागणुकी-मुळे तो रामप्रसादांचा जिवलग मित्र बनला.

एकदा शहाजहापूरमध्ये हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाला. तो दंगा शमविण्यासाठी अशफाकउल्लाखाँ ह्याने फार प्रयत्न केले. त्याच्या ह्या वृत्तीमुळे काही कडव्या मुसलमानांना तो हिंदुधार्जिणा आहे, असे वाटू लागले होते. अशफाकउल्लाखाँ ह्याचे अंतःकरण देशप्रीतीने उचंबळत होते. तसेच त्याच्या विचारांची झेप जाति-धर्माच्या संकुचित वर्तुळाचा छेद करून पलीकडे गेली होती. ह्या गोष्टीची रामप्रसादांना इतकी खात्री पटली की, काही वेळा ते दोघे एकाच थाळीत जेवले. रामप्रसादांवर अशफाकउल्लाखाँचा किती जीव होता, हे पुढील प्रसंगावरून दिसून येते.

एकदा अशफाक फार आजारी होता. त्या वेळी रामप्रसाद बाहेरगावी गेले होते. त्यांच्या भेटीसाठी अशफाक फार तळमळत होता. तापात तो एक-सारखा ' राम, राम ' असे बडबडत होता. हा मुसलमान असून ' अल्ला अल्ला ' म्हणण्याच्या ऐवजी ' राम, राम ' का म्हणतो हे कोडे लोकांना उकलेना. जेव्हा रामप्रसाद त्याला भेटले तेव्हा त्याचे ' राम राम ' म्हणणे बंद झाले. त्याचा राम डोळ्यांना दिसला. लगेचच तोंडाचा राम बंद झाला. अशफाकउल्लाखाँ रामप्रसादांना ' राम ' ह्या नावाने हाक मारीत असे.

काकोरी स्टेशनजवळ आगगाडीतील खजिना लुटण्याच्या योजनेला अशफाकउल्लाखाँचा विरोध होता. कारण त्या ठिकाणाजवळच रामप्रसादांचे व त्यांचे गाव होते. म्हणून तो प्रसंग त्यांच्या अंगावर बेतण्याचा संभव होता.

परंतु रामप्रसाद, चंद्रशेखर आजाद इत्यादी ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी खजिना लुटण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय जरी आपल्या मनाच्या विरुद्ध असला तरी सेनापतींचा तो निर्णय अशफाकउल्लाखांनी मनोभावे करून मानला. आगगाडीच्या डब्यातून ती जड तिजोरी त्यांनीच बाहेर लोटली आणि घणाचे घाव घालून ती फोडण्यास मुकुंदीलाल ह्यांना त्यांनीच साह्य केले. लालबुंद चेहऱ्याचा हा पठाण मुलगा बांध्याने उंच व शरीराने दुहेरी हाडाचा होता. एखाद्या उमद्या युवराजाप्रमाणे त्याचे व्यक्तिमत्त्व लोभस व आकर्षक होते.

काकोरी कटाचा छडा पोलिसांना लागला. धरपकड सुरू झाली. रामप्रसादांना पकडले त्या वेळी अशफाकउल्लाखांच्या घरावरही पोलिसांची धाड गेली. परंतु त्यांना हात हलवीत जावे लागले. परिस्थितीचा रागरंग पाहून अशफाकउल्लाखां गावाजवळील उसाच्या शेतात लपले होते.

बनारस येथे क्रांतिकारकांचा महत्त्वाचा अड्डा होता. अशफाकउल्लाखां तेथे गेले. परंतु तेथील कार्यकर्ते पकडले गेल्याचे त्यांना कळले. मग ते काशी हिंदू विद्यापीठात गेले. तेथील काही मित्रांच्या सल्ल्यावरून व सहकार्याने ते बिहारात गेले. तेथे नाव व वेष बदलून ते राहू लागले. आपण कायस्थ प्रभू असून मथुरा जिल्ह्यातील रहिवासी आहोत, असे सांगून ते एका कचेरीत कारकून म्हणून काम करू लागले.

अशफाकउल्लाखांचे आतापर्यंतचे जीवन म्हणजे नंग्या समशेरीच्या तळपत्या फेकीप्रमाणे होते. कचेरीतील कारकुनी जीवनात त्या खळखळत्या-सळसळत्या जीवाला कोंडून गुदमरल्यासारखे वाटू लागले. नऊ-दहा महिन्यांतच त्यांना त्या जीवनाचा उबग आला. कोणत्या तरी मार्गाने ती कोंडी फोडून परदेशात जाण्याचा बेत त्यांनी आखला. त्यासाठी ते दिल्लीस गेले.

अशफाकउल्लाखां, चंद्रशेखर आजाद इत्यादी काकोरी-प्रकरणातील हल्लेखोर भूमिगत झाले होते. त्यांना पकडून देण्यासाठी सरकारने हजारो रुपयांची बक्षिसे लाविली होती. अशफाक दिल्ली येथे एका पठाण मित्राच्या खोलीत उतरले होते. तो मित्र स्थापत्यशास्त्राच्या (इंजिनिअरिंग) महाविद्यालयात शिकत होता. अशफाकउल्लाखानने रात्री त्या मित्राबरोबर एका उपाहारगृहात भोजन केले व नंतर मित्राचा निरोप घेऊन ते एका ठरलेल्या ठिकाणी झोपण्यास

* * *

मोठे. पहाटेच त्या ठिकाणी पोलिस गेले व त्यांनी त्याला पकडले. मित्राने घात केला. बक्षिसाच्या लालचीने मित्राला दगा दिला.

अशफाकउल्लाखांना पकडल्यावर त्यांच्यावरील खटला सुरू झाला. तुरुंगात इंग्रजांनी अशफाकउल्लाखांकडे एका मुसलमान पोलीस सुपरिंटेंडेंटला पाठविले. नोकरीत बढती मिळविण्यासाठी इंग्रजांच्या सांगण्यावरून स्वतःच्या जातभाईशी देखील निमकहरामीपणा करण्यात तो कचरला नव्हता. अशफाकउल्लाखांना विश्वासात घेऊन क्रांतिकारकांच्या हालचालीसंबंधाने अधिक माहिती मिळवण्याची कामगिरी त्याच्याकडे सोपविण्यात आली होती. "हे हिंदू लोक हिंदूंचे राज्य आणण्यासाठी धडपडत आहेत. तुझ्यासारख्या मुसलमान तरुणांनी त्यांच्या जाळ्यात सापडू नये." सहानुभूतीचा आव आणून तो अधिकारी अशफाकच्या अंतःकरणाचा ठाव घेऊ लागला. "हिंदूंचे जरी राज्य आले तरी ते ब्रिटिशांच्या राज्यापेक्षा निश्चितच चांगले राहील. "हिंदू राज किसी भी तरह ब्रिटिश राजसे अच्छा ही होगा!" त्यावर त्या अधिकाऱ्याने मानभावीपणाने त्यांना असा सल्ला दिला की, जर त्यांनी सरकारकडे माफी मागितली तर सरकार त्यांना दया दाखवील. त्यावर तो बाणेदार तरुण उत्तरला, "एका अल्लाशिवाय कोणापुढेही दयेची भीक मागणे मी पाप व लाचारी समजतो."

अशफाकउल्लाखांना फाशीची शिक्षा झाली. त्यांना दि. १९ डिसेंबर १९२७ रोजी फैजाबाद तुरुंगात फाशी देण्यात आले.

अशफाकउल्लाखां उर्दू भाषेत सुंदर कविता करीत असत. वंदे मातरम् म्हणून स्वतःची कविता म्हणत ते फासावर चढले.

सुनाएं गम की किसे कहानी,
हमे तो अपने सता रहे हैं।
हमेशा सुबेह-शाम दिल पर
सितमके खंजर चला रहे हैं।
न कोई इंग्लिश, न कोई जर्मन,
न कोई रशियन, न कोई तुर्की।
मिटाने वाले है अपने हिंदी,
जो आज हम को मिटा रहे हैं।

* * *

२७. असेंब्लीत बॉम्ब

(भगतसिंह, दत्त, राजगुरू, सुखदेव)

दिल्लीच्या असेंब्ली गृहात असेंब्लीची बैठक भरली होती. सरकारने 'सार्वजनिक सुरक्षितता' बिल (पब्लिक सेफ्टी बिल) सभागृहापुढे ठेविले होते. क्रांतिकारकांच्या दहशतवादी चळवळीमुळे संतापलेल्या सरकारने चळवळीचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने हे बिल सभागृहाच्या मंजुरीसाठी सभागृहापुढे ठेविले होते. त्या बिलास सभागृहाची मंजुरी मिळाली असती, तर त्याच्या आधारे सरकारने क्रांतिकारकांच्या नावाखाली निरपराधी जनतेवर देखील जुलूम केला असता. म्हणून सभागृहातील हिंदी सभासद त्या बिलास मंजुरी देईनात. सभागृहातील इंग्रज सभासद बिलास अनुकूल होते. शेवटी बिलास अनुकूल व प्रतिकूल असणाऱ्या सभासदांची मतमोजणी करता ती समसमान भरली. असेंब्लीचे सभापती श्री. विठ्ठलभाई पटेल (सरदार वल्लभभाई पटेलांचे बंधू) हे होते. सरकारच्या रोषाची पर्वा न करता ते आपले मत बिलाच्या विरुद्ध बाजूस देण्यासाठी उभे राहिले.

आणि सभागृहात एक मोठा स्फोट झाला. सभागृहाच्या भिंती हादरल्या. त्या भयंकर आवाजाने सभागृहातील माणसांच्या कानठळ्या बसून गेल्या. सभागृहाची इमारत दाट धुराने भरून गेली. सारे लोक भांबावून गेले. काय झाले हे कोणालाच समजेना. इतक्यात प्रेक्षकांच्या जागेतून दोन तरुण पुढे आले. त्यांच्या हातात पिस्तुले होती व 'इन्किलाब झिंदाबाद !' (क्रांतीचा जयजयकार !) 'वंदे मातरम्', 'साम्राज्यशाहीचा नाश होवो !' अशा घोषणा ते देत होते. तांबड्या रंगाच्या हस्तपत्रिका ते सभागृहात उधळीत होते. त्या तांबड्या हस्तपत्रिकांत मजकूर होता—"आम्ही मनुष्याच्या जीवनाला पवित्र समजतो, आम्ही असा उज्ज्वल भविष्यकाल पाहू इच्छितो की, ज्यांच्यात हर एक व्यक्तीला स्वातंत्र्य, सुरक्षितता व प्रगतीचा अवसर मिळेल. मनुष्याचा रक्तपात करण्यात आम्हाला दुःख होत आहे. तथापि क्रांतीच्या द्वारे सर्वांना स्वातंत्र्याची समान संधी देणे व काही माणसांकडून इतर माणसांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी काही प्रमाणात रक्तपात होणे अनिवार्य आहे. असे

असले तरी, माणुसकीबद्दल आदर दाखविण्यात व मानवतेवर प्रेम करण्यात आम्ही कोणापेक्षाही कमी नाही. ''

सभागृहातील धूर निवळल्यावर हातात पिस्तुले असलेल्या त्या दोन तरुणांपैकी एकजण अवेशाने बोलू लागला, " बॉम्बच्या योगाने कोणाला ठार मारण्याचा आमचा उद्देश नाही. तसे नसते तर आम्ही तो बॉंब माणसांच्या ऐवजी सभागृहातील मोकळ्या जागेत टाकला नसता. आम्ही करू तो जुल्म प्रजा सोसते म्हणून काही कझिनछाप अधिकारी राष्ट्राची छकले करण्यासाठी पुढे धावतात. तशा मदांध अधिकाऱ्यांच्या कानी त्रस्त प्रजेच्या आर्त किंकाळ्या



भगतसिंह बटुकेश्वर दत्त

पोहोचूच शकत नाहीत. अशा बेगुमान अधिकाऱ्यांचे कान खोलण्यासाठी आम्हाला बॉम्बचे आवाज काढावे लागतात.'' असे म्हणून त्याने हातातील पिस्तूल जमिनीवर फेकून दिले. त्या तरुणाचे नाव होते भगतसिंह व त्याच्या साथीदाराचे नाव होते बटुकेश्वर दत्त. भगतसिंह व दत्त ह्यांनी शस्त्रे फेकून दिल्यानंतरच पोलिस त्यांना पकडू शकले. ८ एप्रिल १९२९ रोजी ही घटना घडली.

भगतसिंहांचा जन्म ५ ऑक्टोबर १९०७ रोजी पंजाब प्रांतात झाला. वडिलांचे नाव किसनसिंग. आईचे नाव विद्यावती. त्यांचे दोन चुलते व वडील

ह्यांना इंग्रज राजवटीविरुद्ध चळवळ केल्यामुळे कारावासाची शिक्षा भोगावी लागली होती. अशा देशभक्त कुटुंबात जन्मल्यामुळे बालपणापासूनच भगतसिंहांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले होते. लाहोर येथील नॅशनल महाविद्यालयात शिकत असतांना भगवतीचरण व्होरा, सुखदेव, यशपाल ह्या विद्यार्थ्यांशी त्यांची मैत्री जडली. नौजवान सोसायटी काढून त्यांनी पंजाबात क्रांतिकार्याला सुरुवात केली. त्यांनी कर्तारसिंग बागींची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणावर साजरी केली. कर्तारसिंहांच्या फोटोला स्वतःची करंगळी कापून त्या रक्ताचा टिळा दुर्गादेवी व्होरा यांनी लाविला. पदवीधर झाल्यानंतर त्यांचा विवाह ठरविण्याचा विचार त्यांच्या वडिलांच्या मनात घोळू लागला. भगतसिंहांना देशकार्य करण्याच्या मार्गात विवाहबंधन नको होते. म्हणून ते घर सोडून गुपचूपपणाने कानपूरला निघून गेले. स्वतःचा पत्ता घरच्या माणसांना लागू नये, म्हणून ते नाव बदलून वृत्तपत्रातून लेख लिहीत असत. कॉंग्रेसचे पुढारी गणेश शंकर विद्यार्थी यांनी काही दिवस त्यांना वृत्तपत्राचे संपादक म्हणून काम दिले व त्यानंतर एका शाळेचे मुख्याध्यापक म्हणून नेमणूक केली. भगतसिंहांना फाशी दिल्यानंतर देशभर मोठा हरताळ पडला. कानपूरला मुसलमान व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली नाहीत म्हणून हिंदु-मुसलमानांचा दंगा सुरू झाला. ग. शं. विद्यार्थी हे थोर गृहस्थ दंगा थमविण्याचा प्रयत्न करू लागले. एकाने विश्वासाने त्यांना घरात बोलावून त्यांना ठार मारले. त्यानंतर चंद्रशेखर आझाद, सचींद्रनाथ सन्याल, रामप्रसाद बिस्मिल इत्यादी क्रांतिकारकांशी संबंध येऊन त्यांची मैत्री जमली. सचींद्रनाथ सन्याल यांनी इ. स. १९२२ मध्ये 'हिंदुस्तान रिपब्लिक असोसिएशन' नावाची संस्था काढली होती. शस्त्रांचा वापर करून इंग्रजांची राजवट उलथून टाकण्याचे ह्या संस्थेचे ध्येय होते. ह्या संस्थेच्या शाखा संयुक्त प्रांत, पंजाब व बंगाल या प्रांतांत होत्या. शाळा कॉलेजातील तरुण लोक या संस्थेस येऊन मिळाले होते. शस्त्रे विकत घेण्यासाठी व बॉम्ब बनविण्यासाठी पैसा उपलब्ध व्हावा, म्हणून ते तरुण सरकारी खजिना व बॅंक लुटीत. इ. स. १९२१ मध्ये महात्मा गांधींनी असहकारितेची चळवळ पुकारली. असहकारितेच्या चळवळीच्या योगाने 'एक वर्षात स्वराज्य मिळवून देतो' असे गांधीजींनी जनतेला सांगितले होते. सरकारची दडपशाही व असहकारितेच्या चळवळीत चौरीचुरा येथे

५-२-१९२२ मध्ये जनतेने पोलिसांची हिंसा करून असहकारितेच्या अहिंसामय चळवळीस गालबोट फासले. ह्यामुळे गांधीजींनी असहकारितेची चळवळ थांबविली १२-२-२२. अशा प्रकारच्या वैफल्याच्या परिस्थितीत देशातील तरुण परत सशस्त्र चळवळीकडे वळले.

इंग्रजांना देशातून घालवून द्यावयाचे एवढेच ध्येय, आतापर्यंत क्रांतिकारकांच्या पुढे होते. परंतु भगतसिंहांनी त्यांना नवी दृष्टी दिली. त्यांचे सांगणे असे होते की, इंग्रजांची सत्ता देशातून घालवून देणे ही क्रांतीची पहिली पायरी. त्यानंतरची पायरी म्हणजे राज्यकारभारासाठी देशातीलच कोणा एखाद्या व्यक्तीच्या अथवा गटाच्या हाती सत्ता जाऊ न देता समाजवादी (साम्यवादी) प्रजासत्ताकाची उभारणी करणे ही होय. या ध्येयानुसारच त्यांनी क्रांतिकारकांच्या मूळच्या 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' ह्या नावात सोशालिस्ट (समाजवादी) ह्या शब्दाची भर घालून संस्थेचे नाव 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक आर्मी' असे ठेवण्यात आले. असोसिएशन (समिती) ऐवजी आर्मी (सैन्य) असाही फरक करण्यात आला. असेंब्लीत बॉम्ब टाकल्यानंतर जी लाल पत्रके फेकण्यात आली त्यांच्यातील मजकूर व पुढे न्यायालयात केलेले भाषण, ह्यावरून भगतसिंहांच्या राजकीय विचारांची कल्पना येते. सशस्त्र क्रांतिकारक म्हणजे, इंग्रजांचा रक्तपात करणारे व बॉम्ब गोळे उडविणारे कोणी अविचारी माथेफिरू तरुण होते, असा गैरसमज होऊ नये म्हणूनच येवढ्या विस्ताराने त्या मंडळींच्या विचाराची बैठक विशद केली आहे. इतक्या लहान वयात व राज्ययंत्रणेचा काहीही अनुभव नसता भारताच्या आजच्या राज्ययंत्रणेचे चित्र भगतसिंहांच्या मनःचक्षूसमोर स्पष्ट स्वरूपात तरळत होते, हे पाहून कौतुक वाटते. भगतसिंह म्हणजे समाजवादी प्रजातंत्र राज्यपद्धतीचा अग्रदूतच होत.

असेंब्लीत भगतसिंहाने जे पिस्तुल फेकून दिले होते, त्यावरून सरकारने भगतसिंहाचा संबंध सॉंडर्सच्या वधाशी जोडला. सॉंडर्सचा बळी घेतलेल्या पिस्तुलाच्या गोळीचा आकार त्या पिस्तुलाशी जुळला. शिवाय सॉंडर्सचा वध झाल्यावर 'सॉंडर्स मारा गया, लालाजीकी मृत्यू का बदला ले लिया गया' ह्या मजकुराचे जे पत्रक सापडले, त्यातील हस्ताक्षराशी भगतसिंहाचे हस्ताक्षर जुळले. सॉंडर्सच्या वधाची हकिगत अशी :

हिंदुस्थानातील सरकारविरोधी चळवळी शमविण्यासाठी हिंदी लोकांना राज्यकारभारात काही अधिकार देण्याचा विचार ब्रिटिश सरकारने ठरविला. तेवढ्यासाठी सायमन नावाच्या साहेबाच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक कमिशन (समिती) भारतात पाठविले. कमिशनमध्ये एकही भारतीय सभासद नव्हता. हे कमिशन नेमून सरकार नेहमीच्या धोरणानुसार भारतीय जनतेला कोणतेही राजकीय हक्क देणार नाही, अशी हिंदी जनतेची पक्की खात्री झाली. ह्या कमिशनची नेमणूक करणे म्हणजे हिंदी जनतेच्या डोळ्यांत धूळफेक करण्यासारखे होते. ह्यास्तव जनतेने सायमन कमिशनवर बहिष्कार टाकला. लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी ज्या ज्या शहरी हे कमिशन गेले त्या त्या शहरी जनतेने प्रचंड मोर्चे, मिरवणुका काढून ' सायमन, परत जा ' ह्या आरोळ्यांत त्या कमिशनचे स्वागत केले. सायमन कमिशन दि. ३० ऑक्टोबर १९२८ रोजी लाहोर येथे गेले. पंजाबचे प्रसिद्ध पुढारी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली एक प्रचंड मिरवणूक निघाली. हातात काळी निशाणे घेतलेले व ' सायमन, परत जा '. अशा घोषणा देणाऱ्या हजारो लोकांचा तो मोर्चा चालला होता. अग्रभागी लाला लजपतराय चालले होते. मोर्चामुळे स्कॉट ह्या इंग्रज जिल्हा पोलीस अधिकाऱ्याचे (डिस्ट्रिक्ट पोलीस सुपरिंटेंडेंट) माथे भडकले. मोर्चावर लाठीहल्ला करण्याचा त्याने पोलिसांना हुकूम दिला. एवढेच नव्हे तर लाला लजपतराय ह्यांच्या छातीवर स्वतः जोरजोराने ठोसे लगावले. त्या दुखापतीमुळे लालाजी थोड्याच दिवसांनी दि. १७-११-१९२८ रोजी निधन पावले. स्कॉट ज्या वेळी लालाजींच्या छातीवर मुठीने प्रहार करीत होता त्या वेळी लालाजी म्हणाले होते. " माझ्या छातीवर मारलेला प्रत्येक ठोसा म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या शवपेटिकेला ठोकलेला खिळा ठरणार आहे." लालाजींची भविष्यवाणी खरी ठरली.

लालाजींचा त्याग, विद्वत्ता व देशसेवा ह्यामुळे ते जनतेच्या गळ्यातील ताईत बनले होते. जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लालाजींचा बळी घेतला, ह्यामुळे सरदार भगतसिंह, चंद्रशेखर आझाद इत्यादी क्रांतिकारकांची मस्तके संतापाने पेटून गेली. लालाजींच्या मृत्यूचा सूड घेण्याचे त्यांनी ठरविले. जयगोपाळ ह्या साथीदाराला त्यांनी स्कॉटच्या हालचालीवर नजर ठेवण्यास

सांगितले. त्याने पुरविलेल्या माहितीवरून १७ डिसेंबर १९२८ हा दिवस स्कॉटला मारण्यासाठी ठरविण्यात आला. भगतसिंह, चंद्रशेखर आझाद, शिवराम हरी राजगुरू हे तिघे भरलेली पिस्तुले खिशात घालून पोलीस कचेरीजवळ थांबले. (राजगुरू हे पुणे जिल्ह्यातील खेडचे राहणारे. संस्कृत शिकण्यासाठी काशीस गेले. तेथेच आझादही संस्कृत शिकत होते. त्यांच्या मैत्रीमुळे राजगुरू क्रांतीकारकांच्या संघटनेत सामील झाले.) पोलीस कचेरीतून एक गोरा अधिकारी बाहेर आला व मोटार सायकलवर बसू लागला. जयगोपालने इशारा केला. लगेच राजगुरूने खिशातून पिस्तुल काढून त्या गोऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर गोळी झाडली. गोळी पायाला लागून तो खाली पडला. भगतसिंहांनी त्याच्यावर झडप घालून आणखी गोळ्या झाडून त्याला यमसदनाला पाठविले. लगेच सायकलीवर स्वार होऊन ते वाऱ्याच्या वेगाने निघाले. चरणसिंग नावाचा पोलिस त्यांचा पाठलाग करू लागला. चंद्रशेखरांनी मागे वळून त्याच्यावर गोळी झाडून त्याला ठार केले. ते तिघेजण नंतर डी. ए. व्ही. महावीरसिंग ह्या क्रान्तिकारकाने भगतसिंग व राजगुरू



शिवराम राजगुरू



त्यांना मोटारीतून दूर नेले. कॉलेजच्या वसतिगृहात सायीदार मित्राकडे गेले व तेथून पसार झाले.

डोक्यावरचे लांब केस इंग्रजी पद्धतीने कापून घेऊन व इंग्रज गृहस्थासारखा उंची पोषाख करून भगतसिंह एके रात्री कलकत्त्यास जाणाऱ्या आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात बसले. ह्या वेषांतरित साहेबाने स्वतःबरोबरच आपल्या सुंदर मेमसाहेबलाही घेतले होते. ही तरुण स्त्री म्हणजे क्रांतिकारकांचीच सहकारी व प्रसिद्ध क्रांतिकारक भगवतीचरण व्होरा यांची क्रांतिकारक धाडसी पत्नी दुर्गादेवी व्होरा ही होती. तिच्या समवेत तिचा छोटा मुलगा शचीनही होता. राजगुरू हा त्या अद्ययावत पोषखातील साहेबाचा 'अर्डली' (नोकर) बनला होता. अशा रीतीने भगतसिंह व राजगुरू लाहोर येथील नाटकातील प्रवेश संपवून कलकत्ता येथील प्रवेशात दाखल झाले.

दुसरीकडे एक धष्टपुष्ट पंड्या काही म्हाताऱ्या यात्रेकरूंची दिंडी घेऊन मथुरेच्या मार्गाला लागला होता. तो पंड्या होता चंद्रशेखर आझाद; मात्र स्कॉट समजून जो अधिकारी ठार मारण्यात आला तो स्कॉटचा मदतनीस (असि. सुपरिंटेंडेंट) सॉंडर्स हा होता. इशारा करणाऱ्या जयगोपालने त्यालाच स्कॉट समजून इशारा केला. असेंब्लीत बॉम्ब टाकल्याबद्दल काळया पाण्याची व सॉंडर्सच्या वधाबद्दल देहान्ताची शिक्षा भगतसिंह, बटुकेश्वर दत्त व राजगुरू यांना सांगण्यात आली.

दर्शनी उमदेपणाप्रमाणेच भगतसिंहाचे अंतरंगही उमदे होते. त्यांना वाचनाची फार आवड होती. काव्य, संगीत, विनोद, चित्रपट ह्यांच्यात ते नेहमी दंग असत. त्यांना चित्रपट पाहाण्याची एवढी आवड होती की, त्यांचे सहकारी थट्टेने म्हणायचे की, 'रणजित' हा पोलिसांना चित्रपटगृहातच सापडला जायचा. त्यांच्या एका हातात पुस्तक तर दुसऱ्या हातात पिस्तुल असे. एका हातावर शुभदा सरस्वतीचे अधिष्ठान तर दुसऱ्या हातावर प्रलयकारी क्रांतिकालीचे !

तुरुंगात राजबंद्यांना गुन्हेगार कैद्याप्रमाणे वागवीत. त्यांना राजबंद्याप्रमाणे सन्मानाने वागविण्यात यावे ह्या मागणीसाठी भगतसिंहांना तुरुंगात असताना एकशे पंधरा दिवस उपोषण करावे लागले. तशी वागणूक भगत-

सिद्धांना स्वतःपुरतीच नको होती तर सर्वच राजबंद्यांच्यासाठी हवी होती. ही मागणी सरकारला मान्य करावी लागली.

न्यायालयात आपली बाजू मांडताना भगतसिंह म्हणाले, " क्रांती हा नियतीचा नियम आहे. ती मानवी प्रगतीचे मूळ आहे. काही व्यक्तींचा रक्तपात करणे हा क्रांतीचा उद्देश नाही. आमच्या देशात मनुष्याकरवी मनुष्याचे शोषण थांबवून आम्हांला स्वतःला राज्यकारभाराचा अधिकार प्रस्थापित करावयाचा आहे. "

काश्मिरी बिल्डिंगवर छापा घालून पोलिसांनी क्रान्तिकारकांचा बॉम्बचा कारखाना ताब्यात घेऊन सुखदेव व जयगोपाळ यांना अटक केली. पुढे जयगोपाळ माफीचा साक्षीदार झाला. त्याने सॉंडर्सवधापासून क्रान्तिकारकांची सर्व रहस्ये पोलिसांना सांगितली. सुखदेव, भगतसिंग व दत्त पकडले गेले होतेच. फरारी चंद्रशेखर आझाद यांच्यासाठी पाच हजारांचे इनाम जाहीर करण्यात आले. त्यांच्या व राजगुरूंच्या पाळतीवर पोलीस होते. भगतसिंह व दुर्गाभाभी यांना लाहोर ते कलकत्त्यापर्यंत पोहोचवून देऊन राजगुरू नागपूर, अकोले या ठिकाणी काही दिवस राहून मग पुण्याला आईला भेटण्यासाठी गेले. पुण्यास ते पंजाबी वेषात वावरत होते. तरी देखील कोणी घरभेद्याने त्यांच्या पाठीवर असलेल्या पोलीसांनी त्यांची बातमी दिली. पहाटे त्यांना टिळकरोडवरील एका धोब्याच्या लॉन्ड्रीत पकडले व बेड्या घालून लाहोर येथे नेले. राजगुरूंचे पार्टीचे नाव ' रघुनाथ ' किंवा ' एम्. ' असे होते. ते खूप झोपाळू होते. इतके की, एखादे वेळी भिंतीला टेकून उभ्याने झोप घेत किंवा एखादे वेळी चालतानाही झोप घेत. परंतु दिसायला ओबडधोबड व रंगाने काळा असा हा झोपाळू नेमबाजीत पक्का व इमानात सच्चा होता. म्हणूनच सर्वजण त्याच्यावर फार प्रेम करीत होते. त्यांना लाहोर तुरुंगात आणताच भगत, दत्त, सुखदेव आदि क्रान्तिकारक मित्रांनी मोठमोठ्याने ' वंदे मातरम् ', ' इन्किलाब झिंदाबाद ' च्या घोषणांनी त्यांचे स्वागत केले.

त्यांच्या खटल्याचा निकाल ८ ऑक्टोबर १९३० लागून भगतसिंह सुखदेव-राजगुरू यांना सॉंडर्सचा वध केल्याच्या आरोपावरून फाशीची शिक्षा सांगण्यात आली. बटुकेश्वरदत्त यांना असेंब्लीत बॉम्ब फेकण्याच्या आरोपावरून काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

शिक्षा झाल्यानंतर त्यांनी सरकारकडे दयेचे अर्ज करावेत, असे काही प्रमुख लोक त्यांना सुचवू लागले. केवळ त्यांच्यावरील त्यांच्या बहादूरीवरील व प्रेमामुळे. परंतु त्या सूचनेची भगतसिंहांना खूप चीड आली. त्यांच्या अपरोक्ष त्यांच्या वडिलांनी व्हाईसरॉयकडे दयेचा अर्ज केल्याचे जेव्हा त्यांना कळले तेव्हा त्यांनी वडिलांची खूप निर्भत्सना केली. उलट सरकारला त्यांनी रोकठोक सवाल टाकला: "आम्हांला दया नको आहे. दयाच दाखवावयाची असल्यास गुन्हेगारासारखे फाशी न देता रणांगणातील वीरा-प्रमाणे बंदुकीच्या गोळ्या घालून ठार करा."

वास्तविक भगतसिंह, सुखदेव व राजगुरू यांना दि. २४ मार्च १९३१ रोजी फाशी देण्याचे ठरले होते. परंतु सरकारच्या ह्या निर्घृण व हट्टी निर्णयामुळे देशात लोकमत फार क्षुब्ध होऊ लागले होते. त्यामुळे फाशी देण्याची वेळ लोकांना न कळू देता त्यांना आदल्या दिवशीच म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी संध्याकाळी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. फाशी जाण्याच्या आदल्या दिवसापासून तो फाशी जाण्याच्या वेळेपर्यंत भगतसिंह लेनिनचे चरित्र वाचण्यात गुंग होऊन गेले होते. त्यांच्या वाचना-च्या तंद्रीतून जागे करून तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना फाशीच्या वेळेची कल्पना दिली. वाचन थांबवून ते प्रसन्न मनाने वधस्तंभाकडे गेले. एका बाजूला राजगुरू, दुसऱ्या बाजूला सुखदेव व मध्ये सरदार भगतसिंह अशा रीतीने ओळीत तीन फाशीच्या तक्त्यांवर उभे राहिले. फाशी देताना आपले हात बांधू नयेत व चेहरे काळ्या कापडाच्या मुखवट्यांनी झाकू नये, अशी भगतसिंहानी विनंती केली. त्यांची विनंती अधिकाऱ्यांनी मान्य केली. फाशीच्या तक्तावर चढत असता तेथे उपस्थित असलेल्या इंग्रज कमिशनरकडे बघत भगतसिंह म्हणाले, "मिस्टर मॅजिस्ट्रेट, तुम्ही भाग्यवान आहात. कारण भारतीय क्रान्तिकारक आपल्या सर्वोच्च आदर्शासाठी किती प्रसन्नतेने मृत्यूला आलिंगन देतात हे स्वतःच्या डोळ्यांनी पाहाण्याची संधी आज तुम्हाला मिळत आहे." असे म्हणून 'वंदे मातरम्' 'इन्किलाब झिंदाबाद ! डाऊन वुईथ इम्पिरियालिझम ! (साम्राज्यशाहीचा नाश होवो !)' अशा घोषणा देत ते तक्तावर उभे राहिले. मांगांनी त्यांच्या गळ्यात फास अडकावले, तक्त्यांच्या फळ्या ओढल्या आणि फासात लोंबकळणाऱ्या त्या पवित्र कुड्यांतून त्यांचे दिव्य आत्मे अनंतात विराम पावले.

आणि तुरुंगापासून थोड्या अंतरावर सभा भरली होती. भगतसिंहाचे वडील किशनसिंह सभेत भाषण करीत होते. राजगुरू आणि दत्त व सुखदेव यांच्या माता तेथे होत्या. भगतसिंहांची आई, आजोबा, आजी व चुलत्या तेथे होत्या. फाशी जाणाऱ्या त्यांच्या लाडक्यांना शेवटी एकदा डोळे भरून पाहून घेण्याची संधी निष्ठुर अधिकाऱ्यांनी नाकारली होती. अंधार पडत चालला होता. सर्वांची मने अंधारून गेली होती इतक्यात तुरुंगात दूध घालणारा गवळी तेथे आला व फाशीची बातमी त्याने सभेला सांगितली. दुःख, सूड आणि संतापाने तो अंधार पेटला. प्रेते ताब्यात घेण्यासाठी धावपळ सुरू झाली. पण कसचे काय ! तुरुंगाधिकाऱ्यांनी रातोरात ट्रकमध्ये ते मृत देह घालून पंचाहत्तर मैल अंतरावर फिरोजपूर येथे सतलज नदीच्या पुलाजवळ नेले व दोन भटजींना त्या गावातून पकडून आणून त्यांच्या करवी त्या मृत देहांना अग्नी दिला. लाहोरमधील जनतेला सत्य घटना कळल्यावर पहाटेच्या सुमाराला तो संतापाने पेटलेला व हातात पेटलेले चुडे घेतलेला जनसमुदाय फिरोजपूरला आला. जळत असलेली चिता त्यांना सतलजच्या पुलाजवळ दिसली. पेटलेले पलिते नदीकडे येत असल्याचे पाहून ट्रकबरोबर आलेल्या निर्लज्ज भ्याड अधिकाऱ्यांनी जळत्या चितेतील लाकडे नदीच्या पाण्यात लोटून देऊन तेथून पळ काढला. आणि सहृदय वाचकहो, निष्ठुर निर्लज्जतेने माणुसकीचा खून करणाऱ्या नीच उन्मत्त अधिकाऱ्यांचे शौर्य तर पाहा. भगतसिंह, दत्त, राजगुरू यांच्या मृतदेहाची खांडोळी करून व पोत्यात भरून ते मृतदेह येथे आणून दहनासाठी एकाच चितेवर ठेवण्यात आले.

दुरात्म्यांनो, मृतदेहांच्या त्या पवित्र मृत्तिकेचा घोर अपमान करून तुम्ही कोणता अघोरी पुरुषार्थ साधला ? मृत्तिकेला छिन्नभिन्न करून का तिच्यातील तेज विझविता येते ? त्या गतीला सोन्याची झळाळी आली. परंतु तुम्ही तुमच्या त्या अधम नीच कृतीने माणुसकीच्या उज्ज्वल मुखाला डांबर फासले !

दुसऱ्याच दिवशी कराचीत कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन होते. सर्व मंडपावर दुःखाची कळा पसरली होती. भगत – सुखदेव – राजगुरूंच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहताना सुभाषचंद्र बोसांनी दुःखोद्गार काढले, "मित्रहो, आज आपण मोठ्या दुःखाच्या छायेखाली जमलो आहोत. भगतसिंह व त्यांचे

सहकारी हे बंडखोर प्रवृत्तीचे बोधचिन्ह होते. ते गेले तरी ती वृत्ती अजिंक्यच राहील. ती अमर आहे ! ”

भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांना सॉंडर्स वधाच्या आरोपावरून फाशीची शिक्षा सांगण्यात बटुकेश्वर दत्त यांना असेंब्लीत बॉम्ब टाकण्याच्या आरोपावरून जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. त्यांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. फाशी जाण्याच्या आदल्या रात्रीची गोष्ट. रात्रीच्या गडद अंधारात शिववर्मा व इतर काही राजबंद्यांच्या कोठडीजवळ तुरुंगाचा अधिकारी आला. ते राजबंदी भगतसिंहाचे साथीदार असून त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा सांगण्यात आल्या होत्या. त्यांना घेऊन तो अधिकारी भगतसिंहाच्या कोठडीजवळ गेला. भगतसिंहांचे शौर्य, स्वभाव व उमदेपणा यांनी तो तुरुंगाधिकारी प्रभावित झाला होता. म्हणूनच मरणाच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या सरदार भगतसिंहांना एकदा डोळे भरून अखेरचे पाहाण्यासाठी तो त्या मित्रांना घेऊन आला होता. भगतसिंहांना भेटताना शिववर्मा म्हणाले, “ सरदार, उद्या तुम्ही हे जग सोडणार. मृत्यूचे तुम्हांला दुःख तर वाटत नाही ना ? ” भगतसिंहांनी स्मित केले. नंतर गंभीरपणे ते बोलू लागले, “ क्रांतीच्या वाटेवर जेव्हा मी पाऊल टाकले, तेव्हाच मनाशी ठरविले होते की, ‘ क्रांतीचा विजय असो ! ’ (इन्किलाब झिंदाबाद) हा जयघोष मी राष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत जरी पोहचवू शकलो, तरी जीवनाचे सार्थक झाले असे समजेन. आज ह्या तुरुंगाच्या ह्या भिंतीआड व कोठडीच्या मागे असताना देखील, तुरुंगाबाहेरील माझ्या हजारो देश-बांधवांच्या कंठातून निघणारा ‘ इन्किलाब झिंदाबाद ’ हा जयघोष मी सारखा ऐकत आहे. माझी खात्री आहे की, देशबांधवांपर्यंत पोहोचलेला क्रांतीचा जयघोष स्वातंत्र्य-संग्रामाच्या सक्तीच्या रूपाने साम्राज्यशाहीच्या डोक्यावर प्रहार करीत राहील. बस झाले. इतक्या छोट्या जीवनाचे यापेक्षा मोठे मोल तरी काय येणार ? ” असे म्हणून गजांवाटे हात बाहेर काढून भगतसिंहाने शिववर्माचा हात हातात घेतला. कायमचा निरोप घेणाऱ्या त्या दिलदार मित्राच्या उदार अंतःकरणातून स्रवणाऱ्या उदात्त भावनांनी हस्तस्पर्शातून शिववर्माच्या हृदयात प्रवेश केला. आलेल्या सर्व मित्रांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. भगतसिंह म्हणाले, “ असे भावनाविवश होऊ नका. मी तर

काय या सर्व झंझावातून उद्या सकाळी मोकळा होऊन जाईन. परंतु तुमचा प्रवास फार दूरचा आहे. कित्येक दिवस तुरुंगात खितपत पडावे लागेल. अडचणी व दुःखे भोगावी लागतील. पण मध्येच थांबू नका. ठेचाळू नका. मान ताठ ठेवा. " असे म्हणून ते गजामागे सरले. भगतसिंहांचे परवलीचे नाव 'रणजित' असे क्रांतिकारक मित्रांनी ठेवले होते. खरा रणजित ! खरा रणमर्द ! राणा प्रतापचा वारसदार !

"इन्किलाब झिंदाबाद !"

आझादी और जिंदगी एक बात है । गुलामी और मौत एक बात है ।

— भगतसिंह

* * *

२८. दोन सत्याग्रही हुतात्मे

(जतींद्रनाथ दास व महावीरसिंग)

हिंदुस्थान सोशालिस्टिक रिपब्लिकन आर्मी (एच्. एस्. आर. ए.) हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक सेनेची स्थापना झाली ९ सप्टेंबर १९२८ रोजी आणि चंद्रशेखर आझाद यांचे हौतात्म्य (२७ फेब्रुवारी १९२७) आणि भगतसिंहांचे स्वर्गारोहण दि. २३ मार्च १९३१ याबरोबरच तिचे विसर्जन झाले. तीन-चार वर्षांचा इतका छोटा कालावधी, परंतु इतक्या छोट्या अवधीत व छोट्या उमरीत एच्. एस्. आर. ए. च्या सैनिकांनी केलेला भीम-पराक्रम पाहून कळीकाळाने देखील त्यांच्यापुढे मान लववावी. स्वातंत्र्यलालसा, शौर्य सुहृदनिष्ठा, सच्छील व आदर्श ध्येयनिष्ठा ह्यांची ह्या तरुणांनी इतकी उत्तुंग शैलशिखरे उभविली आहेत की ती पाहून कोणत्याही राष्ट्राने स्तिमित होऊन आदराने त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे. फाशीच्या तक्तावर चढण्याच्या वेळेपर्यंत सरदार भगतसिंह लेनिनचे चरित्र वाचण्यात रंगून गेले होते. मृत्यूच्या सिंहासनावर पाऊल ठेवताना तेथे उपस्थित असलेल्या इंग्रज डेप्युटी-कमिशनरला ते म्हणाले, "मिस्टर मॅजिस्ट्रेट, तुम्ही फार भाग्यवान आहात. कारण भारतीय क्रांतिकारक आपल्या सर्वोच्च आदर्शासाठी किती प्रसन्नतेने मृत्यूस आलिंगन देतात, हे स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याची संधी आज तुम्हाला मिळत आहे. एकीकडे जीवनातील मोहक प्रलोभने मृगजळातील चित्राप्रमाणे मागे दूरवर तरतळत आहेत आणि पुढे मृत्यूच्या दूतांच्या ढोल-नगाऱ्यांचा आवाज कानठळ्या बसवीत आहे." जीवन-मृत्यूच्या सीमारेषेवर काढलेले हे उद्गार ऐकले म्हणजे स्थितप्रज्ञ महायोग्याच्या अढळ चित्तवृत्तीची आठवण होते. चांगदेवासारखा महायोगी देखील ती अचल चित्तवृत्ती पाहून स्वतःच्या समाधीत कौतुकाने हसला असेल ! स्वतःच्या अंगावर गोळ्यांचा वर्षाव होत असताना आजूबाजूच्या लोकांचे प्राण त्या गोळीबारात विनाकारण जाऊ नयेत, म्हणून "दूर पळा, दूर पळा. इकडे गोळीबार चालू आहे, इकडे येऊ नका." असे ओरडून सांगणाऱ्या चंद्रशेखर आझादाच्या हृदयातील मानवताप्रेम किती उच्च दर्जाचे होते याची कल्पना येते. जतीन्द्रनाथ दास व

महावीरसिंग हे अशाच थोर प्रभावळीतील होत. कारावासात सर्व उपाय संपल्यानंतर त्यांनी प्राणांतिक उपोषणाचा सत्याग्रह केला आणि स्वतःच्या बलिदानाने आख्खा देश हादरून सोडला.

जतीन्द्रनाथ दास हे बंगाल प्रांताचे रहिवासी. जन्म इ. स. १९०४ साली झाला. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षीच ते गांधीजींच्या असहकार चळवळीत दाखल झाले. त्यांना तुरुंगवासाच्या अल्पमुदतीच्या शिक्षाही झाल्या. त्यानंतर ते बंगाल्यातील सशस्त्र क्रांतिकारकांत सामील झाले. हेमचंद्र-दास यांनी इंग्लंडमधून सेनापती बापट यांच्याकडून बॉम्ब बनविण्याचा पाठ (फॉर्म्युला) बंगालमध्ये पूर्वीच आणला होता. बंगालमधील क्रांतिकारक बॉम्ब-विद्येत तरबेज झाले होते. त्यांच्यात राहून जतींद्रनाथनींही ती विद्या संपादन केली होती. काकोरी कटाशी संबंध असल्याच्या संशयावरून पोलिसांनी त्यांना पकडले होते. तथापि आरोप सिद्ध न झाल्याने त्यांना सोडून देण्यात आले. परंतु त्यांना बॉम्ब बनविता येतात असे वाटल्यावरून त्यांच्या कलकत्त्याच्या निवास-स्थानावर पोलिसांचे काही काळ लक्ष होते. बंगालमधील क्रांतिकारकांना संशयावरून अटकेत ठेवण्यासाठी बंगाल ऑर्डिनन्स कायदा सरकारने लागू केला होता. त्याअन्वये जतींद्रनाथाला अटक झाली होती. तुरुंगातील अन्यायाविरुद्ध त्यांनी २१ दिवस उपवास केला होता. शेवटी जेल सुपरिटेंडेंटने माफी मागि-तल्यावर त्यांनी तो सोडला.

काकोरी कटांत हिंदुस्थानातील रिपब्लिकन आर्मीचे मुख्य मुख्य मोहरे पकडले गेले होते. रामप्रसाद बिसमिल, ठाकूर रोशनसिंह, राजेंद्र लाहिडी व अशफाक उल्लाखां यांना फाशीची शिक्षा झाली. मन्मथनाथ गुप्ता, रामकृष्ण खत्री, मुकिंदीलाल इत्यादींना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. निसटले काय ते चंद्रशेखर आझाद. दलाची अशी वाताहत झाल्यानंतर क्रांतिकारकांची नवी संघटना तयार करण्याचे प्रयत्न आझादांनी सुरू केले. त्या कार्यात सरदार भगतसिंह त्यांना येऊन मिळाले. दिल्ली, आग्रा, कानपूर, लाहोर, लखनौ इत्यादी ठिकाणी क्रांतिकारक तरुणांची नवी आघाडी उभी करण्यात आली. यशपाल, इंद्रपाल, भगवतीचरण व्होरा, डॉ. गयाप्रसाद, फणींद्र घोष, जयगोपाल, शिवराम राजगुरू, बटुकेश्वर दत्त, सुखदेव, सुखदेवराज, महावीरसिंग, विश्वनाथ वैशंपायन, भवानीसिंह रावत, वीरभद्र तिवारी, दुर्गाभाबी,

सुशीला दिदी असे किती तरी तरुण क्रान्तिकारक ह्या आघाडीत सामील झाले. पिस्तुलाच्या नेमबाजीत ही मंडळी तयार झाली होती. तथापि शत्रूशी मुकाबला करण्यासाठी लागणाऱ्या नव्या अमोघ अस्त्राची–बॉम्बची विद्या त्यांच्यापैकी कोणालाच अवगत नव्हती. सन १९२८ मध्ये कलकत्त्याला कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या गर्दीत भगतसिंह कलकत्त्याला गेले. तेथे बंगाली पोषाखात ते वावरत होते. त्यांनी जतींद्रनाथ दासांना गाठले व क्रांतिकारांना बॉम्बविद्येचे शिक्षण देण्यासाठी आग्रा येथे चलण्याची गळ घातली. ह्या सुमारास जतींद्रनाथासंबंधाने पोलिसांचा संशय नाहीसा झाला होता. त्याप्रमाणे जतींद्रनाथ आग्रा येथे गेले. त्यांनी एच. एस. आर. ए. च्या काही सभासदांना त्या विद्येत तरबेज केले. जतींद्रनाथांच्या ह्या विद्येमुळे हिं. सो. रि. आर्मीने खूपच प्रभावी कार्य केले.

भगतसिंह-बटुकेश्वर दत्त यांनी असेंब्लीत बॉम्बस्फोट केल्यानंतर त्यांना पकडण्यात आले. तरी देखील हिं. सो. रि. दलाचे सभासद बॉम्बची निर्मिती करून सरकारी यंत्रणेला हादरून सोडण्याचा प्रयत्न करीतच होते. भगतसिंहांना पकडल्यावर काही क्रान्तिकारक लाहोरला गेले. काही कानपूरकडे रवाना झाले. काही थोडे दिल्ली-आग्रा ह्या भागात राहिले. सुखदेव व भगवती-चरण व्होरा यांनी लाहोर येथे काश्मिरी बिल्डिंगमध्ये एक जागा भाड्याने घेऊन तेथे बॉम्बचा कारखाना सुरू केला.

हिंदुस्थानच्या दौऱ्याहून व्हॉईसराय दि. २३ डिसेंबर १९२९ रोजी दिल्लीला परतणार होते. ही गोष्ट चंद्रशेखर आझादांना माहीत झाली. लोह-मार्गावर बॉम्ब ठेवून व्हॉईसरायची गाडीच उलथून पाडण्याचा धाडसी व्यूह त्यांनी रचला. त्या कामासाठी जतींद्रनाथांनी प्रभावी बॉम्ब तयार केला. यशपाल व इंद्रपाल तो बॉम्ब घेऊन आदल्या दिवशी रात्री दिल्ली स्टेशनच्या दोन तीन मैल अलीकडे असलेल्या यमुनेच्या पुलाजवळ गेले. पुलापासून थोड्या अंतरावर जुन्या किल्ल्याची पडकी इमारत आहे. त्या इमारतीच्या भिंतीच्या आडोशाला त्यांनी बॅटरी ठेवली. बॅटरीला तार जोडून ती पुलावरील आगगाडीच्या लोहमार्गावर ठेवली. पहाटे अंधार असताना त्यांनी पुलावरील लोहमार्गावर बॉम्ब ठेवून तारेचे टोक त्याला जोडले व ते किल्ल्याच्या पडक्या भिंतीमागे व्हॉईसरायच्या गाडीची वाट पाहात बसले. ते कडाक्याच्या थंडीचे दिवस होते. भोवताली दाट धुके पसरले होते. थोड्या अंतरावरील भाग

देखील धुक्याच्या दाट आवरणामुळे दिसू शकत नव्हता. इतक्यात दूर अंतरावरून आगगाडीचा आवाज येऊ लागला. यशपाल व इंद्रपाल डोळयांत तेल घालून पुलाकडे पाहू लागले. इतक्यात धाड्धाड् आवाज करीत गाडी पुलावर प्रवेश करती झाली. यशपालने बॅटरी सुरू केली. बॅटरीला जोडलेल्या तारेतून विजेच्या प्रवाहाने बॉबवर ठिणगी टाकली. कानठळ्या बसविणारा आवाज झाला. गाडीच्या तिसऱ्या डब्याचा चुराडा झाला. पाचव्या डब्यात व्हॉईसरॉय होते. त्यांना काहीच इजा झाली नाही. क्रांतिकारकांची अपेक्षा अशी होती की, बॉम्बच्या स्फोटाने आगगाडीच्या काही डब्यांचा चुराडा होईल व स्फोटामुळे लोहमार्ग उखडले जाऊन गाडी पुलावरून खाली कोसळेल. परंतु आडाखा थोड्यावरून चुकला. रेल्वेचे लोखंडी रूळ उखडले गेले नाहीत. कमी वेगाने गाडी दिल्ली स्टेशनला नेण्यात आली. यशपाल व इंद्रपाल दाट धुक्याचा आश्रय घेऊन तेथून पसार झाले.

व्हॉईसरॉयच्या गाडीवरील ह्या बॉम्ब फेकीचे कृत्य क्रान्तिकारकांचेच असले पाहिजे अशी सरकारची खात्री झाली. तथापि बॉम्बच्या सूत्रधाराचा तपास लागला नाही. उलट आम्ही बॉम्ब का उडवितो, हे विशद करणारी 'बॉम्बमागचे तत्वज्ञान' (Philosophy of Bomb) ही पत्रके देशभर प्रसृत करण्याचे धाडसी कृत्य क्रान्तिकारकांनी करून आपली भूमिका जनतेसमोर मांडली. हे पत्रक भगवतीचरण व्होरा या बुद्धिमान क्रान्तिकारकाने तयार केले होते.

भगतसिंह लाहोरचे राहाणारे असल्यामुळे असेंब्लीत उडविलेल्या बॉम्बची काही कवचे दिल्ली पोलिसांकडे अधिक चौकशीसाठी पाठवून दिली. सॉंडर्सचे वधकारी अद्याप सापडू शकले नव्हते. त्यांना छडा लावून देणाऱ्यासाठी मोठे बक्षीस जाहीर झाले होते. लाहोरचे पोलीस क्रान्तिकारकांच्या शोधांत होतेच. त्यांच्या सुदैवाने त्याच सुमारास क्रान्तिकारकांचा सुगावा लागणारी एक अनुकूल घटना घडली. लाहोरमधील क्रांतिकारक बॉम्बसाठी लागणाऱ्या लोखंडी खोळी गुलाम रसूल नावाच्या लोहाराकडून बनवून घेत असत. ह्या खोळी आपल्या यंत्राच्या कारखान्यासाठी लागतात असे ते त्या लोहाराला सांगत असत. परंतु वारंवार बहुसंख्येने लागणाऱ्या खोळींमुळे त्या लोहाराला त्या गोष्टीचा संशय आला. शिवाय क्रान्तिकारकांच्या शोधाचे बक्षिस त्यांच्या

डोळ्यांपुढे तरळत होतेच. लोखंडी कवच्यांची वार्ता त्याने पोलीस अधिकाऱ्यांना दिली. कवच्या नेणाऱ्या इसमावर पाळत ठेवून पोलीस अधिकाऱ्यांनी काश्मिरी बिल्डिंगला वेढा दिला. क्रान्तिकारकांच्या खोलीच्या दरवाजावर अधिकाऱ्यांनी टकटक वाजविले. दार उघडताच सुखदेव समोर आले. त्यांना पकडीत असताच भोवळ आल्याचे निमित्त करून ते जमिनीवर पडले. पोलिसांनी त्यांच्या डोक्यावर थंड पाणी शिंपडले. इतक्यात त्यांनी खिशातून पिस्तूल बाहेर काढले. परंतु पोलीस अधिकाऱ्याने त्यांचा हात पकडल्यामुळे त्यांचा बेत फसला. पोलिसांना खोलीच्या झडतीत तयार बॉम्बच्या कवच्या, ॲसिडच्या बाटल्या, बॉम्बसाठी लागणारी रसायने इत्यादी गोष्टी सापडल्या. खोलीत असणारा जयगोपाळ यालाही सुखदेव यांच्या बरोबर पकडण्यात आले. ह्या जयगोपाळने माफीचा साक्षीदार बनून क्रान्तिकारकांची नावे व त्यांनी केलेल्या कृत्यांची माहिती दिली. त्या माहितीच्या अनुषंगाने क्रान्तिकारकांची धरपकड सुरू झाली. त्यामुळे जतींद्रनाथ व महावीरसिंग यांना पकडण्यात आले.

लाहोरला ज्या तुरुंगात भगतसिंह, बटुकेश्वर दत्त इत्यादी क्रान्तिकारकांना ठेविले होते त्याच तुरुंगात जतींद्रनाथांनाही आणण्यात आले. जतींद्रनाथ तेथे आले त्या वेळी भगतसिंह व बटुकेश्वर दत्त यांचा अन्नसत्याग्रह सुरू होता. क्रान्तिकारकांना इतर गुन्हेगार कैद्यांप्रमाणे न वागविता त्यांना राजकीय बंदिवानांप्रमाणे वागविण्यात यावे. त्यांना चांगले अन्न देण्यात यावे व पुस्तके व वृत्तपत्रे मिळण्याची सोय करावी, अशा त्यांच्या मागण्या होत्या. आणि ह्या सोयी फक्त स्वतःपुरत्या न स्वीकारता सर्व क्रान्तिकारकांना दिल्या गेल्या पाहिजेत, असा भगतसिंहांचा आग्रह व हट्ट होता. ह्या मागण्या मान्य होईपर्यंत सर्व क्रान्तिकारक राजबंद्यांनी अन्नसत्याग्रह करावा, असे त्यांनी सुचविले.

हिंदुस्थान दलाच्या बैठकीत एखाद्या विषयावर चर्चा चालली असली तरी जतीन्द्रनाथ सहसा वादविवादात भाग घेत नसत अथवा एखाद्या मुद्द्याचे अट्टाहासाने प्रतिपादन करीत नसत. मितभाषी असलेला हा तरुण स्वतःची कामगिरी मात्र जीव ओतून करीत असे. कोणताही निर्णय साधकबाधक विचारातून घ्यावयाचा व घेतलेला निर्णय अढळ ठेवायचा हा बाणा.

आपल्या मागण्या सरकारकडून मान्य होईस्तोवर अन्नसत्याग्रह (भूक-

हरताळ) करण्याच्या वादळी विचाराने राजबंद्यांची मते झपाटली होती. काहीही करून सरकारला नमवावयाचे ह्या ईर्ष्येने पेटलेल्या मनांना त्या उपोषणा आड दडविलेले भयानक क्लेश व यातनाही दिसत नव्हती. जतींद्रनाथांना पूर्वीचा उपोषणाचा अनुभव होता व म्हणून उपोषणाच्या यातनांची कल्पना फक्त त्यांना एकट्यांना होती. उपोषणासाठी हुरावलेल्या आपल्या सहकाऱ्यांना जतीन्द्रनाथांनी उपोषणातील भयानकतेची कल्पना दिली. "अन्नसत्याग्रह करणे दिसते तितके सोपे नसून ती एक महान तपस्या आहे. छातीवर गोळी झेलणे अथवा फासामध्ये मान अडकविणे प्राणांतिक उपोषणाच्या तुलनेने बरेच सोपे आहे. त्यात दुःख व यातना आहेत. परंतु त्या फक्त काही क्षणांच्या, परंतु प्राणांतिक उपोषणाने क्षणाक्षणाला होणाऱ्या असंख्य वेदनांनी होणारे दुःख दीर्घकाल शरीर जाळीत राहाते. त्या यातना सहन करण्याचे ज्यांचे आत्मबल असेल, त्यांनीच ती गोष्ट करावी. एरव्ही त्या मार्गाचा अवलंब करणे चांगले. आपल्या प्रतिष्ठेला डागाळू देऊ नका." अशा प्रकारचा इशारा सहकाऱ्यांना देऊन दि. १३ जुलै १९२९ रोजी ते मागण्या मान्य होईपर्यंत प्राणांतिक उपोषणास बसले.

सुरुवातीस सरकारी अधिकाऱ्यांना क्रान्तिकारकांच्या उपोषणाची पोरखेळासारखी गंमत वाटली. परंतु आठ-दहा दिवसांनंतर मात्र उपोषण करणाऱ्या क्रान्तिकारकांची प्रकृती काळजी करण्यासारख्या गंभीर बनू लागल्या. त्यांचे ते व्रत ढासळविण्यासाठी कारागृहाच्या अधिकाऱ्यांनी कैद्यांच्या खोल्यांतून मिष्टान्नाची ताटे ठेवण्यास सुरुवात केली. भुकेने कासावीस झालेल्या उपोषणार्थींच्या तोंडास पाणी सुटून त्यांना सुग्रास अन्नाचा मोह व्हावा, हा त्या कृतीमागचा अर्थ होता. भूक ही एक ज्वालामुखीची आग आहे. ती आग शांत करण्यासाठी सामान्य माणूस वाटेल ते पाप करावयास तयार होतो; हा सामान्य जनांचा सिद्धान्त आहे. तथापि भगतसिंह, बटुकेश्वर दत्त, जतीन्द्रनाथ दास हे स्वतःच्या सामान्य देहातून असामान्य व्यक्तिमत्त्वाचे जीवनशिल्प घडवीत होते. त्या मोहक अन्नाने त्यांना भुरळ घातली नाही. त्यांनी त्याला स्पर्शही केला नाही. अन्नाचा काही भाग गुपचूपपणे राजबंदी खातात की काय, हे पडताळून पाहाण्यासाठी कारागृहाचे अधिकारी ताटातील पदार्थ परत मोजून पाहात. तथापि ताटात आलेले अन्न परब्रह्म तशाच पूर्ण अन्नावस्थेत परत जाई, याची अधिकाऱ्यांना खात्री पटली.

अन्नत्यागाने देह वाळवणाऱ्या राजकीय कैद्याला कोणत्या का उपायाने जगविणे हे तुरुंगाधिकाऱ्यांना आपले कर्तव्य वाटत होते. त्यासाठी



जतींद्रनाथ

त्यांनी आता बळाचा वापर करण्याचे ठरविले. तुरुंगाचे डॉक्टर जतीन्द्रनाथांना बळजबरीने दूध पाजू लागले. परंतु त्यांनी तोंड घट्ट मिटून घेतल्यामुळे डॉक्टराने दुधाची नळी त्यांच्या नाकपुडीत घातली. तथापि जतीन्द्रनाथांनी इतका प्रतिकार केला की, डॉक्टरला त्यांच्या धडपडीमुळे हताश व्हावे लागले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी डाॅक्टरला खूप चेव आला. त्याने चार पाच बलवान कैद्यांना जतीनदासांना पकडून ठेवण्यास सांगितले. जतीनदासांनी तोंड घट्ट मिटून घेतल्यामुळे डॉक्टराने दुधाची नळी त्यांच्या नाकपुडीवाटे आत खुपसली. ती नळी तोंडात उतरताच दासांनी ती दातांनी पकडून ठेवली त्यामुळे रागाने पिसाट झालेल्या त्या डॉक्टराने दुसरी नळी त्यांच्या दुसऱ्या नाकपुडीवाटे आत घुसडून तिच्यावाटे दूध आत लोटून दिले. दोन्ही नाकपुडया दुधाच्या नळ्यांमुळे तुंबल्याने त्यांचा श्वास कोंडला गेला. व त्यांनी डोळे पांढरे केले. डॉक्टराने दुधाच्या नळ्या घाईने बाहेर काढल्या व जतीनदासांवर इतर उपचार सुरू केले. या अघोरी प्रकारातून दास वाचले. परंतु डॉक्टरांनी त्यांच्या नाकातून खुपसलेल्या नळीतील दूध त्यांच्या पोटात न जाता फुप्फुसांत शिरले. थोडयाच दिवसांत त्या दुधाचे विष बनले व विषाच्या अतिक्रियेमुळे त्यांच्या अवयवांवर सूज चढू लागली.

त्या प्रसंगानंतर दूध पाजण्याचा तो अतिरेकी प्रकार बंद झाला. दासांची प्रकृती दिवसेंदिवस चिंताजनक होऊ लागली. ह्या प्रकारात दासांच्या देहावसानाचा ठपका आपल्यावर येऊ नये म्हणून सरकारने त्यांना जामिनावर सोडण्याचे प्रयत्न सुरू केले, परंतु जतीनदास जामिनावर सुटण्यास तयार होईनात. एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाली, तरी सरकार राजबंद्यांच्या मागण्या मान्य करण्यासंबंधाने अवाक्षरही काढीना. आणि जतीनदासही आपल्या दृढ निश्चयापासून रतिभरही मागे हटेनात. मोठमोठ्या काँग्रेस पुढाऱ्यांची तुरुंगात जाऊन उपोषण सोडण्याविषयी दासांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पं. जवाहरलालजींनीही तुरुंगात जाऊन जतीनदासांची भेट घेऊन त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पाशवी शक्तीच्या राजसत्तेच्या निष्ठुरपणाला जतीनदासासारख्या सच्च्या कोवळ्या देशभक्ताचा नाहक बळी जाऊ नये, ह्या सद्हेतूने प्रेरित होऊन उपरोक्त पुढाऱ्यांनी प्रयत्न केले. तथापि मोडेन, परंतु वाकणार नाही, ह्या ब्रीदाच्या जतीनदासांनी त्यांच्या सौजन्याचपा उपदेशा खातर देखील स्वतःच्या ब्रीदाला कलंक लागू न देण्याचा विचार मनात येऊ दिला नाही.

दासांची गंभीर परिस्थिती पाहून सरकारने दासांचे धाकटे बंधू-किरणदास यांना कलकत्त्याहून बोलावून घेऊन आपल्या आसन्न मरण बंधूची शुश्रूषा करण्यास सांगितले. मृत्यूच्या कमानीतून स्वर्गाकडे जाणाऱ्या मार्गाची, एका बंधूची वाटचाल सुरू झाली होती आणि दुसरा भाऊ अगतिकपणे हळुवारपणाने त्यांची शेवटची सोबत करत होता. एक तेज स्वर्गारोहण करीत होते. बंधुप्रेमाने ओथंबलेले दुसऱ्याचे अश्रू त्याच्या खडतर मार्गावर मायेची शिंपण करीत होते. जतींद्रनाथ किरणकडून 'वंदे मातरम्', 'एकला चालो रे,' ही गीते म्हणवून घेत. पोटात दुधाच्या विषाचे हलाहल ढवळत असता मातृ-भूमीच्या जयजयकाराच्या धुंदीत तो देशभक्त समाधीसुखाची धुंदी अनुभवीत होता. किरणबाबू रवींद्रनाथांचे 'एकला चालोरे' हे गीत म्हणत होते. परंतु जतीन्द्रनाथ मात्र त्या वाटेने एकटे चालले नव्हते. त्यांच्या मागून शेकडो नरवीर व शेकडो वीरकन्या छातीवर गोळ्या झेलीत व गळ्याभोवती फासाचे सर्प वेटोळी खेळवीत त्या मार्गाने जाणार आहेत.

दि. १३ सप्टेंबर १९२९ चा दिवस आज जतीनदासांच्या उपवासाचा

६३ वा दिवस दुपारी त्यांचे प्राण पंचतत्वात विलीन झाले. पंचवीस वर्षांच्या या शूर देशभक्ताने भारताच्या उज्ज्वल परंपरेत एक सुवर्णाचे पान खोवले. जतीनबाबूंच्या धीरोदात्त करुण हौतात्म्याने सारा देश हळहळला. कोटी कोटी हृदये गहिवरली. कोटी कोटी लोचनांतून अश्रू ओघळले !

सुभाषचंद्र बोस हे त्या वेळी बंगाल काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना तारेने सहाशे रुपये पाठवून जतींद्रनाथांचे शव आगगाडीने लाहोरहून कलकत्त्याला आणण्याची व्यवस्था केली. मोठमोठ्या स्टेशनांवर लोक जतीनबाबूंचे शेवटचे दर्शन घेत होते. त्यांच्या पार्थिव देहावर फुले उधळीत होते. दिल्ली स्टेशनवर गाडी आली. चंद्रशेखर आझादांनी हिंदुस्थान समाजवादी दलाच्या सरसेनापतीने वेषांतर करून आपल्या शूर सहकाऱ्याच्या पायाला स्पर्श करून त्याला अखेरची वंदना दिली. अलाहाबाद स्टेशनवर पं. जवाहरलालांनी दासांच्या शवावर पुष्पमाला वाहिली. कलकत्त्यामध्ये दासांच्या अंत्ययात्रेस पाच लाख लोक जमले होते.

एखाद्या सम्राटाच्या वाट्याला न येणारे भाग्य जतीन दासांना लाभले !

महावीरसिंग

महावीरसिंग हे आझाद—भगतसिंहाचे सहकारी. त्यांचा जन्म उत्तरप्रदेशातील इटावा जिल्ह्यात झाला. शाळकरी विद्यार्थी असतानाच इ. स. १९२१ च्या असहकारितेच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते कानपूरच्या डी. ए. व्ही. महाविद्यालयात प्रविष्ट झाले व वसतिगृहात राहू लागले. शिववर्मा ह्या विद्यार्थ्याची खोली म्हणून क्रान्तिकारकांचे आश्रयस्थान होते. तेथेच महावीरसिंगांनी क्रान्तिकार्याची दीक्षा घेतली.

त्याच सुमारास महावीरसिंगाच्या वडिलांनी महावीरसिंगांचा विवाह करण्याचे ठरविले. ते वृत्त ऐकून महावीरसिंगांपुढे मोठा पेचप्रसंग उभा राहिला. देशकार्याला वाहून घेणाऱ्या माणसाच्या जीवनात विवाहबंधन हे एक खोडाच होऊन बसणार, अशी त्यांच्या विचारांची धारणा होती. म्हणून आपल्या मनोदयाची कल्पना वडिलांस देण्यासाठी त्यांनी पत्र लिहिले. ते पत्र वाचून वडिलांना खूप आनंद वाटला. "माझा मुलगा देशासाठी लढणार आहे, हे पाहून मला फार आनंद होत आहे. तथापि काहीही झाले तरी मग भिऊन मागे फिरू नको आणि संगती-सोबत्यांचा विश्वासघात करू नको.

तुझ्यामागे माझे आशीर्वाद सदैव आहेत. लग्नाच्या भानगडी सोडून दिल्या आहेत.'. अशा अर्थाचे उत्तर महावीरसिंगाच्या वडिलांनी पाठविले.

महावीरसिंग बांध्याने धिप्पाड असून तालमीमुळे त्यांचे शरीर पिळदार व दणकट बनले होते. दलाच्या कामासाठी बॉम्ब-पिस्तुलप्रमाणेच मोटर-ड्रायव्हिंगलाही महत्त्व होते. वेळप्रसंगी त्या कलेचा क्रांतिकारकांना बराच उपयोग होणार होता. हिंदुस्थान समाजवादी दलाने लाहोर येथे दलाच्या काही सदस्यांसाठी मोटर ड्रायव्हिंगची सोय केली होती. महावीरसिंगांनी तेथे जाऊन ड्रायव्हिंगचे शिक्षण घेतले. त्यांच्या त्या शिक्षणाचा दलाला पुढे फार उपयोग झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या थोडे अगोदर दलाला पैशांची फार जरुरी होती. म्हणून लाहोर येथील पंजाब नॅशनल बँकवर दुपारी कामाच्या वेळात दरवडा घालण्याचे ठरले. चंद्रशेखर आझाद इत्यादी क्रांतिकारके पिस्तुले घेऊन बँकेच्या आवारात तयार होते. बँकेच्या कार्यालयात पिस्तुलाचे बार काढावयाचे व तेथील रक्कम घेऊन अगोदरच बँकेच्या दरवाजाजवळ तयार ठेवलेल्या मोटारीतून पसार व्हायचे असे ठरले होते. भगतसिंह व महावीरसिंग मोटार मिळविण्यासाठी गेले. परंतु मोटार न मिळू शकल्याने पंजाब नॅशनल बँकेवरील दरवड्याचे काम पुढे ढकलण्यात आले आणि लाला लजपतराय यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे त्या कामावर पडदा पडला. लालाजींच्या





महावीरसिंग

मृत्यूच्या छासूडांचे वेध क्रांतिकारकांना लागले. सॉंडर्सच्या वधानंतर भगतसिंह व राजगुरू डी. ए. व्ही. कॉलेजच्या वसतिगृहाच्या आवारातून शिरून दुसऱ्या टोकाला गेले. त्या ठिकाणी महावीरसिंग मोटार घेऊन तयार होते. त्यांनी त्या दोघांना मोटारीतून दूर नेले.

असेंब्लीतील बॉम्बस्फोटानंतर थोड्याच दिवसात फितुरीमुळे क्रांतिकारकांची धरपकड झाली. महावीरसिंगही त्या वेळी पकडले गेले. सॉंडर्सच्या वेळी केलेली ड्राइव्हिंगची मदत व राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. लाहोरच्या तुरुंगात भगतसिंग, जतींद्रनाथ दास वगैरे राजबंद्यांसमवेत महावीरसिंगही उपोषण करीत होते. राजबंद्यांना नाकातून दूध पाजण्यासाठी प्रयत्न करण्यास डॉक्टर आले की, महावीरसिंग व डॉक्टर आणि महावीरांना पकडून ठेवणारे कैदी यांच्यात खूप वेळ धडपड चाले. महावीरांसारख्या बलदंड व्यक्तीवर अत्याचार करणे फारच कठीण होते. त्यांना काही दिवस लाहोरच्या तुरुंगात, नंतर बेल्लारीच्या तुरुंगात व शेवटी अंदमानच्या सेल्यूलरच्या जेलमध्ये पाठविण्यात आले.

महावीरसिंग बेल्लारीच्या तुरुंगात असतानाची गोष्ट. त्या सुमारास १९३०–३१ च्या कायदेभंगातील सत्याग्रहींनी तुरुंग भरला होता. कैद्यांना फार वाईट रीतीने वागविण्यात येत होते. ती अपमानास्पद वागणूक थांबविण्यासाठी महावीरसिंग व त्यांचे सहकारी डॉ. गयाप्रसाद यांनी कैद्यांचा पोशाख अंगावर घालण्याचे व नंबराचा बिल्ला छातीवर लावण्याचे नाकारले. त्यामुळे जेलरने त्यांना बरीच मारपीट केली. एकदा ते जेलरसाहेब तुरुंगाच्या खोल्यांपुढून चक्कर मारीत असता महावीरसिंगांनी त्यांच्यावर अचानकपणे झडप घातली व त्यांच्या नाका-तोंडावर खूप गुद्दे लगावले. जेलरसाहेब पूर्वी मुष्टियुद्ध खेळत असत व आता कैद्यांना बुकलून काढून त्या मल्लविद्येचा रियाज (सराव) करीत असत. परंतु महावीरसिंगांसारख्या तगड्या जवानाने जेलरसाहेबांची विद्या त्यांच्याच चलनात त्यांना परत केली. कैद्यांच्या उपस्थितीत जेलरसाहेब शरीराच्या बाह्यांगाप्रमाणेच अंतर्यामी देखील रागाने लाल झाले. त्या वेळी त्यांनी तेथून धूम ठोकली. परंतु महावीरसिंगांच्या अपराधाबद्दल त्यांना तीस फटक्यांची सजा सुनावण्यात आली. फटक्यांची सजा देताना एका लाकडी उभ्या चौकटीच्या वरच्या व खालच्या बाजूला असलेल्या कड्यात अपराध्याचे

हातपाय फाकून अडकाविले जात व कंबर कातडी पट्ट्याने त्या चौकटीस बांधून टाकली जाई. आणि मग पाण्यात भिजविलेल्या वेताच्या फोकाचे फटकारे कैद्याच्या उघड्या पाठीवर ओढले जात. अशा शिक्षेच्या क्रूरतेने कैदी फटके बसत असतांचि बेशुद्ध पडे व याला स्ट्रेचरवरून त्याच्या कोठडीत पोचविले जाई. कैद्याला अडकवण्याच्या त्या लाकडी चौकटीला 'टिकटिकी' म्हणत. महावीरसिंगांना टिकटिकीत अडकवून जेव्हा त्यांच्या अंगावर वेताचे फटकारे बसू लागले त्या वेळी प्रत्येक फटक्यागणिक त्यांच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या व मांसाचे तंतू उडत असत; तथापि प्रत्येक वेळी ते 'इन्किलाब झिंदाबाद' ची घोषणा देत असत. मारणाराचे हात थकले. महावीराच्या वीरश्रीने जेलरचे तोंड काळे ठिक्कर पडले. आणि तो विजयी वीर एखाद्या घायाळ सिंहाच्या उमद्या गतीने स्वतःच्या पायांनी— स्ट्रेचरवरून नव्हे— खोलीकडे गेला.

अंदमानला गेल्यावर तेथे देण्यात येणाऱ्या अमानुष वागणुकीमुळे महावीरसिंगांनी अन्नसत्याग्रह सुरू केला. त्यामुळे तुरुंगाच्या अधिकाऱ्याने डॉक्टरकरवी नाकात नळी घालून त्यांना दूध पाजण्याचा प्रयत्न सुरू केला. त्या प्रयोगाला त्यांनी प्रतिकार केला. अशाच एका प्रसंगी प्रतिकाराच्या धडपडीत दुधाची नळी महावीरसिंगांच्या फुप्फुसांत खुपसली गेली. त्यामुळे थोड्याच दिवसात त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे प्रेत समुद्रात फेकण्यात आले.


हुतात्म्यांच्या रक्ताने, अंदमानच्या मातीने भांगामध्ये रंग भरला. हुतात्म्यांच्या विव्हल बोलांचे सूर झेलून जलपरी अंदमानच्या सागर किनाऱ्यावर शोकगीत गात आहेत.

* * *

२९. झाशीचे सिंह

(भगवानदास माहोर व सदाशिवराव मलकापूरकर)

‘मोठेपणाचा मार्ग मृत्यूच्या मैदानातून जातो,’ असे एका लेखकाने म्हटले आहे. क्रांतिकार्याच्या बाबतीतही असे म्हणणे योग्य होईल की, क्रांतीचा मार्ग हा मृत्यूच्या चौक्याचौक्यांतून जात असतो. भारतीय सशस्त्र क्रांतिकारकांच्या जीवन-पथावर ठायी ठायी मृत्यूच्या चौक्या बसविलेल्या होत्या, असे त्यांचा इतिहास अवलोकन करताना आढळून येते. बॉम्ब, बंदुका, पिस्तुले ही मृत्यूची आयुधे म्हणजे क्रान्तिकारकांची दररोजची खेळणी झाली होती. त्यांचे डोळे क्रांतीच्या ज्वालेने तळमळत होते. हृदयात क्रांतीच्या विचारांचे ज्वालामुखी धगधगत होते. आणि शरीरात क्रान्तीची विद्युल्लता संचारली होती. देशाच्या स्वातंत्र्य-सूर्याकडे त्यांची मने झेपावत होती. त्या ध्येयवेडापुढे प्राणांची कुर्बानीही त्यांना दीपज्योतीवरील पतंगाच्या आत्मसमर्पणासारखी यःकश्चित बाब वाटत होती. त्यामुळे इंग्रजांची बायोनेटे आणि बंदुका, तुरुंगाचे सापळे आणि फासाचे दोर यांची भयानक रूपे त्यांना शेतात उभारलेल्या विदुषकी बुजगावण्यांच्या रूपांसारख्या मामुली गोष्टी वाटाव्यात ह्यात नवल नाही.



देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या तरुण-तरुणींची एक पिढी विसाव्या शतकात जन्माला आली. झाशी येथील भगवानदास माहोर व सदाशिवराव मलकापूरकर हे तरुण विद्यार्थी अशा तरुणांपैकीच.

सन १९२४-२५ च्या सुमारास ही दोन तरुण मुले झाशीच्या माध्यमिक शाळेत शिकत होती. त्या सुमारास शचिंद्रनाथ बक्षी नावाचा क्रांतिकारक क्रांतिकारकांची संघटना बांधण्यासाठी उत्तर भारतातून झाशी येथे आला. त्याने तरुण विद्यार्थ्यांमध्ये क्रांतिकार्याची बीजे पेरण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत चंद्रशेखर आझाद हे गुप्त वेषात झाशी येथे येऊन राहिले. काकोरी येथे आगगाडीतील खजिना लुटल्यानंतर ते भूमिगत झाले होते. त्यांना पकडून देण्यासाठी इंग्रज सरकारने दहा हजार रुपयांचे बक्षीस लाविले होते. ह्यास्तव चंद्रशेखर आझाद हे उत्तर भारतातून निघून झाशी येथे आले होते. झाशीजवळच टिमोरबाबा नावाच्या साधूच्या मठात चेला म्हणून ते राहू लागले. शचिंद्रनाथ बक्षी हा आझाद, भगतसिंह इत्यादी क्रांतिकारकांच्याच दलापैकी एक कार्यकर्ता असल्यामुळे चंद्रशेखर आझाद हे मधून मधून शचिंद्रनाथ बक्षींच्या घरी येत असत. त्याच ठिकाणी भगवानदास माहोर व सदाशिवराव मलकापूरकर ह्यांची चंद्रशेखर आझादांबरोबर प्रथम भेट झाली. आझादांचा तो बलवान देह व त्यांची उग्र, करारी मुद्रा पाहून भगवानदास व सदाशिवराव हे फारच प्रभावित झाले. शचिंद्रनाथ बक्षींसारख्या किरकोळ शरीराच्या माणसाकडून ते आतापर्यंत बॉम्ब-पिस्तुलांसारख्या भयानक वस्तूंच्या गोष्टी ऐकत आले होते. परंतु त्यांनी जेव्हा प्रथम आझादांना पाहिले तेव्हा त्यांची खात्री झाली की, इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रूशी सामना करण्याला हा मनुष्य समर्थ आहे. दिवसांमागून दिवस जाऊ लागले. आझादांचा व त्यांचा परिचय वाढत गेला. आझादांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाकडे लोहचुंबकाप्रमाणे ते आकर्षिले गेले.

एकदा शचिंद्रनाथ बक्षी घरात गुप्तपणे क्रांतिकारकांशी काही चर्चा करीत होते. त्यांच्या हातात पिस्तुल होते. संभाषणाच्या ओघात अनवधानाने त्यांची बोटे पिस्तुलाचा चाप ओढू लागली. पिस्तुल भरलेले आहे, ह्या गोष्टीचे त्यांना भान राहिले नाही. पिस्तुलाच्या नळीचे तोंड भगवानदास माहोरांच्या छातीकडे होते. इतक्यात चंद्रशेखर आझादांच्या समयसूचक दृष्टीपुढून पुढील भयंकर प्रसंगाचे चित्र विजेच्या चपखल चमचमाटाप्रमाणे चमकून गेले. झटदिशी पुढे होऊन आझादांनी बक्षींच्या हातावर आपला पंजा ठेवून पिस्तुलाची नळी घराच्या छताकडे केली. पिस्तुल त्यांच्या

हातातून काढून घेतले व चापीखाली झोडला. आझादांच्या दृष्टीला ही गोष्ट आली नसती, तर बोलण्याच्या ओघात उरलेला अर्धा चाप बक्षींकडून न कळत ओढला गेला असता; त्यांच्या समोर बसलेल्या भगवानदासांचे मुडदा पडला असता, आणि पिस्तुलाच्या बारीकशा आवाजाने क्रांतिकारकांच्या गुप्त कार्याचा डंका पिटला जाऊन, त्यांच्या हातात हातकड्या पडल्या असत्या. आझादांच्या प्रसंगावधानाने तो भयंकर प्रसंग टळला.

लगेच आझादांनी माहोरांचा हात हातात घेतला. "मला भविष्य देखील समजते. बघू तुझा हात." असे म्हणत आझादांनी भगवानदासांचा हात हातात घेऊन त्यांचा तळहात पाहिला. नाडीवर बोट ठेवले. हात पाहण्यात असा उद्देश होता की, घडलेल्या प्रसंगामुळे घाबरून भगवानदासांचे हृदयाचे स्पंदन जोराने होऊ लागले की काय? परंतु तसे काही झालेले आझादांना आढळले नाही. म्हणून ते ज्योतिष्याचा आव आणून म्हणाले, "काहीही कार्य न करता फुकाचा थोडाच मरतोय! तसा योग नाही ह्या हाताचा. काही तरी सिंहासारखे कार्य होईल हातून."

भगवानदास आपल्या आठवणी सांगताना म्हणतात, "मला काव्याचे फार वेड. मी नेहमी प्रेमकाव्ये गाई. मराठी नाटकातील पदेही मी आवडीने गाई. (भगवानदासांची मातृभाषा हिंदी होती.) असेंब्लीत टाकण्यासाठी, बॉम्ब तयार करण्यासाठी आम्ही आग्रा येथे बॉम्ब तयार करीत होतो. त्या वेळी सहज गप्पा मारताना भगतसिंह मला म्हणाला, "कैलास, तू फाशी जाताना देखील आनंदाने गात गात फासावर चढशील का?" मला त्या वेळी त्याच्या म्हणण्याचा अर्थ पुरतेपणी लक्षात आला नाही. तथापि काही तरी उत्तर द्यायचे म्हणून मी म्हणालो, "होय." माझे उत्तर ऐकताच आनंदभराने त्याने माझा हात हातात घेऊन माझ्याकडून तसे वचन घेवविले. (क्रांतिकारकांच्या दलातील सदस्य एकमेकांना सांकेतिक नावाने संबोधीत असत. कैलास हे भगवानदासांचे सांकेतिक नाव.) वेळ आली तर क्रांतिकार्यासाठी निधड्या छातीने मृत्यूला सामोरे जाण्याची माझ्या मनाची तयारी आहे की नाही, ह्या गोष्टीची माझी परीक्षा भगतसिंहाला घ्यायची होती.

आझाद जरी आमचे नेते व सेनापती होते तरी आम्हां सहकाऱ्यांवर त्यांचे मातेप्रमाणे प्रेम होते. काव्य विनोद, संगीत इत्यादी कलात रममाण

होणारे भगवसिंह, विजयकुमारसिंह व मी अशा सहकाऱ्यांच्या संगतीत असणाऱ्या आझादांच्या पायांनी कधी जमिनीचे पाय सोडून कल्पनासृष्टीच्या अस्मानात भरारी घेतली नाही. ते अत्यंत व्यवहारी व वास्तववादी होते. मी प्रेमकाव्य म्हणू लागलो की ते म्हणायचे, "अरे, तुम्ही त्या मदनाच्या शरांनी काय विव्हल होता? त्यापेक्षा शत्रूच्या बंदुकीच्या गोळ्या हृदयात शिरून मरण्यात आनंद माना. माझे हृदय मदनबाणाने घायाळ होण्यापेक्षा त्याचियात शत्रूच्या पिस्तुलाची गोळी शिरली तर मला आनंद वाटेल!"

अशा मित्रांच्या तालमीत माहोर आणि मलकापूरकर तयार झाले होते. 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी' ज्या ज्या चढाया करीत असे त्यात ते भाग घेऊ लागले. सॉंडर्स वधाच्या वेळी ते दोघे देखील चंद्रशेखर आझाद, भगतसिंह, राजगुरू इत्यादींच्या समवेत पिस्तुले घेऊन वेळप्रसंगी मदतीला असावे म्हणून बाजूला दडून होते.

असेंब्लीत बॉम्ब टाकल्यानंतर भगतसिंह व बटुकेश्वर दत्त यांना सरकारने पकडले. त्यानंतर क्रांतिकारकांचा छडा लावण्यासाठी गुप्तहेर व पोलीस खाते जारीने प्रयत्नास लागले. क्रांतिकारकांनी एके ठिकाणी थांबणे आता धोक्याचे झाले. ह्यास्तव आझादांनी सर्वांना निरनिराळ्या ठिकाणी जाण्यास सांगितले. भगवानदास सदाशिवराव (मलकापूरकर) यांच्याकडे मध्यप्रदेशात अकोला येथे बॉम्ब घेऊन जाण्याची कामगिरी सोपविण्यात आली. कारण उत्तर प्रदेशापेक्षा मध्यप्रदेश आता क्रांतिकार्यासाठी सोयीचा होता असे राजगुरूने (रघुनाथ) सुचविले होते. एका मोठ्या ट्रंकेत तळाशी कापूस व कपडे टाकून बॉम्ब भरण्यात आले. शिवाय पिस्तुलाचे छर्रे, काही स्फोटक पदार्थांनी भरलेल्या बाटल्याही ठेवण्यात आल्या. ती ट्रंक घेऊन भगवानदास माहोर व सदाशिवराव मलकापूरकर हे झाशीहून अकोल्यास जाण्यासाठी रेल्वेत चढले. भुसावळ स्टेशन आले. दुसऱ्या प्रांतातून मुंबई प्रांतात येणाऱ्या लोकांची त्या वेळी भुसावळ येथे अबकारी खात्यामार्फत तपासणी होत असे. हमालाच्या डोक्यावर ट्रंक देऊन हे दोघेजण मागून जाऊ लागले. तपासणी अधिकाऱ्यांनी सामानाबाबत चौकशी केली. कपडे व इतर सामान असल्याचे त्या दोघांनी सांगितले. तथापि तपासणी अधिकाऱ्यांना संशय आल्याने त्यांनी ट्रंक उघडण्यास सांगितले. बाटल्यांत औषधे आणून आम्ही औषधे विकत फिरतो, असे

त्यांनी सांगितले. तथापि अधिकाऱ्यांचा संशय दुणावून त्यांनी उचकण्यास सुरुवात केली. पाहातात, तो बॉम्ब आणि छर्रे. आता आपण पकडले जाऊ असे पाहाताच त्या दोघांनी खिशातून पिस्तुले काढून त्यांचे बार काढले व स्टेशनच्या बाहेर पडण्यासाठी ते पळू लागले. परंतु दुर्दैवाने त्यांना आडवी टांग मारली. रेल्वे लाईनच्या कडेने जाणाऱ्या सिग्नलच्या तारेत पाय अडकून सदाशिवराव पडले. माहोर स्टेशनातून बाहेर पडण्यासाठी जे पळाले ते आयतेच पोलीस चौकीत घुसले. पोलीस त्यांच्या पाठीमागे धावत होतेच. त्यांनी त्यांना पकडले. त्यांची पिस्तुले काढून घेण्यात आली. नंतर धुळ्याच्या तुरुंगात त्यांची रवानगी करण्यात आली. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात मोठ्या अक्षरात बातमी आली :- ' झाशीचे सिंह पकडले ! '

धुळ्याच्या तुरुंगात असताना आपल्या वकिलामार्फत त्यांनी चंद्रशेखर आझादांना आपणाला एक पिस्तुल पाठवून देण्याचा निरोप पाठविला. आझाद हे पिस्तुलांना फार जपत असत. कारण एक तर पिस्तुले मिळविणे हे फार महागाईचे व धोक्याचे काम होते; आणि दुसरे असे की, क्रांतिकारकांच्या कार्यभागाची सर्व भिस्त पिस्तुलांवर अवलंबून होती. म्हणून पिस्तुलाचा बेफिकिरीने वापर करणाऱ्या सहकाऱ्यांला ते म्हणत, " एखादा कार्यकर्ता पकडला गेला अथवा मारला गेला तरी मला फार दुःख होणार नाही. परंतु एखादे पिस्तुल शत्रूच्या हाती गेले तर मला मनस्वी दुःख होते." ह्यास्तव भगवानदासांचा निरोप आल्यानंतर वस्तुस्थितीची शहानिशा करण्यासाठी आझादांनी भगवतीचरण व्होरांकडे ही कामगिरी सोपविली. सोपविलेली ही कामगिरी सोपी नव्हती. स्वतःचा जीव धोक्यात घालून ती करावी लागणार होती. भगवतीचरणांनी बॅरिस्टरासारखा अद्ययावत झकपक पोषाख केला व ते धुळ्याच्या तुरुंगात भगवानदास व सदाशिवराव यांची भेट घेण्यास त्यांच्या वकिलासमवेत गेले. भगवतीचरणांचा पोषाख पाहून कैद्यांच्या वतीचा वकीलच त्यांना भेटावयास आला आहे, असे वाटून त्यांना ह्या कैद्यांना भेटण्याची परवानगी मिळाली. आपल्या कैदी सहकाऱ्याशी विचारविनिमय करून बॅरिस्टरसाहेब आल्या पावली परत गेले.

थोड्याच दिवसांत जळगावच्या जिल्हा न्यायाधीशासमोर खटला उभा राहाणार होता. म्हणून खटल्यासाठी त्या दोन आरोपींना धुळ्याहून जळगावला आणण्यात आले व जळगावच्या सबजेलमध्ये ठेवण्यात आले.

खटल्याचा निकाल लागेपर्यंत आरोपींना स्वतःच्या घरचे जेवण मागविण्याची सवलत असते. त्या सवलतीचा फायदा घेऊन जळगावला आलेले सदाशिवराव मलकापूरकरांचे बंधू भगवानदास व सदाशिवराव यांना बाहेरून जेवण घेऊन जात असत. एके दिवशी त्यांनी अन्नपदार्थांच्या खाली पिस्तूल व गोळ्या घालून जेवणाचा डबा भगवानदासांकडे पोहोचता केला. भगवानदासांचा गोड स्वभाव व गोड वाणी ह्यामुळे पहारेकरी पोलीस त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहात असत. ह्यास्तव डब्यातील वस्तूंची फारशी पाहाणी ते करीत नसत.

आझादांनी पिस्तुल पाठविताना निरोप पाठविला की, पिस्तुलाचा उपयोग फक्त कैलासने (भगवानदासांनीच) करावा. कारण नेमबाजीत ते जास्त निपुण होते. खटला सुरू झाला. बेड्या घालून आरोपींना खटल्याच्या दिवशी जिल्हा न्यायालयात नेत असत. लाहोर येथे सॉंडर्सच्या झालेल्या वधाच्या संबंधात भगवानदास व सदाशिवराव ह्या जोडगोळीच्या शोधात सरकार पूर्वीपासून होतेच. परंतु त्यांचा पत्ता लागत नव्हता. सॉंडर्स-वधाच्या खटल्याशी संबंधित असलेल्या क्रांतिकारकांपैकी जयगोपाळ व फणींद्र घोष हे माफीचे साक्षीदार झाले होते. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांनी केलेल्या कृत्यांचा तपशील सरकारला सांगितला. भगवानदास व सदाशिवराव ह्यांच्या विरुद्ध सरकारतर्फे साक्षीदार म्हणून पंजाब पोलिसांच्याबरोबर त्या दोघांना जळगावला आणण्यात आले होते.

खटल्याचे काम बरेच दिवस चालले होते. एके दिवशी भगवानदासांनी कोर्टात जाताना बेमालूमपणे पिस्तुल अंगावरच्या कपड्यात घेतले. खटल्याचे कामकाज दुपारच्या चहाच्या वेळी थांबले. त्या वेळी त्या दोन कैद्यांना कोर्टाच्या आवारात नेण्यात आले. त्यांच्या आप्तांनी त्यांच्यासाठी खाण्याचे पदार्थ आणले होते. हे दोघे कैदी जेथे बसले होते तेथून थोड्या अंतरावर समोर राहुटीत जयगोपाळ व फणींद्र घोष हे पंजाब पोलिसांसमवेत बसलेले दिसत होते.

मोत्या-पोवळ्यांचा पाऊस क्वचितकाळी बरसत असतो. तशी ही संधी कृतसंकल्पाच्या उत्कंठेवर तरंगत आली होती. भगवानदासांचा उजवा व सदाशिवरावांचा डावा हात एका बेडीच्या जोडीत अडकविलेला होता. खाण्याच्या

वेळेपुरता आपला उजवा हात बेडीतून मोकळा करावा, अशी विनंती भगवान-दासांनी पहारेकरी पोलिसांना केली. भगवानदासांचे गोड गाणे व खेळकर स्वभाव ह्यांवर खूष असलेल्या पोलिसांना त्यांची अडचण रास्त वाटून त्यांनी त्यांचा हात बेडीतून मोकळा केला. केवड्याच्या पिवळ्या धम्मक कणसांच्या आड केवढे जहरी फूत्कार दडलेले आहेत, याची त्या बिचाऱ्या भावड्या पोलिसांना काय कल्पना ! हात मोकळा होताच भगवानदासांनी विजेच्या चपळाईने समोरच्या राहुटीकडे धूम ठोकली. कपड्यांत लपविलेले पिस्तुल काढून त्यांनी जयगोपाळ व फणींद्र ह्या विश्वासघातकी सहकाऱ्यांवर गोळ्या झाडल्या. भगवानदासांना याचा आनंद वाटला की, आपण मागविलेल्या पिस्तुलाचे सार्थक केले. विश्वासघातक्याचा काटा काढला. परंतु दुर्दैवाचे दशावतार संपलेले नव्हते. पिस्तुलाच्या गोळ्या जयगोपाळ व फणींद्र ह्यांच्या मर्मस्थानी न लागता पायाला चाटून गेल्या होत्या. भगवानदासांचा तो वीरभद्राचा अवतार पाहून पंजाबी पोलिसांबरोबर असलेला एक लठ्ठ युरोपियन पोलिस अधिकारी, 'मला नको मारू, मी काही तुझा शत्रू नाही.' अशी गयावया करीत भगवानदासांच्या अंगावर पडला. त्याच्या अगडबंब शरीराच्या ओझ्यामुळे भगवानदास कोलमडले.

न्यायालयाच्या आवारात एकच गोंधळ उडाला. भगवानदासांना पकडण्यात आले. पुढे खटला चालून निरनिराळ्या आरोपांखाली त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. झाशीचे सिंह ! पण आता तुरुंगाच्या पिंजऱ्यात कोंडले. फणींद्रनाथ घोष या माफीच्या साक्षीदाराला पुढे वैकुंठ शुक्ल या क्रान्तिकाराने कुकरीने ठार मारून त्याच्या पापाचे प्रायश्चित्त दिले. वैकुंठला गयाजेलमध्ये १९३४ मध्ये फाशी दिले.

३०. रक्तकमळ

(भगवंतीचरण व्होरा)

भगवतीचरण व्होरा आणि दुर्गादेवी व्होरा ह्या पतिपत्नींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत केलेल्या धैर्यशाली, शौर्यशाली कार्याला क्वचितच तोड मिळू शकेल. हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेनेचे सभासद भगवतीभाईंना बाबुभाई म्हणत व चंद्रशेखर आझादांना भैय्या म्हणत. कुठल्याही फळाची, कीर्तीची, स्तुतीची अथवा मानमान्यतेची पर्वा व अभिलाषा न करता एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे बाबुभाई कार्य करीत राहिले. विनयवती व विद्यावती रूपवती अशी पत्नी होती. गोजिरवाणा मुलगा होता. त्या काळी तसे पाहिले तर घरची सांपत्तिक स्थिती देखील बऱ्यापैकी होती. आणि ह्या काळाच्या मानाने त्यांचे बी. एस्सी. पर्यंतचे शिक्षण झाले होते. दृष्ट लागण्यासारख्या सुखासीन जीवनाच्या मार्गावर ते उभे होते. परंतु देशाच्या स्वातंत्र्याच्या विचाराने त्यांचा जीवनप्रवाहच आमूलाग्र बदलून गेला. बुद्धिपुरःसर सतीचे वाण घेतलेल्या बाबुभाईंनी ना कधी कीर्तीची अभिलाषा केली, ना कधी वैयक्तिक सुखाची पर्वा केली. आणि इतके असूनही निर्दय नियतीने मात्र त्यांचा निर्मळ जीवनप्रवाह गढूळ करण्यासाठी हात धुऊन त्यांच्या पाठीमागे लागली होती. ज्या सहकाऱ्यांसाठी ते वणवणले, रणरणले, शिणशिणले, त्यांच्याच मनात आलेल्या संशयाच्या किल्मिषांमुळे त्यांचे अंतःकरण व्यथित होत होते. कार्यासाठी त्यांनी जीवनाची बाजी लावली होती, परंतु क्रूर दैवाने त्यांच्या पदरात मित्रमंडळींची इतराजी घातली होती. तथापि बाबुभाईंना त्याची खंत नव्हती, खेद मात्र वाटत होता. हे गैरसमजाचे धुके विरावे, असा सारखा ध्यास त्यांना लागला होता.

भगवतीचरण व्होरा यांचे घराणे गुजराती ब्राह्मणाचे. त्यांचे पूर्वज गुजरातमधून निघून लाहोरला स्थायिक झाले. तेथेच भगवतीभाईंचा १९०४ मध्ये जन्म झाला. लाहोरला त्यांचे स्वतःच्या मालकीचे घर होते. घरची सांपत्तिक स्थिती चांगली होती. भगवतीचरण नॅशनल महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांच्याहून दोन-तीन वर्षे वयाने लहान असलेल्या

दुर्गादेवी या सुंदर मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला. दुर्गादेवीही महिला विद्यालयात शिकत होत्या.

नॅशनल महाविद्यालयात शिकत असताना जयचंद्र विद्यालंकार या प्राध्यापकांच्या उत्तेजनामुळे भगवतीभाई समाजवादी विचारसरणीची पुस्तके वाचू लागले. त्यामुळे समाजवाद व क्रांती यांकडे त्यांचे मन आकृष्ट झाले. त्यांच्यामागून दोन वर्षांनी सरदार भगतसिंह, सुखदेव हे त्यांच्याच महाविद्यालयात शिकण्यासाठी आले. समान विचारामुळे लौकरच त्यांची गट्टी जमली. सुरुवातीला हे तरुण गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीकडे आकृष्ट झाले होते. परंतु गांधीजींनी चळवळ मागे घेतल्यामुळे ह्या तरुणात वैफल्याची भावना निर्माण झाली. स्वतःच्या मनात उसळणाऱ्या जळजळीत विचारांना वाव देण्यासाठी ते क्रांतीच्या मार्गाकडे वळले. इ. स. १९२४ च्या सुमारास त्यांनी 'नौजवान भारत सभा' सुरू केली आणि सत्तावन्नच्या स्वातंत्र्ययुद्धापासून ते गदर चळवळीपर्यंतच्या वीरांचे कार्य आणि फ्रेंच व रशियन क्रांती यांची माहिती निरनिराळ्या ठिकाणी जाऊन हे तरुण जनतेला देत असत. त्या सुमारास रामप्रसाद बिस्मिल, शचिंद्रनाथ सन्याल इत्यादी क्रांतिकारक उत्तर प्रदेशात इंग्रजांविरुद्ध शस्त्रधारी क्रांतिकारकांची गुप्त संघटना बांधण्याचे कार्य करीत होते. पंजाबातील वरील तरुणांनी त्यांच्याशी संधान बांधले. त्यांच्याकडून मिळणारे संदेश व सूचनापत्रके यांनुसार भगवतीचरण, भगतसिंह, सुखदेव, यशपाल आदी लाहोरचे युवक कार्यकर्ते पंजाबात कार्य करू लागले. गणपतीभाई हे त्या सर्व विद्यार्थी युवकांत वयाने व शिक्षणाने पुढे होते. रशियातील समाजवाद, फ्रान्स, रशिया, इटली इत्यादी देशांत झालेल्या क्रांत्यासंबंधीच्या ग्रंथांचे त्यांचे वाचन दांडगे होते. त्यामुळे भगतसिंह, सुखदेव, यशपालादी सहकाऱ्यांना क्रांतिकार्याचे सुरुवातीचे पाठ त्यांच्याकडूनच मिळाले. भगवतीभाई अंगाने दुहेरी हाडाचे व सहा फूट उंचीचे होते. त्यांच्या डोळ्यांना चष्मा होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व भारदस्त दिसे. वृत्तीने ते गंभीर असून मितभाषी होते.

नॅशनल महाविद्यालयातील प्राध्यापक जयचंद्र विद्यालंकार यांनी वास्तविक रीत्या आपल्या विद्यालयातील ह्या तरुण विद्यार्थ्यांना क्रांतिप्रवण

केले. स्वतः जयचंद्रांना पुढारीपण हवे होते, परंतु संघटनेसाठी काही रचनात्मक कार्य करण्यास त्यांचे मन धजत नसे. ते एक बोलघेवडे पुढारी होते. शिवाय देखील, ते प्राध्यापक असल्यामुळे क्रांतिकारी चळवळीत काम करणारे विद्यार्थी युवक त्यांना मानीत असत. परंतु भगवतीभाईंनी थोड्याच अवकाशात पंजाबात जे कार्य केले त्याच्या प्रभावाने युवकांचे नेतृत्व साहजिकच त्यांच्याकडे येऊ लागले. आपला एक विद्यार्थी आपल्या पुढारीपणाला असू लागल्याचे पाहून प्रा. जयचंद्रांना भगवतीभाईंचा हेवा वाटू लागला. आपले सध्याचे पुढारीपण हिरावून घेऊन पुढेमागे भगवतीचरण व्होराच क्रांतिकारकांचा पुढारी होईल ह्या असूयेच्या विचाराने त्यांच्या मनात पेट घेतला. भगवतीभाईंच्या कार्याला काळिमा फासण्याच्या उद्योगाला हे प्राध्यापक लागले. त्याच सुमारास हा रामप्रसाद बिस्मिल, रामकृष्ण खत्री, मन्मथनाथ गुप्त, मुकुंदीलाल, शचिंद्रनाथ संन्याल वगैरे क्रांतिकारक काकोरी येथे केलेल्या रेलगाडीच्या हल्ल्याच्या प्रकरणी पकडले गेले होते. त्यांना सोडविण्याच्या कार्यासाठी पैशांची जरुरी होती. बाबुभाईंनी त्या कामासाठी स्वतःचे बरेच पैसे दिले व जनतेकडूनही जमा केले. प्रा. जयचंद्रांनी त्याच कामासाठी सुशीलादिदी ह्या क्रांतिकार-कार्यकर्तीकडे दोनशे रुपयांची मागणी केली. एवढे पैसे तिच्याजवळ नव्हते म्हणून हातातील सुवर्णकंकणे मोडून आलेले पैसे तिने द्यावेत, असे जयचंद्र विद्यालंकारांनी तिला सुचविले. एवढेच नव्हे तर दोन-तीन दिवसांनी तिला निरोप पाठविला की, सुशीलादिदीने आपल्या सोन्याच्या बांगड्या त्यांच्याकडे पाठवून द्याव्यात. आपल्या भाचीचे लग्न असल्यामुळे तिला बांगड्या द्याव्या लागतील. त्यासाठी लागणारे पैसे काकोरी कटातील क्रांतिकारकांना सोडवण्यासाठी उपयोगी पडतील व दिदींच्या बांगड्या त्यांच्या भाचीला होतील. भगवतीभाईंनी जेव्हा हा प्रस्ताव ऐकला, तेव्हा त्यांचे डोकेच फिरले. त्यांनी जयचंद्रांना निरोप पाठविला की, सुशीलादिदीसारख्या एका महिला-कार्यकर्तीला तिच्या असलेल्या सोन्याच्या बांगड्या विकायला सांगण्यापेक्षा प्राध्यापक महाशयांनी आपल्या भाचीला लग्नात नवीन बांगड्या विकत न घेता ते वाचलेले पैसे काकोरीच्या क्रांतिकारकांच्या मदतीसाठी द्यावेत. भगवतीभाईंनी हाणलेला टोला वावदूक जयचंद्रांच्या चांगलाच वर्मी लागला.

दुखावलेल्या भागाप्रमाणे हेच घडून जयचंद्रांनी त्यानंतर भगवतीभाईंच्या मागाते विष पेरण्यास सुरुवात केली. भगवतीभाई हे पोलिसांचे गुप्त हस्तक असून शेवटी ते आपणा सर्वांना पकडून देतील, असा गुप्त प्रचार त्यांनी क्रांतिकारक युवकांत करण्याला सुरुवात केली व ते युवक जयचंद्र विद्यालंकारांचे विद्यार्थी असल्यामुळे आपल्या गुरूच्या शब्दांवर त्यांचा नाही म्हटले तरी, काही अंशी विश्वास बसला. त्यामुळे पुढे पुढे सुखदेव व भगतसिंह बाबुभाईंशी तुटकपणाने वागू लागले व दलाच्या अंतर्गत महत्त्वाच्या गोष्टी त्यांना न कळू देण्याची खबरदारी घेऊ लागले. काकोरीच्या खटल्यानंतर हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशनचे नेतृत्व चंद्रशेखर आझादांकडे आल्यावर त्यांच्या मनात देखील भगवतीचरणांबद्दल विकल्प होताच. त्यामुळे त्यांच्यापासून दोन पावले दूर राहण्याचा सल्ला आझादांनी सर्व सहकाऱ्यांना दिला होता. ज्यांच्या साथीने आपण हे कार्य करीत आहोत त्या सहकाऱ्यांचा आपल्यावर विश्वास नसून ते आपणापासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत आहेत, ह्या गोष्टीची जाणीव दुर्गाभाबी व बाबुभाई या पति-पत्नीला झाली होती. मनाला अपार दुःख वाटत होते; परंतु राग सहकाऱ्यांचा येत नव्हता, तर नियतीचा येत होता. सहकाऱ्यांबद्दल त्यांच्या मनात प्रेमाचे कुंभ उचंबळत होते.

काकोरी कटातील क्रांतिकारकांची धरपकड झाल्यानंतर आपल्यावर पंजाबात तसा प्रसंग येऊ नये, म्हणून भगवतीभाईंनी भारताचे थेट पूर्वेकडचे टोक गाठले. कामगारांच्या बकाली वस्तीत ते राहू लागले. कलकत्त्यात असताना बॉम्ब बनविण्याची कृती शिकण्याचा प्रयत्न त्यांनी केला; परंतु ती गोष्ट शक्य झाली नाही. कलकत्त्याहून केव्हा तरी ते लाहोरला पत्नी व छोट्या शचिनला भेटायला जात व एखादुसरा दिवस तेथे राहून परत परांगदा होत. असेच एकदा ते लाहोर येथे आले. दुर्गाभाबीजवळ घरखर्चाला हजार रुपये देऊन गेले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी सॉंडर्सचा वध झाला. दलातील (पार्टीतील) सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे दुर्गाभाबी भगतसिंहांची पत्नी बनून त्यांना आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून सुखरूपपणे कलकत्त्याला घेऊन गेल्या. भगवतीभाईंनी घरखर्चासाठी ठेवलेले हजार रुपये त्या वेळी आगगाडीच्या भाड्यासाठी उपयोगी आले. एका गुप्तहेराची पत्नी अशा संशयी नजरेने समाज दुर्गाभाबींकडे पाहात

होता. दलातील सहकाऱ्यांचाही त्यांच्यावर पूर्णपणे विश्वास नव्हता-आणि पतीही देशकार्यासाठी घरापासून दूर अंतरावर राहात होता. अशा सर्वच बाजूंनी दूर फेकले गेल्यामुळे भाबींचा कोंडमारा होत होता. तथापि ती धीराची युवती, ती सर्व अग्नीकाष्टे भक्षण करून पचवीत होती. आश्रयाला आलेल्या क्रांतिकारक साथीदारांना दोन घास भरवीत होती. अडीअडचणीला पदरचे दोन पैसे देत होती.

भगतसिंह व दत्त यांना पकडल्यानंतर काही दिवसांनी त्यांना लाहोर येथील कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यांची सुटका तेथून कशा रीतीने करता येईल याचा अंदाज घेण्यासाठी चंद्रशेखरांनी बच्चनला (विश्वनाथ वैशंपायनला) कानपूरहून लाहोरला पाठविले. दुर्गाभाबींकडे न जाण्याबद्दल बजावून सांगितले. उद्देश हा की, न जाणो ती पोलिसांना खबर देऊन दलातील अन्य क्रांतिकारांना पकडून देईल. वैशंपायन त्याप्रमाणे लाहोरला गेले. काही दिवस त्यांनी टेहळणी केली. दर रविवारी भगतसिंह व दत्त यांना गावातील दुसऱ्या तुरुंगात असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांना भेटण्या-साठी घेऊन जात असत. तुरुंगाच्या फाटकापासून थोड्या अंतरावर पोलिस-गाडी उभी राही. पोलीस भगत-दत्तांना घेऊन फाटकापासून पोलिसगाडीपर्यंत येत असत. ह्या वेळी पोलिसांवर बॉम्ब फेकून गडबड उडवून द्यावी व त्या गडबडीत अगोदरच तयार ठेवलेल्या मोटारीतून भगत-दत्तांना पळवून न्यावे, अशी कल्पना वैशंपायन यांच्या डोक्यात आली. लाहोर येथे वैशंपायन ज्या मित्राकडे उतरले होते. त्यांच्याकडून शेवटी त्यांना कळले की, वैशंपायन यांच्या राहाण्याची, जेवणाची व भाड्याची सर्व सोय दुर्गा-भाबींनी केली होती व जाण्यापूर्वी भेटण्यास सुचविले होते. त्याप्रमाणे वैशंपायन भाबींना भेटले. भाबींनी मनमोकळेपणाने आपले दुःख व्यक्त केले. व आपण व भगवतीभाई सर्व सहकाऱ्यांशी इतक्या प्रामाणिकपणे वागत असताही सहकाऱ्यांनी आपणाशी अशा संशयीवृत्तीने वागावे. यामुळे होणाऱ्या दुःखाच्या तीव्र वेदना त्यांनी वैशंपायनजवळ व्यक्त केल्या व बाबुभाई व आपण भगत-दत्तांना सोडविण्याची पराकाष्ठा करू असे कळवळून सांगितले.

वैशंपायनने कानपूरला येऊन आझादांना ही सर्व हकिगत सांगितली. आझादांचीही दुर्गाभाबीच्या निवेदनाने खात्री पटली. बच्चन दिल्लीला जाऊन

भगवतीभाईंना घेऊन कानपूरला आला. भैय्या आणि बाबुभाईंनी एकमेकांना बाहुत कवळून दृढ आलिंगन दिले. त्यांच्यामधले गैरसमजाचे धुके विरून गेले.

भगतसिंहाची सुटका करण्यापूर्वी इंग्रजी शासनाला एक जबरदस्त हादरा देण्याची योजना भाईंनी आझादभैय्यांना सांगितली. मध्यंतरीच्या काळात बाबुभाई कलकत्याहून निघून काश्मिरमध्ये श्रीनगरला गेले. तेथे रसायनशास्त्राच्या एका प्राध्यापकाकडून बॉम्बचा मसाला तयार करण्यास शिकले व तो मसाला भरण्यासाठी प्लॅस्टरच्या खोळी ते स्वतःच बनवू लागले, अशा एका बॉम्बने व्हॉईसरायाची गाडी उडवून देण्याची योजना त्यांनी आखली. यशपाल व इंद्रपालने ती कामगिरी स्वतःवर घेतली व भगवतीभाईंना भगत-दत्तांच्या सुटकेच्या योजनेसाठी लाहोरला जाण्यास सांगितले.

२३ डिसेंबर १९२९ रोजी व्हॉईसरॉय लार्ड आयर्विन फिरतीवरून स्वतंत्र आगगाडीने दिल्लीस पहाटे येणार होता. दिल्ली स्टेशनपासून तीन-चार मैल अंतरावर रेल्वे लाईनवर यमुना नदीवर पूल होता. इंद्रपाल-यशपालांनी भगवतीभाईंनी बनविलेला बॉम्ब त्या पुलावर रुळाजवळ ठेवला व बॉम्बला जोडलेली तार थोड्या अंतरावर असलेल्या कौरव-पांडवांच्या पडक्या किल्ल्याजवळ बॅटरीला जोडून ठेवली व अंधारात बॅटरीजवळ ते उभे राहिले. पहाटेची वेळ. धुक्यामुळे अंधार अधिकच भासत होता. थोड्या अंतरावरचे देखील दिसत नव्हते. अंधारातून गाडीची घरघर ऐकू येऊ लागली. ते दोघे सावध झाले. इतक्यात गाडी यमुनेच्या पुलावरून धाडधाड आवाज करीत जाऊ लागली. यशपालने बॅटरीची किल्ली फिरविली. बॅटरीतील विजेचा प्रवाह क्षणार्धात बॉम्बपर्यंत पोचला. 'धुम धडाम' असा एकच मोठा आवाज अंधार आणि धुके भेदीत दूरवर गेला. बॉम्ब फुटला. एका डब्याचा चुराडा झाला. पण व्हॉईसरायचे दैव शिकंदर. त्याचा डबा पुढे निघून गेला होता. बॉम्बचा अपेक्षित परिणाम होऊन गाडी पुलाखाली कोसळली नाही. गाडी हलके हलके दिल्ली स्टेशनात गेली. अंधार व धुके यात यशपाल व इंद्रपाल गडप झाले.

ह्या हल्ल्यावर गांधीजींनी 'कल्ट ऑफ बॉम्ब' (बॉम्बवाल्यांचा पंथ) ह्या नावाचा लेख लिहून बॉम्ब फेकणारांचा निषेध केला होता. जनतेत आपल्यासंबंधाने गैरसमज निर्माण होऊ नये म्हणून गांधीजींच्या त्या

लेखाला समर्पक उत्तर देणारे व आपल्या कृतीचे समर्थन करणारे 'फिलॉसॉफी ऑफ बॉम्ब' (बॉम्बचे तत्त्वज्ञान) नावाचे पत्रक भगवतीभाईंनी तयार केले व त्याच्या प्रती देशाच्या सर्व भागात एकाच दिवशी दि. २६ जानेवारी १९३० रोजी वाटल्या जातील अशी योजनाही केली. एवढेच नव्हे, तर एक प्रत गांधीजींच्या हाती पडेल अशीही व्यवस्था केली.

भगवतीभाई लाहोरला गेले. बॉम्ब बनविण्यासाठी काश्मिरी बिल्डिंग नावाच्या इमारतीचा वरचा मजला भाड्याने घेण्यात आला होता. त्या ठिकाणी सुखदेव, जयगोपाळ, यशपाल, भगवतीभाई इत्यादी मंडळी बॉम्ब बनवीत असत. बॉम्बचा मसाला भरण्यासाठी लागणाऱ्या खोळी गुलाम रसूल नावाच्या लोहाराकडून तयार करवून घेतल्या जात असत. आम्ही तयार करीत असलेल्या इंजिनासाठी ते भाग लागतात असे ते लोहाराला सांगत असत. परंतु त्या लोहाराला संशय आला. शिवाय सॉंडर्सचे मारेकरी पकडून देण्यासाठी सरकारी मोठे इनाम लागले होते. त्यामुळे त्या लोहाराची बुद्धी चळली. त्याच्या तोंडाला पाणी सुटले. त्याने पोलिसांत खबर दिली. पाळत ठेवून दि. १५ एप्रिल १९३० रोजी गुलाम रसूलकडून बॉम्बसाठी लागणाऱ्या लोखंडी खोळी घेऊन जाणाऱ्या माणसाच्या मागोमाग जाऊन पोलिसांनी खोलीच्या दारावर थाप मारली. सुखदेवांनी दार उघडले. पोलिसांशी सामना करण्यासाठी त्यांनी रिव्हॉल्व्हरला हात घातला, परंतु पोलिसांनी त्यांना पकडले. जयगोपाळ, इंद्रपाल हेही पकडले गेले. भगवतीभाई व यशपाल त्या वेळी तेथे नव्हते. तयार झालेले काही बॉम्ब, रसायने, पिस्तुले वगैरे साहित्य पोलिसांच्या हाती लागले. सुखदेव आदींना पकडून नेऊन त्यांच्यावर खटला भरण्यात आला.

एक जूनला भगतसिंह-दत्तांना सोडविण्यासाठी बॉम्ब टाकावयाचा होता. आज दि. २८ मे १९३० चा दिवस. मध्ये फक्त दोनच दिवस उरले. म्हणून आपण स्वतः तयार केलेल्या बॉम्बची रंगीत तालीम घेण्यासाठी भगवतीभाई फार उत्सुक झाले होते. भैय्याच्या मनातील गैरसमज दूर झाल्याचे पाहून त्यांच्या अंगात हत्तीचे बळ संचारले होते.


भगतसिंहांना पकडल्यावर त्यांच्याजवळ सापडलेल्या पिस्तुलाची गोळी व सॉंडर्स मारलेली गोळी ही सारखीच असावी, असे अनुमान

पोलिस अधिकाऱ्यांनी काढले. तसेच 'सॉंडर्स मेला, लालाजींचा सूड उगवला' ह्या हस्तपत्रकाशी भगतसिंहांचे हस्ताक्षर जुळले. सॉंडर्सचा खून करणे व असेंब्लीवर बॉम्ब टाकणे ह्या अपराधाबद्दल भगतसिंह व दत्त यांना लाहोरच्या केंद्रीय कारागृहात (सेंट्रल जेल) ठेवले होते व त्यांच्यावरील खटला सुरू होता.

भगतसिंह व दत्त यांची कारागृहाच्या इमारतीतून सुटका करण्याची मसलत लाहोरमधील बहालपूर कोठी ह्या इमारतीत क्रान्तिकारक करीत होते. काश्मीरी बिल्डिंगवर पोलिसांनी धाड घातल्यामुळे ह्या नवीन जागेत क्रान्तिकारकांनी आपला संसार थाटला. आझादही तेथे आले होते. ही जागा कारागृहाच्या जवळ असल्याने कार्यभागाच्या दृष्टीने योग्य होती. लाहोरच्या तुरुंगावर बॉम्ब टाकून गोंधळ उडवून द्यावा व त्या गोंधळाचा फायदा घेऊन त्या दोघांची सुटका करावी, असे ठरले. त्यानंतर बॉम्ब कवचात भरण्यात आले. सावधगिरी व खबरदारी घेण्यास जरा देखील हलगर्जीपणा झाला तर मध्येच बॉम्बचा स्फोट होऊन जिवावर बेतायचे, आवाजाने लोकांना गुप्त कटाचा सुगावा लागायचा, आणि अशा रीतीने सर्व प्रयत्नांवर पाणी फिरायचे.

बॉम्ब तयार झाल्यावर ते सुखदेवराज, वैशंपायन व भगवतीचरण व्होरा हे बॉम्बची चाचणी घेण्याकरता बाहेर पडले. भगवती चरणच्या खांद्याला झोळी अडकविलेली होती आणि तिच्यात बॉम्ब ठेवलेले होते. सुखदेवराज हा पूर्वी लाहोर येथे महाविद्यालयात शिकत होता. त्यामुळे लाहोर शहरातील रस्ते, गल्ल्या व भोवतालची ठिकाणे यांची त्याला चांगली माहिती होती. गावाच्या बाहेर पडून ते रावी नदीच्या तीरावर आले. नदी पार करण्यासाठी तेथे एक होडी होती. सुखदेवराज व भगवतीचरण यांना होडी वल्हविण्यास येत होती. आपल्या बेताची गुप्तता राहावी म्हणून होडीवाल्याला काही पैसे देऊन त्याला बरोबर न घेता त्या तिघांनीच होडी हाकारली. होडीने ते काही अंतरावर पैलतीरी पोहोचले. रावी नदीच्या त्या भागापासून पुढे एक निबिड अरण्य होते. तेथे गेल्यावर एका मोठ्या डबक्याच्या काठी ते थांबले. सुखदेवराज व वैशंपायन भगवतीचरणांना म्हणाले, "भगवती-भाई, तुमच्यासारख्या वीरांची आपल्या कार्याला गरज आहे. बॉम्ब उडवताना काही अपघात होऊन आम्ही मेलो तरी चालेल. तुमच्या मृत्यूमुळे मात्र

क्रांतीची वाट आंधळी होईल. क्रांतीची लाट थिजून जाईल." त्या तिघांचे संबंध नव्हते आप्ताचे, नाते नव्हते रक्ताचे, नाते जडले होते उदात्त भावनेच्या बंधुभावाचे. वडील भावाच्या जाणीवेने भगवतीचरणने उत्तर दिले, "भाई, माझ्याबद्दल नका काळजी करू. मृत्यूच्या सावलीत चालण्याची मला सवयच झाली आहे. परंतु जर का तुमच्यावर काही अनर्थ ओढवला, तर मात्र हे काळे तोंड घेऊन मला भैय्याकडे जाता येणार नाही. म्हणून मीच बॉम्बची



चाचणी घेतो. तुम्ही जरा अंतरावरील झाडाच्या खोडामागे आडोशाला उभे राहा."

वैशंपायन व सुखदेवराज हे दूर जाऊन झाडाच्या बुंध्याच्या आड उभे राहिले. भगवतीचरणने झोळीतून बॉम्ब काढला. हातात घेऊन त्यांनी हलकेच बॉम्बची पिन काढली व तो खड्ड्यात फेकणार इतक्यात 'धुम धडाड' असा कानठळ्या बसणारा आवाज झाला. बॉम्बच्या स्फोटाने भगवतीचरण यांचा एक हात खांद्यापासून तुटून दूर उडाला. दुसऱ्या हाताची बोटे तुटून गेली. डोळ्यांची बुबुळे बाहेर पडली व सर्वांगावर झालेल्या जखमांतून रक्ताच्या चिळकांड्या उडू लागल्या. जणू मृत्यूचे कारंजेच फवारत होते.

बॉम्बचा एक कवचा उडून सुखदेवराज यांच्या मांडीत घुसला. तशाही परिस्थितीत ते वैद्यकीय मदत आणण्यासाठी शहराकडे निघाले. रक्तबंबाळ झालेल्या पायामुळे त्यांना चालताही येईना कसे तरी चालत त्यांनी एक टांगा गाठला. हे काय झाले अशी टांगेवाल्याने शंका प्रदर्शित करताच 'झाडावरून पडल्याने पाय मोडला' असे त्याने सांगितले. ते शहरात गेले. घरापासून थोड्या अंतरावर तो टांगा सोडून ते घरी गेले. सर्व क्रांतिकारक सहकाऱ्यांना झालेली हकीकत कळली. भगवतीचरणांच्या मदतीला डॉक्टर नेणे गुप्तपणा राखण्याच्या दृष्टीने धोक्याचे होते. म्हणून वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असलेल्या ओळखीच्या दोन विद्यार्थ्यांना औषधे घेऊन तिकडे पाठविण्यात आले. वैशंपायन स्वतःच्या हॅटमध्ये नदीवरून पाणी आणून भगवतीचरणांच्या तोंडात थेंब थेंब पाणी सोडीत होते, परंतु भगवतीचरणांच्या कुडीतील प्राणज्योत केव्हाच विझून गेली होती.

रात्र झाली. टिकाव, खोरे, घमेले इत्यादी सामान घेऊन क्रांतिकारक अंधारातून रावी नदीच्या पैलतीरापलीकडील जंगलात गेले. हिंदू असूनही भगवतीचरण यांच्या शवाला अग्निसंस्कार देणे अशक्य झाले होते. जंगलात पेटलेला विस्तव व धूर ह्यामुळे घडलेला प्रकार लोकांना कळला असता व क्रांतिकारकांच्या योजना फसल्या असत्या म्हणून खड्डा खणून त्यात भगवतीचरणांचा मृतदेह पुरण्यात आला.

भगवतीचरणांच्या पत्नी दुर्गादेवी व्होरा ह्या त्या वेळी लाहोरातच क्रांतिकारकांच्या घरात होत्या. सर्व क्रांतिकारक त्यांना भाबी (वहिनी) असे म्हणत. रस्ता लांबचा व प्रसंग धोक्याचा म्हणून पतीच्या शवाच्या दर्शनासाठी देखील दुर्गादेवींना जंगलात नेण्यात आले नाही. एकीकडे क्रांतिकारक भगवतीचरणांच्या भग्न शरीरावर मातृभूमीची मंगल माती घालीत होते. दुसरीकडे दुर्गादेवी मृत पतीच्या दिव्य स्मृतिचित्रावर अश्रूंचा अभिषेक ढाळीत होती.

भगवतीचरणांचे बलिदान म्हणजे स्वातंत्र्यदेवीला वाहिलेले रक्तकमळ !

* * *


३१. उसनी बायको

(दुर्गादेवी व्होरा)

सॅंडर्सवर गोळ्या झाडल्यानंतर भगतसिंह व राजगुरू हे डी. ए. व्ही. महाविद्यालयाच्या वसतिगृहात शिरले. वसतिगृहातील साथीदार मित्रांच्या हषाली सामफळी करून ते वसतिगृहाच्या इमारतीच्या दुसऱ्या बाजूने बाहेर पडले. पूर्वयोजनेप्रमाणे महावीरसिंग मोटार घेऊन तेथे थांबले होते. त्यांना मोटारीत घेऊन महावीरसिंग जलदीने निघून गेले.

सॅंडर्सच्या वधानंतर पोलीस तपासाची चक्रे जोराने फिरू लागली. गुन्हेगार बाहेर पडू नये म्हणून लाहोरातून बाहेर पडणारे व रेल्वे स्टेशनवर हत्यारी व साध्या वेषातील गुप्त पोलिसांची टेहळणी सुरू झाली. गुन्हेगारांचा छडा लावून देणाऱ्यासाठी सरकारने बक्षीस घोषित केले. तरी देखील गुन्हेगारांचा थोडाही मागमूस लागण्याच चिन्ह दिसेना. उलट सेनापती हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी (एच. एस्. आर. ए.) च्या सहीने काढलेली भित्तीपत्रके लाहोरच्या चौकाचौकांतून लाविली गेली. कारण संशयावरून भलत्याच निरपराधी राजकीय कार्यकर्त्यांची धरपकड चालली होती. ती थांबविण्यासाठी अशी पत्रके जाहीर ठिकाणी भिंतीवर लावणे हिं. स. प्र. सेनेच्या कार्यकर्त्यांना आवश्यक





वाटले. “ पकडले गेलेले कोणीच वधाविषयी दोषी नाहीत, आणि वधकर्ते काँग्रेसवाले नाहीत. तेव्हा वरील लोकांच्या वधाच्या शोधात उगाच छळ चालू राहिला तर त्याचा बदला घेतला जाईल. ”—बलराज, सेनापती हिं. स. प्र. सेना.

सरकारला जरी सॉंडर्सच्या वधकऱ्यांचा तपास लागू शकत नव्हता, तरी खऱ्या वधकऱ्यांना लाहोरची ती रंगभूमी सोडून शक्य तितक्या लौकर सुरक्षितपणे दूरवर जाणे आवश्यक होते. त्या योजनेच्या कार्यवाहीसाठी यशपाल दुर्गाभाभींकडे गेला. परंतु भाभींजवळ विषय काढण्यास त्याची जीभ रेटेना. शेवटी मनाचा हिय्या करून त्याने बोलण्यास सुरुवात केली. “ भाभी, भगतला शक्य तितक्या लौकर लाहोरच्या बाहेर पाठविले पाहिजे. लाहोरमध्ये चहूकडे पोलीस आणि हेर यांचा सुळसुळाट झाला आहे. कधी घात होईल याचा नेम नाही ” “ मी काय मदत करू ? ” भाभींने विचारले. यशपाल काहीच बोलेना. त्याने खाली मान घातली. त्याची अडचण लक्षात घेऊन भाभीने परत विचारले, “ पैसे का पाहिजेत काही भाड्याला ? हवे असल्यास देते. गेल्या आठवड्यातच बाबुभाई घरखर्चासाठी हजार रुपये देऊन गेले आहेत. लागतील तेवढे त्यातून देईन. ”

“ पैसे तर लागतीलच भाभी, परंतु त्यापेक्षाही मोलाच्या अन् अवघड कामात दलाला तुझी मदत पाहिजे आहे. ”

“ मग सांग की, दलासाठी आम्ही दोघा नवराबायकोनं आतापर्यंत काम करण्यात काही हातचं राखलं आहे काय ? मग आताच तुला अशी शंका का आली ? ”

“ तसं नाही भाभी, आताचं काम जरा नाजूक आहे, म्हणून तशी शंका आली. भगतने मोठया सनदी अधिकाऱ्याप्रमाणं पोशाख करायचा. रघुनाथने (राजगुरू) त्याचा ऑर्डरली (गणवेषातील शिपाई नोकर) बनावयाचं आणि तू......”

“ आलं लक्षात. ठीक आहे. लागा तयारीला. ”

आणि एका रात्री कलकत्याला जाणाऱ्या गाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात एक उंचापुरा देखणा तरुण चढला. त्याचा पोशाख, वर वळविलेल्या टोकदार ऐटबाज मिशा व छाप पाडणारे व्यक्तिमत्त्व पाहून तो कोणी बडा

सनदी अथवा सनदी पोशाखातील लष्करी अधिकारी असावा, असे वाटावे. त्याच्याबरोबर त्याला साजेशी सुंदर, सुशिक्षित, तरुण पत्नी व लहान मुलगा होता. डब्यात बसल्यानंतर तो अधिकारी डब्याच्या खिडकीकडे चेहऱ्याचा दर्शनी भाग न होऊ देता संत्रे सोलून त्याच्या फोडी मुलांच्या हातात देण्याच्या कामात गढून गेला होता. इतक्यात नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे दोन पोलीस प्रत्येक डब्याची टेहळणी करीत प्लॅटफॉर्मवरून वरील डब्यासमोरून जात असता एक पोलीस दुसऱ्याला म्हणत होता, "पहिल्या-दुसऱ्या वर्गाच्या डब्यांकडे उगाच कशाला हेलपाटे मारून पाय शिणून घ्या. त्या भुक्कड क्रांति-कारकांच्या बाला तरी असे डबे पाहायला मिळतील का? तिसऱ्या वर्गाच्या डब्यातच कुठं तरी गर्दीच्या आड आडोशाला जीव धरून बसले असतील साले." इतक्यात खाकी गणवेषातील एका राकट शिपायाने डब्याच्या खिडकीजवळ येऊन क्षणभर त्या अधिकाऱ्याशी बातचीत करून त्याला लष्करी सलामी ठोकली व तो तिसऱ्या वर्गाच्या डब्याकडे धावला. गाडी सुरू झाली आणि स्टेशने घेत घेत तिने एकदाचे कलकत्ता गाठले. भगतसिंह, दुर्गाभाबी व व राजगुरू एकदाचे प्रवासाच्या त्या दिव्य जोखमीतून सुखरूप पार पडले. अधिकाऱ्याच्या पत्नीला साजेसे दुर्गाभाबींचे सौंदर्य, व्यक्तिमत्त्व व ऐट आणि त्याच्या जोडीला बरोबर घेतलेला त्यांचा छोटा मुलगा शचीन यामुळे त्यांनी वठवलेले नाटक बेमालूम वास्तववादी झाले.

त्या सुमाराला सुशीलादिदी ह्या क्रांतिकारक साथीदार कलकत्ता येथे एका श्रीमान व्यापाऱ्याच्या मुलीच्या शिक्षिका म्हणून राहिल्या होत्या. बाबुभाई (भगवतीचरण) नाव बदलून मजुरांच्या वस्तीत राहात होते. सुशीलादिदीला राजगुरूंनी एका स्टेशनवरून तार केली होती. त्यामुळे ती त्या सर्वांना उतरून घेण्यासाठी स्टेशनवर आली होती. शेटजींच्या एका रिकाम्या बंगल्यात त्यांची राहण्याची तात्पुरती सोय करण्यात आली. बाबुभाईंनीही तेथे येऊन त्यांची गाठ घेतली. बंगाली माणसासारखा पोषाख करून भगतसिंह आता उघडपणे कलकत्त्यात वावरू लागले. ह्याच वेळी भगतसिंह व यतींद्रनाथ दास यांची गाठ पडून भगतसिंहाने त्यांना पार्टीतील मंडळींना बॉम्बची विद्या शिकविण्यास आग्रा येथे येण्याची विनंती केली. कलकत्त्याची कामगिरी आटोपून भाबी परत लाहोरला गेल्या व राजगुरू नागपुराकडे गेले.

बाबुभाई व दुर्गाभाबी यांचे कार्य पाहिले म्हणजे तुमच्या आमच्यासारखी वाटणारी ही सामान्य माणसे असीम त्याग, अनन्यसाधारण निष्ठा व ज्वलंत राष्ट्रप्रेम यांनी भारित होऊन मोठेपणाच्या किती उत्तुंग शैलशिखरावर विराजमान झाली, याचे कौतुक वाटेल. आणि हे सर्व ती दोघे करीत होती केवळ कर्तव्यबुद्धीने – कीर्तीसाठी किंवा स्वार्थासाठी नव्हे. दुर्मिळ कर्मयोग्यांचे जीवन! सुंदर, सुस्वभावी व सुविद्य पत्नी, गोजिरवाणा मुलगा स्वतःच्या अंगचे कर्तृत्व व घरची संपन्नता ह्या गोष्टींचा भगवतीचरण व्होरांनी कर्तव्यकठोरतेने त्याग केला होता. प्रा. जयचंद्र विद्यालंकारांनी मत्सराने ग्रस्त होऊन भगवतीचरण हे सरकारी गुप्तहेर आहेत, अशा आवईमुळे दलातील सहकारीही त्यांच्याशी तुटकपणाने व तुच्छतेने वागत असत. विव्हल करणारा हा वार छातीवर झेलून व राजद्रोहाच्या वैराचा भार पाठीवर वाहून घायाळ अश्वत्थाम्याप्रमाणे बाबुभाई कलकत्ता, आग्रा, श्रीनगर, धुळे, जळगाव इत्यादि गावांतून कर्तव्यासाठी भटकत होते. आणि दुर्गाभाबींची स्थितीदेखील अनुकंपनीयच होती. घरभेद्याची पत्नी म्हणून समाजाचे धारदार डोळे त्यांच्याकडे रोखलेले असत आणि सहकाऱ्यांच्या राहण्याजेवणाच्या पैशाच्या खस्ता खाऊनही त्यांच्याकडून अप्रत्यक्षरीत्या होणारी अवहेलना. पतीच्या सहवासाला अंतरलेली आणि घरी येणाऱ्या दलातील सहकाऱ्यांच्या वेळी-अवेळी होणाऱ्या वर्दळीमुळे जननिंदेचे प्रवाद वाट्यास आलेली ती एक आर्यमहिला होती. लोकापवादाचा वसा ओटीत, भरीत स्वजनांकडून होणाऱ्या अवहेलनेच्या दुःखाचा सल मनात जिरवीत, वीराच्या धैर्याने नी शौर्याने दुर्गाभाबी ध्येयाचा गड चढत होत्या. सौंदर्यशालिनी दुर्गाभाबीचे व्यक्तिमत्त्व होते. नाजूक सुगंधी केवड्याच्या सोनेरी कणसासारखे. पण मनाची निष्ठुरता आणि कार्यवाहीची चपळता होती त्या केवड्याच्या कणसाआड दडलेल्या जहरी नागिणीची!

भगत व दत्त यांना लाहोरच्या मध्यवर्ती कारागृहात (सेंट्रल जेल) भेटण्यासाठी दुर्गाभाबी जात असत. भेटीच्या वेळी त्या दोघांची सुटका कशी करावी, यावर त्यांच्यात विचारविनिमय होऊन पुढील योजना ठरली. दर रविवारी भगत व दत्त या दोघांना त्यांना ठेवण्यात आलेल्या तुरुंगातून शहराच्या दुसऱ्या भागात असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांना भेटण्यासाठी

पोलीसगाडीतून नेण्यात येत असे. गाडी तुरुंगाच्या मुख्य दरवाज्यापासून थोड्या अंतरावर मुख्य रस्त्यावर उभी राहात असे. तुरुंगाचा मुख्य दरवाजा व पोलिस गाडी यांच्या दरम्यानचे अंतर पोलिसांसमवेत भगत व दत्त चालून जात असता त्या ठिकाणी अचानक बॉम्बचा स्फोट करून घबराट-गोंधळ उडवून द्यावयाचा व त्या गोंधळाचा फायदा घेऊन पूर्वनियोजनानुसार तेथे तयार ठेवलेल्या मोटारीतून त्या दोघांना पळवून न्यायचे.

भगत-दत्तांच्या सुटकेचा अंदाज घेण्यासाठी कानपूरहून आझादांनी बच्चनला (वैशंपायन) लाहोरला पाठविले होते. त्याची आणि दुर्गाभाबींची गाठ पडल्यावर तिने ती योजना त्याला सांगितली. भाबींची तळमळ व निष्ठा पाहून बचनची भाबी व बाबुभाई यांच्या सच्चेपणाबद्दल खात्री पटली. त्याने कानपूरला जाऊन आझादांना सर्व वृत्तान्त निवेदन केला व त्यानंतर भैय्या (आझाद) व बाबुभाई यांचा मिलाफ घडवून आणला.

बाबुभाई लाहोर येथे गेले, व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन यांची गाडी दिल्लीजवळील निजामुद्दिनपूर येथे उलथून पाडण्याची योजना तयार करून यशपालजवळ दिली. त्यानंतर 'बॉम्बचे तत्त्वज्ञान' ही हस्तपत्रके तयार करून देशाच्या सर्व भागांतून वाटण्याची योजनाही बाबुभाईंनी पार पाडली. त्याच वेळी भगत-दत्तांच्या सुटकेसाठी हवे असणारे बॉम्ब ते स्वतः तयार करू लागले. बहावलपूर कोठी मार्गावरील ह्या घरी पुढे सर्व क्रांतिकारक येऊन राहिले. इथेच बॉम्ब तयार करून सुखदेवराज व वैशंपायन या सहकाऱ्यांना बरोबर घेऊन भगवतीचरण त्या बॉम्बच्या पूर्वचाचणीसाठी रात्री नदीकाठच्या अरण्यात गेले आणि बॉम्ब-स्फोटात त्यांचा अचानक अपघाती मृत्यू ओढवला.

भगवतीचरण मृत्युसमयी वैशंपायनजवळ म्हणाले होते, " माझा हा आकस्मिक मृत्यू भगत-दत्तांच्या सुटकेआड होऊ देऊ नका. " भगवती-चरणांच्या अंतिम इच्छेप्रमाणे चंद्रशेखर आझाद, यशपाल, वैशंपायन इत्यादी सहकाऱ्यांनी भगत-दत्तांच्या सुटकेसाठी जंग जंग पछाडूनही पोलिसांच्या खबरदारीमुळे त्यांना योग्य अशी संधी मिळू शकली नाही. हिंदुस्थान समाज वादी प्रजातंत्र सेनेच्या या वेळी दुर्दैव हात धुऊन पाठीमागे लागले होते. भगत-दत्तांच्या सुटकेच्या विवंचनेत ही सहकारी मंडळी असताच ते राहात असलेल्या इमारतीत दोन वेळा बॉम्बचे स्फोट झाले. फटाक्यांच्या पेटीने पेट

घेतल्यामुळे आवाज झाला, असे आजूबाजूच्या मंडळींना त्यांनी सांगितले. तरी पण शेजाऱ्या-पाजाऱ्यांत कुजबूज सुरू झाली. आता यापुढे त्या घरातील रहिवास धोक्याचा ठरण्याचा संभव असल्यामुळे आझाद, यशपाल, सुशिला मोहन (दिदी) सुखदेवराज इत्यादी मंडळी भिन्न भिन्न मार्गांनी व भिन्न भिन्न स्थळी रवाना झाली. दुर्गाभाबींच्या तोंडावर अजून पतिनिधनाचे दुःख ओले होते. तशा स्थितीत त्यांची व लहानग्या शचीनची सुरक्षित ठिकाणी रवानगी करणे आवश्यक होते. घुंगट पांघरून एका खेडवळ स्त्रीच्या वेषात दुर्गाभाबी बच्चनबरोबर कानपूरला रवाना झाल्या. भावाबरोबर बहीण जीवन-मरणाच्या नाटकातील नवीन भूमिका वठवू लागली.

अलाहाबादला वैशंपायन, आझाद, यशपाल व भाबी राहात असताना एक दिवस गदर चळवळीत काळ्या पाण्याची शिक्षा झालेले पृथ्वीसिंह आझाद हे आझादांना भेटण्यास गेले. ते चालत्या आगगाडीतून पोलिसांच्या पहाऱ्यातून उडी फेकून पसार झाले ते परत पोलिसांना सापडले नाहीत. अज्ञातवासात फिरत असताना ते अलाहाबाद येथे चंद्रशेखर आझादांकडे गेले. उत्तर हिंदुस्थानात एव्हाना पोलीस, गुप्त पोलीस, घरभेदे व माफीचे साक्षीदार यांच्यामुळे क्रांतिकारकांना सुरक्षितता वाटत नव्हती. त्यामानाने नर्मदेच्या दक्षिणेकडे हिंदुस्थानात धामधुमीची परिस्थिती नव्हती. त्यामुळे सरकारच्या गाफीलपणाचा फायदा घेऊन दक्षिण हिंदुस्थानात इंग्रजी सत्तेला एखादा प्रचंड सुरुंग लावावा, असे विचारविनिमयात ठरले. भगतसिंगांना सोडविण्याच्या दृष्टीने सरकारच्या मनावर बिंबवण्यासाठी मुंबईच्या पोलीस ठाण्यावर अथवा सरकारी कचेऱ्यांवर गोळीबार करून सरकारला हदरावयाचे व जाणीव द्यायची की, भगत-दत्तांच्या पाठीशी देशातील आम युवकशक्ती उभी आहे. एवढ्यासाठी स्वामी दत्तांच्या पाठीमागून सुखदेवराज, दुर्गाभाबी व वैशंपायन मुंबईस रवाना झाले. भाबीला मुंबईस पोचवून वैशंपायन परत गेले व त्या शचीनला मुंबईस काही दिवस बाबाराव सावरकर (गणेश दामोदर) यांच्याकडे ठेवण्यात आले.

पृथ्वीसिंह आझाद त्या काळी मुंबई भागात स्वामी राव ह्या नावाने वावरत होते. मुंबई येथील सरकारी नोकरीतील अधिकारी श्री. गणेश रघुनाथ वैशंपायन यांचा व आझादांचा गाढा स्नेह होता. गणेशपंत हे बिनतारी

संदेशवहानाचे इन्स्पेक्टर होते. आगगाडीतून उडी मारून फरारी झालेल्या पृथ्वीसिंह आझादांना त्यांनीच आश्रय दिला. त्या वेळी ते भावनगरला होते. तारखात्यात काम करणारे शंकरराव मोघे हे सरकारी नोकरीतील गृहस्थ त्या वेळी दादरला तुळशीबाग तेजपाल चाळीत राहात होते. गणेशपंत वैशंपायन व शंकरराव मोघे हे दोघेही गृहस्थ खरे देशभक्त होते. सरकारी पातळीवरील गुप्त बातम्या ते सावरकर वगैरे क्रांतिकारकांना सांगत असत. गणेशपंत वैशंपायन यांच्यामुळे शचीनला भावनगर येथे डॉ. काणे यांच्याकडे ठेवण्यात आले. जनार्दन बाळकृष्ण बापट ह्या क्रान्तिकारकांचा व पृथ्वीसिंहांचा वैशंपायनामुळे स्नेह जमला. बापट हे कर्जत-नेरळजवळील पेण गावचे राहाणारे. मोटार चालविण्यात ते फार निष्णात होते. वैशंपायन याची एक मोटार भाडयाने घेऊन पृथ्वीसिंह आझाद यांच्या ताब्यात दिली. तिच्यात पृथ्वीसिंह, दुर्गाभाबी, सुखदेवराज व बापट बसले. रात्री अकराच्या सुमारास लॅमिंग्टन पोलीस स्टेशनजवळ जाताच ती गाडी थांबली व आतील माणसांनी पोलीसस्टेशनच्या रोखाने पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. इतक्यात पोलीस ठाण्यात एक गाडी आली. तिच्यातून एक गोरा साहेब व त्यांची पत्नी पोलीस स्टेशनकडे जाऊ लागली. मोटारमधून उतरलेला गोरा अधिकारी मुंबईचा पोलीस कमिशनर हिली हा असावा. म्हणून त्यांनी मोटारीतून त्याच्या रोखाने गोळ्या झाडल्या व मोटार भरधाव वेगाने निघून दादरला तुळशीबाग तेजपाल चाळीजवळ थांबली.

मोटरसायकलवर बसलेला गोरा अधिकारी कमिशनर हिली हा नसून सार्जंट टेलर होता. पाठीमागे त्याची पत्नी बसली होती. मोटारीतून झाडलेल्या पिस्तुलाच्या गोळ्यांनी फक्त टेलरच्या हाताच्या बोटांना जखम झाली. पोलिसांनी मोटारचा पाठलाग केला. परंतु बापटांच्या ड्रायव्हिंगच्या कौशल्यामुळे ती मोटार पोलिसांना सापडू शकली नाही. तथापि तुळशीबागेजवळ कुठे तरी गाडी थांबल्याचा पोलिसांना पत्ता लागला.


दुसऱ्या दिवशी त्या चाळीतील संशयितांच्या घरांची झडती घेण्यास पोलीस गेले. संशयितात शंकरराव मोघे यांचं घर होतेच. तेथे पोलीस गेले. पोलीस अधिकारी बैठकीच्या खोलीत चौकशी करीत असता त्यांच्या डोळ्यांदेखत नाकात नथ घातलेली एक महाराष्ट्रीय महिला काखेत व हातांत कळशा घेऊन घरातून बाहेर पडली. त्या होत्या दुर्गाभाबी. तेथून त्या फरारी झाल्या.

* * *

३२. स्वामी राव

(बाबा पृथ्वीसिंह आजाद)

पृथ्वीसिंह आझादांचे जीवन म्हणजे एका बलदंड सामर्थ्याची कथा आहे. विद्यार्थी असल्यापासून त्यांच्या डोळ्यांसमोर फक्त एकच कल्पना, एकच ध्येय आणि एकच चित्र दूरवर चमकणाऱ्या दीपाप्रमाणे चमकत होते आणि ते चित्र होते मातृभूमीचे. तिच्या प्रेमासाठी त्यांनी अनंत यातना सहन केल्या, अनंत दिव्यांतून सुरकांड्या मारल्या. अफगाणिस्तानच्या उजाड व भयाण अशा अज्ञात पहाडी मुलखातून रात्रीच्या अंधारात आडवाटेने धावताना, टोळीवाल्यांच्या पहाडी शिकारी कुत्र्यांच्या हल्ल्याला सामोरे जाताना, आफ्रिडी लुटारू, अफगाण सैनिक व रशियन सैनिक यांच्या सरहद्दीवरून सुटणाऱ्या बंदुकींच्या गोळ्या चुकविताना बर्फाळ वेगवान नद्या पोहून जाताना, ब्रह्मदेशाची निबिड अरण्ये तुडविताना क्रूर जंगली टोळ्या, भयानक हिंस्र श्वापदे व खवळते जलप्रवाह यांतून वाट काढताना भर वेगात दौडणाऱ्या आगगाड्यांतून पायांत बेड्या असूनही उड्या फेकताना व सरकारी पोलिसांच्या गोळ्यांच्या टप्प्यातून निसटताना ह्या बलशाली पुरुषाने दाखविलेले धैर्य व शौर्य ही इतकी चित्तथरारक व स्फूर्तिप्रद आहेत की,



त्या घटना ऐकणाऱ्यांची कल्पना थक्क करून सोडतील. बाजी लावून जीवनाचा खेळ खेळणाऱ्या पृथ्वीसिंहांनी त्यांच्यामागे धावणाऱ्या विक्राळ

मृत्यूला हरप्रसंगी टांग मारून तोंडघशी पाडले. सामर्थ्यशाली इंग्रज सरकारची यंत्रणा किती बलवान ! कुठे खट वाजले तरी जिच्या श्रवणशक्तीतून सुटत नाही व माशी उडाली तर जिच्या दृष्टीतून निसटत नाही, अशा सरकारच्या अनंत डोळ्यांना व अगणित कानांना जंग जंग पछाडूनही सोळा वर्षापर्यंत पृथ्वीसिंहांचा ठावठिकाणा लागला नाही. एवढी मोठी शक्ती, परंतु ती त्यांना वाकवू शकली नाही अथवा चिरडू शकली नाही.

पृथ्वीसिंहांचा जन्म पंजाबात अंबाला शहराजवळील लालडू नावाच्या खेड्यात एका रजपूत कुटुंबात इ. स. १८९१ च्या १५ सप्टेंबर रोजी झाला. वडलांचे नाव शादीलाल चौधरी. आईचे नाव चमेली. तिचे माहेर सुप्रसिद्ध चव्हाण या रजपूत घराण्याचे होते. पृथ्वीसिंह व त्यांच्या पाठीवर झालेला भाऊ लहान असतानाच त्यांची आई मरण पावली. दुष्काळ पडल्यामुळे वडील ब्रह्मदेशात उद्योग पाहाण्यासाठी गेले. तेथे त्यांचा धाकटा भाऊ फौजेत नोकरीत होता. वास्तविक शादीलाल याची उंची सहा फुटांपेक्षा अधिक व बांधा बळकट असूनही त्यांची सैन्यात अथवा पोलिसात भरती होऊ शकली नाही. त्यांनी काही गाई विकत घेऊन फौजी छावणीला दूध पुरविण्याचा धंदा सुरू केला. त्या धंद्यात त्यांचा चांगला जम बसला. त्यानंतर सुटी घेऊन पंजाबात रजेवर गेलेल्या आपल्या भावाला त्यांनी परत येताना मलांना घेऊन ये असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांचा भाऊ रजेवरून परत येताना पृथ्वीसिंह व त्यांचा धाकटा भाऊ यांना घेऊन आला.

घरापासून दीड–दोन मैलांवर एक ख्रिस्ती मिशनरी शाळा होती. त्या शाळेत मुलांची नावे घालण्यात आली. मिशन शाळेत ब्रह्मी व इंग्रजी भाषेतून शिक्षण देण्यात येत असेल, परंतु मातृभाषा उर्दू व गुरुमुखी यांचे शिक्षण आपण घेतले पाहिजे, ही जाणीव पृथ्वीसिंहांना झाली. त्यांच्या घरापासून काही अंतरावर शीखांचे एक गुरुमुखी (मंदिर) होते. तेथील पुजाऱ्याकडे जाऊन त्यांनी उर्दू गुरुमुखीचा अभ्यास केला. तसेच सैन्यातील एक हवालदार वडिलांचा मित्र होता. त्याच्याकडून त्यांनी उर्दूचे ज्ञान मिळविले. मिशन शाळेत अभ्यास चालू असताना एक दिवस एका इंग्रजी कवितेचा धडा वर्गात सुरू झाला. ती इंग्रजी भाषेतील एक देशभक्तिपर ... ही माझी प्रिय मातृभूमी आहे, असे शब्द ज्यांच्या मनात

उभे राहात नाहीत, असा मुर्दाड मनुष्य असल्यास तो मृतवतच समजावा; अशी त्या कवितेची सुरुवात होती. (ब्रीद्ज देअर दी मॅन, वुइथ सोल सो डेड् हू नेव्हर टू हिमसेल्फ हॅज् सेड, धिस् माय ओन माय नेटिव्ह लँड); एक साधी कविता, परंतु तिच्यातील आशयाने पृथ्वीसिंहांच्या विचारांना जबरदस्त धक्का दिला व त्यांच्या डोळ्यांपुढे हिंदुस्थान व पंजाबचे चित्र उभे राहिले. एका अनामिक भावनेने मातृभूमीने त्यांच्या मनाला आपणाकडे आकर्षून घेतले. चौदा–पंधरा वर्षांच्या ह्या मुलाने वडलांचा निरोप घेऊन पंजाबची वाट धरली. पंजाबात जाऊन त्याने पुढील शिक्षणास सुरुवात केली.

तो काळ राजकीय दृष्ट्या धामधूमीचा होता. सरदार अजितसिंह, सुफी अंबाप्रसाद व लाला लजपतराय यांनी पंजाबी किसानांची सरकारी शेत सारा न देण्याची चळवळ सुरू केली होती. त्यामुळे पंजाबात अशांतता निर्माण झाली होती. वरील पंजाबी पुढाऱ्यांना सरकारने पंजाबबाहेर हद्दपार केले होते. बंगालमध्ये तरुण क्रांतिकारक जुलमी राजवटीविरुद्ध बॉम्बस्फोट करीत होते. महाराष्ट्राचे वातावरण चाफेकर बंधू व लो. टिळक यांनी खूप तापविले. त्यामुळे सरकारने टिळकांना ब्रह्मदेशात कैदेत ठेवले होते. ह्या सर्व घटनांची प्रतिक्रिया देशातील सुशिक्षित तरुणांवर होत होती. विद्यार्थी पृथ्वीसिंह देखील ह्या घटना वाचून व ऐकून बेचैन होत होता. इतक्यात वडिलांच्या आजारपणाचे वृत्त कळल्यामुळे ते वडिलांकडे ब्रह्मदेशांत गेले. वडलांची प्रकृती सुधारल्यानंतर पृथ्वीसिंहांचे मन तेथे रमेना. पंजाबमध्ये असताना त्यांनी ऐकले होते की, तेथील किती तरी माणसे पैसे मिळविण्यासाठी, चांगल्या रोजगारासाठी व विद्या संपादन करण्यासाठी अमेरिकेत जात असतात. पुढील विद्याभ्यासासाठी अमेरिकेत जाण्याचे त्यांनी ठरविले. वडलांकडून काही पैसे घेऊन ते घरातून बाहेर पडले. रंगून, सिंगापूर, हाँगकाँग, मॅनिला या ठिकाणी थांबून नोकऱ्या करून पुढील प्रवासासाठी द्रव्यार्जन करीत त्यांनी इ. स. १९१२ मध्ये अमेरिकेच्या भूमीवर पाऊल ठेवले. कुठे जवळचे पैसे संपले, तर कुठे चोरीस गेले, कुठे फेरीवाल्याचा धंदा करून, तर कुठे नोकरी करून, कुठे परदेशी लोकांच्या भांडणतंट्यात सापडून, तर कधी बोट बुडण्याच्या प्रसंगी दोराला घट्ट पकडून– अशा संकटांना तोंड देत देत त्यांना हा प्रवास करावा लागला. उदरनिर्वाहाकरिता काही दिवस त्यांनी हिंदी मजुरांसमवेत

कॅलिफोर्नियात (अमेरिका) मजुराची कामे केली. त्याच सुमारास लाला हरदयाळ यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या गदरच्या चळवळीत ते सामील झाले. गदर कार्यकर्त्यांबरोबर अमेरिकेतून दि. २८ ऑगष्ट १९१४ ला 'कोरिया' बोटीने निघून जपानात व तेथून पुढे 'तोसामारू' जहाजाने हिंदुस्थानात आले.

तोसामारू जहाजाने कलकत्यास उतरलेल्या गदरच्या कार्यकर्त्यांना पकडून आगगाडीने पंजाबकडे नेण्यात येत होते. मध्ये तुरुंगात ठेवण्यासाठी वाटेत एका स्टेशनवर उतरणाऱ्या लोकांच्या गर्दीत घुसून पृथ्वीसिंह आझाद निसटून गेले. त्यानंतर पंजाबात जाऊन ते जनतेत मिसळून इंग्रजांविरुद्ध उठावणी करण्याचा प्रचार करू लागले. एके दिवशी ते अंबाला येथील राजपूत विद्यार्थी वसतिगृहात मुक्कामाला होते. त्याच दिवशी राजपूत समाजाचे एक, सरकारधार्जिणे सरदार तेथे मुक्कामाला होते. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या सरदारांची व पृथ्वीसिंहांची गाठ झाली. त्यानंतर ते सरदार सरकारी कार्यालयात काही कामासाठी गेले असता गदरच्या कैद्यांपैकी फरारी झालेल्या कैद्यांचा विषय निघाला. त्यात पृथ्वीसिंहांचे नाव निघाले. सरकारचे ते बगल-बच्चे सरदार लगेच म्हणाले, "मला हे माहीत असते, तर आज सकाळीच मी पृथ्वीसिंहाला तुमच्या ताब्यात देऊ शकलो असतो. प्रयत्न करून पाहा. तो कदाचित अजून राजपूत वसतिगृहात असेल." पोलीस अधिकाऱ्याने एका बलवान शिपायाला राजपूत वसतिगृहाकडे पाठविले. वेळप्रसंग आलाच तर जवळ हत्यार असावे म्हणून त्याच्याजवळ भरलेले पिस्तुल व मोठा चाकू संरक्षणासाठी देण्यात आला. पोलीस पार्टी घेऊन आम्ही लगेच येतो, तोपर्यंत पृथ्वीसिंह तेथे असल्यास त्याला संभाषणात गुंतवून ठेव, असे त्या शिपायांला सांगण्यात आले. त्या त्याप्रमाणे तो शिपाई वसतिगृहात गेला शिपायाला सांगण्यात आले. पृथ्वीसिंह तेथेच होते. नागरी पोशाखातील त्या शिपायाने त्यांना नमस्कार करून इकडच्या तिकडच्या गप्पा सुरू केल्या. इतक्यात एक क्रांतिकारक स्नेही तेथे आला. सदरचा माणूस छुपा पोलीस आहे, अशी सूचना त्याने पृथ्वीसिंहाला दिली. पृथ्वीसिंह तेथून निसटण्यासाठी उठताच त्या पोलिसाने खिशातून पिस्तूल काढले. पृथ्वीसिंहांनी झटकन त्याच्या हातावर थप्पड मारून ते पिस्तूल दूर उडविले व त्याला खाली

पाडले. वास्तविक पाहाता त्याच पिस्तुलाने पृथ्वीसिंहांना त्या घातकी माणसाला ठार मारता आले असते. परंतु त्यांनी तसे केले नाही. झोंबाझोंबीत खाली गेलेल्या त्या पोलिसाने जवळच्या चाकूने पृथ्वीसिंहांच्या गळ्यावर वार केले. पृथ्वीसिंहांनी बुकलल्यामुळे त्या दांडग्या पोलिसाच्या नाकातोंडातून रक्त वाहू लागले व मानेवर झालेल्या चाकूच्या वारामुळे पृथ्वीसिंहांच्या गळ्याला रक्ताची धार लागली. थोड्या वेळाने पोलीस पार्टी आली. तिने बेशुद्धावस्थेत असलेल्या त्या दोघांना अंबाला येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये नेले. जखमा शिवून पृथ्वीसिंहांना अंबाल्याच्या तुरुंगात पाठवून दिले. त्यानंतर गदरच्या कैद्यांवर लाहोरचा पहिला खटला चालून त्यांना फाशीची शिक्षा झाली. परंतु हिंदी पुढाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे फाशीऐवजी काळ्या पाण्याची शिक्षा होऊन इ. स. १९१५ मध्ये त्यांना कलकत्त्यास व तेथून 'महाराजा' जहाजाने अंदमानला पाठविण्यात आले. कैद्यांच्या पायात पांच शेर वजनाच्या बेड्या होत्या व गळ्याभोवती अडकविलेल्या साखळीला असलेल्या लाकडी पट्टीवर त्यांची कैदेची मुदत संपण्याचे साल लिहिलेले होते. पृथ्वीसिंह आझादांच्या पट्टीवर सुटकेचे साल लिहिले होते १९५१.

हिंदुस्थानातील तुरुंगात दोन वर्षे काढल्यानंतर पृथ्वीसिंह अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये आले. या तुरुंगाला ७२० सेल्स (खोल्या) होत्या. म्हणून सेल्युलर जेल म्हणत असत. घाणा ओढून खोबऱ्याचे तेल गाळणे, काथ्या कुटणे, काथ्याचे दोर तयार करणे इत्यादी काम कैद्यांकडून करवून घेण्यात येत असत. कैद्याला सबंध दिवसात पुरा न होईल एवढा कामाचा भारा देण्यात येई व काम पुरे न करणाऱ्यांना वेताच्या छडीचा मार, इतर कैद्यांकडून दंड्याचा मार देणे, हातकड्यात हात वर अडकवून ठेवणे इत्यादी प्रकारच्या अघोरी शिक्षा दिल्या जात. कैद्यांना देण्यात येणाऱ्या या अमानुष वागणुकीला प्रतिकार करण्यासाठी पृथ्वीसिंहांनी अन्न-सत्याग्रह सुरू केला. आठवडाभर त्यांनी अन्न तर नाहीच, पण पाणी देखील घेतले नाही. मग त्यांना तुरुंगाच्या दवाखान्यात नेले. तेथे कैद्यांनी त्यांचे हात, पाय, डोके दाबून धरले व डॉक्टरांनी नाकातून नळीवाटे त्यांच्या पोटात दूध घातले.

अंदमानच्या तुरुंगातील राजकीय कैद्यांचा भूक हरताळ भयानक जाचाला व मानहानीला वैतागून काहीजणांनी केलेली आत्महत्या, कैद्यांना पशूप्रमाणे

देण्यात येणारी वागणूक, या गोष्टी हिंदुस्थानात कळल्या. त्याबाबत वृत्तपत्रांनी व पुढाऱ्यांनी सरकारला धारेवर धरले. त्याचा परिणाम म्हणून या सर्व गोष्टींची चौकशी करण्यासाठी एक आयोग (कमिशन) नेमण्यात आले. त्या आयोगातील सदस्यांनी अंदमानला भेट देऊन तेथील वस्तुस्थितीची पाहणी केली व कैद्यांची गाठ घेतली. त्यानंतर सन १९२१ साली पंजाबी राजकीय कैद्यांना 'महाराजा' बोटीने मद्रासला पाठविण्यात आले. ह्या राजकीय कैद्यांना मद्रासला पाठविण्याचे कारण असे की, हे पंजाबी कैदी फार बलवान होते. काहीजण तर इतके उंच व बलवान होते की, त्यांची मनगटे बेड्यात मावत नसत. हे सर्व बंदिवान एकजुटीने वागत. काम करण्याचे नाकारीत व अपशब्द बोलणाऱ्या तुरुंगाधिकाऱ्यांवर हल्लेही करीत. त्यामुळे त्यांना अंदमानहून हलविणे योग्य वाटले. गदरच्या काही कैद्यांनी हिंदुस्थानमध्ये हजारीबागच्या तुरुंगात असताना तुरुंगाच्या अधिकाऱ्यांवर हल्ला करून त्या सर्वांना चोपून काढले व तुरुंगाच्या भिंतीवरून उड्या मारून ते पळून गेले. अशा वस्तुस्थितीमुळे सर्व प्रांतातील अधिकाऱ्यांनी अंदमानहून परत येणाऱ्या ह्या महाभयंकर पंजाबी राजबंदींना आपल्या राज्यातील तुरुंगात घेण्याचे अमान्य केले. म्हणून मद्रास प्रांतातील निरनिराळ्या तुरुंगातून त्यांना विभागून ठेवण्याचे ठरले.

एका बेडीत दोन कैद्यांचे हात घालून अशा जोडीने त्यांना कलकत्ता मेल-मध्ये बसवून मद्रासहून राजमहेंद्रीच्या तुरुंगाकडे नेण्यात येत होते. १९२१ चा जुलै महिना होता. गाडी वेगात चालली होती. बाहेर पावसाच्या धारा कोसळत होत्या. ढगामुळे अंधाराची काळोखी आणखीच वाढली होती. गाडीची गती, जलधारांचे गीत व रात्रीचा समय यामुळे गाडीतील प्रवासी पेंगत होते. लघवीला जायचा बहाणा करून पृथ्वीसिंहाने शिपायाला बेडीतून आपला हात मोकळा करण्यास सांगितले. संडासातून बाहेर आल्यावर त्यांनी पाहिले तो सर्व शिपाई झोपले होते. त्यांनी हलकेच खिडकीच्या बाहेर अंग काढले व गाडीच्या बाहेर उडी फेकली. सुदैवाने त्यांना फारशी इजा झाली नाही. पायातील बेड्यासह ते पावसात च अंधारात शेतातून पळू लागले शेताच्या कडेला साबरीचे कुंपण होते. त्यातून डोळ्यावर हात ठेवून त्यांनी उडी मारली. सर्व अंगात काटे भरले. रानं तुडवीत ते एका झोपडीजवळ दिव्याच्या अनुरोधाने

आले. एक मनुष्य खाटेवर झोपला होता. त्याची बायको जमिनीवर झोपली होती. पृथ्वीसिंहांनी त्या माणसाला जागे केले. अंगातून रक्त निथळत आहे कपडयातून रक्त व पाणी निथळत आहे, पायात बेड्या आहेत; असे ते भयानक रूप पाहून तो शेतकरी व त्याची पत्नी भयभीत झाले. त्या आंध्र शेतकऱ्याला पृथ्वीसिंहांची भाषा समजू शकत नव्हती. शेवटी 'स्वराज्य, देशभक्त' असे संस्कृतनिष्ठ शब्द त्यांनी उच्चारून त्याला समज देण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी गांधीजींनी असहकाराची चळवळ सुरू केली होती. त्यामुळे सभा होत, भाषणे होत. त्यांमधून 'देश, स्वदेश, स्वराज्य, देशभक्ती' अशा शब्दांचा उच्चार होई. आंध्रमध्येही असहकारितेच्या चळवळीत बरेच लोक तुरुंगात गेले होते. ह्या परिस्थितीमुळे पृथ्वीसिंहांच्या वरील शब्दांमुळे त्या शेतकऱ्याला त्यांच्या स्थितीची कल्पना आली. पृथ्वीसिंहांना खूप भूक लागली होती व अंगावरील कैद्याचा पोशाख पाणी व रक्त यांनी ओलाचिंब झाला होता; परंतु दुर्दैव असे की, त्या शेतकऱ्याच्या घरात अन्न शिल्लक राहिले नव्हते व खाण्यास देण्यास कोणताही पदार्थ नव्हता. नवऱ्याच्या अंगात एक छोटे कुडते व कमरेभोवती लहानसा पंचा. बायकोच्या अंगाभोवती लुगड्याचे लहानसे पटकूर, घरात अठरा विश्वे दारिद्र्य नांदणाऱ्या घरी त्या दुर्दैवी अतिथीला अन्न आणि वस्त्र कसे मिळावे? काहीही करून प्रथम पायातील बेडी तोडणे आवश्यक होते. झोपडीच्या कोपऱ्यात त्यांना नांगराचा लोखंडी फाळ दिसला. त्याचे प्रहार करून त्यांनी पायातील बेडी तोडली व ती जंगलात पुरून टाकून अंगावरचे कपडे जाळून टाकले व फक्त एका लंगोटीनिशी पुढचा मार्ग धरला. दिवस उगवता उगवता ते रेल्वे मार्गाजवळ आले. त्या मार्गाच्या कडेने ते एका स्टेशनवर आले. दरवड्याच्या तपासासाठी आगगाडीने जाण्यासाठी एक पोलिस पार्टी स्टेशनवर थांबली होती. जवळच्या स्टेशनपाशी रात्री एक कैदी आगगाडीतून उडी टाकून पळाल्याची बातमी स्टेशनमास्तरकडून त्या पोलिसांना कळली होती. पृथ्वीसिंहांचा अवतार पाहताच पोलिसांची खात्री पटली की, रात्री पळालेला कैदी हाच असावा. पोलिसांनी विचारलेल्या प्रश्नांना पृथ्वीसिंहांना समाधानकारक उत्तरे देता येईनात. त्यामुळे त्यांनी त्यांना पकडून ज्या अंगोला नावाच्या गावाजवळ त्यांनी गाडीतून उडी टाकली होती तेथील पोलिस ठाण्यात पोचते केले. पोलिसांनी अंगोला येथील

कोर्टात त्यांच्यावर खटला दाखल केला. तुरुंगातून पळविल्याबद्दल त्यांच्या शिक्षेत एक वर्षाची वाढ करण्याचा निर्णय न्यायाधिशांनी दिला. त्यानंतर त्यांना राजमहेंद्री येथील तुरुंगात पोहोचविण्यात आले.

पृथ्वीसिंह राजमहेंद्रीच्या तुरुंगात असताना सरकारला ह्या राजकीय कैद्यांना तेथून परत हलविण्याची पाळी आली. कॉंग्रेसचा सत्याग्रह जोरात सुरू होता. त्याचा फायदा घेऊन आंध्रमधील सीताराम राजू नावाच्या तरुण राजपुताने डोंगरात जाऊन आदिवासी लोकांचे सैन्य उभारले व सरकारी कचेऱ्यांवर हल्ले करणे व सरकारी खजिने लुटणे सुरू केले. सीताराम राजूच्या पुंडाव्या-मुळे पोलिस घाबरून गेले होते. त्याच वेळी सीतारामला कळले की, सरदार पृथ्वीसिंह नावाचा राजपूत तरुण राजमहेंद्री तुरुंगात आहे. त्यामुळे त्याने तुरुंगातील अधिकाऱ्यांना निरोप पाठविला की, "पृथ्वीसिंहाला सोडविण्या-साठी मी तुरुंगावर हल्ला करणार आहे." ह्यास्तव पृथ्वीसिंह व इतर काही राजबंदींना दुसऱ्या तुरुंगात पाठविण्याचे ठरले.

राजमहेंद्रीच्या तुरुंगात असताना ह्या राजकीय कैद्यांची वागणूक फार चांगल्या प्रकारची दिसून आली. शिवाय राजकीय कैद्यांना गुन्हेगार कैद्यां-प्रमाणे बेड्या घालण्याच्या पद्धतीवर वर्तमानपत्रांनी खूप कडक टीका केली होती. त्यामुळे बेड्या न घालता त्या कैद्यांना आगगाडीत बसविण्यात आले. समवेत एक इंग्रज इन्स्पेक्टर व तीन शिपाई होते. राजबंदी राजमहेंद्रीहून जाणार ही बातमी गावात समजताच कॉंग्रेसचे कार्यकर्ते व इतर तरुण खूप मोठ्या संख्येने स्टेशनवर त्यांना निरोप देण्यासाठी आले. एवढे पाहताच तो इंग्रज पोलीस इन्स्पेक्टर घाबरला. परंतु पृथ्वीसिंहांनी त्याला आश्वासन दिले की, जमावापासून त्यांना मुळीच धोका पोहोचणार नाही. त्यानंतर गाडी सुटली. सिकंदराबाद स्टेशनवर गाडी बदलण्यासाठी कैदी व अधिकारी खाली उतरले. काही खाण्याचे पदार्थ आणण्यासाठी पृथ्वीसिंहांच्या सहकाऱ्यांनी त्यांना गावात पाठविले. पृथ्वीसिंहांनी गावात जाऊन खाण्याचे पदार्थ आणले व नंतर ती सर्व मंडळी दुसऱ्या आगगाडीत बसली. गाडी सुरू झाली. पृथ्वीसिंह खिडकी-जवळ बसले होते. ती गोष्ट त्या इंग्रज इन्स्पेक्टरला सहन होईना. त्याने एका कैद्याच्या कानात सांगितले की, 'पृथ्वीसिंहाला सांगा की, खिडकीजवळून उठून माझ्या शेजारी येऊन बैस!' सहकारी मित्राने पृथ्वीसिंहाला तसे

सांगितले. ते ऐकताच पृथ्वीसिंहांचा चेहरा क्रुद्ध दिसू लागला. परंतु ते जागेवरून उठले नाहीत. रागाने व तिरस्काराने त्या अधिकाऱ्याकडे पाहू लागले. काही वेळाने पृथ्वीसिंह उठले व दोन पोलिसांच्या मध्ये जाऊन बसले. रात्रीचे दहा वाजून गेले होते. तो इंग्रज अधिकारी डुलक्या घेऊ लागला. एका बाजूला शिपायांनी प्रवाशांबरोबर पत्त्यांचा डाव मांडला. इंग्रज इन्स्पेक्टरच्या निद्रेला रंग भरू लागला, पत्त्याचा डाव रंगला व पृथ्वीसिंहांचे विचारही रंगू लागले. इन्स्पेक्टरने दाखविलेल्या अविश्वासाने त्यांच्या स्वाभिमानाला डंख झाला होता. आजूबाजूच्या परिस्थितीचा अंदाज घेऊन ते लघवी करण्यासाठी संडासात गेले. त्यांनी आतून बोलट लावून घेतला. संडासाच्या खिडकीतून शरीर बाहेर काढले व खिडकीला धरून खाली उडी मारली. बाहेर चांदणे पडले होते. राने तुडवीत ते काही वेळाने एका हमरस्त्यावर आले. आपण देशाच्या कोणत्या भागात आलो आहोत, हे समजण्यास त्यांना मार्ग नव्हता. कारण कोणत्या गावाकडे त्यांना नेण्यात येत होते, हे कैद्यांना सांगण्यात येत नव्हते. काही वेळ त्या हमरस्त्याने चालल्यानंतर त्यांना रस्त्याच्या कडेचा मैलाचा दगड दिसला. ' अमरावती २ मैल ' असे त्याच्यावर लिहिले होते. पहाटेचे रंग पृथ्वीवर झिरपू लागले होते. ते अमरावतीजवळ आले. गावाच्या सीमेवर एका इमारतीत दिवा दिसला म्हणून ते इमारतीकडे गेले. विद्यार्थी-वसतिगृहाची ती इमारत असून एक विद्यार्थी अभ्यासासाठी नुकताच उठला होता. त्यांनी खोलीचा दरवाजा वाजविला. आतील विद्यार्थ्याने दार उघडले. पृथ्वीसिंहांनी त्याला बरोबर घेतले व दादासाहेब खापर्डे यांचे घर दाखविण्यास सांगितले. दादासाहेब हे लोकमान्य टिळकांचे मित्र असल्यामुळे आपल्यासारख्या क्रांतिकारकाला त्यांच्याकडे निश्चित आश्रय मिळेल, असे त्यांना वाटले. खापर्डे यांच्या घरी चौकशी करता ते दिल्लीला गेल्याचे कळले. त्यामुळे मग ते वीर वामनराव जोशी यांच्या घरी गेले. परंतु ते परगावी गेल्याचे कळले. दिवस उजाडण्यापूर्वी कुठे तरी सुरक्षित ठिकाणी जाणे आवश्यक होते म्हणून त्यांनी बरोबरच्या विद्यार्थ्याला सांगितले की, " कोणत्याही कॉंग्रेस पुढाऱ्याच्या घरी चल. " विद्यार्थ्याने त्यांना डॉ. वऱ्हाडपांडे या कॉंग्रेसच्या पुढाऱ्याच्या घरी नेऊन घातले. डॉक्टरांची गाठ घालून देऊन तो विद्यार्थी निघून गेला. डॉ. वऱ्हाडपांडे यांनी पृथ्वीसिंहांना आश्रय दिला.

त्यांची हाकिकत कळल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांना द्रव्यसाह्य देऊन मुंबईस डॉ. नारायणराव सावरकरांकडे रवाना करण्यात आले. डॉ. नारायणराव सावरकर हे स्वा. विनायकराव सावरकरांचे धाकटे बंधू. ते मुंबई येथे दाताचे डॉक्टर होते. पृथ्वीसिंहांची व त्यांची ओळख नव्हती. तथापि पृथ्वीसिंहांची हकिकत ऐकून त्यांनी त्यांना भावनगर येथे आपले मित्र डॉ. काणे व ग. र. वैशंपायन यांच्याकडे सुरक्षिततेसाठी पाठवून दिले. त्या दोघांच्या साह्याने पृथ्वीसिंहांना शारीरिक शिक्षकाची नोकरी तेथील हायस्कुलात लागली. 'स्वामीराव' ह्या नावाने त्यांनी उघडपणे सुमारे आठ वर्षे तेथे नमुनेदार कार्य केले व हजारो शिस्तप्रिय व सामर्थ्यवान युवक तयार केले.

त्यानंतर एकोणीसशे तीस मध्ये मिठाच्या सत्याग्रहासाठी ते गेले असता पोलीस त्यांच्या पाठीमागे लागले. त्यांना झुकांडी देऊन ते अलाहाबादला चंद्रशेखर आझादांकडे गेले. आझादांनी त्यांना एक पिस्तुल दिले व भारतात साम्यवादाची क्रांती करण्यासाठी रशियात जाऊन शिक्षण घेण्यास व साह्य मिळविण्यास सांगितले. आझादांची गाठ घेतल्यानंतर भगतसिंहांच्या सुटकेसाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी त्यांनी दुर्गादेवी व्होरा यांच्या-समवेत लॅमिंटन रोड पोलिस स्टेशनवर हल्ला केला. भगतसिंहांना सरकारने फाशी दिल्यानंतर पृथ्वीसिंह आझाद कराचीस गेले. तेथे सरहद्द गांधी यांच्याशी विचारविनिमय करून पठाणाच्या वेशाने ते हिंदुकुश पर्वताच्या रांगा ओलांडीत टोळीवाल्यांबरोबर अफगाणिस्तानात व तेथून पायदळी रात्रीचा प्रवास करीत रशियाच्या हद्दीत गेले. तेथे त्यांना पकडून कैदेत ठेवण्यात आले. हिंदी क्रांतिकारक असल्याची खात्री पटल्यानंतर त्यांना रशियात सन्मानाने शिक्षण देण्यात आले. शिक्षणानंतर एका रात्री रशियाच्या सरहद्दीवरील बर्फा-प्रमाणे थंड पाण्याची नदी पोहून ते अफगाणिस्तानात शिरले. अफगाण सरकारने त्यांना कैद केले. रशियन अधिकाऱ्यांच्या साह्याने ते तेथून निसटले व नंतर समुद्रमार्गाने पॉंडेचरी येथे हिंदुस्थानात उतरले. पाठीमागे लागलेल्या एका गुप्तहेराला चोप देऊन पॉंडेचरीहून ते मद्रासला आले.

बाबा पृथ्वीसिंह आझाद सोळा वर्षे अज्ञातवासात राहिले.

रशियाहून परत आल्यावर त्यांनी पाहिले की देशाचे राजकारण संपूर्णपणे बदलले आहे. आता सशस्त्र गुप्त चळवळ करण्याचे कारण उरले

नाही. त्यामुळे आता स्वातंत्र्यासाठी स्वतंत्रपणे कार्य करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे ते महात्मा गांधींच्या आश्रमात गेले. गांधीजींनी त्यांना सरकारपुढे आपल्या कृत्यांची कबुली देण्यास सांगितले. सरकारने त्यांना १९६५ पर्यंत कैदेची शिक्षा दिली. परंतु गांधीजींच्या शिफारसीमुळे सरकारने १९४१ साली त्यांना सोडून दिले.

बाबा पृथ्वीसिंहांची जीवन-कहाणी एखाद्या हेरकथेपेक्षाही चित्तथरारक परंतु उदात्त आहे. आजही शिस्तप्रिय नागरिक घडविण्यासाठी ते शिक्षक, मुख्याध्यापक, युवक यांचे पंजाब सरकारच्या वतीने मेळावे व शिबिरे घेत आहेत.

* * *

१३. स्वतंत्र म्हणून जगेन, स्वतंत्र म्हणूनच मरेन

(चंद्रशेखर आझाद, वैशंपायन, भवानीसिंह रावत)

पहिल्या महायुद्धाच्या वेळी गदरच्या स्वातंत्र्यवीरांनी भारतातून इंग्रजांच्या सत्तेचे उच्चाटन करण्याचा जोरदार प्रयत्न केला. दैवाचे फासे उलटे पडले. फितुरीची ठिणगी पडली. क्रान्तीच्या डावपेचासंबंधीचे क्रांतिकारकांचे अज्ञान भोवले. काहींना फासावर जावे लागले. काहींना लाहोरच्या तुरुंगातून कलकत्ता मार्गे 'महाराज' ह्या जहाजातून अंदमानला काळ्या पाण्यावर जावे लागले.

इ. स. १९२० मध्ये लोकमान्य टिळक निधन पावले. गांधीजींचा उदय हिंदी राजकारणाच्या क्षितिजावर झाला. इंग्रजी राजवटीबरोबर संपूर्णपणे असहकार करण्याची चळवळ त्यांनी सुरू केली. सारे राष्ट्र ह्या नव्या चळवळीने भारावून गेले. कोर्ट-कचेऱ्यांवर वकिलांनी बहिष्कार टाकला. शाळा महाविद्यालयांवर बहिष्कार पडला. राष्ट्रीय शिक्षण सुरू झाले. विलायती कापडाच्या होळ्या पेटू लागल्या. स्वदेशीचा चरखा फिरू लागला. सरकारी नोकर व पाटील, पटवारी सरकारी नोकऱ्या सोडू लागले. धरणीकंपाच्या जबरदस्त धक्क्याने धरणी हादरून जावी, त्याप्रमाणे असहकारितेच्या चळवळीने देश हादरून निघाला.



चंद्रशेखर आझाद

छोटा चंद्रशेखर त्या वेळी बनारस येथे शिकत होता. त्याचे गाव मध्यप्रदेशात होते. पंडित सीताराम तिवारींचा तो मुलगा. पंडित सीताराम हे

बागेचे रखवालदार म्हणून काम करीत होते. चंद्रशेखरांचा जन्म ७ जुलै १९०६ रोजी झाला. गरिबीमुळे काही दिवस ते मुंबईस नोकरी करून शिकले व पुढे संस्कृत भाषेचा अभ्यास करून पंडित होण्यासाठी काशीस गेले. असहकारितेच्या चळवळीत इतर काही विद्यार्थ्यांप्रमाणे त्यानेही उडी घेतली. 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्याबद्दल पोलिसांनी त्याला पकडले. हिंदी लोकांनी मातृभूमीचा जयघोष करणे हा देखील इंग्रजांच्या दृष्टीने गुन्हा होता. पोलिसांनी चंद्रशेखरला पकडले, परंतु त्याचे हात इतके लहान होते की, ते बेडीतून निघाले. त्यामुळे फटक्यांची शिक्षा करून त्याला सोडून देण्यात आले. ह्या प्रसंगाने चंद्रशेखरच्या मनात इंग्रजांविषयी संतापाच्या आगीचा लोळ पेटला. संस्कृत महाविद्यालयात संस्कृतचा अभ्यास करीत असताना चंद्रशेखरने व्यायाम करून शरीर चांगले सामर्थ्यवान बनविले.

चारिचुरा (संयुक्त प्रांत) येथे असहकारितेच्या चळवळीला हिंसक वळण लागले. त्या ठिकाणी खवळलेल्या जनतेने २१ पोलिसांना जिवंत जाळले. सरकारी दडपशाही व असहकारितेच्या चळवळीस लागलेले हिंसक वळण ह्यामुळे गांधीजींनी काही काळ चळवळ मागे घेतली. हिंदी राजकारणात एक वैफल्याची पोकळी निर्माण झाली. असहकारितेच्या चळवळीत भाग घेणारे काही तरुण ह्या वैफल्यामुळे सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले.

'हिंदुस्थानात रिपब्लिक असोसिएशन' नावाची क्रांतिकारकांची गुप्त संघटना करणारी एक संस्था बनारस येथे होती. रासबिहारी बोस व शचिंद्रनाथ सन्याल ह्या बंगाली तरुणांनी ती संस्था सुरू केली होती. हत्यारे पैदा करणे, बॉम्ब तयार करणे व त्यासाठी लागणारा पैसा सरकारी खजिने लुटून अथवा दरवडे घालून मिळवणे, इंग्रज अधिकाऱ्यांना ठार मारणे ह्या गोष्टी क्रांतिकारकांची ही गुप्त संघटना करीत असे. चंद्रशेखर आझाद ह्या संघटनेत सामील झाले. शिवराम हरी राजगुरू हे आझादांबरोबर संस्कृतचा अभ्यास करीत होते. राजगुरू हे पुणे जिल्ह्यातील खेड येथील रहिवासी. शिक्षणासाठी ते काशीस गेले होते. चंद्रशेखर आझादसमवेत ते देखील क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेत सामील झाले.

शस्त्रास्त्रे विकत घेण्यासाठी संस्थेला पैशाची जरूरी होती. लखनौहून काकोरी स्टेशनकडे जाणाऱ्या आगगाडीतील सरकारी खजिना लुटण्याचे ठरले.

आगगाडी थांबवून खजिना लुटण्यात आला. खजिना लुटलेल्या काही क्रांतिकारकांना सरकारने पकडले. आगगाडीवर करण्यात आलेल्या हल्ल्यात चंद्रशेखर आझाद यांनीही भाग घेतला होता. ते फरारी (भूमिगत) झाले. त्यांना पकडून देण्यासाठी सरकारने हजारो रुपयांचे बक्षीस लाविले होते.

भूमिगत असताना चंद्रशेखर हे काही दिवस झाशीजवळ जंगलात उदासीबाबांचा मठ होता, त्याच्यात बाबांचा चेला म्हणून राहात होते. त्या वेळी झाशी येथील क्रांतिकारक शचिंद्रनाथ बक्षी, भगवानदास माहोर, सदाशिवराव मलकापूरकर इत्यादींशी त्यांचा परिचय झाला. झाशी येथील रुद्रनारायणसिंह ह्या उमद्या धनिक गृहस्थाचे चंद्रशेखर आझादांवर भावासारखे प्रेम जडले. भूमिगत काळात देखील आझाद उघडपणे रुद्रनारायणसिंहांच्या घरी राहात असत. पोलीस आझादांच्या तपासासाठी आले असताना रुद्रनारायणसिंहांच्याच घरी थांबले होते. त्यांच्या डोळ्यांसमोर भय्याच्या वेषात आझाद उघडपणे वावरत होते, एवढेच नव्हे तर त्यांच्या बरोबर पत्त्यांचा डावही खेळत होते. पोलिसांच्या बोलण्यात आझादांचा विषय निघाला की, पत्ते खेळणारा हा भय्याही आश्चर्याने म्हणायचा, ‘ बराच बेरकी दिसतोय हा तुमचा आझाद !’

चंद्रशेखरांचे आपल्या सहकारी मित्रांवर फार प्रेम असे. पंडित रामप्रसाद बिस्मिल ह्यांना काकोरीच्या कटाच्या खटल्यात फाशी देण्यात आले, त्यानंतर हिंदुस्थान सोशालिस्टिक रिपब्लिकन आर्मीचे सेनापतिपद भीमासारख्या बलवान अशा चंद्रशेखर आझादांकडे आले. संकटाच्या गंभीर प्रसंगी देखील ते शांत असत. त्यांच्या मनाची थोडी देखील चलबिचल होत नसे. ते रोखठोक व्यवहारवादी होते. भगतसिंह, राजगुरू, माहोर, शिववर्मा, विजय, कुमारसिंह, इत्यादी मित्रांची जेव्हा गप्पाष्टकाची बैठक जमे त्या वेळी काव्यविनोद यावर चर्चा चाले. चंद्रशेखर आझाद चंद्र, चंद्रावरील काव्य, मदन, मदनाचे बाण इत्यादी काव्यविषयांची टर उडवीत असत. त्यांचे व्यवहारी बोल मित्रांना सांगत, “ अरे, हृदयात मदनाचे बाण घुसू देण्याऐवजी पिस्तुलाची गोळी घुसू द्या. माझ्या हृदयात जर शत्रूच्या पिस्तुलाची गोळी घुसली तर मी जन्माचे सार्थक मानीन. ” काव्य, संगीत व कला यांची आवड असणारे भगतसिंह विनोदाने म्हणत, “ पंडतजी, तुम्ही जर इंग्रजांच्या हाती सापडला

तर तुम्हांला फाशी देण्यासाठी त्यांना एकाऐवजी दोन दोर त्यावे लागतील-एका दोराचा फासा तुमच्या गळ्याभोवती व दुसऱ्याचा तुमच्या ढेराभोवती. चंद्रशेखरांचे शरीर फारच धष्टपुष्ट होते. त्यावर आझाद म्हणत, " मदारी जसा पकडलेल्या अस्वलाला किंवा माकडाला दोराने बांधून चालवतो त्याच प्रमाणे पोलीस बंदीवानांना दोराने बांधून ओढत नेतात. हा मदारीचा खेळ हवा आहे कोणाला ? जोपर्यंत माझा ' बंबुल बुखारा ' (आझादांनी स्वतःच्या पिस्तुलाचे ठेवलेले नाव) मजजवळ आहे. तोपर्यंत पोलिसांना मला पकडण्याची छातीच होणार नाही.

" दुष्मन की गोलीयोंका हम सामना करेंगे ! आझाद ही रहे हैं आझाद ही मरेंगे । " आपल्या कर्कश भसाड्या आवाजात आझादांनी स्वतःच रचलेल्या काव्यपंक्ती म्हणून दाखविल्या. कोमल काव्यावरून खडी दाबण्याचा रूळ फिरवल्याप्रमाणे त्यांच्या भसाड्या आवाजाखाली ते काव्य चिरडून निघत होते. तथापि आझादांच्या जीवनाचे ते तत्त्वज्ञान-सार होते. त्यांच्या इतर करारी आत्म्याला अंधाऱ्या अदृष्टाने दाखविलेले ते स्वप्नचित्र होते की काय कोण जाणे !

लाला लजपतराय ह्यांच्या हत्येचा सूड घेण्याची योजना आझाद व भगतसिंह ह्यांनीच आखली होती. एखाद्या धुरंधर धाडशी सैनिकास शोभण्या सारखेच आझादांचे वागणे होते. सॉंडर्सच्या वधाच्या त्या भीषण नाट्य-प्रवेशात त्यांच्या बंबुल बुखाऱ्याने पाठलाग करणाऱ्या पोलिसाला (चरणसिंग) यमसदनाला पाठविले व भगतसिंह व राजगुरू यांना सायकलीवरून पळण्यास अवसर करून दिला. त्यानंतर भगतसिंह व राजगुरू यांना वेषांतर करून कलकत्त्यास पाठविले. स्वतः पंड्या बनून त्यांनी यात्रेकरूंचा तांडा हाकीत मथुरेची वाट धरली.

भगतसिंह असेंब्लीत पकडले गेले, त्या वेळी आझाद झाशी येथे होते. भगतसिंह, राजगुरूंच्या फोटोंची वृत्तपत्रातील कात्रणे क्रांतिकारक सहकाऱ्यांनी चंद्रशेखर आझादांकडे आणून दिली. कोणत्याही संकटात डोके शांत ठेवणाऱ्या व सहजासहजी भावनाविवश न होणाऱ्या चंद्रशेखरांच्या डोळ्यात देखील त्या वेळी अश्रू उभे राहिले.

वास्तविक असेंब्लीत बॉम्ब टाकण्याचे काम करून त्यासाठी भगतसिंह सारखा मोहरा खर्ची टाकण्यास आझादांचा विरोध होता. परंतु भगतसिंहानेच तसा आग्रह धरला. क्रांतिकारकांचे तत्त्वज्ञान असेंब्लीत व कोर्टात योग्य रीतीने मांडण्यास आपल्याइतका योग्य दुसरा माणूस नाही, असे त्यांचे म्हणणे पडले. म्हणून त्या योजनेस चंद्रशेखर आझादांना संमती द्यावी लागली.

२३ डिसेंबर १९२९ रोजी व्हॉईसराय लॉर्ड आयर्विन ह्यांची स्पेशल ट्रेन बॉम्बने उडवून देण्याचा धाडसी प्रयत्न चंद्रशेखर आझादांनी आपल्या सहकाऱ्यांनिशी केला. गाडी निजामुद्दीन स्टेशनजवळ येत असता, रुळांमध्ये ठेवलेल्या बॉम्बचा स्फोट झाला. गाडीचे तीन-चार डबे फक्त रुळांवरून घसरून पडले. व्हॉईसरॉयचे दैव बलवत्तर होते. बॉम्बच्या प्रकरणी काँग्रेस पुढाऱ्यांनी टिका केली.

त्या टीकेमुळे जनतेचा गैरसमज होऊ नये म्हणून 'बॉम्बचे तत्त्वज्ञान' ही पत्रके क्रांतिकारकांनी देशभर एकाच वेळी प्रसारित केली.

भगतसिंहांच्या अटकेनंतर झाशी व कानपूर येथे क्रांतिकारकांच्या मागावर बरेच गुप्त पोलीस आले. सर्व क्रांतिकारकांनी एके ठिकाणी न राहाता निरनिराळ्या गावी विखरून राहून पुढील कार्य करावे, असा सल्ला आझादांनी दिला. त्यांनी आपले कार्यालय झाशीहून अलाहाबादला नेले. एक खोली भाड्याने घेऊन तेथे आझाद, भवानीसिंह रावत, सुरेंद्र पांडे, यशपाल व वैशंपायन हे राहू लागले. भवानी सिंहाच्या अटकेनंतर क्रांतिकारकांच्या पंजाब व संयुक्त प्रांतातील हालचालीत एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न आझाद तेथून करीत होते.

भगतसिंहांना पकडल्यानंतर पोलिसांनी कानपूर, लाहोर, झाशी, आग्रा इत्यादी शहरी क्रांतिकारकांच्या हालचालीवर सक्त टेहळणी ठेवली. त्यामुळे क्रांतिकारकांनी ठराविक केंद्रे सोडून देणे अपरिहार्य बनले. लाहोर येथे काश्मिरी बिल्डिंगमध्ये सुखदेव यांच्या समवेत पकडलेला जयगोपाळ माफीचा साक्षीदार झाला होता. त्याचप्रमाणे फणींद्र घोष हा देखील माफीचा साक्षीदार झाला होता आणखीही काहीजण माफीचे साक्षीदार झाले होते. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांची ठिकाणे, हत्यारांचे साठे, योजना वगैरे माहिती पोलिसांना

पुरविली होती. वास्तव आझादांनी भगवानदास माहोर व सदाशिवराव मलकापूरकर यांच्याबरोबर दोन ट्रंकांत बाँबचा मसाला, ॲसिडच्या बाटल्या पिस्तुले, छर्रे हे सामान भरून वर कपड्यांच्या घड्या व पुस्तके भरून त्या ट्रंका त्यांना वऱ्हाडात अकोले येथे घेऊन जाण्यास सांगितले. परंतु दुर्दैवाने भुसावळ येथे ते पकडले गेले.

शिववर्मा, जयदेव कपूर, विजयकुमारसिंह व डॉ गयाप्रसाद हे सरहणपूर येथे बाँब तयार करीत असत. विजयकुमारसिंह व शिववर्मा हे दोघेही कानपूरच्या डी. ए. व्ही. महाविद्यालयाचे विद्यार्थी. शिववर्मा विद्यार्थिदशेतच क्रांतिकारकांसमावेत काम करू लागले होते 'काकोरी कटात फाशीची शिक्षा सांगण्यात आलेले रामप्रसाद तुरुंगात असताना. त्यांची आई त्यांना भेटण्यास तुरुंगात गेली. आपण रामप्रसादांचा धाकटा भाऊ आहोत. अशा बहाण्याने ते रामप्रसादांच्या आईबरोबर गेले. फाशी जाण्या-पूर्वी हिं. रि. दलाच्या न पकडले गेलेल्या सहकाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना रामप्रसादाने आपल्या ह्या मानीव धाकट्या भावाच्या हाती पाठविल्या. विजयकुमारसिंह यांचे वडील बंधू राजकुमार हे काकोरी कटात पकडले गेले होते. त्यांना दहा वर्षांची शिक्षा झाली होती.

शिववर्मा, विजयकुमार, कपूर यांना पैशांची जरुरी लागल्यामुळे डॉ. गया-प्रसाद हे पैसे आणण्यासाठी आझादांकडे गेले. त्याच सुमारास फणींद्र घोष या फितूर क्रान्तिकारकाने शिववर्मा इत्यादींच्या हालचालींची माहिती पोलि-सांना दिली. दुसऱ्या दिवशी उजाडण्यापूर्वी पोलिसांनी क्रांतिकारकांच्या घरावर धाड घातली. दारावरचे ठोठावणे ऐकून शिववर्मा झोपेतून उठून डोळे चोळीत दरवाजा उघडण्यासाठी तिकडे गेले. त्यांना वाटले पैसे आणण्यासाठी गेलेले डॉ. गयाप्रसादच परत आले असावेत. त्यांनी दार उघडताच पोलीस आत शिरले. पोलिसांच्या अनपेक्षित व अचानक धाडीमुळे शिववर्मा पकडले गेले. कपूर व विजयकुमार यांना झोपेतून उठवून अटक करण्यात आली. इतक्यात डॉ. गयाप्रसाद तेथे आले त्यांनाही अटक करण्यात आली. पोलीस ठाण्याकडे नेले जात असताना रस्त्यात डॉ. गयाप्रसाद यांनी लघवीला बसण्यासाठी बाजूला जाण्याची परवानगी मागितली. काकोरी कटात शिक्षा झालेल्या योगेशचंद्र चतर्जी यांना तुरुंगातून कसे सोडवावे, यासंबंधी-

त्या योजनेचे कागदपत्र गयाप्रसाद यांच्या खिशात होते. ते पोलिसांच्या हातात पडू नयेत म्हणून त्या कागदाचा चोळामोळा करून त्यांनी तो तोंडात घातला व चावून ते तो कागदाचा लगदा गिळू लागले. परंतु लगदा नरड्यात अडकल्यामुळे ते घाबरे झाले. पोलिसांच्या लक्षात खरी गोष्ट आली नाही. परंतु कैदी घाबरा झाल्याचे पाहून त्यांनी त्याला पाणी पाजले. पाण्याच्या घोटाबरोबर कागदाचा तो लगदा गयाप्रसादांच्या घशातून पोटात उतरला. अशा रीतीने तो गुप्त मजकूर वाचला व गयाप्रसादांचे प्राणही वाचले. त्या सर्वांना लाहोरच्या तुरुंगात पाठविण्यात आले. भगतसिंहाच्या खटल्याबरोबरच त्यांच्यावर खटला चालून त्यांना काळ्या पाण्याच्या शिक्षा झाल्या. शिक्षा भोगून आल्यावर शिववर्मा उत्तर प्रदेशचे आमदार म्हणून निवडून आले. विजयकुमार-सिंह चांगल्या दर्जाचे लेखक असून निरनिराळ्या इंग्रजी नियतकालिकांतून लेखन करतात. शिववर्मा यांना दलाने दिलेले टोपणनाव ‘ प्रभात ’ व विजयकुमारांना दिलेले नाव ‘ बच्चू ’ असे होते.

अशा रीतीने दलातील साथीदार एकामागून एक पकडले जात होते. चंद्रशेखर आझादांनी ‘ बच्चन ’ ला जयपूर संस्थानात हत्यारे आणण्यासाठी पाठविले. बच्चन हे विश्वनाथ यांचे ठेवलेले नाव. त्यांचा जन्म १९१० साली झाला. शिक्षण झाशी येथे झाले. माहोर-मलकापूरकर यांच्याबरोबरच वैशंपायन हिं. स. प्र. दलाचे सभासद झाले. वैशंपायनांची आझादांवर एकनिष्ठ भक्ती होती. वैशंपायनांवर आझादांचा ठाम विश्वास होता. जयपूर येथे एका मुसल-मान गृहस्थाने हत्यारे देण्याचे कबूल केले. परंतु वैशंपायनांचे कोवळे वय लक्षात घेता या मुलाला हत्यारे चालविता येतात की नाही अशी शंका त्यांना आली. तेव्हा वैशंपायन यांनी बंदुकीने दोन गोळ्या एकाच लक्ष्यावर बरोबर मारल्या. त्यामुळे खात्री पटून त्या गृहस्थाने वैशंपायन यांना काही रिव्हॉल्-व्हर व एक बंदूक दिली. एका मित्राच्या पत्नीला पडदा पांघरण्यास देऊन तिला बरोबर घेऊन ‘ बच्चन ’ ने हत्यारे सुरक्षितपणे आझादांकडे आणली.

पैशांच्या अडचणीत असल्यामुळे आझादांनी हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीची (हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र दल) मोटर कानपूरला शिवचरण व वीरभद्र तिवारी यांच्याकडे विकण्यासाठी ठेवली होती. तिचे पैसे आणण्यासाठी वैशंपायन यांना आझादांनी कानपुरास पाठविले होते. वीरभद्र

तिवारी व शिवचरण ह्या साथीदारी क्रांतिकारकांनी विश्वासघात करून पोलिसांना खबर दिली. वैशंपायन यांना दि. १-२-१९३१ रोजी पकडण्यात आले. इतरांबरोबर लाहोर कटातील आरोपींच्या खटल्यात त्यांना काळे पाण्याची शिक्षा झाली. नऊ दहा वर्षांची शिक्षा भोगून आल्यानंतर ते परत आले. त्यानंतर आपले सेनापती बलराज चंद्रशेखर आझाद यांचे त्यांची विस्तृत व रोमांचकारी चरित्र लिहिले.

आझादांच्या मृत्यूनंतर घडलेली ही घटना येथेच सांगणे सोयीस्कर होईल. वीरभद्र तिवारीने दगलबाजी करून वैशंपायन यांना पकडून दिले, व आल्फ्रेड पार्कमध्ये चंद्रशेखरांना विश्वासघात करून बोलाविले. ह्यामुळे भवानीसिंह रावत ह्या आझादांच्या सहकाऱ्याच्या डोळ्यात रक्त उतरले. भवानीसिंह हे हिमालयातील गढवाल प्रांतातील राहणारे. त्यांचे वडील इंग्रजी सैन्यात कप्तान-पदावर होते. सैन्यातील उत्कृष्ट कामगिरीमुळे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहण समारंभात उपस्थित राहाण्यासाठी इंग्रज सरकारने त्यांना लंडन येथे पाठविले होते.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी भवानीसिंह रावत दिल्लीला आले. इ. स. १९२८-२९ चे ते दिवस होते. देशात महर्षी दयानंद सरस्वतींच्या जन्मशताब्दी-महोत्सवाचे समारंभ ठिकठिकाणी साजरे होत होते. अशाच एका टोलेजंग समारंभासाठी भवानीसिंह मथुरा येथे गेले होते. महर्षींच्या कार्याचे मोल ऐकून भवानीसिंह प्रभावित झाले व ते आर्यसमाजी बनले. या धामधुमीच्या काळात दिल्ली येथे पुढाऱ्यांच्या वारंवार सभा भरत. पं. जवाहरलाल नेहरूंच्या एका सभेस भवानीसिंह गेले. तेथे काही क्रांतिकारकांची व त्यांची ओळख होऊन ते हिं. स. ज. दलात प्रविष्ट झाले. दिल्लीजवळील निझामुद्दीन स्टेशनजवळ व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन यांची गाडी उलथविण्याच्या प्रयोगाच्या वेळी त्या प्रयत्नात भवानीसिंहाने साह्य केले. बॉम्बच्या तत्त्वज्ञानाची पत्रके मध्यप्रदेशात वाटण्याचे काम भवानीसिंहानेच केले. दलाला लागणाऱ्या द्रव्यासाठी दिल्लीची इम्पीरियल बँक १ जुलै १९३७ रोजी लुटण्याचे आझादांनी ठरविले. परंतु ३० जून रोजी पं. मोतीलाल नेहरूंना सरकारने पकडले. त्यामुळे १ जुलैला दिल्लीत हरताळ पडला. शहरात पोलिसांची गस्त सुरू झाली. त्यामुळे

त्या दिवशी इम्पीरियल बँक लुटण्याची योजना सोडून द्यावी लागली. त्यानंतर काही दिवसांनी दिल्लीतील मोडोदिया स्टोअरवर हल्ला करण्यात आला. त्या वेळी हातात पिस्तुल घेऊन भवानीसिंह पहाऱ्यावर उभे होते. भवानीसिंहांच्या वसतिगृहातील खोलीवर लुटीचा ऐवज मोजण्यात आला. जवळजवळ तेरा हजार रुपयांची रक्कम होती. दलाच्या कामासाठी काही रक्कम निरनिराळ्या कार्यकर्त्यांकडे पाठविण्यात आली व काही रकमेतून 'हिंदुस्थान टॉयलेट कंपनी' काढण्यात आली. आझाद कानपूरकडे रवाना झाले. त्यानंतर वरील चोरीचा तपास पोलीस जारीने करू लागले म्हणून दिल्लीत राहाणे भवानीसिंहांना धोक्याचे वाटू लागल्यामुळे ते फरारी झाले व राजस्थान, व उत्तर प्रदेशातील निरनिराळ्या शहरांत राहून शेवटी ते आझादांकडे कानपूरला गेले व तेथून आझादांच्यासमवेत अलाहाबादला गेले व त्यांच्याच खोलीत सुरेंद्र पांडे व वैशंपायन यांच्यासमवेत राहू लागले. दिल्लीच्या दरवाड्याच्या प्रकरणी पोलिसांनी त्यांना पकडून देण्यासाठी पाचशे रुपयांचे इनाम घोषित केले होते व गावोगावी चिकटविलेल्या जाहिरनाम्यांवर त्यांचे फोटो छापले होते.

आझाद बाहेर पडल्यानंतर भवानीसिंहांनी आपल्या बड्या भय्यासाठी न्याहारीचे पदार्थ तयार केले व आझादांची मार्गप्रतीक्षा करीत बसले. बराच वेळ झाल्यानंतर यशपाल व सुरेंद्रनाथ पांडे घरी आले व त्यांनी आझादांच्या हौतात्म्याची गंभीर घटना भवानीसिंहांना सांगितली.

त्यानंतर भवानीसिंहांनी विश्वासघातकी वीरभद्र तिवारीचा काटा काढण्याचे ठरविले. सुरेंद्र पांडे यांस बरोबर घेऊन ते कानपूरला गेले. चौक बाजारच्या समोरच्या गल्लीत वीरभद्र राहात होता. भवानीसिंहांनी त्याच्यावर टेहळणी ठेवली वीरभद्र घरातून निघून गल्लीच्या वळणावर आला. तेवढ्यात भवानीसिंहाने त्याच्यावर पिस्तुलाचा नेम धरला. दुर्दैवाने त्याच वेळी दुसऱ्या बाजूने एक गाय आडवी आली. त्यामुळे भवानीसिंहांनी झाडलेल्या गोळीचा नेम चुकला व वीरभद्र वाचला. भवानीसिंह तेथून निसटले. त्यानंतर एका इंग्रज कम्युनिस्टाशी संधान बांधून ते परदेशी जाण्याच्या तयारीने मुंबईस गेले. जाण्यापूर्वी स्वतःजवळ असलेली एक डझन पिस्तुले व दोनशे गोळ्या त्यांनी दिल्लीस सहकारी क्रांतिकारकांकडे पोहोचत्या केल्या. मुंबईस बोट सुटण्याच्या आदल्या दिवशी मुंबईस ते आजारी पडले त्यामुळे त्यांना परदेशी

जाता आले नाही. मुंबईस ते साथी मुहम्मद इस्माईल यांच्याकडे उतरले होते. एक दिवस अचानक पोलीस त्या ठिकाणी गेले. त्यांनी सुरेंद्र पांडे व भवानीसिंह यांना अटक केली. दिल्ली येथील कटाचा खटला बरेच दिवस चालून पुढे भवानीसिंहांना पुरेशा पुराव्याअभावी सोडून देण्यात आले.

२७ फेब्रुवारी १९३१ चा तो दुर्भाग्याचा दिवस. सकाळीच स्नानादी कामे आटोपून आझाद खोलीबाहेर पडू लागले. भवानीसिंह रावत ह्या सह-काऱ्याला ते म्हणाले, "मी जरा जरुरीच्या कामासाठी काही मित्रांना भेटण्या-साठी जात आहे. तेथून आल्यावर चहा-नास्ता घेईन."

अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये (बागेत) काही मित्रांच्या बोला-वण्यावरून चंद्रशेखर गेले. असे म्हणतात की वीरभद्र नावाच्या क्रांतिकारकाने बक्षिसाच्या आशेने चंद्रशेखरांना पकडून देण्याचा व्यूह रचला होता. गुप्त पोलीस सुपरिंटेंडेंट नाटबावर, डे. सुपरिंटेंटेंट विश्वेश्वरसिंह व काही पोलीस तेथे होते. नाटबावर आझादांची विचारपूस करू लागला. त्याच्या वागण्याचा संशय येऊन आझादांनी त्याच्यावर पिस्तुल झाडले. पिस्तुलाची गोळी नाटबावरच्या हाताला लागून त्याच्या हातातील पिस्तुल खाली पडले. जवळच असलेल्या एका झाडाच्या पाठीमागे तो लपला. आझादही दुसऱ्या एका



झाडाच्या खोडामागे लपले. डे. सुपरिंटेंडेंट विश्वेश्वरसिंह यांनी आझादावर स्वतःच्या पिस्तुलातून गोळी झाडली. आझादांना विश्वेश्वरसिंह दिसले नाहीत. तथापि पिस्तुलाच्या आवाजाच्या अनुरोधाने आझादांनी गोळी झाडली. आझाद हे आवाजावरून देखील लक्ष्यवेध करण्यात तरबेज होते. त्यांच्या पिस्तुलातून सुटलेली गोळी विश्वेश्वरसिंहाच्या तोंडाला लागून तो खाली पडला. लगेच पोलिसांच्या बंदुकीतून आझादांच्या अंगावर गोळ्यांचा वर्षाव होऊन शेवटी स्वतःच्या हाताने त्यांनी स्वतःवर गोळी झाडून घेऊन ते जमिनीवर पडले. चंद्रशेखर हुतात्मा झाले. त्यांनी आपले बोल खरे करून दाखविले.

'दुष्मनकी गोलियोंका हम सामना करेंगे,
आझाद ही रहे हैं आझाद ही मरेंगे ।'

ज्या झाडाने आझादांना आश्रय दिला होता. त्याच्यावर फुले व गुलाल उधळून लोक त्याची पूजा करू लागले. ते माहात्म्य न साहून सरकारने ते झाड तोडले; तथापि इंग्रजांचे राज्य गेल्यावर एका साधूने तेथे जांभळीचे दुसरे झाड लावले. आता आल्फ्रेड पार्कला 'चंद्रशेखर आझाद पार्क' असे नाव जनतेने दिले आहे.

* * *

३४. चितगाव शस्त्रागारावर हल्ला

(सूर्यसेन मास्तरदा, तारकेश्वर दस्तीदार)

एकोणिसशेतीस साली गांधीजींनी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. मिठाचा कायदा मोडण्यासाठी एप्रिल १९३० मध्ये त्यांनी दांडी येथे समुद्रकिनाऱ्यावर सरकारी मालकीचे मीठ उचलून कायदेभंग केला. गांधीजींच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्रातही सरकारी जंगलातील लाकडे तोडून लोकांनी जंगलाचा कायदा तोडला. वेडाने पिसाळलेल्या सरकारने कायदेभंग करणाऱ्या सत्याग्रहींवर अमानुषपणे लाठीहल्ले केले. सत्याग्रही जमावावर घोडदळ घातले व काही प्रसंगी गोळ्या घातल्या. त्या हल्ल्यांमुळे कित्येक सत्याग्रही ठार झाले व शारीरिक दुखापतींमुळे कित्येक अधू झाले.



नेमके त्याच वेळी बंगाल प्रांतात सशस्त्र क्रान्तिकारकांच्या चळवळीने उठाव केला. आतापर्यंत काँग्रेस इंग्रज सरकारजवळ वसाहतीचे स्वराज्य मागत होती. म्हणजे इंग्रजांच्या आधिपत्याखाली राहून हिंदी लोकांनी स्वतःच्या देशाचा कारभार पाहावयाचा. त्यामुळे इंग्रजांचा अंकुश राहणारच होता. परंतु १९२९ ला काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. त्याचाच अर्थ असा की, इंग्रजांनी चंबूगबाळे आटोपून हिंदुस्थानातून गेले पाहिजे. परंतु हिंदुस्थानातून कोट्यवधी रुपयांची लूट करणारे इंग्रज सहजासहजी तसे थोडेच हिंदुस्थानवरची सत्ता सोडणार ! निःशस्त्रपणे कायदेभंग करणाऱ्यांना त्यांनी झोडपण्यास सुरुवात केली. ते पाहून बंगाली क्रान्तिकारकांची ठाम समजूत झाली की, शस्त्रबलानेच इंग्रजांना हुसकून लावले पाहिजे.

सूर्यसेन हे त्या बंगाली गुप्त क्रान्तिकारकांचा नेता होते. ते चितगाव जिल्ह्यातील राहाणारे. बी. ए. झाल्यानंतर ते गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीत पडले. त्यानंतर राष्ट्रीय शाळा काढून तेथे शिक्षक म्हणून काम करू लागले. तेव्हापासून ते कायदेभंगाच्या चळवळीपर्यंत क्रान्तिकारकांची गुप्त संघटना करीत होते. शस्त्रे जमवीत होते. तरुण मुलां-मुलींना बंदूक चालवणे, तरवार फिरविणे, पिस्तुलाने नेम मारणे अशा तऱ्हेचे शिक्षण ते गुप्तपणे देत होते. शाळा-कॉलेजातील शेकडो मुले-मुली सूर्यसेनांच्या चळवळीकडे आकर्षित झाली होती. त्यांना हाताशी धरून सूर्यसेनांनी इंडियन रिपब्लिक आर्मीची (भारतीय प्रजातंत्र सैन्य) स्थापना केली.

त्या सैन्याने प्रथम चितगाव येथे असलेले सैन्याचे व पोलिसांचे शस्त्रागार लुटण्याचे ठरविले. इंग्रजांशी लढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर हत्यारे मिळविणे आवश्यक होते. दि. १८ एप्रिल १९३० रोजी रात्री साडेदहा वाजता हल्ला करण्याचे ठरले. त्याप्रमाणे सूर्यसेनांनी चार गटांत कामाची विभागणी करून दिली. एका गटाने टेलिफोनच्या तारा तोडावयाच्या. दुसऱ्याने तारायंत्राच्या तारा तोडावयाच्या. तिसऱ्याने युरोपियन क्लबवर हल्ला करून तेथे जमलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांचा काटा काढावयाचा, व चौथ्या गटाने शस्त्रागारावर हल्ला करावयाचा. त्याप्रमाणे तारा तोडण्यात आल्या. युरोपियन लोकांचा क्लब सुटून गेल्यामुळे तो बेत फसला. शस्त्रागारावर पन्नास-जणांच्या टोळीने हल्ला केला. प्रतिकार करणाऱ्या एका इंग्रज अधिकाऱ्याला व काही पहारेकऱ्यांना क्रांतिकारकांनी ठार केले. हत्यारांचा साठा व दारूगोळा हस्तगत करून व त्या इमारतीला आग लावून ते जवळच असलेल्या जलालाबादच्या टेकड्यांवरील दाट जंगलाच्या आश्रयास गेले. तेथे स्वतंत्र हिंदी लोकराज्याची घोषणा करण्यात आली. सूर्यसेनांना ह्या स्वतंत्र राज्याचा मुख्य नेमण्यात आले. आता आमचा लढा इंग्रजांबरोबर सुरू झाला असून इंग्रजांना ह्या देशातून घालवून दिल्यावरच तो संपेल, अशी पत्रके वाटण्यात आली. शस्त्रागार लुटल्याची बातमी सरकारला लागली. लुटारूंचा बंदोबस्त करण्यासाठी एक हजार शिपायांची पलटण जलालाबादच्या टेकड्यांकडे रवाना झाली. दाट झाडझाडोऱ्यात दडून क्रान्तिकारकांनी त्या सैन्यावर टेकड्यावरून गनिमी काव्याचा हल्ला चढविला. साठ–सत्तर गोरे शिपाई मारले गेले. क्रान्ति-

कारकांपैकी पाच-सहा लोक ठार झाले. क्रान्तिकारकांनी इंग्रजी सैन्याचा पराभव केला.

सरकारने सूर्यसेनांना पकडून देणारास दहा हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. तरीही ते सापडेनात. गुप्त पोलीस त्यांचा एकसारखा तपास करीत होते. सूर्यसेन ढालघाट पोलीस स्टेशनजवळच्या पतिया नावाच्या खेड्यात असल्याची बातमी पोलिसांना लागली. कॅप्टन कॅमेरान नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने काही गुरखा शिपाई बरोबर घेऊन सूर्यसेन ज्या घरात होते त्या घराला रात्री वेढा दिला. सावित्रीदेवी नावाच्या गरीब बाईचे ते घर होते. सूर्यसेन आपल्या काही सहकाऱ्यांसह त्या घरात सल्लामसलत करीत होते. इतक्यात दारावर थाप पडली. सूर्यसेनांनी दाराच्या फटीतून डोकावले. बाहेर बॅटऱ्यांचे झोत पडले होते. त्या प्रकाशात त्यांना हत्यारबंद शिपाई दिसले. बाका प्रसंग ओळखून त्यांनी तेथून निसटून जाण्याचा बेत आखला. घराच्या खिडकीच्या फटीतून निर्मलसेन व अपूर्वसेन ह्या क्रांतिकारकांनी पोलिसांवर गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. उलट बाजूने पोलिसांनीही गोळीबारास सुरुवात केली. पोलिसांचे लक्ष घराच्या पुढील भागावर केंद्रित झाल्याचे पाहून सूर्यसेन, प्रीतिलता वडेदार व कल्पना दत्त हे क्रांतिकारक घराच्या परसदाराच्या भिंतीवरून उड्या मारून अंधारात पसार झाले. ह्या चकमकीत कॅप्टन कॅमेरॉनला क्रांतिकारकांनी ठार केले. अपूर्वसेन व निर्मलसेन ह्यांनी सूर्यसेनाला सुखरूपपणे पार पाडण्यासाठी खिंड लढविली. तथापि पोलिसांच्या गोळीबारात ते ठार झाले.

फेब्रुवारी १९३३ मध्ये सूर्यसेन गौराल खेड्यात पूर्णा तालुकदार ह्यांच्या घरात असल्याची बातमी एका फितुराने अधिकाऱ्यांना दिली. लगेच गुरखा शिपायांच्या तुकडीने त्या घराला वेढा दिला. झालेल्या चकमकीत पूर्णा तालुकदार ठार झाला. सूर्यसेन पकडले गेले. त्यानंतर त्यांचे सहकारी तारकेश्वर दस्तीदार हे पकडले गेले. त्यांच्यावर खटला चालून त्यांना फाशीची शिक्षा झाली. १२ जानेवारी १९३४ रोजी त्या दोघांना फाशी देण्यात आले

सूर्यसेन यांना मध्यरात्री त्यांच्या चिंतनातून जागे करण्यात आले. फाशीचा क्षण जवळ आल्याची जाणीव त्यांना झाली. एखाद्या क्रुद्ध वाघाने

गगनभेदी गर्जनेने गहन अरण्य दणाणून सोडावे, अशा गंभीरपणे उच्च स्वरात ' वंदे मातरम् ' अशी आरोळी त्यांनी ठोकली. त्यांच्या आवाजाची धार मध्यरात्रीच्या शांततेचे आवरण कापीत गेली. चितगावच्या कारागृहाच्या खोल्याखोल्यांतून ही घोषणा प्रतिध्वनित गेली, ' वंदे मातरम् ' कैद्यांनी त्या घोषणेला प्रतिसाद दिला, ' वंदे मातरम् ! '

सूर्यसेनांना सरकारने फाशी दिले तरी त्यांच्या तरुण सैनिकांनी पुढे किती तरी इंग्रज अधिकाऱ्यांचे बळी घेतले !

* * *

३५. प्रीतिलता नव्हे विद्युल्लता

(प्रीतिलता वाडेदार)

प्रीतिलताचे वडील दरमहा पन्नास रुपये पगारावर कारकून म्हणून नोकरी करीत होते. तसे पाहिले तर एकंदरीने घरची परिस्थिती गरिबीचीच होती. प्रपंच मोठा. प्रीतीच्या पाठीवर चार बहीण-भावंडे होती. प्रीतिलता ही सर्वांत वडील मुलगी होती. तिचा जन्म १९११ साली झाला. ती हुशार असल्यामुळे प्रीतिच्या वडिलांनी तिला खूप शिकवावयाचे ठरविले. ते मनाशी म्हणत की, एकदा का प्रीतिलताचे शिक्षण पुरे होऊन तिला नोकरी लागली



की माझ्या डोक्यावरचे प्रपंचाचे ओझे हलके होईल. प्रीतिलता हीच भविष्यकाळातील त्यांच्या आशेचे स्थान होते.

चितगाव येथे हायस्कूलचे शिक्षण संपविल्यावर ती डाक्का येथे महाविद्यालयात शिक्षण घेण्यास गेली. ह्याच ठिकाणी तिचा क्रांतिकारकांशी संबंध आला. डाक्का येथे लीला नाग हिचा दीपाली संघ ही संस्था

स्त्रियांमध्ये सशस्त्र क्रांतीची बीजे पेरीत होती. त्या संस्थेत प्रीतीने प्रवेश मिळवून लाठी, जंबिया, पिस्तुलाने नेम मारणे अशा प्रकारचे शिक्षण घेतले. त्यानंतर ती कलकत्ता येथील बेथुल महाविद्यालयातून उच्च दर्जाने बी. ए. झाली. बी. ए. झाल्यावर चितगाव येथील नंदन कानन मुलींच्या शाळेच्या शाखेची मुख्याध्यापिका म्हणून काम करू लागली.

प्रीतिलता जरी नोकरी करीत होती तरी तिचे मन मात्र नोकरीत रमत नव्हते. क्रांतीच्या विचारांनी तिचे मन धगधगत होते. इतिहासात शिकलेल्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाईच्या पराक्रमाचे चित्र तिच्या डोळ्यांपुढे तरळत होते. छोट्या पुत्राला पाठीशी बांधून शत्रूची मुंडकी छाटीत घोडा दौडविणाऱ्या राणीच्या दृश्याने प्रीतीच्या भावनाप्रधान मनाला उदात्ततेच्या उंच जगात नेले. आपणही स्वातंत्र्यासाठी तसे काही केले पाहिजे, असे तिच्या मनाने घेतले. ह्या विचारांनी प्रेरित होऊन आपली सहकारी कल्पना दत्त हिच्या ओळखीने ती सूर्यसेनांना भेटली.

प्रीतिलतेला स्वतःच्या घरचा फाटकातुटका संसार दिसत असूनही तिचे लक्ष देशाच्या परिस्थितीकडे लागले होते. त्या वेळी आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रज सरकारने भारतातून खूप संपत्ती त्यांच्या देशात नेली. भारताचे उद्योगधंदे बसले होते. शेतकरी कंगाल झाले होते व सामान्य जनता निरनिराळ्या करांच्या भाराखाली वाकून गेली होती. ही सर्व परिस्थिती गांधीजींनी पाहिली. सन १९३० साली गांधीजींनी दांडी येथे मिठाचा सत्याग्रह करून कायदेभंग केला. त्यामुळे कायदेभंगाची (कायदे मोडण्याची) चळवळ देशभर पसरली. बंगाल प्रांतात सूर्यसेन नावाचे एक शाळामास्तर होते. ते अत्यंत बुद्धिमान व देशाभिमानी होते. त्यांनी असे ठरविले की, हाती शस्त्रे घेऊन इंग्रज लोकांना देशातून पिटाळून लावले पाहिजे. म्हणून त्यांनी काही तरुण तयार केले. त्या तरुणांना त्यांनी जांबिया, तलवार, लाठी इत्यादी गोष्टींचे शिक्षण दिले. प्रीतिलताही त्यात होती. सूर्यसेनाने सरकारी शस्त्राचे साठे व खजिने यांच्यावर हल्ला करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पहिला हल्ला चितगाव येथील सरकारी शस्त्राच्या साठयावर करण्यात आला. सूर्यसेन व त्याचे साथीदार यांना भरपूर शस्त्रे मिळाली व ही सर्व मंडळी डोंगराळ भागात पळून गेली. इंग्रजाचे सैन्य व शिपाई त्यांच्या

मागावर होतेच. एके दिवशी सूर्यसेन, प्रीतिलता व इतर काही साथीदारांना इंग्रजांविरुद्ध लढण्याचे काही बेत समजावून सांगत होते. तितक्यात दरवाजा ठोठावण्यात आला. प्रीतिलतेने दरवाजाच्या फटीतून पाहिले. बाहेर पोलीस उभे होते. त्यांच्या हातात बॅटऱ्या व खांद्यावर बंदुका होत्या. सूर्यसेन, प्रीतिलता व इतर काही साथीदार त्या घराच्या धाब्यातून धाब्यावर चढले आणि मागच्या बाजूने पळून गेले. वरील प्रसंगानंतर पोलीस लगेच प्रीतिलतेच्या घरी आले, परंतु प्रीतिलता तत्पूर्वी घरी आली होती. जणू आपणास काहीच माहीत नाही असा साळसूदपणाचा आविर्भाव तिने आणला होता. परंतु अशा प्रकारचे सोंग फार दिवस टिकविता येणे शक्य नव्हते. म्हणून ती भूमिगत झाली. सरकारने तिला पकडून देण्यासाठी रु. ५०० चे बक्षिस जाहीर केले, तथापि ती सापडली नाही. एवढेच नव्हे तर रामकृष्ण विश्वास ह्या कैदेतील साथीदाराला ती ४० वेळा भेटून आली.

इंग्रज लोकांच्या पहारतली येथील एका क्लबवर हल्ला करण्याची कामगिरी प्रीतिलतेवर सोपविण्यात आली. त्या क्लबवर इंग्रज अधिकारी व त्यांच्या बायका चैन करण्याकरिता जमत असत. दि. २४ सप्टेंबर १९३२ ची रात्र. प्रीतीने पुरुषाचा पोषाख केला. तिने बरोबर सात आठ साथीदार घेतले. तिच्या हातात पिस्तुल होते आणि साथीदारांच्या झोळीत बॉम्ब होते. दि. २४ सप्टेंबर १९३२ रोजी रात्रीची दहा वाजायची वेळ. अंधारातून मार्ग काढीत स्वतःचे सात-आठ सैनिक बरोबर घेऊन प्रीतिलता त्या क्लबजवळ आली. क्लबमधील अधिकारी नाचण्यात रंगून गेले होते. क्लबवर बॉम्ब फेकण्यास प्रीतीने सांगितले. स्वतः प्रीतीने पिस्तुलातून गोळ्या झाडण्यास सुरुवात केली. बॉम्बचे व पिस्तुलाचे आवाज यामुळे क्लबमधले अधिकारी घाबरून पळू लागले. पिस्तुलाच्या गोळीने एका अधिकाऱ्याच्या बायकोचा बळी घेतला. काही अधिकारी जबर जखमी झाले. प्रीतीने आपल्या साथीदारांना पळून जाण्यास सांगितले. आपले मौल्यवान पिस्तुल साथीदाराजवळ दिले व म्हणाली, "साथींनो, शत्रूचा पराभव होईपर्यंत शस्त्र खाली ठेवू नका. पूज्य मास्तरांना प्रणाम सांगा." वयाच्या विशीत असणाऱ्या तरुणीचे हे देशप्रेम व नेत्याबद्दल निष्ठा व पूज्यभाव होता. बॉम्ब किंवा पिस्तुलाच्या आवाजाने पोलीस शिपाई धावत आले, परंतु त्या पूर्वीच प्रीतिलतेने स्वतःबरोबर आणलेले


विष खाल्ले होते. आपण शत्रूच्या हातात सापडलो तर ते आपली विटंबना करतील, म्हणून तिने मुद्दामच स्वतःजवळ विषाची पुडी ठेवली होती. प्रीतिलतेने स्वतःच्या संसाराकडे लक्ष दिले नाही, तथापि देशातील लोकांच्या कल्याणासाठी स्वतःचे प्राण दिले. प्रीतिलतेच्या कोमल शरीरात देशप्रेमाचा केवढा मोठा ज्वालामुखी धगधगत होता ! ती प्रेमाची लता नव्हती तर देश-प्रेमाने धगधगणारी विद्युल्लता होती.

* * *

३६. बळींचा वेध – एक, दोन, तीन

(प्रद्योतकुमार भट्टाचार्य, मृगेंद्रकुमार दत्त, निर्मलजीवन घोष)

फुकाफुकी मोठेपणा मिळविण्यासाठी सामान्य लोकांत अहमहमिका लागल्याचे दृश्य नेहमीच दिसते. तथापि मरण्यासाठी अहमहमिका लागल्याचे दृश्य क्वचितच पाहावयास मिळत असेल. अशा प्रकारच्या घटना विसाव्या शतकाच्या दुसऱ्या-तिसऱ्या दशकांत बंगालने पाहिल्या. सूर्यसेन मास्तरदा ह्यांनी इंग्रजी राजवट उखडून टाकण्यासाठी जी सशस्त्र क्रांतिकारी मोहीम सुरू केली होती तिच्या प्रभावाने बंगाली तरुण-तरुणींची हृदये प्रभावित झाली होती. क्रांती व जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांचा सूड ह्या विचारांनी त्यांची मने पेटली होती. भारतीयांची स्वातंत्र्याची चळवळ चिरडून टाकण्यासाठी इंग्रज अधिकारी जो जो अधिकाधिक जुलूम करीत तो तो क्रांतिकारकांच्या झुंडीच्या झुंडी ते आव्हान झेलून इंग्रजी अधिकाऱ्यांना कंठस्नान घालून फाशीच्या कड्यात स्वतःच्या माना अडकविण्यास अहमहमिकेने पुढे येत. त्यांच्या मनश्चक्षूंसमोर तरळत होते फक्त स्वतंत्र भारताचे सुंदर चित्र. त्यापुढे त्यांना ना कर्दनकाळ अशा इंग्रजी सामर्थ्याची भीती वाटली, ना मृत्यूची क्षिती वाटली. त्यांच्या



डोळ्यातील प्रखर अंगाराने इंग्रजांची बयोनेटे वितळत होती. मृत्यूच्या सावल्या विरघळत होत्या. वामनाने राक्षसांचा राजा बळी ह्याच्या डोक्यावर पाय रोवून त्याला पाताळात घातला होता. बंगाल्यातील तरुण क्रांतिकारकांनी मृत्यूच्या माथ्यावर पाय रोवून त्याला पाताळात घातला होता. खरे मृत्युंजय !

मिदनापूर हा बंगालातील एक जिल्हा. त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी जेम्स पेडी. क्रांतिकारकांची चळवळ चिरडून टाकण्यासाठी त्याने सरसकट सर्व जनतेला खूप हैराण केले. अशा जुलुमी अधिकाऱ्याला इ. स. १९३१ मध्ये क्रांतिकारकांनी ठार केले.

त्याच्यानंतर एका घमेंडखोर व निर्दय अधिकाऱ्याला मिदनापूरच्या क्रांतिकारकांना वठणीवर आणण्यासाठी सरकारने जिल्हाधिकारी म्हणून पाठविले. त्याचे नाव रॉबर्ट डग्लस. त्याने जनतेला अगदी धारेवर धरले. त्याच वेळी हिजली ह्या तुरुंगात कैदी व तुरुंगाचे शिपाई यांच्यात दंगा झाला. राजद्रोहाच्या संशयाखाली बऱ्याच बंगाली तरुणांना हिजलीच्या तुरुंगात इतर गुन्हेगार कैद्यांच्या समवेत स्थानबद्ध केले होते. तुरुंगातील कैदी व पहारेकरी-शिपाई ह्यांच्यात वारंवार भांडणे होत. एके दिवशी पन्नास शिपाई हातात बंदुका व काठ्या घेऊन कैद्यांच्या बराकीतून बेछूट गोळीबार व लाठीमार करू लागले. ह्या अनपेक्षित हल्ल्यात कित्येक कैदी घायाळ झाले. काय प्रकार आहे, हे पाहाण्यासाठी खोलीबाहेर आलेले राजकीय स्थानबद्ध संतोषकुमार मित्र व तारकेश्वर सेन हे त्या गोळीबारात मरण पावले. ह्या प्रकाराविरुद्ध जनतेने खूप आवाज उठविला. त्यामुळे झालेल्या प्रकाराची चौकशी करण्यासाठी सरकारने एक कमिशन नेमले. शिपायांनी निःशस्त्र व बेसावध असणाऱ्या कैद्यांवर खोल्या-खोल्यात शिरून केलेला गोळीबार हा अमानुषपणाचा होता. तसे करण्यास कोणत्याही अधिकाऱ्याने आदेश दिला नव्हता. ह्यास्तव पोलिसांचे ते कृत्य पूर्णपणे असमर्थनीय होते, असा निष्कर्ष चौकशी-समितीने नमूद केला. ह्या बेकायदेशीर पाशवी कृत्याची संपूर्ण माहिती असूनही डग्लसने त्या गैरकृत्याची यत्किंचितही दखल घेतली नाही. किंबहुना क्रांतिकारकांना चांगला धडा मिळावा, असाच विचार त्याच्या मनात आला.

वरील प्रकाराने क्रांतिकारकांची मने त्वेषाने सळसळू लागली. डग्लसचा काटा काढण्याची संधी ते पाहू लागले. '' ' डग्लस, तू बेगुमानपणे

लोकांचे प्राण घेत आहेस. पण वैऱ्याची रात्र आहे, सावध राहा!' अशा अर्थाची धमकीची निनावी पत्रे त्याला येत असत. त्यामुळे आपण सदोदित मृत्यूच्या सावलीत वावरत आहोत, ह्या भीतीने त्याला पछाडले होते. जिल्हाधिकारी म्हणून त्याला निरनिराळ्या सभांना जावे लागे. अशा प्रत्येक वेळी त्याच्याभोवती हत्यारबंद शरीर-संरक्षक असत. परंतु मृत्यूच्या झडपेला संरक्षकांची फळी थोडीच अडवू शकणार आहे? सर्पाच्या दंशापासून सुरक्षितता मिळवू पाहू शकणाऱ्या परीक्षित राजाला बोराच्या उदरातून अळीच्या रूपाने प्रवेश करणाऱ्या सर्पाने शेवटी गाठलेच की नाही?

जिल्हा मंडळाचा (डिस्ट्रिक्ट बोर्ड) अध्यक्ष असल्यामुळे डग्लस त्या मंडळाच्या सभेसाठी गेला. दि. ३०-४-१९३२ रोजी तिसऱ्या प्रहरच्या सुमारास सभेचे कामकाज आटोपत आले होते. पुढील मेजावरील काही कागदपत्रांवर डग्लस सह्या करीत होता. सभेतील मंडळी आपसात चर्चा करीत होती. त्या परिस्थितीचा फायदा घेऊन दोन तरुण डग्लसच्या दिशेने झटकन पुढे गेले व स्वतःजवळच्या पिस्तुलांतून त्यांनी डग्लसवर गोळ्या झाडल्या. सारे सभागृह पिस्तुलांच्या बारांनी दणाणून गेले. ह्या अनपेक्षित भयंकर प्रकाराने सभागृहातील लोक भीतीने भांबावून गेले. ते तरुण क्षणार्धात सभागृहाबाहेर पडून रस्त्याने पळू लागले. पोलीस त्यांचा पाठलाग करू लागले. पुढे त्या मुख्य रस्त्याला दोन फाटे फुटत होते. एका रस्त्याने एक व दुसऱ्या वाटेने दुसरा तरुण गेला. संध्याकाळचा अंधार पडू लागला होता. एका वाटेने गेलेला तरुण दमला होता. पाठीवर पोलीस येतच होते. अंधाराचा आडोसा घेऊन तो तरुण थोड्या अंतरावरील झोपड्यांत शिरला. पोलीस तेथे पोहचले. त्यांनी झोपड्यांवर गोळीबार सुरू केला. आता तेथे थांबणे असुरक्षित वाटू लागल्यामुळे झोपडीचे कूड पाडून मागील बाजूने तो अंधारात पळू लागला. परंतु दुर्दैवाने त्याला ठोंग मारली. निवडुंगाला अडखळून तो खाली पडला. अंगात निवडुंगाचे काटे घुसले. त्याला पळताना पाहून पोलिसांनी त्याच्या रोखाने गोळ्या झाडल्या. एक गोळी त्याच्या अंगात घुसली, पोलिसांनी त्याला पकडून नेले. त्याच्यावर दवाखान्यात उपचार करण्यात आले. तुरुंगात असताना पोलीस अधिकाऱ्यांनी त्याचे अनन्वित हाल केले. परंतु त्याने आपल्या जोडीदाराचे नाव शेवटपर्यंत सांगितले नाही.

त्यामुळे त्याचा ठावठिकाणा सरकारला लागू शकला नाही व त्या शूर तरुणाचे नाव इतिहासालाही अवगत नाही.

पकडलेल्या तरुणाचे नाव होते प्रद्योतकुमार भट्टाचार्य. एक महाविद्यालयीन विद्यार्थी. आपल्या जोडीदाराचे नाव प्रकट करण्यासाठी पोलिसांनी त्याचे अनन्वित हाल केले. परंतु त्याने खरे नाव अथवा खरा पत्ता सांगितला नाही. प्रद्योतकुमाराजवळ असलेल्या रिव्हॉल्व्हरची तपासणी करता असे आढळून आले की, डग्लसचा बळी घेणाऱ्या गोळ्या ह्या रिव्हॉल्व्हरच्या नसून त्याच्या जोडीदाराच्या रिव्हॉल्व्हरच्या होत्या. त्याचा तपास लावून देणारास सरकारने पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. परंतु त्याचा तपास लागू शकला नाही. डग्लसला ठार मारण्याच्या आरोपावरून प्रद्योतकुमारवर खटला चालून त्याला फाशीची सजा देण्यात आली व दि. १२ जाने. १९३३ ला मिदनापूर कारागृहात त्याला फाशी देण्यात आले.

अध्याय तिसरा. पेडी गेला, डग्लस गेला आता पाळी आली बर्जवर. डग्लसनंतर बर्ज ह्या इसमाची जिल्हाअधिकारी म्हणून मिदनापूर येथे नेमणूक झाली. ह्या सुमारास महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग, करबंदी हया चळवळींनी भारत देश हादरून गेला होता. बंगल्यातही सरकारी कर न देण्याची मोहीम सुरू झाली होती. ब्रिटिश साम्राज्याची इभ्रत सांभाळणाऱ्या बर्जसारख्या जुलमी अधिकाऱ्यांनी ती चळवळ टाचेखाली चिरडून टाकण्याचा चंग बांधला होता. त्यामुळे क्रांतिकारक हया बळीचा वेध घेत होते. परंतु बर्जभोवती पोलिसी संरक्षणाचे अभेद्य कडे रात्रंदिवस असल्यामुळे क्रांतिकारक आपले ईप्सित साध्य करण्याच्या संधीसाठी डोळ्यांत तेल घालून टपून बसले. एक दोनदा तो योग थोडक्यावरून हुकला.

बर्जला फूटबॉल खेळण्याचा चांगलाच नाद होता. दि. २ सप्टेंबर १९३३ रोजी सरकारी अधिकाऱ्यांचा संघ व स्थानिक मुस्लिम संघ यांच्यात फूटबॉलचा सामना घेण्याचे ठरले. सरकारी अधिकाऱ्यांच्या संघाचे नेतृत्व स्वतः बर्जच करणार होता. पाळावर असलेल्या क्रांतिकारक तरुणांना ह्या गोष्टीचा सुगावा लागला. मृगेंद्रकुमार दत्त, निर्मलजीवन घोष, अनंत बंधु पंजा, ब्रिजकिशोर चक्रवर्ती व रामकृष्ण रे हे तरुण होते. आपल्या साध्यासाठी कलकत्त्याहून हत्यारे आणिली होती. मिदनापूरजवळच्या अरण्यातील एका

ओसाड पडक्या घरात त्यांनी ती ठेवली होती. त्या निर्मनुष्य भागात त्यांनी नेमबाजीचा सराव केला होता.

सामन्याच्या आदल्या दिवशी त्यांनी कामाची वाटणी करून घेतली. सामन्याच्या वेळेपूर्वी मुस्लिम संघातील काही खेळाडू क्रीडांगणावर सराव म्हणून फूटबॉल उडवीत होते. मृगेंद्रकुमार दत्त व अनंत बंधू त्या खेळाडूंत मिसळून चेंडू उडवीत होते. थोड्याच वेळात बर्जची गाडी क्रीडांगणाच्या दिशेने येऊ लागली. गाडीत बर्जे असल्याचे पाहून रस्त्यावर उभ्या असलेल्या निर्मलजीवनने परवलीच्या ठरलेल्या खुणेप्रमाणे आपल्या अंगातील हिरवा स्वेटर काढून हातात घेतला. तो इशारा पाहून मृगेंद्राने चेंडू इतर खेळाडूंकडे मारला व तो क्रीडांगणाच्या बाहेर जाऊ लागला. जाता जाता त्याने अनंत बंधूला ‘ रेडी ’ (तयार रहा) असा इशारा दिला. बर्जची गाडी क्रीडांगणाच्या सीमेजवळ येऊन उभी राहिली. बर्ज गाडीतून उतरून क्रीडांगणाकडे जाऊ लागला. त्याचे शरीर-संरक्षक क्रीडांगणाच्या सीमेबाहेर उभे राहिले होते. मृगेंद्र व अनंता फूटबॉल सोडून क्रीडांगणाच्या बाहेर परंतु बर्जच्या दिशेने जाऊ लागले. इतर सराव करणारे खेळाडूही क्रीडांगणाच्या बाहेर जाऊ लागले. हे तरुण, खेळाडूंपैकीच असावेत असे समजून कोणालाच त्यांचा संशय येणे शक्य नव्हते. बर्जजवळून जाताच त्या दोघांनी कपड्यातून आपले पिस्तुल काढून बर्जवर भराभर गोळ्या झाडल्या. बर्ज तात्काळ जमिनीवर कोसळला. ते पाहाताच पोलीस अधिकारी व शरीर संरक्षक त्या दोघांवर धावून गेले. त्यांनी झाडलेल्या गोळ्यांमुळे अनंत बंधू जागच्या जागी ठार झाला व मृगेंद्रकुमारला लागलेल्या गोळ्यांमुळे तो दुसऱ्या दिवशी ठार झाला.

पोलिसांनी लगेच क्रीडांगणाच्या भागाला वेढा देऊन धरपकड सुरू केली. निर्मलजीवन घोष, रामकृष्ण रे, ब्रिजकिशोर चक्रवर्ती इत्यादी तेरा तरुणांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. ह्या तिघांना फाशीची शिक्षा झाली. काहींना काळ्या पाण्याची शिक्षा झाली वरिष्ठ न्यायालयानेही त्या शिक्षा कायम केल्या.

दि. २५–१०–१९३४ ला ब्रिजकिशोर व रामकृष्ण यांना दुसऱ्या दिवशी निर्मलजीवनला मिदनापूरच्या कारागृहात फाशी देण्यात आले. स्वातंत्र्यासाठी मृत्यूबरोबर खेळ खेळणारी ही मुले सतरा-अठरा वर्षे वयाचे महाविद्यालयीन विद्यार्थी होते.

* * *

३७. हे घे पाणी

(हरिपाद भट्टाचार्य)

सूर्यसेनांच्या नेतृत्वाखाली बंगाली तरुण क्रान्तिकारकांनी चितगावच्या लष्करी शस्त्रागारावर हल्ला करून तेथील शस्त्रे लुटून नेली. त्यानंतर ब्रिटिश लष्कराने क्रान्तिकारक ज्या जलालाबादच्या जंगलातील टेकड्यांवर आश्रयाला गेले होते, त्या टेकड्यांना वेढा दिला. झालेल्या चकमकीत क्रान्तिकारकांनी ब्रिटिश लष्कराचा पराभव केला. त्यामुळे सरकार अधिकच चिडले. चितगाव भागात सरकारने लष्कर ठेविले. लोकांना वठणीवर आणण्यासाठी अहसानुल्ला नावाच्या क्रूर, अहंमन्य व मगरूर अधिकाऱ्याची चितगावला पोलीस-प्रमुख (डी. एस. पी.) म्हणून नेमणूक केली.

अहसानुल्लाला जुलुमी ब्रिटिश सरकारने प्रोत्साहन दिल्यामुळे त्याच्या जुलमी वागणुकीला पारावार उरला नाही. तो एकदा चितगावात रस्त्याने जात असताना एका घराच्या दारात बसून पुष्पाराणी घोष नावाची मुलगी 'दुर्गमगिरी कान्तारमरू' ही राष्ट्रीय कवी नजरुल इस्लामची देशभक्तिपर कविता म्हणत होती. अहसानुल्लाने ते ऐकले. ब्रिटिशांच्या गुलामगिरीत आनंद मानणाऱ्या अहसानुल्लाला ती देशभक्तिपर कविता कशी रुचावी ! त्याचे पित्त भडकले. त्याने रागाने त्या मुलीला घराबाहेर ओढले व रक्तबंबाळ होईपर्यंत बुटाच्या लाथेने मारले. झाडाच्या डहाळीवर बसून स्वच्छंदपणे गाणे गाणाऱ्या निरागस पाखराची अवचितपणे एखाद्या निर्दय पारध्याने निर्घृणपणे मान मुरगळावी, तसे हृदयद्रावक दृश्य होते ते. अंबिकाचरण भट्टाचार्यांचा पंधरा वर्षांचा मुलगा हरिपाद ह्याने तो सर्व प्रकार पाहिला. अहसानुल्लाला प्रतिकार करणाऱ्या पुष्पलताच्या घरातील माणसांनाही पोलिसांनी बेदम मारले. त्या मारहाणीमुळे पुष्पलता मरण पावली.

अहसानुल्लाच्या दुष्टाव्याची व नीचपणाची आणखी एक घटना हरिपादने पाहिली. शाळेत जाताना रस्त्याच्या चौकात गर्दी जमलेली हरिपादने पाहिली. काय आहे हे पाहाण्यासाठी तो तेथे गेला. अंबिकाचरण चक्रवर्ती नावाच्या क्रान्तिकारक कैद्याला पोलीस भरचौकात पाठीवर निष्ठुरपणाने

चाबकाचे फटकारे ओढीत होते. चाबकाच्या फटकाऱ्यागणिक त्याच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. भरउन्हाची वेळ व असह्य यातना ह्यांमुळे त्या कैद्याचा जीव कासावीस झाला होता. त्याच्या तोंडाला कोरड पडली होती. ' पाणी, पाणी ' असे तो ओरडत होता. जवळच उभा असलेला अहसानुल्ला विकट हास्य करीत त्याच्याजवळ गेला. त्याच्या तोंडात लघवी करीत तो क्रूरात्मा अहसानुल्ला म्हणाला, ' हे घे पाणी. '

ह्या प्रसंग पाहून हरिपादच्या कोवळ्या मेंदूला इंगळीनें दंश केल्याप्रमाणे असह्य वेदना झाल्या. ह्या गोष्टीचा बदला घेण्याचा त्याने निश्चय केला तो तरुण क्रांतिकारकांच्या गोटात शिरला व त्यांच्याजवळ पिस्तुलाची नेमबाजी शिकला. पूर्ण तयारी झाल्यावर तो संधीची वाट पाहू लागला आणि एके दिवशी तशी संधी त्याला दिसू लागली. त्या दिवशी पोलिसांचा संघ व गावातील कोहिनूर संघ ह्यांच्यात फूटबॉलचा सामना होणार होता. त्या ठिकाणी आपले ईप्सित साध्य करण्याचे हरिपादने ठरविले. सूर्यसेन व तारकेश्वर दस्तीदार ह्यांनी त्याच्या कमरेला एक भरलेले रिव्हॉल्व्हर (पिस्तुल) लटकाविले व काही काडतुसे त्याच्या खिशात घातली. त्याच्या अंगावरून खेडवळासारखा फाटकातुटका पोषाख चढविला. त्याच्या हातात एक फाटकी जुनीपुराणी छत्री दिली. हरिपादचे बावळट सोंग इतक्या बेमालूमपणे सजविले होते की, कुणालाही त्याचा संशय येऊ नये.

हरिपादने आईला नमस्कार केला. ' विजयी हो ! ' असा आशीर्वाद तिने दिला. सूर्यसेन व तारकेश्वर दस्तीदार ह्यांच्या समवेत हरिपाद रस्ता चालू लागला. देवीच्या देवळातात जाऊन त्याने सुरीने स्वतःच्या बोटाचा छेद घेऊन ते रक्त देवीच्या चरणी वाहिले देवीला, नमस्कार करून व तिचा आशीर्वाद मागून तो फूटबॉलच्या सामन्याच्या क्रीडांगणाकडे निघाला. सामना पाहाण्यास लोकांची खूप गर्दी लोटली होती. पोलिसांचा संघ खेळणार असल्यामुळे अहसानुल्ला खेळ पाहाण्यास आला होता. मोडकी छत्री हातात घेतलेला, बावळटाप्रमाणे पोषाख केलेला हरिपाद त्या गर्दीत घुसून अहसानुल्ला बसलेल्या जागेपासून काही अंतरावर संधीची वाट पाहात माणसांच्या दाटीत उभा राहीला. क्रांतिकारकांच्या हल्ल्यामुळे अधिकारी लोक संरक्षणाबद्दल अधिक जागरूक राहू लागले होते. अहसानुल्ला हा जिल्ह्याचा मुख्य पोलीस अधि-

कारी असल्यामुळे तो ज्या ठिकाणी बसला होता त्या ठिकाणाभोवती हत्यारी पोलीस संरक्षकांचे कडे होते त्यांच्या नजरा सभोवताली भिरभिरत होत्या. त्यामुळे हरिपादला अनुकूल संधी मिळेना. त्या दिवशी सामना अनिर्णीत राहिला. दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी तो सामना परत होणार होता.

त्या दिवशी म्हणजे दि. ३० ऑगस्ट १९३१ रोजी हरिपाद तयारीनिशी क्रीडांगणावर गेला. आदल्या दिवसाप्रमाणे त्याने मोक्याची जागा मिळविली. खेळाला रंग भरू लागला. सर्व प्रेक्षक देहभान हरपून सामन्यात रंगून गेले आणि शेवटी पोलिसांच्या संघाने गोल हाणला. कोहिनूर संघाचा पराभव झाला. स्वतःचा संघ विजयी झाल्यामुळे अहसानुल्ला आनंदाने आरोळ्या देत खेळाडूकडे जाऊ लागला. विजयाच्या जल्लोषात त्याच्या-भोवतालचे पोलीस संरक्षकही सामील झाले. संरक्षकांची ती ढिलाई पाहून हरिपाद पुढे धावला. खिशातील पिस्तूल काढून त्याने तीन-चार हात अंतरावरून अहसानुल्लावर गोळ्या झाडल्या. अहसानुल्ला जमिनीवर कोसळला. मरणाचे क्षण मोजणाऱ्या अहसानुल्लाजवळ जाऊन हरिपाद तिरस्काराने म्हणाला, “ स्वातंत्र्यवीरांच्या तहानलेल्या तोंडात लघवी करणाऱ्या सैताना, खा आता ही गोळी ! ”

हरिपादला पकडण्यात आले. अहसानुल्लाची बायको व पोलीस ह्यांनी त्याला बेदम मारले. त्याचे अतोनात हाल केले. परंतु त्याने आपल्या क्रांतिकारक सहकाऱ्यांची नावे सांगितली नाहीत. पोलिसांनी त्याच्या लहान भावास बुटांच्या लाथांखाली ठेचून ठार मारले व त्याचे घर पेटवून दिले. वय लहान असल्यामुळे हरिपादला फाशीऐवजी काळ्या पाण्यावर पाठविण्यात आले.


हरिपादसारख्या काळेपाणी पाहाणाऱ्या छोट्या छोट्या वीरांनी देखील इतिहासाचे पान उज्ज्वल केले आहे !

* * *

३८. ते तीन मित्र

(विनय बोस, सुधीर गुप्त, दिनेश गुप्त)

महात्मा गांधीजींनी इ. स. १९३० साली कायदेभंगाची मोहीम सुरू केली. मोहिमेत भाग घेणाऱ्या निःशस्त्र सत्याग्रहींवर सरकारने लाठीहल्ले केले व घोडेस्वार घातले. सत्याग्रही सैनिकांवर सरकार करीत असलेल्या निर्घृण हल्ल्यांमुळे बंगाली तरुण सूर्यसेनांच्या नेतृत्वाखाली सशस्त्र क्रान्तीच्या



मार्गाला लागले. हिंदुस्थान रिपब्लिक (प्रजासत्ताक) आर्मी (सेना), बंगाल स्वयंसेवक संघ अशासारख्या गुप्त संघटना शाळाकॉलेजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना पोहणे, तरवार फिरविणे, पिस्तुल व बंदूक चालविणे असले शिक्षण देऊ लागल्या. इंग्रजांच्या जुलमाने तरुण-तरुणींची मस्तके सूडाच्या भावनेने पेटली. इंग्रजी राजवट खिळखिळी करण्याच्या उद्देशाने त्या राजवटीचे आधारस्तंभ अशा मोठमोठ्या हुद्द्यांवरील ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार मारण्याचा सपाटा त्यांनी चालविला.

विनय बोस, सुधीर गुप्त बादल व दिनेश गुप्त हे तिघे मित्र होते. ते महाविद्यालयातील विद्यार्थी असून बंगाल स्वयंसेवक संघ, ढाका ह्या गुप्त क्रांतिकारी संघटनेचे सभासद होते.

२९ ऑगस्ट १९३० रोजी महा पोलीस निरीक्षक लोमन (इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस) हे हॉस्पिटलला भेट देण्यासाठी जात होते. पोलीस अधीक्षक (डी. एस. पी.) हडसन त्यांच्यासमवेत होते. बरोबर आणखी अधिकारी व पोलीस होते. इतक्यात एका तरुणाने लोमन व हडसनवर

पिस्तुलाने गोळ्या झाडल्या. लोमन खाली कोसळला व पुढे मरण पावला. हडसनच्या पायाला गोळी लागल्यामुळे तो वाचला. गोळ्या झाडणारा तो तरुण विजेच्या वेगाने पळून गेला. पोलिसांनी खूप धावपळ केली, परंतु तो सापडला नाही. तो तरुण विनय बोस असावा, असा पोलिसांचा संशय होता. तथापि विनय बोस त्यांना सापडू शकला नाही.



त्यानंतर दि. ८ डिसेंबर १९३० चा दिवस. बंगालच्या गव्हर्नरच्या बंगल्याशेजारी डलहौसी चौकात सचिवालयाची इमारत होती. त्या इमारतीचे नाव रायटर्स बिल्डिंग असे होते. तेथे निरनिराळ्या खात्यांतील वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या होत्या. दुपारी बारा-साडेबारा वाजण्याच्या सुमार. इंग्रजी पद्धतीचा पोषाख केलेले तीन तरुण रायटर्स बिल्डिंग-मध्ये गेले. प्रथम ते तुरुंग खात्याचे मुख्य निरीक्षक सिम्पसन यांच्या कचेरीपुढे गेले. साहेबाला भेटण्या-साठी चिठी द्या, असे दरवाजा-जवळच्या चपराशाने त्यांना सांगितले. परंतु त्याच्या सांगण्या-कडे लक्ष न देता ते आत घुसले. त्यांनी सिम्पसनवर पिस्तुलाने गोळ्या झाडल्या. सिम्पसन तात्काळ खाली कोसळला. नंतर ते मुख्य सचिव टाऊनशेन्ड व न्यायखात्याचे सचिव नेल्सन यांच्या कार्यालयात



शिरले व त्यांनी त्या दोघांवर गोळीबार केला. तेथे असलेल्या पहारेकऱ्यांनी त्या तिघांवर गोळ्या झाडल्या. पिस्तुलांच्या गोळीबाराने रायटर्स बिल्डिंग दणाणून गेली. एकच धावपळ झाली. ही बातमी पोलीस ठाण्यावर पोचून पोलीस अधिकारी तेथे आले. त्या वेळी सुधीर गुप्त व्हरांड्यातील एका खुर्चीवर पडला होता. त्याने टेबलावर डोके टेकले होते. आपण आता सुरक्षितपणे येथून सुटत नाही, असे पाहून त्याने विषाची पुडी खाल्ली. शिवाय पहारेकऱ्याची एक गोळी त्याच्या मानेत घुसली होती. थोड्याच वेळाने तो तेथेच मरण पावला. त्याच्या खिशात तिरंगी झेंडा सापडला. विनय बोस व दिनेश गुप्त टेबलाखाली लपून गोळ्या झाडीत होते. जवळच्या गोळ्या संपल्यामुळे त्यांचा गोळीबार थांबला. पोलिसांनी त्यांच्यावर झाडलेल्या गोळ्यांमुळे ते रक्तबंबाळ झाले होते. त्यांना दवाखान्यात नेण्यात आले. तेथे दोन दिवसांनी विजय बोस मरण पावला. आपणच पोलीस महानिरीक्षक लोमन यांना ठार मारल्याचे मरण्यापूर्वी त्याने कबूल केले. दिनेश गुप्ताच्या जखमा काही दिवसांनी उपचाराने बऱ्या झाल्या. त्यांच्यावर खटला चालून त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. ७-८-१९३१ रोजी त्याला फाशी देण्यात आले.

देशप्रेमाने उत्स्फूर्त झालेल्या कोवळ्या वयाच्या ह्या बेडर तरुणांनी ध्येयासाठी स्वतःच्या प्राणांची कुर्बानी केली. त्यांच्या वीरोचित कृत्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ जनतेने आता त्या चौकाचे नाव ‘ डलहौसीस्क्वेअर ’ ऐवजी ‘ विनय, बादल, दिनेश चौक ’ ठेवले.

* * *

३९. वादळ आणि विजा

(शांती घोष, सुनीती चौधरी, वीणा दास, कल्पना दत्त, सुहासिनी देवी व उज्ज्वला)

हिमालयाच्या कन्या ज्या भूमीतून वाहात जाऊन बंगालच्या सागराला मिळतात ती भूमी म्हणजे सोनेरी वंगभूमी. सोनेरी रंगाची सुपीक माती व जलवाहिन्यांचे जाळे, ह्यामुळे बंगालची भूमी सदैव धनधान्याच्या व वनश्रीच्या हिरण्य-श्यामल रंगाने नटलेली दिसते. तथापि ह्या शस्य-श्यामल भूमीवर सागर-लाटांच्या कल्लोळात व हातातील विजेचे आसूड कडाडीत वादळवाऱ्याच्या वेताळाने धिंगाणा घातला नाही, असे वर्ष काही सुने जात नाही. निसर्गाचा हा लहरी चंचलपणा व तल्लखपणा वंगभूमीच्या संतानांच्या जडणी-घडणीतही प्रतिबिंबित झाला आहे, असे वाटते. वादळाचा उन्मेष व विजेची आग यांच्या मुशीतून बंगाली बालकांची मने ओतून काढली असावीत. बंगाली युवक-युवतींनी बेभानपणे भारताच्या स्वातंत्र्यसमरात झोकून दिलेल्या जीवनांवरून असे वाटू लागते. बंगाली युवकांनी गाजविलेल्या शौर्याच्या काही कथा ह्या पुस्तकात दिलेल्या आहेत. ज्यांच्या कर्तृत्वाने भारताच्या इतिहासाची पाने उजळून निघाली. अशा काही बंगाली युवतींच्या शौर्यशाली कथा पुढे वर्णिल्या आहेत. बंगालमधील त्या वेळच्या वादळात चमकून गेलेल्या जणु विजाच !

१

दोन भाबड्या मुली

कुमिल्ला हा चित्तगावच्या शेजारचा जिल्हा. स्टीव्हन्स नावाचा इंग्रज डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट कुमिल्ला येथे बदलून आला होता. तो स्वभावाने फार घमेंडखोर व क्रूर होता. चित्तगाव जिल्हयात सूर्यसेन मास्तरदा व त्यांचे सहकारी यांनी सरकारी शस्त्रागारे व सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले करून सरकारला भांबावून सोडले होते. क्रांतिकारकांच्या कृतींनी बंगालात जणू वादळ उठविले होते. क्रांतिकारकांना चित्तगावमध्ये जसा धुमाकूळ घातला आहे, तसा आपल्या जिल्हयात घालू नये म्हणून स्टीव्हन्स साहेबाने कुमिल्ला शहरात लष्करी अमल सुरू केला. प्रत्येक माणसाने स्वतःचे ओळखपत्र जवळ ठेवून बाहेर

फिरले पाहिजे, असा हुकूम त्याने काढला. त्याचा बंगला पोलीसलाईनजवळ असून बंगल्याभोवती काटेरी तारांचे दुहेरी कुंपण असून फाटकाजवळ रात्रंदिवस बंदुकधारी पोलिसांचा पहारा होता. स्टीव्हन्ससाहेब वरून जरी घमेंड व बेफिकीरपणा दाखवीत असला तरी अंतर्यामी तो क्रांतिकारकांना भीत असे. त्याने क्रांतिकारकांचा इतका धसका घेतला होता की, तो चुकूनसुद्धा बंगल्याच्या गच्चीवर फिरकत नसे अथवा बंगल्याच्या आवारातील बागेत फिरत नसे. क्रांतिकारकाबद्दल वाटणारी ही भीती त्याने मद्रास येथे कमिशनर असलेल्या स्वतःच्या भावास पत्रातून कळविली होती.

१४ डिसेंबर १९३१ ची सकाळ सुमारे दहा साडेदहा वाजण्याची वेळ. स्टीव्हन्सच्या बंगल्याजवळ दोन मुलींना उतरून देऊन एक घोडागाडी निघून



सुनीती चौधरी शांती घोष

गेली. त्या मुलींनी साड्या परिधान केल्या होत्या. फैजुन्निसा कन्या शाळेतील नवव्या इयत्तेत त्या शिकत होत्या. एकीचे नाव होते शांता घोष. शांतीचा जन्म इ. स. १९१६ साली झाला. तिचे वडील कुमिल्ला येथे महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यांचे मूळ गाव बारीसाल. परंतु नोकरीनिमित्त ते कुमिल्ल्याला आले होते दुसऱ्या मुलीचे नाव सुनीती चौधरी असून ती तिपेरा गावची होती. तिचा जन्म १९१७ साली झाला. शिक्षणासाठी ती कुमिल्ला (कोमिल्ला)

येथे आली होती. शाळा-कॉलेजात शिकत असलेल्या काही भावनाप्रधान मुला-मुलींची मने क्रान्तिकारांच्या शौर्याने भारावून गेली होती. आपणही देशाच्या स्वातंत्र्यासाठी काही तरी केलेच पाहिजे, अशी ओढ त्यांच्या मनाला लागली. त्यामुळे ते गुप्त संघटनात सामील होऊन हत्यारे चालविण्याचे व बॉम्बविद्येचे शिक्षण घेऊ लागले. क्रान्तिकारी विचारांच्या अशा युवतींनी कुमिल्ला येथे ‘ छत्री संघ ’ नावाची संस्था काढली होती. ह्या गुप्त संस्थेत जाणाऱ्या मुलींना बंदूक उडाविणे, पिस्तुलाची नेमबाजी, तरवार व जंबिया यांचे हात फिरविणे अशा विद्या शिकविल्या जात असत. शांती घोष व सुनीती चौधरी ह्या दोघींनीही ‘ छत्री संघात ’ हत्यारे चालविण्याचे शिक्षण घेतले होते. शस्त्रविद्येत तरबेज झालेल्या त्या दोन मुलींना क्रान्तिकारकांनी घोड्याच्या गाडीतून स्टीव्हन्सच्या बंगल्याजवळ सोडून ते निघून गेले


चौदा-पंधरा वर्षे वयाच्या त्या दोन शाळकरी मुली स्टीव्हन्सच्या बंगल्याच्या फाटकावरच्या पोलीस चौकीवर गेल्या. साहेबांना भेटण्याची इच्छा त्यांनी प्रगट केली. पहारेकऱ्यांनी त्यांची विनंती धुडकावून लाविली. परंतु साहेबांची गाठ घेण्यासंबंधाने त्या मुली काकुळतीने फारच गयावया करू लागल्या. आपल्या कामासंबंधीचा अर्ज त्यांनी पहारा करणाऱ्या अधिकाऱ्याला दाखविला. कुमिल्ला शहराजवळच्या समुद्राच्या खाडीत मुलींच्या पोहण्याच्या शर्यती होणार होत्या. शर्यतींच्या वेळात तिकडे जहाजे, होड्या इत्यादींची वर्दळ होऊन शर्यतींना व्यत्यय येऊ नये, असा बंदोबस्त व्हावा, अशी त्यांच्या अर्जात मागणी होती. मुलींचा भाबडा भाव, त्यांचे लहान वय व अर्जात दर्शविलेले काम ह्यामुळे पहारेकरी अधिकाऱ्याने त्यांना फाटकातून आत सोडले.

त्या बंगल्याच्या व्हराड्यात गेल्या. स्टीव्हन्सने खिडकीतूनच त्याचा अर्ज घेतला व वाचला.

“ हे काम जिल्हा पोलीस प्रमुखांचे आहे, तेव्हा अर्ज घेऊन तुम्ही त्यांच्याकडे जा. ” स्टीव्हन्सने त्यांना सुचविले.

“ महाराज, पोलीस प्रमुखांच्यासाठी आपण कृपा करून तसा शेरा मारला तर आमच्यावर आपले उपकार होतील. एरव्ही पोलीस अधिकाऱ्यापाशी आमची काय दाद लागणार ? ”

मुलींचा भाबडा भाव व त्यांच्या आग्रहातून व्यक्त होणारी अगतिकता पाहून स्टीव्हन्स बंगल्याच्या आतून व्हरांडयात आला. तेथील टेबलावर मुलींचा अर्ज ठेवून तो त्याच्यावर शेरा लिहू लागला व शांतीशी बोलत होता. तेवढयात सुनीतीने साडीतून पिस्तूल काढून स्टीव्हन्सवर गोळ्या



झाडल्या लगेच शांतीनेही स्वतःच्या साडीत दडवलेले पिस्तूल काढून स्टीव्हन्सवर गोळ्या झाडल्या. स्टीव्हन्स जमिनीवर कोसळला. पिस्तुलाचे आवाज ऐकून बंगल्यातील पट्टेवाले व पहाऱ्यावरील शिपाई धावत तेथे आले. त्या दोन मुलींना त्यांनी यथेच्छ चोपले. परंतु त्या माराचे त्यांना दुःख वाटले नाही. कर्तव्य-पूर्तीचा आनंद त्यांच्या मनात ओसंडत होता. आपल्या सहकाऱ्यांची नावे त्यांनी सांगितली नाहीत.

त्यांच्यावर खटला भरण्यात आला. खटल्याच्या कामकाजात त्यांनी मुळीच भाग घेतला नाही. त्यांची वये लक्षात घेऊन न्यायाधिशाने त्यांना फाशीऐवजी काळया पाण्याची शिक्षा दिली.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी व अन्य थोर पुढारी यांनी राजकीय बंद्यांच्या सुटकेसाठी केलेल्या प्रयत्नांना यश येऊन इ. १९३९ साली त्यांचीही सुटका झाली. त्यानंतर पुढे वैद्यकीय महाविद्यालयात अभ्यास करून

सुनीती चौधरी डॉक्टर झाली. शांती घोषने वाङ्मयाचा अभ्यास केला व नंतर ती राजकीय क्षेत्रात उतरून बंगाल विधिमंडळाची सभासद (आमदार) झाली.

२

पदवीदानसमारंभात गव्हर्नरवर गोळी



वीणा दास ही कलकत्याच्या बेथुन महाविद्यालयात शिकत होती. तिचा जन्म १९११ साली झाला. वडील वेणी माधवदास हे सरकारी संस्कृत विद्यालयाचे मुख्याध्यपक होते. सन १९२८ साली सायमन कमिशनने कलकत्त्यास भेट दिली, त्याच वेळी वीणा दास हिने राजकीय क्षेत्रात पहिले पाऊल टाकले. बेथुन महाविद्यालयावर पिकेटिंग करून तिने विद्यार्थ्यांना आत जाऊ दिले नाही. त्याच वर्षी पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या कलकत्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी तिने स्वयंसेविका म्हणून काम केले. छत्री संघाची ती सभासद होती. त्यामुळे गुप्तपणे कार्य करणाऱ्या क्रांतिकारकांशी तिचा संबंध आला. बी. ए. पास होऊन वीणा बी. टी. च्या महाविद्यालयात दाखल झाली होती. ६ फेब्रुवारी १९३२ रोजी विद्यापीठाचा पदवीदान समारंभ विद्यापीठाचे कुलगुरु बंगालचे गव्हर्नर यांच्या हस्ते होणार होता. त्या प्रसंगी वीणा तिची बी. ए.ची पदवी स्वीकारणार होती. त्या समारंभाच्या प्रसंगी वीणाने गव्हर्नरवर गोळ्या झाडाव्यात, असे तिच्या सहकाऱ्यांनी ठरविले. त्याप्रमाणे तिला रिव्हॉल्व्हर व काडतुसे पुरविण्यात आली.

ठरलेल्या वेळी वीणा जय्यत तयारीनिशी सभागृहात जाऊन बसली. गव्हर्नरसाहेब स्टन्ले जॅक्सन हे स्नातकांना (पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना) उद्देशून करावयाच्या भाषणासाठी उभे राहिले. तोच वीणा स्वतःच्या जागे-

वरून उठून पुढे गेली व तिने पिस्तुलातून गव्हर्नराच्या रोखाने गोळ्या झाडल्या. परंतु त्या सर्व चुकल्या. वीणाच्या साथीदारांनी तिला शस्त्रे पुरविली होती, परंतु शस्त्र चालविण्याचा पुरा सराव दिला नसल्यामुळे वीणाचे नेम चुकले.

वीणाला लगेच अटक करण्यात आली. 'दहशतवादाशिवाय अन्यायाची दाद लागत नाही म्हणून मी हे कृत्य केले.' असे तिने स्वतःच्या कृत्याचे समर्थन करताना न्यायालयात सांगितले. तिला नऊ वर्षांची शिक्षा झाली. तथापि सात वर्षे शिक्षा भोगल्यानंतर इतर राजकीय कैद्यांबरोबर १९३९ साली तिचीही सुटका झाली.

सन १९४६ मध्ये ती कलकत्त्याच्या विधान सभेवर आमदार म्हणून निवडून आली. परंतु राजकारणात पुढे पुढे गुंड लोक शिरू लागल्यामुळे राजकारणातील जनहितावरचा तिचा विश्वास उडाला व ती समाजसेवेकडे वळली. भारत-पाक फाळणीच्या वेळी नौखालीत झालेल्या जातीय दंगलीच्या दिवसांत तिने दुःखितांची सेवा केली. निराश्रितांना आश्रय दिला व त्यांचे पुनर्वसन करण्याचे महत्त्वाचे काम केले.

३

उडाणटप्पू मुलगी

चितगाव येथे सूर्यसेन मास्तरदा यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांनी



पोलीस व सैनिकी शस्त्रागारावर हल्ला केल्यानंतर सरकारी अधिकारी मुख्यता पोलीस खाते डोळ्यांत तेल घालून क्रांतिकारकांचा कसून शोध करू लागले. अशा दिवसात एके रात्री एक तरुण मुलगा संशयास्पद रीतीने जाताना पोलिसांना आढळला. अधिक चौकशीसाठी त्यांनी त्या तरुणाला पोलीस चौकीवर नेले. पोलिसांनी जेव्हा बारकाईने निरीक्षण केले. तेव्हा त्यांना असे आढळून आले

की तो तरुण म्हणजे पुरुषाचा पोषाख केलेली एक तरुणी होती. तिच्यावर खटला भरला, परंतु कोणताही आरोप नसल्याने रात्रीच्या भलत्या प्रहरी उंडाणटप्पूप्रमाणे भटकत असल्याबद्दल जामीन घेऊन त्या मुलीची सुटका झाली. ती मुलगी म्हणजे सूर्यसेन यांच्या सहकाऱ्यांपैकी एक होय. तिचे नाव कल्पना दत्त. सूर्यसेनांची गाठ घेऊन तरुणाचा पोषाख करून रात्री घरी जात असताना पोलिसांकडून ती वरीलप्रमाणे पकडली गेली.

कल्पना दत्त ही चितगावची राहाणारी. तिचा जन्म १९१३ साली झाला. हायस्कूलचे शिक्षण चितगावला झाले. त्या वेळी प्रीतिलता वाडेदार ही तिची सहाध्यायी होती. तेव्हापासूनच त्या दोघी क्रांतिकारकांच्या गुप्त संस्थेत सामील झाल्यावर शस्त्रे चालविण्याचे शिक्षण त्यांनी घेतले. १९२९ साली शालान्त परीक्षा पास झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ती कलकत्ता येथील बेथून महाविद्यायात प्रविष्ट झाली. बी. एस्सी. च्या वर्गात असताना सुहासिनी गांगुली ह्या मैत्रिणीमुळे तिची मास्तरदाशी ओळख झाली. त्यानंतर बॉम्ब बनविण्यासाठी लागणारे साहित्य घेऊन ती कलकत्त्याहून वारंवार चितगावला जाऊ लागली. ही गोष्ट पोलिसांच्या नजरेस आल्यामुळे तिला कलकत्ता सोडून चित्तगावला जावे लागले. तेथे असताना ती मास्तरदांकडे विचार-विनिमयासाठी जात असे. प्रीतिलता व कल्पना ह्या दोघींनी युरोपियन क्लबवर हल्ला करावा असे ठरविण्यात आले होते. परंतु सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे मास्तरदांना भेटून तरुणाच्या पोषाखात रात्री येत असता पोलिसांनी तिला पकडले. त्यामुळे प्रीतिलतेने एकटीनेच ती मोहीम पार पडली.

पोलिसांनी पकडल्यानंतर जामिनावर सुटल्यावर कल्पना भूमिगत झाली व मास्तरदा, तारकेश्वर दस्तीदार इत्यादी क्रान्तिकारकांबरोबर राहू लागली. सूर्यसेन मास्तरदा यांच्या शिरावर सरकारने दहा हजार रुपयांचे पारितोषिक लाविले होते. त्यामुळे एका फितुराने त्या बक्षिसाच्या लालचीने पोलिसांना त्यांचा पत्ता सांगितला. त्या घराला पोलिसांनी वेढा दिला. त्यातून सूर्यसेन, कल्पना दत्त व तारकेश्वर दस्तीदार निसटले. परंतु पळता पळता सूर्यसेन पकडले गेले. तारकेश्वर व कल्पना निसटले. काही दिवसांनंतर

सैन्याच्या एका तुकडीने त्या दोघांना पकडले. खटला उभा राहिला. तारकेश्वरला फाशीची शिक्षा झाली व कल्पनेला काळ्या पाण्याची.

१९३९ साली इतर राजकीय बंद्यांच्या समवेत कल्पना दत्त हिची सुटका झाली. त्यानंतर ती कम्युनिस्ट तत्त्वाकडे वळली.

४

सुहासिनी देवी



सुहासिनी गांगुली ही खुलन्याची राहणारी. तिचे हायस्कूलचे व महाविद्यालयीन शिक्षण डाक्का येथे झाले. शिक्षण चालू असतानाच ती क्रान्तिकारकांच्या गोटात शिरली. चितगावचे सरकारी शस्त्रागार लुटल्यानंतर काही क्रान्तिकारक कलकत्त्यास आश्रयास आले. कोणालाही संशय येऊ न देता त्यांची राहण्याची सोय करणे आवश्यक होते. म्हणून चंद्रनगर येथे एक घर भाड्याने घेऊन शशधर आचार्य ह्या क्रान्तिकारकाने गृहस्थाश्रमी यजमान बनावे असे ठरले. परंतु एक अडचण उभी राहिली. शशधरचे लग्न झाले नव्हते. म्हणून सुहासिनी गांगुलीने शशधरची पत्नी म्हणून त्या घरात वावरून ते नाटक वठवावे, असे ठरले. लोकनाथ बाळ आनंद गुप्त, अनंतसिंग व जीवन घोषाल हे चितगाव हल्ल्यातील क्रान्तिकारक पाहुणे बनले.

असे काही दिवस गेले कोणी तरी पोलिसांना खबर दिली. टेगार्ट या नावाच्या इंग्रज पोलीस अधिकाऱ्याने शिपायांसह त्या घराला वेढा दिला. झालेल्या गोळीबारात जीवन घोषाल गोळी लागून मरण पावला, टेगार्टने सुहासिनीच्या तोंडात मारली. तिच्या त्या तातपुरत्या 'पती'चेही खूप हाल केले. परंतु त्यांनी पोलिसांना काहीच माहिती दिली नाही. पुढे खटला चालून पाहुणे मंडळींना काळे पाण्याची शिक्षा झाली. शशधर व सुहासिनी गांगुली यांच्यावर आरोप सिद्ध न झाल्यामुळे त्यांना पुढे सोडून देण्यात आले.

५

उज्ज्वला

इंग्रजी साम्राज्यशाहीचे आधारस्तंभ असे मुलकी व पोलीस खात्याची



वरिष्ठ अधिकारी तरुण क्रांतिकारकांच्या डोळ्यांत सलत होते. त्यांचा काटा काढण्याची अहमहमिका क्रांतिकारकांत लागली होती. इंग्रजी शासनाच्या प्रांताचा मुख्य शासकच उडवून देऊन त्या सत्तेला भयचकित करून सोडण्याचा कट काही तरुण क्रांतिकारकांनी आखला.

दार्जिलिंग येथे गव्हर्नरच्या चषक घोड्यांच्या शर्यती होणार होत्या. त्यासाठी बंगालचा गव्हर्नर हॅंडरसन हा तेथे जाणार होता. ती संधी टिपण्यासाठी भवानीप्रसाद भट्टाचार्य व रवी बानर्जी हे दोघे दार्जिलिंग येथे एका विश्रांतिगृहात जाऊन राहिले होते. त्यानंतर घोड्यांच्या शर्यतीच्या तीन-चार दिवस अगोदर उज्ज्वला ही वीस वर्षांची मुलगी मनोरंजन बानर्जी ह्या सहकाऱ्यासमवेत येऊन दुसऱ्या एका विश्रांतिगृहात उतरली. तिने कलकत्त्याहून येताना आपल्याबरोबर लपवून आणलेली पिस्तुले भवानीप्रसाद व रवी बानर्जी ह्या सहकाऱ्यांजवळ दिली. शर्यतीच्या दोन दिवस आधी गव्हर्नर फुलांचे प्रदर्शन पाहाण्यास गेला होता. परंतु त्या ठिकाणी त्याच्या सभोवती कडेकोट बंदोबस्त असल्यामुळे उपरिनिर्दिष्ट क्रांतिकारकांना आपले ईप्सित साध्य करता आले नाही.

८ मे १९३४ रोजी घोड्यांची शर्यत होती. त्या दिवशी झकपक इंग्रजी पेहराव करून भवानीप्रसाद व रवी शर्यतीची वरच्या दर्जाची तिकिटे काढून मंडपात गेले. भरलेली पिस्तुले त्यांनी कोटाच्या खिशात ठेविली होती. गव्हर्नरच्या नियोजित बैठकीच्या मागील रांगेतील तिकिटे त्यांनी मिळविली होती. ते दोघे आपापल्या जागेवर बसलेले पहाताच त्यांना मंडपापर्यंत पोहोचवायला

आलेली उज्ज्वला व मनोरंजन बानर्जी हे सहकारी तेथून तडक रेल्वेस्टेशनकडे गेले व कलकत्त्यास जाणारी गाडी त्यांनी पकडली.

शर्यत संपली. गव्हर्नर, शर्यत जिंकणाऱ्या घोड्याला मानाचा चषक देण्यासाठी उभे राहिले. इतक्यात भवानीप्रसाद उभे राहून गव्हर्नरवर पिस्तुलातून गोळी झाडली. परंतु त्यांचा नेम चुकला. त्यांना व त्यांच्या साथीदाराला ताबडतोब पकडण्यात आले. 'आपण गव्हर्नरला ठार मारण्यासाठीच आलो होतो. तथापि गव्हर्नर ठार झाला नाही हे पाहून वाईट वाटते.' असा जबाब त्यांनी दिला.

गव्हर्नरवर गोळी झाडल्यानंतर पोलिसांची धावपळ सुरू झाली. खुनी तरुणाच्याबरोबर तांबडी साडी नेसलेली व जाड भिंगाचा चष्मा घातलेली मुलगी होती, असे कोणी तरी सांगितल्यावरून कलकत्त्यास जाणारी आगगाडी फोन करून एका स्टेशनवर थांबविण्यात आली. जाड भिंगाच्या चष्म्याच्या व तांबडी साडी नेसलेल्या तरुणीचा शोध पोलीस आगगाडीच्या डब्याडब्यातून करू लागले. परंतु अशी मुलगी त्यांना आढळली नाही. उज्ज्वला त्याच गाडीत होती. आगगाडीत चढण्यापूर्वी तिने कपडे बदलून लांब फ्रॉक घातला होता व चष्मा काढून ठेवला होता. ठरलेल्या खुणा न सापडल्यामुळे ती बचावली.

परंतु पुढे तिला कलकत्त्यात पकडण्यात आले. उज्ज्वला डाक्का येथील एका क्रांतिकारक जमीनदाराची मुलगी होती. वयाच्या चौदाव्या वर्षापासूनच वडील तिच्या लहान वयाचा फायदा घेऊन तिच्याकरवी हत्यारांची ने-आण करणे करीत असत. त्यामुळे लहान वयातच ती क्रांतिकार्याकडे वळली. १९३४ मध्ये ती मॅट्रिक झाली. कलकत्त्याला मैत्रिणीकडे जाते असे म्हणून ती कलकत्त्यास गेली व हत्यारे घेऊन दार्जिलिंगला गेली.

भवानीप्रसाद भट्टाचार्य व रवी बानर्जी यांना फाशीची व उज्ज्वलेला काळ्या पाण्याची शिक्षा झाली. १९३९ साली इतर कैद्यांबरोबर तिची सुटका झाली. त्यानंतर नौखालीच्या दंगलीच्या वेळी तिने संकटग्रस्तांना खूप मदत केली तिचे समाजसेवेचे काम अद्याप चालूच आहे.

* * *

४०. जालियनवाला बाग हत्याकांडाचा सूड


(सरदार उधमसिंग)

दि. १३ एप्रिल १९१९ चा दिवस. त्या दिवशी गुढी पाडव्याचा सण होता. पंजाबातील अमृतसर शहरात जत्रा भरली होती. त्या जत्रेसाठी जवळपासचे हजारो लोक अमृतसरला आले होते. बरेच लोक जमा झाले आहेत ही संधी साधून अमृतसर येथील जालियनवाला बाग या ठिकाणी एक सभा घेण्यात आली. जालियनवाला बाग ह्या ठिकाणी बागबगीचा नसून तेथे एक बखळवजा मोठे मैदान होते. त्या मैदानाभोवती तीन बाजूंनी घरे असून चौथ्या बाजूने पाच-सहा फूट उंचीची भिंत होती. त्या भिंतीत एक अरुंद वाट होती. अशा रीतीने त्या अरुंद वाटेखेरीज ते मैदान सर्व बाजूंनी बंदिस्त होते. त्याच जागेत सभा भरली. वीस-पंचवीस हजार लोकांचा समुदाय तेथे लोटला होता.

त्या वेळी सर मायकेल ओडवायर हा पंजाबचा गव्हर्नर होता. 'गदर' चळवळीच्या क्रांतिकारकांची धरपकड त्यानेच केली होती. क्रांतिकारकांच्या चळवळीमुळे तो हिंदी लोकांवर जळफळून होता. जालियनवाला-बागेत भरणाऱ्या सभेचे वृत्त ऐकून तो संतापला. हिंदी लोकांची चळवळ ठेचून काढली पाहिजे असे त्याने ठरविले. जनरल डायर ह्या लष्करी अधिकाऱ्याला त्याने ती सभा उधळून लावण्यास पाठविले.

जनरल डायर पन्नास शीख व गुरखा शिपायांची तुकडी व काही तोफा बरोबर घेऊन जालियनवाला बागेच्या तोंडाशी आला. त्या अरुंद वाटेच्या आत तोफा असलेल्या गाड्या जाऊ शकेनात. म्हणून डायरने ते शिपाई तेथे उभे केले व सभेच्या जमावावर बंदुकीने गोळ्या झाडण्याचा हुकूम केला. शिपायांच्या बंदुकीतून भराभर गोळ्या सुटू लागल्या. ध्यानीमनी नसताना असा अचानक हल्ला झाल्यामुळे लोक भांबावून गेले. पळापळी, रेटारेटी व हलकल्लोळ माजला. मैदान तिन्हीही बाजूंनी बंद असल्यामुळे पळण्यास वाट फक्त गोळ्या येत होत्या त्याच बाजूला होती. काही माणसे त्या बाजूच्या भिंतीवर चढून उड्या टाकण्याच्या बेतात होती. शिपायांनी त्यांच्यावर

गोळ्या झाडल्या. शिकाऱ्याने बंदूक झाडल्यामुळे झाडावरून पाखरे खाली पडावीत त्याप्रमाणे ती माणसे गोळ्या लागल्यामुळे भिंतीवरून पटापट खाली पडली. शेवटी गोळ्या संपल्यामुळे डायरने गोळीबार बंद केला. त्या गोळीबारात चारशे लोक ठार व हजार-दीड हजार जखमी झाल्याचे सरकारने कबूल केले. तथापि हजाराच्यावर प्रेते पडल्याचे समक्ष पाहिलेल्या लोकांनी सांगितले. त्या ठिकाणी जमलेले लोक शस्त्रधारी क्रांतिकारक नव्हते की कोणी गुप्तसंघटनेचे कार्यकर्ते नव्हते. सभेसाठी जमलेले स्त्री, पुरुष, मुले इ. होते. इंग्रजी सत्तेची हिंदी जनतेवर जरब बसविण्याची केवढी निष्ठुर घमेंड !



त्या हत्याकांडाविरुद्ध कोणी ब्रही काढू नये म्हणून ओडवायरने पंजाबात लष्करी अंमल जारी केला. लष्करी अंमल म्हणजे सैतानाचेच राज्य ! लष्करी अंमलदारांनी पंजाबभर असा धुमाकूळ घातला की, जनतेला जीवन जगणे कठीण करून सोडले होते. जनावरापेक्षाही हलाखीचे व अपमानाचे जिणे जगणे अमृतसरच्या नागरिकांच्या वाट्याला आले. त्यांची वीज व पाणी तोडण्यात आले. सायकली जप्त करण्यात आल्या. सांजसकाळी लोकांना गुन्हेगारांप्रमाणे पोलिस ठाण्यावर हजेरी द्यावी लागे. कोणी गोरा माणूस रस्त्यात दिसला की, लवून त्याला मुजरा करावा लागे. चवताळलेल्या लोकांनी शेरवुड

नाथाच्या इंग्रज मिशनरी शिक्षिकेवर ती रस्त्याने जात असता हल्ला केला. इंग्रजांच्या राज्यात एका इंग्रज बाईचा अपमान ! लगेच लष्करी हुकूम सुटला. ज्या गल्लीत तो हल्ला झाला होता त्या गल्लीतील लोकांनी गल्लीतून जाताना पोटावर सरपटत चालत गेले पाहिजे. वरील नियमांच्या पालनात कसूर झाली की फटक्यांची शिक्षा. लहान मुले व स्त्रियांदेखील त्या पाशवी अत्याचारातून सुटल्या नाहीत. फटक्यांच्या वेदनांमुळे मुले बेशुद्ध पडत. त्यांच्या तोंडावर थंड पाण्याचे सपके मारून त्यांना शुद्धीवर आणले जाई व परत फटक्यांची शिक्षा दिली जाई. बेशुद्ध झालेल्या मुलांच्या हातात बेडया घालून त्यांना ढोराप्रमाणे फरफटत तुरुंगापर्यंत ओढून नेण्यात येई. वैतागून कोणी बाहेर गावी जाऊ म्हटले तर ते शक्य नव्हते. रस्ते लष्कराने रोखले होते. आगगाडीची तिकिटे देण्याची बंदी करण्यात आली होती.

जालियनवाला बागेतील हत्याकांडाचा घाव पंजाबातील लोकच काय परंतु देशातील इतर लोक देखील विसरू शकले नाहीत. उधमसिंग हा पंजाबी तरुण त्या वेळी इंजिनिअरिंग महाविद्यालयात शिकत होता. त्याचे वडील व भाऊ जालियनवाला बागेतील कत्तलीत मारले गेले होते. त्या दुःखाचा घाव त्याच्या मस्तकात चिघळत होता. इंजिनिअरिंगचे शिक्षण पुरे करून उधमसिंग आपली सर्व मालमत्ता विकून इंग्लंडला गेले.

जालियनवाला बागेच्या हत्याकांडास त्या वेळचा पंजाबचा गव्हर्नर सर मायकेल ओडवायर हाच खरा जबाबदार होता. तो आता इंग्लंडमध्ये राहात होता. उधमसिंगांनी त्याची ओळख करून घेतली. ते ओडवायरकडे वारंवार जाऊ लागले. त्यांनी ओडवायरचा विश्वास संपादन केला. मनात आणले असते तर त्या संधीचा फायदा घेऊन उधमसिंग त्याला ठार करून सहीसलामत निसटले असते. तथापि ओडवायरला अंधारात मारण्यापेक्षा उघड उघड सार्वजनिक ठिकाणी मारून उन्मत्त ब्रिटिश सत्तेला आव्हान देण्याचे त्यांनी ठरविले.

दि. १३-३-१९४० रोजी लंडनमधील प्रसिद्ध कॅक्सटन हॉलमध्ये एक व्याख्यान होते. त्या वेळी दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. सभेचा विषय राजकारणाचा असल्यामुळे लंडनमधील राजकारणी माणसे सभेला येणार होती. उधमसिंगांनी त्या ठिकाणी आपले उद्दिष्ट साध्य करण्याचे ठरविले.

इंग्रजी पद्धतीचा पोषाख करून व कोटाच्या खिशात एक जंबिया व भरलेले पिस्तुल घालून उधमसिंग कॅक्स्टन हॉलमध्ये गेले. सभा संपल्यावर सभेचे अध्यक्ष लॉर्ड झेटलंड व सर मायकेल ओडवायर जाऊ लागले. इतक्यात उधमसिंग पुढे झाले. त्यांनी ओडवायर व झेटलंड यांच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. ओडवायर जमिनीवर कोसळला. झेटलंडच्या पायाला गोळी लागली व ते बचावले. इतक्यात एका शिपायाने उधमसिंगांवर झडप घालून त्यांचे पिस्तुल काढून घेतले.

उधमसिंगांना पकडण्यात येऊन त्यांच्यावर खटला भरण्यात आला. उधमसिंगांची कोर्टापुढची जबानी त्यांच्या शौर्यास साजेल अशीच बाणेदार आहे.

" माझ्या देशासाठी मी बलिदान करीत आहे. मला त्याबद्दल वाईट वाटत नाही. ते माझे कर्तव्यच होते. डायरने ओडवायरच्या हुकुमावरून जालियनवाला बागेतील लोकांची हत्या केली. त्यामुळे मी ब्रिटिश राज्याचा शत्रू बनलो. ओडवायरच्या कृत्याचा प्रतिशोध (सूड) घेणे भागच होते. म्हणून मी ओडवायरला ठार मारले. "

ज्या कॅक्स्टन हॉलमध्ये काही वर्षांपूर्वी मदनलाल धिंग्रांनी कर्झन वायलीला ठार केले होते, त्याच कॅक्स्टन हॉलमध्ये उधमसिंगांनी ओडवायरला ठार केले. आणि ज्या वधःस्तंभावर मदनलालांना इ. स. १९०९ मध्ये फाशी दिले होते, त्याच वधःस्तंभावर उधमसिंगांना इ. स. १९४० मध्ये लंडनमधील पॅन्टनव्हिले तुरुंगात फाशी देण्यात आले.


जालियनवाला बागेतील हत्याकांडाची चिघळती जखम वीस वर्षांच्या दीर्घ कालावधीभर डोक्यावर घेऊन उधमसिंग वणवण हिंडणाऱ्या अश्वत्थाम्या-प्रमाणे आपल्या शत्रूचा शोध घेत होते. शेवटी त्यांनी आपले ईप्सित साध्य केले.

*****

४१. चलो दिल्ली, जय हिंद !

(नेताजी सुभाषचंद्र बोस)

सुभाषचंद्र बोस यांच्या चेहेऱ्याची ठेवणच मुळी लहानपणापासून विचारमग्न असल्यासारखी दिसायची. जीवनात काही तरी हरवले आहे आणि शोध घेऊनही ते सापडत नाही, अशा खंतीने त्यांचा चेहेरा सदैव ग्रासलेला दिसे. काय हरवले आहे, ह्याची निश्चित कल्पना खुद्द त्यांना



स्वतःला देखील होती की नाही, कोण जाणे. तथापि त्या हरवलेल्याचा शोध घेण्याच्या दुर्दम्य ओढीमुळे त्यांची दृष्टी नी वृत्ती अंतर्मुख झाली होती. त्यांच्या श्रद्धाळू मातेने केलेल्या धार्मिक संस्कारांचा परिणाम असेल तो अथवा स्वामी रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद ह्या बंगालमधील थोर सत्पुरुषांच्या

शिकवणुकीचाही तो परिपाक असेल. मनाला लागलेल्या ह्या आत्यंतिक तळमळीने व जबरदस्त ओढीने त्यांना विद्यार्थिदशेतच हिमालयाच्या गिरि-कंदरात व गंगा-यमुनाकाठच्या तीर्थक्षेत्रांत ओढून नेले. हिमालयात वास करणाऱ्या कोणा ऋषिमुनींच्या उपदेशाने अथवा क्षेत्राच्या ठिकाणी राहाणाऱ्या कोणा संन्यासी-सत्पुरुषाच्या उपदेशाने ज्या हरपलेल्या मृगजळाच्या मागे ते सैरावैरा धावत होते. ते मिळेल व मनाला शांती लाभेल, ह्या हेतूने ते घरातून गुपचिपपणे निघून गेले होते. ते फिरफिर फिरले. परंतु ज्याच्यासाठी त्यांनी घरदार सोडले ते गवसले नाही. त्यांची तळमळ शांत झाली नाही, आणि मनाला शांती लाभली नाही. ' अज्ञेया ' च्या शोधासाठी छोट्या सुभाषचंद्रांनी अज्ञात मुलुखात एकसारखे परिभ्रमण करूनही त्यांच्या मनाभोवती अज्ञाताचे जे सावट झाकळले होते, ते नाहीसे झाले नाही. अशा निराश स्थितीत ते कलकत्त्याला परत घरी आले व विद्याभ्यास करू लागले.

सुभाषचंद्रांचा जन्म कटक येथे इ. स. २३ जानेवारी १८९७ मध्ये झाला. त्यांचे वडील जानकीनाथ हे वकील होते. माता प्रभावतीदेवी ही फार धार्मिक वृत्तीची स्त्री होती. मातेचे धर्माचरण व धार्मिक शिकवणूक ह्या दोहोंचाही सुभाषचंद्रांच्या बालमनावर फार गहिरा ठसा उमटला. कटक येथे प्राथमिक शिक्षण संपवून माध्यमिक शिक्षणासाठी ते कलकत्त्यास गेले. ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या शालान्त परीक्षेत त्यांचा दुसरा क्रमांक आला. त्यानंतर त्यांनी प्रेसिडेन्सी महाविद्यालयात प्रवेश घेतला. सरकारी महाविद्यालयात त्या वेळी बहुतेक प्राध्यापक इंग्रज असत. हे गोरे प्राध्यापक उच्च विद्येने भूषित असूनही त्यांच्यावर खऱ्या अर्थाने विद्येचे संस्कार झालेले नसत. राज्यकर्त्यांची घमेंड, गुर्मी व मग्रुरी ही त्यांच्या रक्तातून वाहत होती. त्यामुळे श्यामल वर्णाच्या हिंदी विद्यार्थ्यांना ते कस्पटा-समान मानीत. तेथे गुरुशिष्यांचे प्रेमळ नाते पवित्र नव्हते. गुलामीत असलेल्या राष्ट्रातील पोरांच्या अंगावर ज्ञानाचे तुकडे फेकणाऱ्या परकेपणाची हीन वृत्ती होती. गुरुशिष्यांमध्ये असा तुटकपणाचा व जित-जेत्यांच्या नात्याचा संबंध असल्या-मुळे एकदा एका इंग्रज प्राध्यापकाने एका हिंदी विद्यार्थ्याच्या तोंडात मारली. ह्या प्रकाराने सुभाषचंद्रांना मनस्वी चीड आली व त्वेषाने ते त्या प्राध्यापकाच्या अंगावर धावून गेले. परंतु तो निसटून गेला. त्यानंतर सुभाषचंद्रांनी

विद्यार्थ्यांत संघटना करून महाविद्यालयावर बहिष्कार घडवून आणला. त्यांच्या ह्या वर्तनाने इंग्रज प्राचार्य व प्राध्यापक यांचे पित्त खवळले व त्यांनी त्यांना महाविद्यालयातून काढून टाकले. त्यानंतर कलकत्त्यातील स्कॉटिश चर्च ह्या महाविद्यालयातून बी. ए. च्या परीक्षेस बसून ते १९१९ साली पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. इंग्लंडला जाऊन १९२० साली ते आय. सी. एस. ही कठीण व सर्वोच्च परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या काळात आय. सी. एस. अधिकाऱ्यांचा थाट एखाद्या सुभेदारासारखा किंवा नबाबासारखा असे. हातात अमर्याद सत्ता, डोळ्यांवर अधिकाराची धुंदी व सरकारकडून दरमहा मिळणाऱ्या रुपयांच्या चळतींची चंदी, ह्यांमुळे आय. सी. एस. अधिकाऱ्याचे जीवन म्हणजे स्वर्गातील यक्ष-गंधर्वांचे विलासी व मिजाशी जीवन! तथापि त्या विलासी जीवनाची भुरळ सुभाषचंद्रांना पडली नाही. एवढे उच्च टोक गाठूनही त्यांच्या हुरहुरत्या मनास शांतता लाभली नाही. त्यांचे आसावलेले डोळे दूरदूर कुठे तरी अज्ञाताचा व अज्ञेयाचा शोध-वेध घेत दिक्कालाचा ठाव घेत होते.

भारतात आल्यावर त्यांनी आय. सी. एस. अधिकाऱ्याचे त्यागपत्र भारतमंत्र्याकडे पाठवून दिले. मुंबई येथे महात्मा गांधींची भेट घेतली. त्यानंतर ते कलकत्त्याला गेले व देशभक्त चित्तरंजन दास यांचे अनुयायी बनले. त्यांच्या सल्ल्यावरून सुभाषबाबू कलकत्त्याच्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. काही दिवसांनंतर युवराजांच्या आगमनाच्या प्रसंगी सुभाषबाबूंनी बहिष्कार घडवून आणल्याबद्दल त्यांना सरकारने सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा दिली.

चित्तरंजन दास हे बंगालचे त्या वेळी मोठे लोकप्रिय नेते होते. सुभाषचंद्रांवर त्यांचे फार प्रेम होते. दासबाबू कलकत्ता नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर त्यांनी सुभाषबाबूंना नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याच्या जागेवर नेमले. त्या वेळी सुभाषबाबूंनी बरीच लोकोपयोगी कामे केली. त्यानंतर बंगालमधील क्रांतिकारकांशी संबंध असल्याच्या वहिमावरून सरकारने त्यांना पकडून मंडाले येथे तुरुंगात ठेवले. तेथे त्यांची प्रकृती ढासळल्याने सरकारने त्यांची सुटका केली. त्यानंतर कलकत्त्यातील जनतेने त्यांच्या गळ्यात कलकत्ता-नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची माळ घातली.

पुढे इ. स. १९३० ते १९४० ह्या दशकातील काल म्हणजे सुभाष-बाबूंनी देशाच्या स्वातंत्र्य-चळवळीत प्रत्यक्ष घेतलेल्या भागाचा काळ. त्या चळवळीबद्दल त्यांना वारंवार शिक्षा झाल्या. तुरुंगवासात वारंवार त्यांची प्रकृती बिघडे. त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठी ते दोन-तीन वेळा युरोपमध्ये गेले. स्वित्झर्लंड येथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. आजारपणात त्यांनी 'भारताचा लढा' हे पुस्तक तयार केले. त्यांच्या लेखन-मुद्रण कामी एमिली शेंकिल ह्या तरुणीने त्यांना खूप मदत केली. आजारपणातून बरे वाटताच भारतीय स्वातंत्र्याच्या बाबतीत त्यांनी इटालीचा मुसोलिनी व जर्मनीचा हिटलर यांची भेट घेतली. त्यानंतर ते भारतात आले.

सुभाषबाबूंच्या जहाल विचारसरणीमुळे त्यांचे व काँग्रेस पुढाऱ्यांचे पटत नसे. त्रिपुरी येथे भरणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांना मिळू नये म्हणून काँग्रेस पुढाऱ्यांनी खूप प्रयत्न केले. परंतु सुभाष-बाबूंचा त्याग, निःस्वार्थीपणा, धडाडी, बुद्धिमत्ता, विद्वत्ता व कर्तृत्व ह्यामुळे ते जनतेच्या गळ्यातील ताईत बनले होते. त्यामुळे महात्मा गांधींनी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी पुरस्कारिलेल्या पट्टाभि सीताराम अय्या यांचा पराभव करून सुभाषचंद्र बोस हे काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. तथापि आपसातील बेदिलीमुळे त्यांच्या मनाला त्यांच्या रुग्णाईत शरीरापेक्षाही अधिक यातना होऊ लागल्या. काँग्रेसचा त्याग करून ते चढाईचे राजकारण खेळू लागले. इतक्यात १९३९ साल उगवले. युद्धाचा ब्युगल वाजला. जर्मनीविरुद्ध इंग्रज सरकार युद्धात उतरले. सावधगिरीचा उपाय म्हणून आजारी सुभाषबाबूंना सरकारने त्यांच्या राहात्या घरात नजरकैदेत ठेविले.

युरोपात पेटलेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्याच्या विषारी धुराने जागतिक वातावरण अंधारून गेले. महायुद्धाच्या ज्वाळा पूर्वेकडे सिंगापूर, जपान व आफ्रिकेत इजिप्तपर्यंत जाऊन भिडल्या. काळाची घोडदौड सुरू होती आणि इतिहास मागे वळून पाहात होता. भूतकाळाचा वेध घेत घेत इतिहासाची दृष्टी शिवाजी महाराजांच्या आग्रा येथील तुरुंगावर खिळली. भांबावलेल्या त्यांच्या डोक्यात लखलखून वीज चमकली. मागच्या गतीने व मागच्या रीतीनेच इतिहासाने पाऊल टाकले. २६ जानेवारी १९४३ रोजी जगातील वृत्तपत्रांत बातमी उठली की, सरकारच्या नजरकैदेतून सुभाषबाबू गुप्तपणे सुटून गेले. इतिहासाची पुनरावृत्ती घडली !

सुभाष बाबू काल रात्री घरातून नाहीसे झाले असे घरातील मंडळींनी जाहीर केले आणि पहाऱ्यावर असणाऱ्या अधिकाऱ्यांना सुभाषबाबूंच्या गुप्त होण्याच्या वेळेसंबंधी काहीच पत्ता नसल्यामुळे ते भांबावून गेले. सुभाषबाबू केव्हा गेले व कोठे गेले ह्याचा कोणालाच पत्ता लागला नाही. असेच वर्ष सव्वा वर्ष गेले आणि एप्रिल १९४२ मध्ये बर्लिन (जर्मनी) रेडिओ लहरींनी एके दिवशी इंग्रजी साम्राज्याला एक जोरदार धक्का दिला. " हा रेडिओ बर्लिन आहे. मी सुभाषचंद्र बोस बोलत आहे. माझ्या हिंदी बंधु-भगिनींनो, हिंदी स्वातंत्र्याचा समय नजीक आलेला आहे. " सुभाषचंद्रांच्या आवाजाने साम्राज्यवादी इंग्रज भयभीत झाले, तर भारतवासीयांच्या मनांना आशेची पालवी फुटली.

खरे पाहाता ज्या वेळी सुभाषबाबू घरातून गुप्त झाल्याचे जाहीर झाले होते, त्याच वेळी ते अफगाणिस्तानचे पहाड-पठारे व दऱ्याखोरी ओलांडून व काबूल नदीचा प्रवाह पार करून काबूल येथे पोहोचले होते. पूर्वनियोजनानुसार दि. १६ जानेवारी १९४१ रोजी ते गुप्त वेषाने घराबाहेर पडले व तयार ठेवलेल्या मोटारीतून चाळीस मैल जाऊन मग एका छोट्या स्टेशनावर आगगाडीत चढून पेशावरला पोहोचले. पेशावरला गेल्यानंतर भगतराम नावाच्या पंजाबी तरुणाला बरोबर घेऊन पठाणी पोषाख करून व मुके-बहिरे असल्याचा बहाणा करून त्यांनी खैबरखिंडीतून भारताची सीमा ओलांडली. कशी ओलांडली, हे एक तर ते अथवा देवच जाणे. युद्धाचे दिवस. चोहीकडे कडेकोट बंदोबस्त आणि सरहद्दीवर तर हातात बंदुका घेऊन रात्रंदिवस पहारे करणारे लष्करी शिपाई व लष्करी गस्त आणि लष्करी चौक्या. त्यांच्या कचाट्यातून जीव-जिवाणू सुटणे मुष्किल; मग मानवी प्राण्यांची आणि शिवाय इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन त्यांच्या तावडीतून निसटणाऱ्या त्यांच्या शत्रूची तर गोष्टच काढावयास नको. काबूल येथे उत्तमचंद नावाच्या व्यापाऱ्याच्या घरी ते राहात असत. उत्तमचंदाचे शेजारच्या इराण, रशिया इत्यादी राष्ट्रांमधील व्यापाऱ्यांशी संबंध होते. त्यांच्या ओळखीने तेथून युरोपात जाण्यासाठी परवाना मिळविण्याचा प्रयत्न ते करू लागले. शेवटी इटली देशाकडून त्यांना परवाना मिळाला. त्या परवान्यावर इटालियन नागरिकाचे नाव धारण करून एका मोटारीतून काही

जर्मन व इटालियन गृहस्थासमवेत ते रशियन हद्दीत पोहोचले. तेथून पुढे रेल्वेने ते मॉस्को येथे गेले. काही दिवस तेथे राहून भारताच्या स्वातंत्र्यासाठी रशियाचे साह्य मिळण्याच्या शक्यतेचा अंदाज घेऊन ते पुढे जर्मनीला गेले. हिटलरने त्यांचे सन्मानपूर्वक स्वागत केले. इंग्रज-अमेरिकेशी लढणाऱ्या हिटलरने भारताच्या स्वातंत्र्यासाठी सुभाषबाबूंना सर्व प्रकारचे साह्य देऊ केले. ह्याच काळात एमिली शेंकिलशी त्यांनी विवाह केला.

त्याच सुमारास जपानने जर्मनीच्या बाजूने इंग्रजांविरुद्ध युद्धात दंड थोपटले. ह्या संधीचा फायदा जपानमध्ये स्थायिक झालेल्या रासबिहारी बोस ह्या प्रख्यात क्रान्तिकारकाने घेण्याचे ठरविले. चीन, जपान, सिंगापूर, मलाया, ब्रह्मदेश ह्या पूर्वेकडील देशांत व्यापार, धंदा व नोकरीनिमित्त बरेच भारतीय गेले होते. त्यांच्यापैकी बहुतेक लोक इंग्रजी सत्तेचा द्वेष करीत होते. पूर्व भागात पसरलेल्या या लोकांची रासबिहारी बोसांनी जपानला टोकियो येथे सभा घेतली. जपानचे साह्य व सहकार्य घेऊन, परंतु स्वतंत्रपणे भारतीय स्वातंत्र्यासाठी लढा देण्यासाठी "इंडिअन इंडिपेन्डन्स लीग" ची स्थापना करण्यात आली. रासबिहारी बोसांना लीगचे अध्यक्ष निवडण्यात आले. इंग्रजांशी लढण्यासाठी पैसा जमविण्यात आला व "आझाद हिंद" फौजेची उभारणी करण्यात आली.

पूर्वेला युद्धाचा डोंब उसळला. जपानने ब्रह्मदेशापर्यंत धडक मारून इंग्रजांना आसामात मागे रेटले. युद्धाच्या धुमश्चक्रीने काळवंडलेली पूर्व क्षितिजे भारताच्या स्वातंत्र्याच्या आशेने उजळू लागली. जागतिक युद्धाची ही बदलती चित्रे बर्लिनहून सुभाषबाबू पाहात होते. भारतीय स्वातंत्र्याचा क्षण समीप आला आहे, असे त्यांना वाटले. जर्मनी व जपानच्या दोन पानबुड्यांतून एक सेवक बरोबर घेऊन ते सागराच्या उदरातून प्रवास करीत जपानकडे निघाले. निरनिराळ्या समुद्रांच्या पृष्ठभागावर गस्त घालणाऱ्या इंग्रज-अमेरिकेच्या आरमारी बोटींच्या काफिल्यांना चुकवीत चुकवीत व हर घडीला जिवघेण्या भयानक प्रसंगांशी सामना देत देत त्या मृत्युंजय वीराने सुमारे तीन महिन्यांनी उगवत्या सूर्याच्या भूमीवर पाऊल ठेविले. सुभाषबाबूंच्या देदिप्यमान जीवनाची कल्पना पूर्वेकडील भारतीयांना होतीच. जनतेने हर्षभराने त्यांच्या आगमनाचे स्वागत केले. सुभाषबाबू जपानमध्ये प्रगट होताच २१ ऑक्टोबर

१९४३ ला स्वतंत्र हिंदुस्थानच्या हंगामी सरकारच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली. इंडियन इंडिपेन्डन्स लीगचे अध्यक्ष रासबिहारी बोस यांनी सुभाषबाबूंच्या हाती लढ्याची सूत्रे सुपूर्द केली. सुभाषबाबूंना हिंदी जनतेने 'नेताजी' हा किताब दिला व स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचे पंतप्रधान म्हणून निवडून दिले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी देशोदेशी वणवण हिंडून प्रयत्न करणाऱ्या क्रांतिवीर रासबिहारींना सुभाषबाबूंनी हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार नेमले.

ब्रह्मदेशात इंग्रजांचा पराभव करून जपान्यांनी इंग्रजांच्या साठ हजार सैनिकांना व अधिकाऱ्यांना कैद केले होते. त्यात हिंदू होते, मुसलमान होते, शीख होते नी खिश्चनही होते. हे सर्व युद्धकैदी सुभाषबाबूंच्या स्वाधीन करण्यात आले. युद्धबंदी झालेल्या ह्या सैनिकांच्या मनापुढे काळेकुट्ट भवितव्य उभे राहिले. त्यांच्या आशा-आकांक्षांचा चक्काचूर झाला होता. नेताजी सुभाषचंद्रांचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी होते की, ह्या निराशेने गलितगात्र झालेल्या सैनिकांत विजेचा संचार झाला. त्यांच्या वीरश्रीयुक्त शब्दांनी सैनिकांची मने देश-भक्तीच्या ज्वलंत भावनेने धगधगून गेली. "तिथे लांब अंतरावर, त्या नदीपलीकडे, त्या अरण्यापलीकडे, त्या टेकड्यांपलीकडे आपली ध्येयभूमी वसत आहे! ज्या भूमीमध्ये आपण जन्मलो ती भूमी वसत आहे! ऐका हिंदुस्थान तुम्हाला साद घालीत आहे! रक्त रक्ताला बोलावीत आहे. उठा, तुमची शस्त्रं उचला, शत्रूच्या फळीमधून आपण आपला मार्ग कापीत जाऊ. किंवा परमेश्वराची तशी इच्छाच असेल तर हुतात्म्याचं मरण पत्करू! आपल्या अंतिम निद्रेमध्येही आपण दिल्लीस नेणाऱ्या रस्त्यांचेच चुंबन घेऊ. दिल्लीचा रस्ताच स्वातंत्र्याचा रस्ता आहे. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो. चलो दिल्ली, जय हिंद!"

नेताजींच्या स्फूर्तिप्रद भाषणांनी समरांगणात पडलेल्या प्रेतामध्ये देखील आदेश संचारला असता, मग ते तर जिवंत सैनिक होते. धडक मारून त्यांनी आसाममधील मणिपूर-कोहिमापर्यंत चाल केली. मातृभूमीच्या मातीची चिमूट घेऊन सुभाषबाबूंनी ती भक्तिभावाने भाळी लावली. आझेयाचा वेध घेणाऱ्या चक्षूंना अन् अंतश्चक्षूंना ते अज्ञेय आता गवसले. अंदमानच्या भूमीवर पाऊल ठेवतानाही सुभाषबाबूंचे मन भरून आले. ज्या सेल्युलर

कारागृहात भारतातील शेकडो क्रान्तिवीराचे वास्तव्य होते, त्या पवित्र स्थळाला त्यांनी वंदन केले. अंदमान बेटाचे नाव त्यांनी 'शहीद' (हुतात्मा) बेट असे ठेविले.

नेताजींवर सैनिकांनी अपार प्रेम केले. जात, धर्म, प्रांत असे सर्व भेद विसरून सर्वजण एकदिलाने आझाद हिंद फौजेच्या झेंड्याखाली उभे होते. जनरल जगन्नाथराव भोसले होते. कॅप्टन सैगल होते, कर्नल शहानवाझ खान होते, कॅप्टन लक्ष्मी व कर्नल लोकनाथन् आणि ले. कर्नल हाबिबूर रहिमान होते. खरी राष्ट्रीय एकात्मता! एक दिल, एक कदम!

नेताजींवर जनतेनेही अपार प्रेम केले. भारतीय स्वातंत्र्य-दिनानिमित्त झालेल्या समारंभात नेताजींच्या गळ्यात घातलेल्या हारांचा त्यांनी लिलाव पुकारला. बोलता बोलता त्या हारावर नऊ लाखांची किंमत लागली हे पाहून एका धनाढ्य व्यापाऱ्याने आपली सर्व संपत्ती त्या हारावर लावली. नेताजींने आझाद हिंद सरकारची बँक सुरू करताच हिंदी व्यापाऱ्यांनी त्या बँकेकडे अक्षरशः पैशाचा पूर वाहविला. एवढेच नव्हे तर स्त्रियांनी आपले बहुमोल अलंकार देशाच्या स्वातंत्र्यासाठी नेताजींच्या चरणी अर्पण केले.

——आणि दैवाचे फासे उलटे पडू लागले. जपानी फौजांचा ठिकठिकाणी पराभव होऊ लागला. ते सैन्य ब्रह्मदेश सोडून गेले. आझाद हिंद सेनेलाही माघार घ्यावी लागली. पुढे ठरवावयाच्या धोरणासंबंधाचे विचारविनिमय करण्यासाठी नेताजी विमानाने टोकिओला निघाले. त्यांच्याबरोबर कर्नल हबिबूर रहिमान होते. दुर्दैवाने ते विमान रस्त्यात पेटले व खाली कोसळले. त्या अपघातात नेताजी मरण पावले. ज्वलंत भावनांचे, धगधगत्या कर्तृत्वाचे व रसरसलेल्या देशभक्तीचे एक अग्निलोलकासारखे तेजस्वी जीवन विमानाच्या अग्निज्वालांत अंतर्धान पावले! स्वतंत्रतादेवीच्या मंगलचरणांवर थोर देशभक्ताने स्वतःच्या जीवनाचे केलेले बलिदान!

चिराग बनकर जो जल गये हैं।
सलाम सौ सौ उन्हें हमारा ॥